# ख्रिस्तायन

नाताळ ई - अंक ♦ वर्ष चौदावे ♦ २५ डिसेंबर २०२४ ♦ संपादक ख्रिस्तोफर रिबेलो



Design : Paul Dmello


BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD
ESTD. 1918
(SCHEDULED BANK)
"Celebrate the Joy of Giving with
Bassien Catholic Co-operative Bank
this Christmas Season!
Invest in moments that matter and
gift a prosperous future to your loved ones.
Merry Christmas
And Happy New Year
filled with financial security, growth, and joy!"
Board of Directors
Mr. Benauld Dias
Chaiman
Mr. Simon Soares
Vice Chairman
Mr. Sandeep Seth
CEO
www.bccb.co.in
Helpline no. 080 6942 0000
Corporate Add. - Catholic Bank Building, Papdy naka, Vasai west 401 207
For more details visit our

# ख्रिस्तायन

नाताळ ई-अंक वर्ष चौदावे २५ डिसेंबर २०२४

**संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो**

**सहसंपादक : एडवर्ड डिसोजा**

**तांत्रिक सहकार्य : स्वप्निल रिबेलो**

**मुखपृष्ठ : पॉल डिमेलो, गास**

**विशेष साहाय्य : स्मिता ख्रि. रिबेलो**

**मोबाईल ॲप – चार्ल्स क्लेमेंट गोम्स**

**संपर्क / अभिप्राय :** आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा.

chrisrtayan25online@gmail.com (9819436078)

**आभार : आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे " ख्रिस्तायन" तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही

**© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन**

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित), वाघोली.

रजि.नं.टीएनए /व्हीएस्आय /आरएस्आर / सीआर / ४२९ / ८८-८९ दिनांक ९-१२-१९८८

## कोकण विभागातील अग्रेसर पतपेढी

आपल्या व्यावसायीक व कौटुंबिक विकास योजनेसाठी पतपेढीच्या सेवा

*१३ महिन्यापेक्षा जास्त ते १८ महिन्यापर्यंत*

**जीवन विकास दिर्घ मुदत ठेव योजना ७.६० %** (सरळव्याज)

ज्येष्ठ नागरीकांच्या ठेवीवर - द.सा.द.शे. ७.५५% व्याजदर

**सर्वसाधारण सभासदांस द.सा.द.शे. ७.३० % व्याजदर**

८.५०% ते ११.७५% व्याजदराच्या विविध सुलभ कर्ज योजना.

**शैक्षणिक कर्ज किफायतशीर व्याजदरात - ८.९५%**

**घरबांधणी कर्ज द.सा.द.शे. ९% व्याजदर**

**फ्लॅट खरेदी द.सा.द.शे. ८.५०% व्याजदर**

**सोलार पॅनल कर्ज द.सा.द.शे. ८.५०% व्याजदर**

**शॉप, गाळे, मशिनरी खरेदीसाठी द.सा.द.शे. ९.५०% व्याजदर**

**(१ कोटीपर्यंत कर्ज वितरण करणारी एकमेव पतसंस्था)**

**रु. ५ लक्ष पतकर्जाचे त्वरीत वितरण**

**नियमित कर्ज भरणा करणा-यांना व्याजात २% रिबेट**

**३१ ऑक्टोबर २०२४ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे**

* भागभांडवल रु. १४.०५ कोटी
* कर्जे रु. २२१.५९ कोटी
* ठेवी रु. ३७७.८३ कोटी
* गुंतवणूक रु. २३९.२८ कोटी
* एकूण व्यवसाय रु. ५९९.४२ कोटी
* सभासद संख्या १७३५८
* निव्वळ एन. पी. ए. ०%

*** दि. ३१/०३/२०२४ अखेर नफा रु. ६.७१ कोटी**

**शाखा -**

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी | नालासोपारा (प.) |
|---|---|---|---|---|---|
| फोन :८००७९५५४३० | मो. ७२६१९१९०१२ | मो. ०८५५०९१०२६४ | मो. ७२६१९१९०१३ | मो. ०८५५०९१०६४३ | मो. ७८७५८९५५०८ |

लता जे.फोस
मुख्य कार्यकारी अधिकारी

संज्याव जे.रोझारियो
उपाध्यक्ष

नेल्सन पी. दोडती
अध्यक्ष

व संचालक मंडळ

# या अंकात ...


## संपादकीय...
फादर फ्रान्सिस दिब्रिटो – एक दीपस्तंभ (श्रद्धांजली)
'गीत' नाताळ अंक - लेस्ली से. डायस

## कथा :-
चळवळ - जोसेफ तुस्कानो
गंगा - डॉ. नेहा सावंत
स्ट्रॅटेजी - स्टॅन्ली गोन्सालविस
ब्रुटस तू सुद्धा! - दीपक मच्याडो
घडत्या कादंबरीचा तुकडा - प्रसाद कुमठेकर
जानू - बेर्नादित रुमाव
घरजावई - लेस्ली से. डायस
थँक्सगिविंग - फ्लॉरी रॉड्रिग्ज
भिक्षां देहि - मॅटिल्डा डिसिल्वा
हुंदके - अमर म्हात्रे
चिंचेचे झाड - बॅप्टिस्ट एम वाझ
वायलसार - पॉल घोन्सालविस
पोलिस नावाचा माणूस... - ॲलेक्स मच्याडो
डोंबारी - फ्रँक डॉ. मिरांडा
सोलो ट्रिप - डॉ. रिबेका दोडती
एक अनोखी भेट - सुनिता परेरा
मॅनेजर - सुनिल सा. डिमेलो

## व्यक्तिचित्रे :-
माझे आजोबा - मुक्ता अशोक टिळक
एक प्रथितयश उद्योजक - जॉन गोन्सालविस
वसईतल्या खाद्य क्रांतीच्या जनक - अमर म्हात्रे
मालाडसॅा भैय्या ! - पेट्रेशिया गोन्साल्वीस
कृतीशील 'पेरणी' फा. एलायसची - सिडनी जस्टीन मोरायस
अन् आदिती डॉक्टर झाली - भरत वाळींजकर
What’s stopping you? - Savin Tuscano

## प्रवासवर्णन :-

बाबूल मोरा - डॉ. अनुपमा उजगरे

कष्टाची बरी भाजी भाकरी... - फ्रान्सिस डिमेलो

## ग्रंथ परीक्षण :-

स्त्रीवादाचा क्रॅशकोर्स - डॅनिअल मस्करणीस

## वैचारिक लेख :-

तुला बोलायला कोणी सांगितलं होतं ? - सायमन मार्टिन

भारत देशाचा नागरिक म्हणून जगताना.. - अमित उषा जगू घोडके

कथा नकोशा झालेल्या बाळाची - प्रा. स्टीफन आय. परेरा

'सत्य, मार्ग आणि जीवन मीच आहे!' - रेमंड मच्याडो

विवेक वादाचा प्रसार - फ्रान्सिस आल्मेडा

वसईतील खिस्तसभा हा समूह, कळप की.... - ॲड. अतुल आल्मेडा

एव्हरी प्रॉब्लेम हॅज ए सोल्यूशन - बावतीस पेडीकर

सकारात्मकता एक कल्पवृक्ष! - ॲड. जॉन रॉड्रिग्ज

गोष्ट आर्थिक साक्षरतेची- ब्रिनल क्रास्टो

निमित्त लिहिण्यासाठी की न लिहिण्यासाठी... - जॉर्ज डाबरे

आंघोळ - एमेल आल्मेडा

योहानाचे धैर्य - फा. असिस रॉड्रिग्ज

वय आणि वलय - डॉ. नेन्सी विन्सेंट डिमेलो

## सामाजिक लेख :-

अनिवासी वसईकर कुपारी - सॅबी परेरा

'रॉ'ची दहशत....! - जॉन कोलासो

कोडोलीचा नाताळ - पौलस वाघमारे

पिंपळोबा - डॉ. फेलिक्स डिसोजा

ख्रिस्ताचे सामाजिक राजकारण - फादर मायकल जी.

टिल्लू महादेव - प्रा. जगदीश संसारे

पालखी - अतुल काटदरे

सुखी माणूस - क्लेमेंट डिमेलो

जीवन अनुभव - श्रीमती सुजाता पीटर तुस्कानो

पारंब्या - आयवन क्रास्टो

करशील जे.... - बर्नड लोपीस

## कविता / चारोळया :-

रवीन्द्र दामोदर लाखे, संगीता अरबुने, महेश लीलापंडित, अजित अभंग, अक्षय शिंपी, इग्नेशियस डायस, सबिना फोस, अमोल विनायकराव देशमुख, जॅक गोम्स, बाबू फिलीप डिसोजा, आयवन क्रास्टो, सुनिल बा. डिमेलो, शकुंतला नारायण पाटील

## कलाकुसर :-

लिओनार्ड रिबेलो, ऑस्टिन डाबरे, रॉयल बाप्तिस्टा रॉड्रिग्ज, सेलीना कोरिया

# संपादकीय ...

प्रिय बंधुभगिनींनो, आपणास नाताळ सणाच्या अनेक हार्दिक शुभेच्छा.

दरवर्षीप्रमाणे पुन्हा एकदा साहित्यिक मेजवानी घेऊन आम्ही आपणापाशी आलो आहोत. मी नेहमी म्हणतो, आम्हा ख्रिस्ती धर्मीयांचा एकमेव सण म्हणजे नाताळचा सण. डिसेंबर महिन्यात एकदा आगमनकाळाला सुरुवात झाली की ख्रिस्ती घरामध्ये एक वेगळाच माहोल तयार होतो आणि त्याच उत्साहाने प्रेरित होऊन आम्ही तयारीला लागतो. मी प्रत्येक वर्षी संपादकीयामध्ये आवर्जून उल्लेख करतो आणि करत राहीन की दिवाळी सण आणि दिवाळी अंक हे जसे अतूट नाते आहे तसेच नाताळ सण व नाताळ अंक यांचे नाते व्हावे असे आमचे स्वप्न आहे आणि ते आम्ही २२ वर्षाअगोदर प्रथम छापील स्वरुपात अंक प्रकाशित करून प्रत्यक्षात आणि गेली चौदा वर्षे हा अंक ऑनलाइन प्रकाशित करून ते पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत.

मंडळी, आज हे संपादकीय लिहित असताना विशेष स्मरण करतोय ते म्हणजे फा. फ्रान्सिस दिब्रिटो ह्यांचे. २५ जुलै २०२४ रोजी त्यांचे निधन झाले. माझ्यावर त्यांचा विशेष लोभ होता. त्यांना श्रद्धांजली वाहणारा वेगळा लेख या अंकात आहेच. पण त्यांची आठवण करणे क्रमप्राप्त आहे. प्रत्येक वर्षी फा. दिब्रिटो ह्यांचे फक्त लेखच मिळत नाही तर मार्गदर्शनपर आशीर्वाद मिळत होते. यावर्षी आणि यापुढेही त्यांच्या उणीव नेहमी भासत राहील.

दरवर्षी वसई परिसरातले ज्येष्ठ लेखक- कवी ह्यांचा सहभाग या अंकात मला लाभतोच पण वसईबाहेरीलही साहित्यिक या उपक्रमात मनमोकळेपणाने सामील होत असतात. मी ऑक्टोबर महिन्याच्या सुरूवातीला अंकाच्या तयारीला लागलो की सर्वप्रथम माझ्याकडे असलेल्या लिस्टमधील सर्व लेखक-कवी-चित्रकार ह्यांना मेसेज करतो. मग लेख-कविता चित्रे यायला सुरुवात होते. पण काही व्यक्तींचा मला प्रकर्षाने उल्लेख करावा वाटतोय, कारण त्यांचे फक्त लेखच येत नाहीत तर मार्गदर्शनपर सूचनाही येत असतात.  असेच कायम प्रोत्साहन मिळत असते ते म्हणजे ज्येष्ठ लेखिका

डॉ.अनुपमा निरंजन उजगरे, ज्येष्ठ विज्ञान लेखक जोसेफ तुस्कानो, ज्येष्ठ कवी सायमन मार्टिन, फा. (डॉ.) रॉबर्ट डिसोजा, प्रथितयश कवी वर्जेश सोलंकी, महेश लीलापंडित, माझ्यावर मोठ्या बहिणीप्रमाणे मार्गदर्शन आणि प्रेम करणाऱ्या डॉ. नेहा सावंत, मी ज्यांना कुपारी पू. लं. म्हणतो ते मित्रवर्य सॅबी परेरा, प्रथितयश तरुण कविद्वय व जवळचे मित्र झालेले डॉ. फेलिक्स डिसोझा व इग्नेशियस डायस, पुणे येथील ज्येष्ठ पत्रकार कामिल पारखे, पत्रकार सुहास बिऱ्हाडे, वैष्णवी राऊत ह्या सर्वांचे सतत मार्गदर्शन आणि मोलाच्या सूचना मिळत असतात, त्यांच्या व्यस्त शेड्यूलमधून ते नेहमी माझ्यासाठी वेळ काढतात, त्यामुळे मी सतत त्यांच्या ऋणात राहू इच्छितो.

या अंकाची अनुक्रमणिका बगितली तर तुमच्या लक्षात येईल की अनेक मान्यवर लेखक-कवी आणि चित्रकार ह्यांचा समावेश आहे. ह्या सर्वांना दरवर्षी मी देत असलेल्या त्रासाला न वैतागता व मानधनाची अपेक्षा न करता फक्त साहित्यिक चळवळ म्हणून ते कुटुंबिय म्हणून माझ्या सोबत असतात. या सर्वांना माझे मन:पूर्वक धन्यवाद.

मंडळी, गेली तेरा वर्षे लेस्ली से. डायस हे ‘गीत’ हा नाताळ अंक नियमितपणे प्रकाशित करत आहेत. ‘खिस्तायन’ ऑनलाईन व ‘गीत’ छापील अंक हे नाताळ अंक यावर्षी आम्ही त्याविषयी माहिती अंकात दिली आहे. एक विशेष बाब म्हणजे गेली ८-१० वर्षे आपल्या या अंकाचे मुखपृष्ठ बनवून देणारे चित्रकार ‘पॉल डिमेलो, गास’ ह्यांचे गेल्याच महिन्यात वसईतील स्थानिक संस्कृतीवर आधारित चित्रांचे प्रदर्शन ख्यानाम अशा जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये संपन्न झाले. पॉल हे एक सत्कृत्य म्हणून विनामोबदला मुखपृष्ठ बनवून देत आहेत, त्यांचे खास आभार.

मंडळी, आम्ही हा अंक ‘पीडीएफ’ स्वरुपात देत आहोत, त्यामुळे आपणास अंक वाचण्यासाठी पूर्ण वेळ ऑनलाइन असण्याची गरज नाही. त्याचबरोबर या अंकाचे अँड्रॉईड ॲपही आहे. प्ले स्टोअर वरुन आपण हा अंक डाऊनलोड करून नंतर आपल्या सोयीप्रमाणे अगदी मोबाईलवरही वाचू शकता. आपण हा अंक वाचल्यानंतर इतरांनाही कळवा.. आणि आपल्या सूचना आणि अभिप्रायांची देखील आम्ही वाट पाहत आहोत.

**नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!**
**Merry Christmas & Happy New Year**

# फादर फ्रान्सिस दिब्रिटो – एक दीपस्तंभ

■ ख्रिस्तोफर रिबेलो

वसईचे नाव साहित्यिक क्षेत्रात सर्वदूर पसरविणारे फा. फ्रान्सिस दिब्रिटो हे वसईचे भूषण आहेत, आमच्या सारख्या साहित्यिक आणि सामाजिक चळवळीत चंचु प्रवेश करू इच्छिणाऱ्या अनेकांचे प्रेरणास्थान, वसईच्या इतिहासात त्यांचे नाव नक्कीच फार वरचे आहे, त्यांनी आपल्या धर्मगुरू पदाचा सुवर्णमहोत्सवही साजरा केला आहे, त्यांचे कार्य फक्त चर्च पुरते सीमित न राहता ते वैश्विक पातळीवर जाऊन पोहोचले, वसईच्या धार्मिक वाटचालीत त्यांचा सिहांचा वाटा आहेच पण मराठी साहित्यातील एक सिध्दहस्त लेखक, ज्येष्ठ संपादक, एक निष्ठावान पर्यावरण वादी, वसईच्या हितासाठी लढणारा एक तळमळीचा निडर कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे आणि यापुढेही राहील.

फादर दिब्रिटो यांनी 'हरित वसई संरक्षण समिती'च्या माध्यमातून वसईभर पर्यावरणविषयक जागृती केली. फादर दिब्रिटो यांनी १९८३ ते २००७ अशी २४ वर्षे मराठी भाषिक ख्रिस्ती समाजाचे मुखपत्र असलेल्या 'सुवार्ता'चे संपादक म्हणून धुरा वाहिली. 'सुवार्ता'चा अंतर्बाह्य कायापालट करण्यात फादर दिब्रिटोंचा महत्त्वाचा सहभाग आहे. त्यांनी व्याख्यानमाला, लेखन कार्यशाळा, चर्चासत्रे, सुवार्ता साहित्य मेळावा आदि उपक्रमांद्वारे या नियतकालिकाला धार्मिक वार्तापत्राकडून एक उत्कृष्ट साहित्यिक मासिक तसेच समाज प्रबोधनाचे एक साधन बनविले. त्यांनी वसई परिसरात अनेक ख्रिस्ती युवक-युवतींना लिहिते केले. फादर दिब्रिटोंनी ख्रिस्ती लेखकांव्यतिरिक्त अन्य समाजातील लेखकांनाही सहभागी करून घेतले तसेच त्यांनी अनेक साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक उपक्रम राबवले. वसईतील साहित्य, पर्यावरण आणि सामाजिक चळवळीतील त्यांचे योगदान कदापि विसरता येणार नाही.

फा. दिब्रिटो यांनी १९९२मध्ये पुणे येथे झालेल्या पंधराव्या मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भुषवले होते. ९३व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद हा त्यांच्या शिरपेचात मानाचा तुरा होता. पत्रकारिता, संपादन, समाजसेवा व लेखन आदि क्षेत्रात त्यांना अनेक पुरस्कार लाभले आहेत. महाराष्ट्र शासनाने पहिली ते आठवीच्या

मराठी विषयासाठी अभ्यासक्रम निश्चित करण्याऱ्या पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ , 'बालभारती' या संस्थेच्या भाषासमितीवर त्यांची नेमणूक केली होती त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारने पैठण येथील संतपीठाचा अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी असलेल्या अभ्यासगटाचे सदस्य म्हणूनही फादर दिब्रिटो यांची नियुक्ती केली होती.

२०१६ साली ‘फेसबूक’वरील एका लेखामध्ये मी वसईतील साहित्य आणि कला क्षेत्रात नावाजलेल्या व्यक्तींविषयी ऊहापोह केला होता आणि त्या लेखात फादर दिब्रिटो हे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व्हावे अशी इच्छा व्यक्त केली होती. खूप जणांनी त्यावेळी ही अशक्य गोष्ट आहे असे मला सांगितले होते, पण मी पाहिलेले हे स्वप्न सप्टेंबर २०१९ मध्ये त्यांची अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा झाली आणि माझ्या स्वप्नांवर विश्वास बसला. त्यांचे अभिनंदन करण्यासाठी आम्ही जीवन विकास मंडळाचे काही कार्यकर्ते जीवन दर्शन केंद्रात गेलो होतो त्यावेळी त्यांनी स्वत:हून मला कोणीतरी हे त्यांच्या कानावर घातल्याचे सांगितले व माझे सर्वांसमोर आभार मानले. जानेवारी २०२० मध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पासून धाराशिव (उस्मानाबाद) येथील संमेलन स्थळ ते परत हा संपूर्ण प्रवास एक भारावलेला मंत्रमुग्ध काळ होता. आम्ही बोलत असलेली ‘कादोडी’ भाषा हीच फादरांची सुद्धा भाषा आहे ह्याचे महाराष्ट्रातील इतर भागातील साहित्यप्रेमींना सांगितल्यावर त्यांना वाटणारे अप्रूप विशेष आनंद देणारे होते.

मी संपादित करत असलेला 'ख्रिस्तायन' एकमेव ऑनलाईन नाताळ अंक आणि कुपारी समाजाच्या बोली भाषेतील एकमेव 'कादोडी' अंकासाठी फादरांचा सदैव आमच्या पाठीवर कौतुकाचा आणि प्रोत्साहनाचा लाभत असलेला हात आम्हाला सतत नवीन हुरूप देत असायचा. कित्येक वेळा स्वत: फोन करून त्यांनी काहीक सूचना आणि मार्गदर्शन केले आहे. प्रथितयश लेखक-कवी तसेच नवोदितांनाही वेगवेगळ्या विषयांद्वारे लिहिते करण्याची प्रेरणा त्यांनीच मला दिली होती, त्यासंबंधी अनेक मुद्दे ते प्रकर्षाने अधोरेखित करत असत. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणाची तयारी करत असताना त्यांनी 'ख्रिस्तायन' व 'कादोडी' ह्या दोन्ही अंकांची इत्यंभूत माहिती घेतली होती आणि नंतर त्यांनी भाषण त्रोटक करावे लागल्यामुळे ते समाविष्ट न करता आल्याचे फोन करून सांगितले होते. इतका मोठा साहित्यिक इतका नम्र कसा काय होऊ शकतो ह्याचे कोडे मला आजही उलगडले नाही.

संमेलनावेळी उठलेले पाठीचे दुखणे त्यांना आज त्यांच्या अंतापर्यंत सोबत राहिले, ‘मल्टीपल मायलोमा’ सारखा विकार जडला आणि त्यातच त्यांची अखेर झाली. मला ते सतत एका दीपस्तंभासारखे भासत होते, स्वत:चा प्रकाश इतरांना देत त्यांचा फक्त प्रवासच त्यांनी उजळवला नाही तर तो प्रकाशही इतरांना देण्यास त्यांनी उद्युक्त केले.

‘मुलांचे बायबल’ लिहून ‘ख्रिस्ताची गोष्ट’ सांगत ‘ख्रिस्ती सण आणि उत्सव’ यांची माहिती देऊन ‘परिवर्तनासाठी धर्म’ कसा असावा यासाठी ‘संघर्षयात्रा ख्रिस्तभूमीची’ करणाऱ्या तसेच ‘कृतघ्न’ समाजमनावर आपल्या संयत शैलीत ‘आनंदाचे अतरंग’ उमटवत ‘मदर तेरेसा’ यांच्या पथावर ‘पोप जॉन पॉल दुसरे’ यांचा आदर्श ठेवत ‘तेजाची पाऊले’ टाकीत ‘पथिकाची नामयात्रा’ करून ‘सृजनाचा मळा’ उभारणाऱ्या व त्यात ‘सृजनाचा मोहर’ फुलविणाऱ्या तरीही अजून ‘ओॲसिसच्या शोधात’ असलेल्या आणि वसईच्या हरित लढ्यात ‘पर्वतावरील प्रवचन’ द्वारे जनमानसात अन्यायाविरुद्ध लढण्याचे ‘तरंग’ उमटविणाऱ्या, त्यातूनच हितचिंतकांचा ‘गोतावळा’ जमा करणाऱ्या म्हणूनच अगदी अभिमानाने ‘नाही मी एकला’ म्हणत लोकांच्या मनावर आपल्या संवेदनशील वृतीने राज्य करणाऱ्या आणि महाग्रंथ ‘सुबोध बायबल’द्वारे ख्रिस्तेतर समाजात बायबल पोहोचविणाऱ्या फा. दिब्रिटोंचे मराठी सारस्वतात मानाचे स्थान सदैव अबाधित राहील.

२५ जुलै ह्या दिवशी माझा वाढदिवस आणि ह्याच दिवशी फादर दिब्रिटोंचे देहावसान हा संयोग म्हणावा की काय हा संभ्रम मनात निर्माण झाला आहे. कदाचित त्यांच्यासह असलेले ऋणानुबंध कायम राहावे, माझ्या मनात त्यांची आठवण कायम राहावी म्हणून म्हणून असे झाले असावे.

प्रिय तात्या फादर, प्रत्येकाला एक दिवस ह्या जगाचा निरोप घेऊन जायचे आहे, पण आपण चर्चिलेली पुढील कामं राहून गेली, 'ख्रिस्तायन'चा एक प्रकाशन सोहळा तुमच्या अध्यक्षतेखाली घ्यायचा राहिला आणि आपल्या ‘कादोडी’ भाषेतील संमेलन व माझ्यासारख्या साहित्य क्षेत्रात थोडीबहुत मुशाफिरी करणाऱ्या नवोदित साहित्यिकांचा मेळावा तुमच्या उपस्थितीत घ्यायचा राहून गेला. फादर, तुम्हास भावपूर्ण श्रद्धांजली. तुमचा माझ्यावर असलेला लोभ सदैव आठवणीत राहील.

# 'गीत' नाताळ अंक.

■ **लेस्ली से. डायस, सांडोर वसई**

माझे वडील पुस्तकप्रेमी होते. पुस्तके वाचून ते त्यातल्या गोष्टी आम्हाला सांगत असत. त्यामुळे लहानपणीच पुस्तकांशी माझी छान गट्टी जमली होती. पुढे शिक्षण संपवून मी नोकरीस लागलो. आता खऱ्या अर्थाने मीही पुस्तकप्रेमी झालो होतो. वाचनाचा झपाटा एवढा वाढला होता की दिवसाला दोनअडीचशे पानांचे पुस्तक सहज वाचून मी हातावेगळे करू लागलो.

गोरेगाव ही माझी कर्मभूमी. त्याकाळी गोरेगाव पश्र्चिमेस स्टेशनजवळ 'पंचम' नावाचे एक खाजगी वाचनालय होते. तेथे नुकतीच प्रकाशित झालेली नवीन नवीन पुस्तके सहज उपलब्ध असायची. रोज संध्याकाळी कामावरून सुटल्यावर तेथून मी पुस्तक बदलून दुसरे घेई.

प्रवासात गर्दी कितीही असो कामावर जाता येता, ट्रेनची, बसची वाट बघताना जेथे जेथे मला संधी मिळेल तेथे पुस्तक उघडून मी वाचन करीत असे. गर्दीत उभा असतानाही माझं वाचनात कधी खंड पडत नसे. वाचनाचा माझा हा झपाटा पाहून वाचनालयात काम करणारी मुलगी खूप अचंबित होऊन जाई. चांगली वाचनीय पुस्तके, कादंबऱ्या, प्रवासवर्णन आणि छान छान दिवाळी अंक निवडताना माझ्या मदतीस ती नेहमी तत्पर असे.

बऱ्याच वर्षांनंतर मी 'मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालया'च्या गोरेगाव आणि पुढे बोरिवली शाखेतूनही पुस्तके घेऊ लागलो. पुढे काही वर्षांनी मी नोकरीचा राजीनामा दिला आणि वसईतच माझा स्वतःचा व्यवसाय सुरु केला. व्यवसायाच्या धावपळीतही माझे वाचन सुरुच होते. वसईतील दोन-तीन वाचनालयांचा मी आजही सदस्य आहे.

या पुस्तक प्रेमामुळेच वाचकांसाठी काहीतरी करावं या विचारातून आमच्या-कडून डिसेंबर २०१२ साली 'गीत' नाताळ अंकाला सुरवात झाली. 'गीत' नाताळ अंकाचे यंदा तेरावे वर्ष आहे. या तेरा वर्षात अनेक कडू आणि गोड प्रसंगाला आम्ही सामोरे गेलो आहोत.

अंकाच्या पहिल्या वर्षीची गोष्ट. आम्ही अंक प्रकाशित करतोय हे जेव्हा माझ्या मित्रमंडळीना कळले तेव्हा बरेच मित्र मला टाळू लागले. चुकून ते जेव्हा माझ्या समोर येत तेव्हा "कशाला हा या नसत्या उठाठेवी करतोय? याला ते जमणारच नाही.” असे भाव त्यांच्या चेहऱ्यावर मला वाचायला मिळत.

पण मदतीसाठी धावून आलेल्या इतर साहित्यिक मित्रांनी आणि आयुष्यभरात मी वाचलेल्या हजारो पुस्तकांनी मला साथ दिली ती आजतागायत. वाचलेले कधी फुकट जात नसते. त्यातील शब्द नी शब्द आपला खास जवळचा असा जोडीदार झालेला असतो. तो शब्द कायमचा आपल्या बरोबर असतो. आपल्याशी कधी तो दगाफटका करीत नाहीत. वागायचे कसे? बोलायचे कसे? लिहायचे कसे? तोच आपला खराखूरा मार्गदर्शक.

'गीत' नाताळ अंकाच्या बारा-तेरा वर्षात मोठमोठ्या साहित्यिकांना मी भेटलो आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेक मान्यवरांना भेटलोय. बऱ्याच जणांनी आमचे कौतुक केले, सहकार्य केले. बहुमोल असे मार्गदर्शनही केले. तर काहींचे अनुभव येथे न सांगण्यासारखेही आहेत. पण वर 'कडूगोड' शब्दाचा उल्लेख आलाय म्हणून थोडे सांगावं लागतेय. आपल्याच भावविश्वात कायम दंग असलेलीही अशी माणसे असतात. त्यांच्याकडूनही बरंच काही शिकायला मिळालं.

असो, 'गीत' नाताळ अंकाने जे यश दिले ती सर्व बाळयेशूचीच कृपा. त्याच्या जयंतीनिमित्त सुरू असलेला ह्या उपक्रमास त्याची कृपादृष्टी लाभतेच लाभते.

पाठीराखा परमेश्वर आणि साहित्यिक मित्रमंडळींची बहुमोल साथ मिळतेय म्हणूनच हे 'गीत'.

# चळवळ

■ **जोसेफ तुस्कानो, बोरीवली**

मोर्चा आटोपून तो घरी आला. त्याला खूप थकवा आला होता. घसा तर पार कामातून गेल्यासारखा वाटत होता. सगळे शरीरच गळल्यासारखे भासत होते. मनदेखील निपचित पडू पाहत होते... किती प्रचंड मोर्चा! लोकशक्तीचा तो प्रचंड हुंकार, त्यांचा उत्साह आणि पोटतिडकीचा साक्षात्कार... एकसारखे, दुपारपासूनचे ते चित्र त्याच्या नजरेसमोर तरळत होते... अन् आता विरून गेलेला तो अफाट जनसमुदायाचा लोंढा! जणू मुलीची सासरी पाठवणी केलेल्या प्रेमळ पित्यासारखी त्याची अवस्था झाली होती. एक वेगळीच सायंकाळ त्याने अनुभवली होती. हृदयाच्या खोल कप्प्यात कायम साठवून ठेवण्याजोगी ती एक आठवण होती.....

दुपार टळत असतानाच, घराघरांतून माणसे उतरू लागली होती. कुणी बसमधून, कुणी खाजगी गाड्यातून जात होते, तर काही चक्क पायी चालत होते. घड्याळाच्या काट्याने तीन दर्शवायच्या आधीच प्रचंड जनसमुदायाचा ओघ त्या छोट्या शहराच्या तहसीलदार कचेरीकडे वाहू लागला होता. त्यात सर्व जातीधर्मांचे आणि समाजाच्या सर्व थरांतील लोक होते. गरीब-श्रीमंत होते. बायका-मुले होती. तरुण-तरुणी होत्या. म्हातारे-कोतारे होते. ललना तर हिरव्याहिरव्या पेहरावात अफलातून शोभून दिसत होत्या. आपल्या हिरव्यागार नगरीला मॅच होईलसा रंग त्यांनी आज जणू मुद्दाम निवडला होता. मोर्च्यातील बहुतेकांनी हातात माडाच्या हिरव्या पात्या आणि हिरवी झुडपे उंचावून पकडली होती. त्या मोर्चाची ती प्रतीके होती. ती सगळी माणसे माणुसकीच्या धाग्यांनी बांधली गेली होती. आकाशातील घनभरले ढग स्तिमित होऊन निसर्गाच्या रक्षणासाठी कटिबद्ध झालेला मानवतेचा साक्षात्कार टक लावून पाहत होते. मग, शिस्तबद्ध सैनिकासारखा सरकत तो जमाव पुढे गेला; रस्त्याला जणू माणसांचा पूर आला होता...

'सामान्य माणसा जागा हो, माणुसकीचा धागा हो...' या घोषणेने आसमंत दुमदुमून गेला होता. त्या संध्याकाळी, रस्त्यावरून जाणाऱ्या भरधाव वाहनांना आपला पहिला गियर बदलता आला नाही... मग, मोर्चाचे महाकाय सभेत रूपांतर झाले.

कलावंत कार्यकर्त्यांनी पथनाट्य सादर केले. तिथे उपस्थित असलेल्या भव्यदिव्य मानवतेला त्यांनी आपल्या कर्तव्याची झिंग चढवली. कलाकर्तव्याचा तो अनोखा मिलाफ होता. त्याचा कैफ काही अवीटच होता. हिरव्या शालूतील आपल्या नगरीचे वस्त्रहरण करणाऱ्या सिमेटासुराच्या दु:शासनाला शह देण्यासाठी, तिथल्या लोकांनी मनातल्या मनात ठोकलेल्या शड्डूचे पडसाद त्या निर्मळ वातावरणात उमटत होते. जनताजनार्दनाचे ते आगळे वेगळे रूप पाहून तो पार भारावून गेला. आपल्यावर लोकांनी टाकलेला विश्वास पाहून तो आणि त्याचे सहकारी जबाबदारीच्या जाणीवेने नतमस्तक झाले. त्यांनी जनतेला कोटीकोटी प्रणाम केले. भाषणे झाली. सर्वधर्मसमभावाचे गोडवे गायले गेले, आपल्या नगरीचे हिरवेपण राखण्याच्या निश्चयाचा पुनरुच्चार झाला. त्यागाची तयारी दर्शविली गेली.

अखेर, सगळ्यांचे हात उंचावले गेले.

'हम होगे कामयाब...'चे आशावादी गाणे गळ्यागळ्यांतून ओघळले. उत्कट भावनांचा उत्स्फूर्त उद्रेक होता तो. माणसाच्या रक्षणासाठी उभी असलेली आजूबाजूची वृक्षराजी भारावून डोलत होती. माणसांनी दाखविलेल्या कृतज्ञतेची पावती म्हणून आपली डहाळी-पाने झुळझुळू हलवून ते दाद देत होते. तो अपूर्व सोहळा संपला.

मग, नभाने आपला आनंद व्यक्त केला. टपटप करीत जलफुलांचा सडा हिरव्या नगरीवर बरसला... एक चळवळ त्या सुपीक जमिनीत रुजून गेली होती.

पण, त्याच्या मनात ही चळवळ त्याआधीच रुजली होती... तो प्रसंग त्याला अजूनही तस्साच आठवत होता... एक हुशार विद्यार्थी म्हणून तो लहानपणापासून नावाजला होता. चौकस बुद्धी नि कष्टाची तयारी या गुणांमुळे तो उच्च शिक्षण घेऊन आपल्या जन्मगावी परतला होता. त्यांच्या छोट्या शहराजवळच्या एका संशोधनसंस्थेत त्याला संशोधकाची नोकरी मिळाली होती. रोज लोकल ट्रेनमधून तो त्या मोठ्या शहरात जा-ये करू लागला होता. आपल्या संशोधन-तपश्चर्येत तो पार गढून गेला होता. त्यामुळे, आजूबाजूला घडत असलेल्या काही गोष्टी त्याला प्रारंभी जाणवल्याच नाहीत.

परंतु, गाडीघोड्यातील वाढती गर्दी जाचक ठरू लागली होती. 'हे इतके लोक येतात कुठून?' या प्रश्नावर उत्तर शोधत असताना, एकेक गोष्ट त्याच्या लक्षात येऊ लागली.

मोठ्या शहरातल्या औद्योगिक क्षेत्रात नोकरी करणारा कामगार आपली निवाऱ्याची गरज भागविण्यासाठी, शहरालगतच्या या सुंदर नगरीत येऊ लागला होता.

त्याची नगरी हिरव्या-हिरव्या गावांनी वेढलेली होती. या गावांत भूमीपुत्र शेतकरी वंशपरंपरेने गुण्यागोविंदाने राहत होते. शहरातल्या लोकांची दुधदुभत्याची, भाजीपाला नि फळाफुलांची गरज भागवित होते... पण, शहरातील काही बिल्डर मंडळींची नगरीला जणू दृष्ट लागली आणि इकडच्या जमिनीचा एकेक तुकडा इमारतीच्या घशात पडू लागला. स्थानिक दोन टक्केवाल्यांचा सुळसुळाट झाला व गरीब शेतकरी पैशाच्या आमिषाला बळी पडू लागले. हिरव्यागार सृष्टीचे पिवळ्या सिमेटासुरात रूपांतर होऊ लागले.

लोकांचा लोंढा येत होता. त्याच्या गरजा वाढत होत्या. वाहतूक यंत्रणा अपुरी पडत होती. त्यामुळेच, गाड्याघोड्यातून झिम्म गर्दी वाहत होती.

एकदा गाडीत त्याला संशोधन संस्थेतला सहकारी भेटला. तो अलीकडेच त्यांच्या नगरीत राहायला आला होता. त्याच्या हातात प्लास्टिकच्या रिकाम्या बाटल्यांची पिशवी होती.

"हे रे काय? या रिकाम्या बाटल्या कुठे नेतोयस?” त्याने सहजपणे विचारले.

"साहेब काय सांगू? स्वस्तात फ्लॅट मिळतो, म्हणून शहरापासून दूर इथं राहायला आलो. पाण्याची मुबलक सोय आहे अशी वल्गना बिल्डरने केली होती, त्याला आम्ही भुललो. अहो, आम्हाला टँकरचा पाणीपुरवठा होतो, तोही अपुरा. त्या पाण्यात माती असते. जीवजंतू तरंगताना दिसतात. प्रसंगी मेलेले उंदीर, साप आढळतात. तेव्हा, मुलांसाठी मी रोज ऑफिसमधून बाटल्यांत पाणी भरून आणतो."

"अरे पण, तुम्ही तक्रार करायला हवी. या असल्या पाण्याने आरोग्य बिघडेल! अन् तू किती दिवस ऑफिसमधून पाणी आणशील?”

"कुणाकडे तक्रार करायची? आम्हाला कोणी वाली नाही! बिल्डर लॉबीची गुंडगिरी तर भलतीच वाढली आहे. सरकारी यंत्रणा तर त्यांची हुजरेगिरी करण्यात गुंतली आहे. जरा कुठे जाब विचारला की मारहाण होते. आम्ही तर जीव मुठीत धरून जगतोय."

आपल्या सहकाऱ्याचे बोलणे ऐकून तो कळवळला. किंबहुना, लवकरच त्या गुंडगिरीचा त्याला स्वतःला प्रत्यय आला. त्या दिवशी ऑफिसला जाताना, तो प्रसंग घडला. गाडीत तो प्रसंग घडला.

गाडीतल्या गर्दीत, बसण्याच्या जागेसाठी तर नेहमीच रस्सीखेच चालू असते. त्या दिवशी एका अपंग तरुणावर एका धडधाकट माणसाने हात उगारला. वर्तमानपत्र

वाचण्यात मग्न असलेल्या त्याच्या, हे लक्षात येताच, त्याने त्या माणसाचा हात मागूनच पकडला. तो माणूस चकित होत, मागे वळून म्हणाला, "तू हात कुणाचा पकडला आहे, माहीत आहे? गब्रूदादाचा माणूस आहे मी!"

"हे बघ, तुझ्या गब्रुदादाला मी ओळखत नाही. सार्वजनिक ठिकाणी एका अपंग माणसावर अन्याय होतोय, ते मी सहन करणार नाही," त्या आक्रस्ताळी माणसाचा हात घट्ट पकडीत, तो सात्त्विक संतापाने म्हणाला.

अपमानित झालेल्या त्या माणसाने झटका देत आपला हात सोडवून घेतला खरा, पण त्याने शिटी मारताच चारपाच जण गर्दीतून वाट काढीत तिथे पोहोचले. अचानक त्या सगळ्यांनी हल्ला चढवला नि त्याला बेदम मारहाण केली. गाडीत एवढे लोक होते, पण सगळे मूग गिळून बसले होते. कुणीही विरोध करण्यास धजावला नाही की त्याला वाचविण्यास पुढे आला नाही. तो रक्तबंबाळ झाला होता. स्वतःला कसाबसा वाचवित, तो पुढच्या स्टेशनवर उतरला.

संध्याकाळी, त्याला पाहण्यासाठी त्याचे नातेवाईक, मित्र आले होते. त्याला आश्चर्य वाटले. हीच मंडळी सकाळी गाडीत होती, तेव्हा चिडीचूप बसली होती. किती भेकड बनले आहेत, आपले लोक? त्यांच्यात निर्भयपणाची ठिणगी पेटवली पाहिजे. अन्यायाविरुद्ध लढण्यास त्यांना प्रवृत्त केले पाहिजे.

बस्स! त्या दिवशीच त्याने मनातल्या मनात निश्चय केला. आपले लोक संकटात आहेत. आपला गाव संकटात आहे. आपले पर्यावरण धोक्यात आहे. चूप बसून चालणार नाही... तो गावोगाव फिरला. समविचारी तरुणांना गोळा करून, आपली भूमिका त्यांच्यापुढे मांडली. या भूमीचे, तिच्या निसर्गाचे, पर्यायाने इथल्या भूमीपुत्रांचे रक्षण करणे, हे आपले कर्तव्य आहे, हे त्यांना पटवून दिले....

त्या सर्वांची परिणती, त्या ऐतिहासिक मोर्चात झाली होती. शासनयंत्रणा खडबडून जागी झाली होती. मोर्चाचे पडसाद राज्याच्या विधानसभेत उमटले होते... त्यामुळे, स्वतः बिल्डर असलेले त्या नगरीचे आमदार मात्र डिवचले गेले होते. पण त्यांना माघार घेऊन कसे चालेल? शासनाने कोणतीही चौकशी करावी, असा आग्रह त्यांनी देखील धरला. पण, गुंडशाहीच्या दबावाखाली एकेकटा सामान्य माणूस जाबजबाब द्यायला पुढे यायला तयार होईना.

मात्र, 'नगर पर्यावरण संरक्षण समिती'ने शासनाला आपल्या निवेदनात खडसावून सांगितले....

'इथल्या शेतीच्या जमिनीतून पाण्याचा प्रचंड उपसा होत आहे. हे पाणी बिल्डिंगच्या कामासाठी वापरले जात आहे. ह्या उपशामुळे विहिरीतील पाण्याची पातळी खूप खालावली आहे. तसेच, पाण्याची क्षारता हळूहळू वाढत आहे. लोकांच्या आरोग्यावर तसेच पिकांवर याचा विपरीत परिणाम होण्याची चिन्हे दिसत आहेत. तेव्हा, त्वरित पाण्याचा उपसा थांबला पाहिजे.'

परंतु त्यांच्या आमदाराने विधानसभेत म्हटले, 'हा परिस्थितीचा विपर्यास आहे. माझ्या विभागात ना गुंडशाही, ना पर्यावरणाला धोका! शासनाला हवे तर त्यांनी चौकशी समिती नेमून, आमच्या नगरीतल्या गावांतील विहिरीच्या पाण्याचे नमुने तपासून पाहावेत.' शासन-यंत्रणा आमदाराच्या बाजूने होती. पण, लोकदबावापुढे नमणे त्यांना भाग पडले. विहिरीतल्या पाण्याचे नमुने तपासण्यासाठी एक जिल्हास्तरीयः समिती नेमली गेली. बिल्डरलॉबीशी संलग्न असलेल्या टँकर असोसिएशनने समितीच्या कामात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला. कारण पाणी तपासणी झाली तर त्यांचे पितळ उघडे पडणार होते...

समितीचा निष्कर्ष जाहीर करण्यासाठी एक बैठक घेण्यात आली होती. स्वतः आमदाराने त्यासाठी पुढाकार घेतला होता. शासकीय अधिकारी, आमदार, काही बड़े बिल्डर, टँकर असोसिएशनचे दोन चार प्रतिनिधी, सोबत 'नगर पर्यावरण संरक्षण समिती’चे कार्यकर्तेदेखील उपस्थित होते.

त्याला तर आवर्जून आमंत्रण होते. पब्लिक हेल्थ लॅबोरेटरीच्या शास्त्रज्ञांनी अहवाल वाचला, तेव्हा टँकर असोशिएशनच्या प्रतिनिधींना आनंदाच्या उकळ्या फुटल्या. त्या नगरीतील विहिरीतले पाणी पिण्यालायक असल्याची ग्वाही त्यांनी दिली होती. त्यातील क्षार नि अविद्राव्य द्रव्ये माफक प्रमाणात असल्याचा त्यांनी निर्वाळा दिला.

आपल्या हातातील अहवालाची प्रत उंचावत नि स्मित करीत आमदार म्हणाले, "काय संशोधक महाशय, आता काय म्हणायचंय तुम्हाला?"

त्यांना जणू त्याला खिजवायचं होतं. हा लोकांचा लिडर व्हायला निघालाय ना? तेव्हा, त्याची खास जिरवायची संधी तो राजकारणी कसा सोडणार?

त्याच वेळी, आपल्या हातातली अहवालाची प्रत चाळतच तो उभा राहिला. बैठकीतील मंडळी क्षणभर तो काय म्हणतोय या उत्सुकतेने ऐकू लागली.

'पब्लिक हेल्थ लॅबमधील अधिकाऱ्यांनी नुकताच आपला निष्कर्ष जाहीर केला आहे. त्यांचा आदर ठेवून, मला एक गोष्ट स्पष्ट करायची आहे...' तो क्षणभर थांबला. सगळे कमालीचे अवाक होत, त्याच्या पुढच्या बोलण्याची प्रतीक्षा करू लागले.

'या अहवालावरून नजर फिरविली तर लक्षात येते की आपल्याकडील विविध विहिरीतील पाण्याचे नमुने तपासून, त्याचे जे रिझल्टस् आढळले आहेत, ते इंडियन स्टॅण्डर्डच्या आय. एस् : ३०२५ या मानकाशी तपासून पाहिले गेले आहेत. वास्तविक ती एक चूक आहे. कारण आय. एस् ३०२५ हे भारतीय मानक, औद्योगिक क्षेत्रात वापरायच्या पाण्याची कसोटी ठरविते. याचा अर्थ असा की पिण्याच्या पाण्याची तुलना ही इमारती बांधण्यासाठी वापरायच्या पाण्याशी केली गेली आहे. वास्तविक, पिण्याच्या पाण्याची पात्रता ठरविण्यासाठी आय. एस् : १०५०० हे मानक उपलब्ध आहे. ते तुलनेने कडक आहे. ह्या मानकातील विविध घटकांच्या प्रमाणाशी तुलना केली तर आपल्याकडील विहिरीतले पिण्याचे पाणी खूपच खराब झालेले आढळून येईल. त्यातील क्षार वाढलेले आहेत व ते आरोग्यास हानिकारक ठरू शकते, हे लक्षात येईल. मला वाटते, अज्ञानी सामान्य माणसाच्या डोळ्यांत शासनाचे मान्यवर अधिकारी धूळ फेकत आहेत...''

तो बोलत असताना, आमदार मध्येच उठले व बैठक सोडून तावातावाने निघून गेले. हेल्थ लॅबोरेटरीतील अधिकाऱ्यांचे चेहरे पार पडून गेले होते. तिथे उपस्थित असलेली बिल्डरमंडळी व टँकरवाले तर मान खाली घालून होते. विविध ठिकाणांहून आलेले वर्तमानपत्रांचे वार्ताहर मात्र भराभर टिपणे काढीत होते.....

आणखी एक नैतिक विजय चळवळीच्या पदरी पडला होता... चळवळ भक्कम होत गेली होती....

(कथासंग्रह – **बंध रेशमाचे,** प्रकाशन- जून 2000)

# गंगा

■ डॉ. नेहा सावंत, दहिसर

शेवटचा तास संपवून, निशा वर्गातून खाली आली. स्टाफरूममध्ये तुरळक शिक्षक होते, बाकीचे त्यांचे पाच तास पूर्ण करून घरी गेले असावेत. आपण विद्यार्थ्यांमध्ये जरा जास्तच अडकून आणि गुंतून पडतो असं वाटून निशाला स्वतःचच हसू आलं. खरं तर तास संपून वीस मिनिटं झाली होती, पण काहीतरी किस्सा सांगत बसली, मुलांनाही किस्सा ऐकण्यात स्वारस्य होतं. त्या नादात निशाला वर्गातून निघायला उशीरच झाला होता. आता स्टेशनपर्यंत तिला एकटीलाच जावं लागणार होतं, नेहमी तिच्यासोबत असणारी राधिका पण गेली होती कारण तिच्या टेबलवर तिची बॅग दिसत नव्हती.

निशाने मस्टरवर सही केली, थंब बायोमेट्रिक करून बाहेर जाण्यासाठी वळली, तेव्हा तिचं लक्ष तिच्या पुढ्यात हातात लहान बाळाला घेऊन उभ्या असणाऱ्या मुलीकडे गेलं. त्या मुलीच्या चेहऱ्यावर कमालीचा आनंद होता मात्र डोळे भरलेले होते. बाळाला घेऊनच ती नमस्कार करण्यासाठी वाकली होती. "अगं, अगं! वाकू नकोस. मला का नमस्कार करतेयस?" निशाने विचारलं.

"बाई, ओळखलं नाहीत मला? मी गंगा. तुमची विद्यार्थिनी. FYBA वर्गात रोज फळा लिहिणारी"

"गंगा ? अगं, किती बदलली आहेस? ओळखलंच नाही तुला मी ! अगं, होतीस कुठे तू ? अर्धवटच कॉलेज सोडलंस, मुलींनी सांगितलं की तुझं लग्न झालं आणि तू गावी असतेस. मग इतक्या वर्षांनी आज कशी आलीस ?" उत्साहाच्या भरात निशा घडाघडा बोलत सुटली. आपल्याला उशीर झालाय हे विसरूनच गेली.

"कॉलेज सोडावं लागलं मला. पण इतक्या वेगात आयुष्यात खूप काही घडलं, कुणाला काही सांगताच आलं नाही. पण मॅडम तुमची खूप खूप आठवण यायची" तिच्या पूर्वीच्या पाणीदार डोळ्यातलं पाणी हरवलं होतं, पण बोलताना मात्र डोळे भरत

होते. निशाला मनापासून गंगा भेटल्याचा आनंद झाला होता. खूप काही ऐकलं होतं तिच्याविषयी. पण खरं खोटं काहीच कळत नव्हतं. अचानक आज ती संधी चालून आली होती.

गंगाच्या हातातलं गोंडस बाळ निशाकडे कुतूहलाने पाहत होतं. “किती गोड आहे ग बाळ ! नाव काय ग ह्याचं? निशाने विचारलं.

“श्रेयस” गंगा उत्तरली.

“छानच आहे गुंड्या. अगदी तुझ्यासारखाच गोब-या गालाचा, टपो-या डोळ्यांचा" निशाला बाळाचं कौतुक वाटत होतं. “बरं, तू आज कशी काय आलीस, काही काम आहे का तुझं?” निशाने विचारलं.

“बोनाफाईड सर्टिफिकेट मिळेल का, त्याची चौकशी करायची होती. पण आता लंच टाईम आहे ना!

खरं तर तुम्हाला भेटायची खूप इच्छा होती, पण इतक्या उशिरापर्यंत तुम्ही भेटणार नाही असंही वाटलं.” गंगा म्हणाली.

“तुझी मनापासून इच्छा होती ना, म्हणून भेट झाली. चल, नाहीतरी अर्धा तास तुला थांबायचं आहेच ना, तर आपण कॅन्टीनमध्ये बसू.” असं म्हणत निशा गंगाला घेऊन कॅन्टीनमध्ये गेली. बाळासाठी गंगा दुधाची बाटली घेऊनच आली होती. त्याला मांडीवर घेऊन दुधाची बाटली त्याच्या तोंडात दिली. हळुवार त्याला थोपटत होती. ते दृश्य पाहून निशाला गहिवरून आलं. किती पटकन ह्या पोरी मोठ्या होतात ना !

चार वर्षांपूर्वीचे दिवस निशाला आठवले. FYच्या वर्गात पहिल्या बाकावर तीन मुली अगदी खेटून बसायच्या, शाळेपासूनच्या मैत्रिणी. पण त्या तिघींमध्ये लक्षात राहिली ती गंगा. तिच्या टपोऱ्या पाणीदार डोळ्यात सदा कुतूहल दाटलेलं असायचं. दोन घट्ट वेण्या, डोळ्यात काजळ घातलेलं, कपाळावर ठसठशीत टिकली. नीटनेटकी अशी ही गंगा, अगदी लोभस आणि गोंडस लहान मुलीसारखी निष्पाप वाटायची. वर्गात निशा शिरण्याआधीच फळ्यावर सुवाच्य अक्षरात एखादा सुविचार आणि विषय - मराठी असं लिहून ठेवायची. तिच्या या वेगळेपणामुळे गंगा लक्षात राहिली होती. मराठीचा तास तिला फार आवडायचा. निशाच्या प्रत्येक तासाला ती जीवाचे कान करून ऐकत असायची. शिक्षिका होणं हे तिचं स्वप्न होतं. अर्थात दुसरा तिसरा तास

असेल तर तिने फळा लिहिलेला असायचा. पण सात वाजताच्या पहिल्या तासाला नेहमीच गंगा धावतपळत यायची. उशीर का झाला ? असं विचारलं तर म्हणायची पाणी भरून यावं लागतं ना ! आमचा पाण्याचा नंबर नेहमी शेवटी असतो. “घरात दुसरं कुणी नाहीये का?” असं विचारल्यावर म्हणायची, “आई दुस-याच्या घरी जेवण बनवायला जाते, मग मी आणि ताई घरातलं काम आटपून येतो.” तिचं बोलणं ऐकून निशाला तिच्याबद्दल सहानुभूती वाटायची. पण एखादा दिवस आईला सुट्टी असली की ही मोठ्या आनंदात वर्गात लवकर येऊन बसायची. पण असे क्षण कमीच असायचे.

कधीतरी निशाने सहज तिची चौकशी केली होती, तेव्हा कळलं की तिची आई धुण्याभांड्यांची आणि स्वयंपाकाची कामं करते. पण आपल्या दोन्ही मुलींनी शिकून स्वतःच्या पायावर उभं राहावं असं तिला वाटत होतं. गंगाचे वडील गारमेंट कंपनीमध्ये कामाला होते. पण अचानक कंपनी बंद पडल्यावर घरी बसायची सवय लागली, त्यात दारूच्या आहारी गेले होते. रोजंदारीवर काहीबाही काम करायचे. मुलींच्या शिक्षणापेक्षा त्यांना लवकर उजवून मोकळं व्हायचं, असा त्यांचा विचार होता. गंगाची मोठी बहीण बारावी शिकली होती, आणि तिने शिवणक्लास केला होता, काहीबाही शिवणाचं काम करायची. घरात थोडासा हातभार लावायची.

एक दिवस गंगा स्टाफरूम मध्ये भेटायला आली आणि म्हणाली, “मॅडम, मी आठ दिवस कॉलेजला येणार नाहीये, ताईच लग्न ठरलंय. म्हणून गावी जातेय.” ताईच्या लग्नाचा आनंद तिच्या बोलण्यातून लपत नव्हता. पण ताईचं लग्न झाल्यावर ती परतली तेव्हा हिरमुसलेली वाटली. कारण विचारल्यावर म्हणाली, “ताईचं कसं होणार ? ताईला ज्या गावात दिलीय ते तसं खेडंच आहे. तिला शेतात काम करायची सवय नाही. अंगणात मोठी विहीर आहे अख्ख्या गावाची, ताईला तर पाणी कसं शेंदायचं ते पण ठाऊक नाही.घरात चुलीवरच जेवण करतात तिथे. घरात माणसं पण भरपूर. आणि दाजी पण तिच्यापेक्षा मोठेच आहेत, जेमतेम दहावी पास आणि कडक पण. ताई आमची सावळी असली तरी नाकीडोळी किती देखणी! आमच्या बाबांनी सांगितलं की घर मोठं आहे. कसलं मोठं! हा, आमच्या चाळीतल्या खुरट्या घरापेक्षा मोठं म्हणता येईल. पण आहे शेणामातीचच. आई नको म्हणत असताना बाबांनी लग्नाची घाई केली. खोटंच सांगितलं मोठं घर आहे, शेतीवाडी भरपूर आहे. पण तसं काहीच नाही. फक्त

आमच्याकडे हुंडा भरपूर घेतात, या लोकांनी हुंडा घेतला नाही येवढंच. म्हणून बाबांनी घाई केली.”

एवढ्याशा पोरीच्या मनातली बहिणीची काळजी आणि पोक्तपणा पाहून निशाला तिचं कौतुक वाटलं. “होईल सगळं नीट, तू नको काळजी करुस” निशाने तिला धीर दिला. काही महिन्यानंतर तिच्या मोठ्या बहिणीला दिवस गेल्याची बातमी गंगाने दिली होती. पण पुढे परीक्षांची गडबड नंतर मे महिन्याची सुट्टी या गडबडीत गंगा दिसलीच नाही.

जून महिना लागला. कॉलेजचं नवीन वर्ष सुरू झालं. SYच्या वर्गात वर्षाच्या सुरुवातीपासूनच वर्गात गंगा दिसत नव्हती. वर्गात चौकशी केल्यावर कळलं ती परीक्षेलाही बसली नव्हती. तिच्या दोन मैत्रिणींपैकी एक नापास झाली, दुसरी म्हणाली, “मॅडम, गंगाची बहीण बाळंत झाली, पण वारली. म्हणून गंगा गावी गेलीय.” निशाला हे ऐकून चुटपुट लागली. पण गंगाशी संपर्क कसा होणार ? हळूहळू या चुटपुटीची धार बोथट होत गेली. आणि गंगा आठवणीतून पुसट होत गेली. पण कधीतरी निशाला तिचे पाणीदार डोळे आणि गोबरे गाल आठवायचे. हा सगळा पट आता निशाच्या डोळ्यासमोरून सरकला.

“मॅडम, काय आणू खायला ?” तंबी वेटरच्या विचारण्याने निशा भानावर आली. गंगाचं बाळ तिच्या मांडीवर दूध पिता पिताच झोपलं होतं. चहा आणि टोस्ट सँडविचची ऑर्डर निशाने दिली, आणि गंगाला म्हणाली, “कॉलेज सोडून चार वर्ष झाली, या चार वर्षात तुला एकदाही मला भेटावसं वाटलं नाही ?”

“मॅडम, माझ्या आयुष्यात काय काय घडलं कसं सांगू ? या चार वर्षात पहिल्यांदाच माहेरी येतेय. ते पण वडील वारले, त्यांच्या दिवसकार्यासाठी म्हणून घरच्यांनी पाठवलं. नाहीतर तेही पाठवलं नसतं”

“कधी वारले? आजारी होते का वडील ?”

“दारुड्या माणसाचं आणखी काय होणार ? दोन्ही पोरींच्या आयुष्याचं मातेरं करून मग पश्चातापात स्वतःची बरबादी केली. दारू पिऊन लिवर खराब झाली, स्वतःची सुटका करून घेतली. पण आमचं काय ? आईची किती इच्छा होती मी शिक्षिका व्हावं. आईला शिक्षणाची किती हौस होती. स्वतः हौस मौज न करता आमच्या

शिक्षणासाठी काटकसरीने जगत होती. पण बापाने गळ्यात लोढणं अडकवलं आता कसली आमची सुटका?” गंगा मनातले कढ भडाभडा बाहेर टाकत होती. खूप दिवसांनी तिला असं मन मोकळं करायला मिळालं होतं. मनातलं गरळ ओकणं हाच तिच्या दुःखावरचा पर्याय होता. निशा तिला अजिबात थांबवत नव्हती.

गंगा किती पोक्त दिसू लागली होती. तिच्या चेहऱ्यावरचं ते लडिवाळ हसू पार लोपलं होतं. गालांचा गोबरेपणा, डोळ्यातला पाणीदारपणा लोपला होता. खरंतर आताच तिचं वय लग्नाचं झालेलं पण ही मात्र आईपण अनुभवत होती. न राहवून निशाने विचारलं, “गंगा, लग्न का असं अचानक केलंस, इतक्या लहान वयात ?”

“मी कुठे हौसेने केलं? तुम्हाला माहित नसेल कदाचित. ताईच्या बाळंतपणात त्यांनी तिला इकडे पाठवली नाही. आणि माझ्या वडिलांनीही तिला इकडे आणायची तयारी दाखवली नाही. ताईचा जीव गावी रमतच नव्हता. त्यात खूप काम करावं लागत होतं. सासू घालून पाडून बोलायची. गरोदरपणात तिच्याकडे कुणी लक्षच दिलं नाही. खूप अशक्त झाली होती. खाण्यापिण्याची आबाळ होत होती. त्यात तिला मुलगी झाली, म्हणून नंतरही तिची काळजी कुणी घेतली नाही. तिचंही वय लहान. काही कळत नव्हतं. त्यातच ती आजारी पडली, कावीळ झाली तिला. औषधपाणी नीट झालंच नाही आणि त्यातच ती गेली. तान्ही पोर टाकून गेली. तिच्या दिवसकार्याला आम्ही गावी गेलो तेव्हा दाजी म्हणाले की या आईविना लेकराची जबाबदारी कुनी घ्यायची? या लेकराला तुमच्याकडेच घेऊन जा नायतर तुमच्या धाकट्या पोरीचा पाट लावा माझ्याशी. माझ्या बापाला पण तेच हवं होतं. माझ्या लग्नाचा खर्च टाळण्यासाठी या व्यवहाराला तयार झाला. मी आणि आईने तिथच रडायला सुरुवात केली. कारण मोठ्या पोरीची जी परवड झाली ती माझी होऊ नये असं आईला वाटणं साहजिकच होतं. निदान मी तरी शिकावं, स्वतःच्या पायावर उभं राहून मुंबईतच संसार थाटावा अशी तिची इच्छा होती.”

“अगं, पण तू तयार कशी झालीस ? सरळ विरोध करायचा होतास, नकार देऊन बाहेर पडायचं होतं” निशा बोलून गेली.

“मॅडम, हे नकार, बंड, विरोध हे सगळं स्त्रीवाद शिकताना मनात राहतं. हे सगळं कथा कादंबऱ्यामध्ये वाचायला छान वाटतं. प्रत्यक्ष परिस्थितीला सामोरं जाताना सगळ्याच गोष्टींचा विचार करावा लागतो”

निशा गंगाचं बोलणं ऐकून चकित झाली होती. खरंच परिस्थितीने या पोरीला किती समंजस आणि पोक्त केलं!

“मॅडम, माझी सुटका नव्हतीच. त्याने दुसरं लग्न केलं असतं तर त्या बाळाला व्यवस्थित सांभाळलं असतं की नाही कोण जाणे ! आणि माझ्यासाठी माझा बाप कुठला राजपुत्र आणून देणार होता? ताईची ती एकच ठेव आता राहिली होती. नाईलाजाने मला लग्नाला उभं रहावंच लागलं. कालपर्यंत ज्याला मी भावोजी, दाजी म्हणत होते, त्याच्याच नावाचं मंगळसूत्र आता गळ्यात बांधावं लागलं.” असं म्हणून ती रडू लागली. तिच्या मनाची घुसमट निशाला अस्वस्थ करीत होती. वेटरचं लक्ष या दोघींकडे होतं. निशाने बिल चुकतं केलं. तोपर्यंत गंगा जरा सावरली होती. “चल गंगा, निघुया” असं म्हणत निशा उठली.

“सॉरी मॅडम, माझी रडकथा ऐकून कंटाळला असाल ना, घरी जायला तुम्हाला उशीर होत असेल ना !”

“नाही ग, कंटाळले नाही. आपण बोटनिकल गार्डन मध्ये जाऊन बसू. तुला जे जे बोलायचं आहे ते मोकळेपणाने बोल” निशाच्या आश्वासक शब्दांनी गंगा सुखावली.

गंगा आणि निशा दोघीही बोटानिकल गार्डनमध्ये आल्या. वडाच्या झाडाच्या पारावर बसल्या. गंगाने झोपलेल्या श्रेयसला आपल्या बाजूलाच दुपट्यावर झोपवलं. “आपलं हे गार्डन आहे तसच आहे ना ? चार वर्षांनी येतेय इथे. कॉलेजला असताना एखादा तास फ्री असला की मैत्रिणींसोबत इथेच येऊन बसायची. छान गार वाटायचं. इथून निघावसंच वाटायचं नाही” अगदी आनंदाने ती सर्वत्र नजर फिरवत होती.

“आणखी किती दिवस आहेस इथे? निशाने विचारलं.

“परवा बाबांचं तेरावं आहे, ते झालं की जाणार. चार वर्षातलं हेच माझं माहेरपण. आता पुन्हा यायला मिळेल की नाही कुणास ठाऊक. आणि मला जास्त दिवस नाही राहता येणार. माझी मुलगी म्हणजे ताईची मुलगी दिव्या आता चार वर्षाची झालीय. खूप जीव आहे माझा तिच्यावर. ताईची उणीव तिला भासू देत नाही.” असं म्हणून पुन्हा डोळे पुसू लागली. निशा गंगाला जवळ घेऊन थोपटत राहिली.

“हे बघ, असा धीर सोडू नकोस. तू खूप मोठी जबाबदारी उचलली आहेस. ताईचे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेत. खचून जाऊ नकोस. तुझं स्वतःचं असं काहीतरी सुरू

कर. जे गावातल्या लोकांच्याही उपयोगाचं असेल” निशाचं बोलणं ऐकून गंगा मान डोलवत होती.

बराच वेळ बोलण्यात गेला. श्रेयस जागा झाला होता. निशाने त्याला प्रेमाने उचलून घेतलं. “किती गोड आहे तुझा लेक.”

“हो ना! गोरा गोमटा मुलगा झाला, म्हणून त्याचे लाड होतायत. आणि माझा छळ होत नाही इतकंच. मलाही मुलगी झाली असती तर माझाही छळ झाला असता. कारण माझ्या धाकट्या जावेला मुलगीच झाली तर तिला पण टोचून टोचून बोलत असतात. ह्यांना फक्त वंशाचे दिवे हवेत, का कशासाठी माहीत नाही. तशी सासू माझी चांगली धडधाकट आहे पण तिला फक्त सासूशाही मिरवायची असते. सुनांकडून कामं करून घ्यायची असतात. आपण सुना असताना त्रास भोगला मग आता आम्ही त्याचं उट्ट काढणार इतका कोता विचार करतात ह्या बायका.”

एक विदारक सत्य ती बोलून गेली होती.

“मॅडम, दिव्या दोन वर्षाची झाली नाही, ताईच्या दुःखातून मी नुकतीच सावरत नाही तोच सासरच्या मंडळींचा तगादा सुरू झाला आता तुझी कूस उजवू दे. वंशाला दिवा मिळू दे. नशीब श्रेयसचा जन्म सुखरूप झाला. गोरागोमटा नातू झाला म्हणून माझी पण आबाळ झाली नाही”

“बरं, आता पुढे काय करायचं ठरवलं आहेस ?”

“आमच्या गावातच छोटंसं हॉस्पिटल नव्याने उभारलय. तिथेच श्रेयसचा जन्म झाला. त्या डॉक्टर अगदी तुमच्याच सारख्या आहेत. त्यांनीच मला त्यांच्याकडे रिसेपशनिस्ट म्हणून काम करशील का असं विचारलंय.

तुला पुढे शिकायचं असेल तर तू बाहेरून परीक्षा देऊ शकतेस. घरी काहीच कल्पना देऊ नकोस. असं बजावलं आहे. बघू प्रयत्न करीन. म्हणूनच मला दाखला हवाय, तो न्यायला आलेय.”

गंगेच्या बोलण्याने निशाचे डोळे भरून आले. कोणत्या मातीने बनलेल्या असतात ह्या मुली ? कुठून येतो हा जिवट, चिवटपणा यांच्या अंगात ?

“गंगा, तुला हॉस्पिटल मध्ये काम करायला घरातल्यांची परवानगी आहे ?”

“परिस्थितीच तशी मजबूर करते. आताशा शेतीवाडीत वर्षभर घरात पुरेल इतकंही धान्य पिकत नाही. खाणारी तोंडं मात्र वाढताहेत. मधल्या २ वर्षातील कोरोनाने तर जीवनाची सगळी गणितच बदलली. आरोग्याचं, आरोग्यसेवेचं महत्त्व सगळ्यांनाच पटलं. नाही म्हणायला कोरोना काळात गावात सुधारणाही झाल्या थोड्याफार. पण शेती भातीवर मात्र परिणाम झाला. गावातली तरुण मुलं आता नोकऱ्या शोधू लागलीत. माझा नवराही आता नोकरीच्या शोधात आहे. पण शिक्षण दहावी त्यामुळे चांगली नोकरी मिळणं कठीण. स्वतःचा काही व्यवसाय करायचा तर भांडवल नाही आणि कौशल्यही नाही. इतरांनी पक्की घरं बांधलेली पाहून, त्यालाही पक्कं घर बांधावं वाटू लागलंय. चिंतेतच असतो. मला धास्ती वाटू लागली. माझ्या बापासारखा हा दारूच्या वाटेला जायला नको, म्हणून एक दिवस जरा दबकतच विचारलं, मी थोडा पैशासाठी हातभार लावला तर चालेल का ? नुसतच चूल मुल करायचं तर माझ्या शिक्षणाचा उपयोग काय ? जरा कपाळावर आठीच आली होती त्याच्या, पण परिस्थितीच्या चटक्याने आता स्वभाव पण निवळला आहे हेच काय ते सुख. त्यामुळे मला नोकरी चालून आलीय म्हटल्यावर नकार देण्याचा प्रश्नच येत नाही.”

“नक्कीच कर ही नोकरी. आणि पुढे शिकण्याचा प्रयत्न कर. शिक्षिका होण्याची तुझी इच्छा नक्कीच पूर्ण होईल”

“तुमचा आशीर्वाद असू द्या” असं म्हणून गंगा नमस्कार करायला वाकली. तिला भरल्या डोळ्यांनी निशाने कवेत घेतलं आणि म्हणाली, “तुझी हालहवाल कळवत जा”

असं म्हणून तिला सोबत घेऊन कॉलेजच्या ऑफिसमध्ये आली. तिचा अर्ज स्वतःच क्लार्ककडे देऊन दोन दिवसात बोनाफाईड सर्टिफिकेट तयार ठेवायला सांगितलं. एव्हाना गंगेच्या कुशीतला श्रेयस कुरबुर करू लागला होता. गंगेचा निरोप घेणं निशाच्या जीवावर आलं होतं. गंगा मात्र तिच्या लाडक्या बाईना भेटून सुखावली होती. तिच्या डोळ्यात एक वेगळीच आत्मविश्वासाची चमक दिसत होती. भरल्या डोळ्यांनी बाईंचा निरोप घेऊन ती निघाली होती. तिची पाठमोरी लेकुरवाळी सावली आत्मविश्वासाने पावलं टाकीत चालली होती...

# स्ट्रॅटेजी

■ स्टॅन्ली गोन्सालविस, वसई

"मला चहा वगैरे काहीही नकोय रे, रॉबी. तू आपला दोस्त म्हणून हक्काने तुझ्याकडे आलोय ते तुमच्या फॅमिलीची मतं मागण्यासाठी !" विकी रॉबर्टचा हात हातात घेऊन घट्ट धरीत म्हणाला.

"आमची मतं तुलाच रे. पण बस तरी. तू इलेक्शनला उभा आहेस म्हणजे सतत उभंच राहायला हवं असं काही नाही ना?" रॉबर्टने स्वतःच्या विनोदावर हसत विकीला विचारले.

सहकारी बँकेची निवडणूक जाहीर झाल्यापासून बरेच उमेदवार रॉबर्टच्या घरी पाय धूळ झाडून गेले होते. विकी व रॉबर्ट हे वर्गमित्र. त्यांचा दोस्ताना अजून टिकून होता. विकास परेरा तसा स्वभावतःच धडपड्या वृत्तीचा. कोणत्याही धडपड्या माणसाप्रमाणे त्याची पाच-पंचवीस ठिकाणी ऊठबस होती. त्याची कनेक्शन्स बऱ्यापैकी असल्याने तो तसा कामाचा माणूस होता. त्यामुळे जो तो त्याला आपल्याकडे ओढायचा प्रयत्न करीत असे.

साहजिकच परिसरातील अनेक संस्थांवर त्याची सेक्रेटरी, संचालक, अमुकतमुक अशी वर्णी लागलेली होती. त्यात त्याची सुखाची सरकारी नोकरी असल्याने तो 'सोशल वर्क' वगैरे करायला मोकळा असायचा. त्यामुळे पंचक्रोशीतील कुठल्याही कार्यक्रमात 'मान्यवर' म्हणून त्याला आमंत्रण असायचे आणि मान्यवर म्हणून व्यासपीठावर स्थान असेल तरच तो अशा कार्यक्रमांना हजेरी लावायचा. केवळ श्रोता म्हणून सभागृहातील खुर्चीवर बसून टाळ्या कुटायच्या, असा वेळेचा अपव्यय करणे त्याला मान्य नव्हते.

त्यात विकी अतिशय 'फोटो कॉन्शस' माणूस होता. दीप प्रज्वलनापासून हार-तुरे वगैरे प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी आपली छबी कॅमेऱ्याच्या फोकसमध्ये कशी येईल याची तो दक्षता घ्यायचा. त्यामुळे दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात दादा, अप्पा, नाना, भाऊ किंवा सेलिब्रिटींबरोबरच्या फोटोत तो दृश्यमान व्हायचा. शिवाय फेसबुक, व्हाट्सअप ग्रुपवरही ते टाकून सर्वत्र व्हायरल करायचा. अशा पद्धतशीर सेल्फ मार्केटिंगमुळे विकीची इमेज भलतीच वधारली होती. त्या आधारे त्याने बँकेची पहिली टर्म सहज खिशात टाकली होती. आता तो दुसऱ्या टर्मसाठी उभा होता.

तसे विकीचे गावकरी परंपरेने समाजवादी. त्या परंपरेला साजेसे त्यांच्यामध्ये तीन-चार गटही होते. प्रत्येक गट स्वतःला तत्वनिष्ठ समजत असल्यामुळे त्यांच्यात मतभेद उर्फ भांडणे अमाप आणि पर्यायाने रस्सीखेचही भरपूर. त्यात विकीची तरुण तडफदार ब्रिगेड व जॅकी डिमेलो उर्फ ड उर्फ दामले सरांचा जुना-जाणत्यांचा ग्रुप होता. कन्झ्युमर सोसायटी व खताच्या सोसायटीवर दामले सर गेली वीस वर्षे ठाण मांडून होते. सहकारी बँकेचे इलेक्शन लागले तेव्हा दामले सरांनी बँकेवर जायचे ठरवले. अनुभवी व बुजूर्ग म्हणून आपली तिथे आवश्यकता आहे असे त्यांना स्वतःलाच वाटत होते.

ही कुणकुण विकीच्या कानावर गेली तेव्हा त्याने आपल्या युथ ब्रिगेडकरवी पक्ष श्रेष्ठींवर इतके प्रेशर आणले की दामले सरांना डावलून विकीला उमेदवारी देण्यात आली. २५ लाखांच्या मरतुकड्या सोसायटीपेक्षा ५००० कोटींची उलाढाल असलेली बँक विकीला खुणावत होती. पक्षाच्या मीटिंगमध्ये त्याने अगदी छातीवर हात ठेवून आश्वासन दिले, "मला एकदाच संधी द्या. पुढची टर्म तुम्हांला!"

सत्तरीकडे झुकलेले दामले सर नाराज झाले. आपली नाराजी त्यांनी उघड केली नाही. मात्र काँग्रेसवाल्या जॉनच्या पारड्यात आपले वजन टाकले तर विकीला कसे पाडता येईल याचा ते मनातून विचार करू लागले. एकदा खुर्चीवर बसलेला कोणीही खेचल्याशिवाय पायउतार व्हायचे नाव घेत नाही, हे त्यांना पक्के ठाऊक होते. पुढच्या टर्मचे आश्वासन पाच वर्षात हवेत विरून जाईल, हे ते समजून होते.

'आपली बँक' ही तशी जिल्ह्यातील अग्रणी वगैरे बँक. हजारो कोटींचा व्यवसाय. त्यामुळे साहजिकच (ज्याची त्याची) कमाई सुद्धा बऱ्यापैकी होती. बँकेच्या बरोबरीने काही उद्यमशील संचालकांचीसुद्धा अर्थप्रगती होत होती. दामले सर हे पाहत होते. खताच्या सोसायटीच्या चेअरमनला कोणी झेंडावंदनालाही बोलावीत नसत. बँकेच्या चेअरमनची, संचालकांची काय ती प्रत्येक कार्यक्रमात बडदास्त राखली जाते! हार-तुरे, भाषणं, ग्लॅमर आहे ते तिकडे... त्यामुळे जन्मा यावे तर एकदा तरी संचालकपद भूषवावे, जमल्यास वर्षभरासाठी तरी चेअरमनपद मिळवावे. पण विकीने बाजी मारली होती. पार्टी बदलून तो व्हाईस चेअरमनही झाला. आता पुढील टर्मसाठी मतांचा जोगवा मागत दारोदारी फिरत होता.

"बस रे विकी घडीभर... डायरेक्टर झाल्यावर तुला कुठे कोणाच्या घरी जायला वेळ मिळणार आहे? तुम्ही लोक एकत्र मीटिंगमध्ये नाहीतर कुठल्यातरी स्टेजवर... आपली भेट पाच वर्षांनी! हा! हा! हा!!"

विकी वरमला. तो सोफ्यावर बसत म्हणाला, "होय रे! वेळच मिळत नाही बघ. त्यात मी आपल्या गावकीत सेक्रेटरी, चर्चमध्ये सेवक नेता, सोसायटी आहेच. त्यात कुठे

घरादारांच्या वाटण्या, नवरा-बायकोची भांडणं सोडवणं, कोणाची स्ट्रीट लाईट लागत नाही, कुठे गटार तुंबलं आहे, रेशन कार्डांची कामं... लोक काय काय कामं घेऊन येतात सांगू? पण करतो आम्ही जमेल तितकं. बोर्डाच्या मीटिंग तर काय बोलूच नको. आठ-आठ तास चालतात! काय ते प्रस्ताव, त्यावरची न संपणारी चर्चा... जाऊ दे! तुला कंटाळा येईल."

"पण विकी, हेच ऐकून आहे मी बरं का... तुम्हाला तिथे काही बोलू देतात का रे? किंवा तुमचे काही ऐकते का ती 'डी' गँग? तुमच्यात म्हणे दोन-तीन गट आहेत? त्यात त्या पोटल्या सीईओची मुजोरी... तो तर..."

"रॉबी!" विकी त्याला मध्येच तोडीत म्हणाला,"हे सर्व तू ते व्हाट्सअप मेसेज वाचून बोलतोय! तसं काहीही नाही रे! मी तोंडावर बोलणारा माणूस आहे, ठाऊक आहे ना तुला? आपलं कोणाला देणं देणं नाही की कोणाचं घेणं नाही. आपण सत्याची बाजू घेतो!"

"सत्य? असेल तसं, तू सांगतोस तर! आम्ही भागधारक, बोर्डातलं आतलं आम्हांला काय कळतं? एकदा मत दिलं की संपलं आमचं काम... काय त्याला म्हणतात, पवित्र कर्तव्य! मग येजीएम मध्ये येऊन खाऊची पुडी घेऊन सटकायचं... झालं! हा! हा!! हा!!!" रॉबी पुन्हा जोरजोरात हसत म्हणाला.

"हसण्यावारी नेऊ नकोस, रॉबी! सीरियस जॉब आहे हा. जबाबदारी असते. आपल्या क्रेडिट सोसायटीत काय चाललंय बघतोस ना? बुडीत कर्जाची रक्कम डायरेक्टरांकडून वसुलीच्या कोर्ट नोटिसा आल्या आहेत! नुस्त्या सह्या ठोकल्या, झाला ठराव पास, असं नसतं काही."

"होय रे. तुझ्यासारखे खमके लोक आहेत म्हणून आपली बँक व्यवस्थित चालू आहे हे खरं. आजूबाजूला पाहतो रे आम्ही, आजकाल जो तो टक्केवारीच्या हिशोबात खिसे भरायच्या मागे लागलेला. बुडू देत बँक नाहीतर डुबू देत खातेदार. सरकार आणि सहकारातही 'लाभार्थींची' संख्या तेवढी वाढत चालली आहे. सर्वत्र घोटाळे आणि स्कॅम्स. विश्वासच उरला नाही कोणत्या बँकेवर की पतसंस्थेवर... काय काय येतं रे ग्रुपवर!"

"सगळेच नसतात रे तसे. कामं करणारी प्रामाणिक माणसं खूप आहेत. हे बघ, आपली लगान आपल्या कामाशी. हार-तुरे पडतात आमच्या गळ्यात, पण मागाहून चिखलफेकही होते. बोलणारे बोलतात. मी कोणाचं बोलणं मनावर नाही घेत. सोशल फील्डमध्ये असं ऐकून घ्यायची तयारी ठेवावीच लागते." विकी परेरा फारच गंभीर झाला होता.

"गंमत केली रे, सोडून दे ते." रॉबी सावरून घेत म्हणाला, "अरे, लोकांना कळतं बरं का, कोण काम करतो आणि कोण नुसता होयबा बनून मीटिंग भत्ते उकळतो ते. टक्के घेणारे माहीत आहेत, तसेच काम करणारेही माहीत आहेत."

"हो! पण त्यामुळे सारेच बँकवाले बदनाम होतात. तुझ्यासारखे समजदार लोक थोडे आहेत. बाकी सारे गावभरची घाण हुंगणारे, अरे, माहिती करून घ्या ना, की आलं व्हाट्अ‍ॅपवर करा फॉरवर्ड, तिथे बोर्डात बसल्यावरच कळतं xxx काय जळतं ते!" विकी उद्वेगाने म्हणाला.

"खरंच रे, आम्हांला काहीही कळत नाही, मला ना तुमचा तो एनपीए आकळत नाही की तुमची ती आकड्यांची करामत, काय म्हणतात त्याला? ताळेबंद! आमच्या मंद टाळक्यात काहीच शिरत नाही! मी तर तुमच्या अहवालातील ते कोट-टायवाले रंगीत फोटो व डिव्हिडंड किती देणार आहेत तितकच पाहतो. झालं अहवाल वाचन!" रॉबर्ट पुन्हा जोरात हसत म्हणाला. इतक्यात काहीतरी आठवून तो म्हणाला,"अरेच्चा! मी तुला चहाचं बोललो आणि विसरूनच गेलो बोलता बोलता" मग किचनकडे पाहत त्याने आवाज दिला,"रिटाऽऽ बाहेर तर ये! कोण पाहुणे आलेत बघ!"

"अय्याऽऽ विकी भाऊजी! अहो, रोजच्या ह्यांच्या बँकेच्या चर्चा चालू. तेच दळण रोजचं. मी बाहेरच नाही येत. भाऊजींना काही चहापाणी?" तिने रॉबर्टकडे पाहत विचारले. "अग विचारतेस काय? सवय आहे त्याला चहापाण्याची. आणि तू..." विकीने चमकून रॉबर्टकडे पाहिले. तो पाठमोरा होऊन टीपॉय समोर ओढीत होता. मग तो विक्रीच्या समोरच्या सोफ्यावर बसत म्हणाला,"विकी, तू आपला फ्रेंड म्हणून विचारतो, डोन्ट मिसअंडरस्टॅंड मी, तू 'त्या' मंडळींमध्ये कसा गेलास रे?" त्याने उत्तर दिशेकडे बोट दाखवत प्रश्न केला.

बँकेची मागची निवडणूक अटीतटीची झाली होती. दोन्ही पॅनलमधून समसमान उमेदवार निवडून आले होते. विकीला गळाला लावण्यासाठी बडी धेंडं भेटायला येऊ लागली. कुठून कुठून त्याला फोन येऊ लागले. विकीने आपली मूठ उघड केली नाही. तो डोळे उघडे ठेवून व सगळीकडे कान लावून होता. अनेक प्रपोजल आली. व्हाईस चेअरमनपदाची ऑफर आली तेव्हा त्याने थम्स अप केले. झाले! प्रगती पॅनलचा विकी विकास पॅनलला जाऊन मिळाला! डिसोझा चेअरमन, विकी व्हाईस चेअरमन! विकी गाईच्या चिन्हावर निवडून आला होता, आता तो 'तुतारी' वाल्यांची पुंगी वाजू लागला.

विकीला रॉबर्टच्या प्रश्नाचा रोख समजला. तो मुरलेल्या राजकारण्याचा आव आणत मोठ्या मानभावीपणे म्हणाला, "खरं सांगू? माझी तिथे घुसमट होत होती. 'प्रगती' चा तो आलेक्स स्वतःला जणू किंग समजतो. असेल तो मोठा बिल्डर... अरे, कालचा पोरगा... त्या झ्याटूपुढे आम्ही नंदीबैलासारखी मान डोलवायची का? तेव्हा

विकासाच्या मुद्द्यावर मी ह्यांना साथ दिली आहे. पुढेमागे चेअरमनपदाचे चान्सेस आहेत. आम्हां समविचारी मंडळींचे गटबंधन आहे हे. ह्यात राजकारण काहीच नाही."

"भारीच रे! तुमच्या 'गट' बाजीचा अर्थ मला कळत नाही. लोक वार्ता काढतात ना जेवणावळीवर, फ्युनरलच्यावेळी. आम्ही ह्याला निवडून दिले कोणासाठी आणि हा आता गेला कुणीकडे" रॉबर्ट पुन्हा उत्तरेकडे बोट दाखवत म्हणाला.

"बस् का रॉबी! अरे, ती मंडळी तेवढी वाईट आणि आपली माणसं, काय म्हणतात ना आजकाल, तशी त्या वॉशिंग मशीनमधून धुऊन काढलेली वाटतात का तुम्हाला? अरे, चांगल्या कामाचा सत्यानाश करणारी मंडळी आमच्या बोर्डात आहेत! विश्वास बसणार नाही तुझा, एकेकाचे कारनामे आम्ही सांगितले तर... जाऊ दे! आपल्या तोंडात कशाला ती घाण? ज्याचं त्याला, काय? आपलं उद्दिष्ट एकच - प्रगतीचा प्रकाश पसरला पाहिजे. विकास झाला पाहिजे."

"अं? विकास? कोणाचा रे?"

"अर्थातच, बँकेचा!" विकी घाईघाईत म्हणाला, "तुला एक उदाहरण सांगतो. मागे एक बऱ्यापैकी लोन प्रपोजल आलं होतं... 30 कोटींचं! या मंदीच्या काळात एक तर कर्जांना उठाव नाही, त्यात ठेवी वाढतायत. बोर्डापुढे प्रस्ताव आला तर समाजवाद्यांनी चक्क विरोध केला! कर्जे गेली तर तरच कमाई आहे ना रे?"

"होय रे बऱ्यापैकी कमाई बुडाली म्हणायची!" रॉबर्ट गंभीर मुद्रेने तिरकस स्वरात म्हणाला.

"तेव्हा पार्टीने सुधारित प्रपोजल दिले... 20 कोटींचे. पुन्हा तेच!"

"अरे, पण काही कारणं नमूद केली असतील ना त्यामागे?”

"तांत्रिक कारणं रे! म्हणे मशिनरी सेकंड हॅन्ड आहे. कर्जदाराचा मागील रेकॉर्ड चांगला नाही, वगैरे वगैरे. खुसपटं काढायची तरी किती? त्यामुळे आमच्या पॅनेलला यावेळी फुल्ल मेजॉरीटीने निवडून यायला हवं..."

"अहो, हे काय? कधीकाळी भावजी आले आहेत तर तुमची आपली नेहमीची बडबड चाललेली आहे!" रिटा चहाचा ट्रे घेऊन आली होती. मग ती विकीकडे वळून म्हणाली, "अहो, रोज घरात पण यांचं हेच... प्रवचन चालूच... किस पडतील नुसता!"

"रिटा, मी किस पाडतो, पण घेत नाही ना?" रॉबर्ट ओठांचा चंबू करीत तिला डिवचत म्हणाला. "गप्प बसा हो! काहीतरीच पांचट विनोद करताय!" रिटा लाजून उद्गारली.

"बघा वहिनी", विकी हसत म्हणाला. "बँकेचा विकास व्हावा, पर्यायाने समाजाची उन्नती व्हावी म्हणून मी धडपडतोय तर हा रॉबी मला सारखे चिमटे काढतोय! समजतं रे मला तुझं बोलणं..."

"तुम्ही चहा घ्या, भाऊजी. यांना सवयच आहे..."

"काय हा तुम्हालासुद्धा चिमटे काढतो? ती किस काय, चिमटे काय! अजून रोमान्स टिकवून आहात रे तुम्ही!" विकी हसत म्हणाला. रिटा चिक्कार लाजली. ती आत पळाली.

"रॉबी, आज आम्ही बँकेसाठी रक्ताचे पाणी करतोय, पण अपोजिटवाले काय काय छापून आणतात. थेट आरबीआयपर्यंत तक्रारी? पण प्रोग्रेस आहेच ना? दिसतो तो आकड्यांत... १५% डिव्हीडंड देतोय यंदा! आहेस कुठे! एनपीए पण आटोक्यात आहे. केळी खाऊन नाही येत तो." विकी केळ्यांचे वेफर्स तोंडात टाकीत म्हणाला.

"खाणारे खातात. ज्याला पचेल ते. पण कर्माचं फळ मिळतंच बघ. ज्याला त्याला बरं-वाईट. मी ओळखतो ना तुला! माझे मत तुलाच विकी! घे चहा." रॉबर्टने आपला कप उचलला.

"होय ना? मला खात्री होतीच. तू आपला माणूस म्हणून सांगतोय, कुठे बोलू नकोस. यावेळी आपल्या पॅनलला फुल मेजॉरिटी मिळणारच! आम्ही फील्डिंगच तशी लावली आहे..."

"फिल्डिंग? म्हणजे मॅचबिच घेणार काय? फ्रेंडली!" रॉबर्ट खोचकपणे म्हणाला.

"चेष्टा नको... ऐक तर," विकी पुढे वाकून समजावून सांगू लागला, "या वेळची आमची स्ट्रॅटेजीच अशी आहे की समाजवाद्यांमध्ये फूट पाडायची. सोप्पय ते. आधीच त्यांच्यात पन्नास गट. दोघा-तिघा नाराजांना पटवायचं. म्हणजे त्यांचे एकापेक्षा अधिक उमेदवार उभे राहतील. डमी रे! त्यांचीच मत खाण्यासाठी! त्यांच्यातील तो बंडखोर विकेश? त्याला नंतर तज्ञ संचालक म्हणून ऑप्ट करायची ऑफर दिली आहे आम्ही."

"विकेश? तो तज्ञ संचालक? काय त्याची पात्रता?" रॉबर्ट खो-खो हसत म्हणाला. "अरे, तो तर साधा बँक कारकून होता आणि आता त्याचा वराह मांस विक्रीचा धंदा आहे ना?"

"तो आणि त्याचा खासगी व्यवसाय. आपल्याला त्याच्याशी देणंघेणं नाही. एसबीआय मध्ये थर्टी इयर्स सर्विस केली आहे त्याने." "पण मी ऐकलंय की एका फ्रॉडकेसमध्ये त्याला सस्पेंड केलं होत, काही काळासाठी."

"विरोधकांची कारस्थानं रे! निर्दोष सुटला तो. पास्ट इज ओवर नाऊ." त्याला क्लीन चीट देत विकी पुढे सांगू लागला, "तर तो माझ्या शब्दाबाहेर नाही. हाताचा पंजा? काँग्रेसचा ऑल्विन आमच्याच हातात आहे. त्याला एडलीन मॅडमच्या घड्याळाचे काटे कसे उलटे फिरवायचे तेही आम्ही निश्चित केले आहे. बाकी इंडिपेंडेंट उमेदवार तळ्यात-मळ्यात. त्यांना कसे खेचायचे ते आम्हांला ठाऊक आहे. हेरून ठेवली

आहे सगळी माणसं. करतील ते बरोबर मॅनेज." विकी मोठ्या खुशीत येऊन सांगत होता.

इतक्यात त्याचा फोन वाजला. फोनवरील नंबर पाहून विकी उठला व खिडकीजवळ जाऊन बोलू लागला. "निघालोच रे जॉनी. तू त्या किसनला भेटलास का? काय? ताणून धरतोय अजून! दिसतो बावळट पण पक्का पोहोचलेला आहे तो. पण पटण्यासारखा आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक ना ? मालामाल करून टाकू त्याला. कसंही करून मासा गळाला लागला पाहिजे. आलोच मी पाच मिनिटांत..."

विकी मान डोलवत सोफ्यावर येऊन बसला. फोनमधील मेसेज तपासू लागला. त्याचं संभाषण ऐकून रॉबर्ट अवाक् झाला होता. तो हातातील चहाचा कप खाली ठेवत म्हणाला, "विकी, अरे हे राजकारण्यांचे खेळ. ते आपल्याला खेळवतात आणि कमावतात. पण लोकांनी जिथे विश्वासाने आपली कष्टाची कमाई ठेवली आहे त्या सहकारी बँकेत कशाला रे ही नाटकं? याला स्ट्रॅटेजी म्हणतात? की सत्तेसाठी चाललेला मनी पॉवरचा गेम? तुमचा होईल रे खेळ, पण गरीब नोकरदार खातेदारांचं काय? बड्या कर्जदारांची कर्जे तुम्ही काय ती निर्लेखित करता आणि दोन-चार लाखांसाठी गरिबांच्या घरावर टाच आणता! आरबीआयच्या एका आदेशसरशी टाळं लागेल बँकेला. गेल्या आमच्या एफडी मग गाढवाच्या xxx! वाटोळं होईल ह्या तुमच्या साठेमारीने बँकेचं. कसला आलाय ह्यात विकास? स्ट्रॅटेजीच्या नावाखाली कसलं फोडाफोडीचं राजकारण खेळताय तुम्ही? तुम्हांला नाचवणारे तुमचे ते सूत्रधार आणि त्यांचे उद्योगधंदे. लावतील बँकेला देशोधडीला! ही आपली बँक यापुढे आपली राहील याची खात्री वाटत नाहीय मला..."

रॉबर्टने केलेली प्रश्नांची सरबत्ती ऐकून विकी एकदम गार पडला. तो आवाज खाली आणून म्हणाला, "तुझा काहीतरी गैरसमज होतोय रॉबी..." तो अस्वस्थ होत उभा राहिला. हातावरील घड्याळात पाहत म्हणाला, "मला महत्त्वाची मीटिंग आहे आता. उशीर होईल. भेटू पुन्हा आपण. त्या वेळी सविस्तर बोलूया. पण आपली निशाणी लक्षात ठेव. तुतारी!" तो हाताची मूठ वर नेत म्हणाला.

"होय रे, इलेक्शनचे ढोल-ताशे वाजायला लागले ना. आता सगळीकडे असंच व हेच असणार आहे." रॉबर्ट उजव्या हाताचा अंगठा तोंडाकडे नेत प्याल्याचा अभिनय करीत म्हणाला.

# ब्रुटस तू सुद्धा!

▪ दीपक मच्याडो, पाली

deepak.machado@yahoo.com

"या दोघांचा नेहमीच वाद असतो", वसंत म्हणाला.

"तू त्यांच्यात पडू नकोस रे," रोहन त्याला म्हणाला, "हे दोघे इकडे दोन तास भांडतील आणि नंतर दोघे जाऊन बारमध्ये मस्त मेहफिल रंगवत बसतील." रॉनी सॅमसन आणि मंदार यशवंत यांच्यातील शाब्दिक वादविवाद त्यांच्या सर्व मित्रमंडळीत परिचित होता. तसा तो खऱ्या अर्थाने वाद नसायचा. ते बहुतेक बौद्धिक आणि वैचारिक द्वंद्व असायचे. अत्यंत तात्विक आणि संयुक्तिक मुद्द्यांची रेलचेल असलेले त्यांचे वैचारिक बॅडमिंटन चालायचे. त्यात अपशब्द किंवा बाजारी भाषा चुकूनही ऐकायला मिळत नसे परंतु आपापल्या धर्म शिकवणुकीच्या मुद्द्यावर त्यांची जी वागयुद्ध व्हायची त्यामुळे इतर मित्रांची मात्र भरपूर करमणूक होत असे.

शाळा कॉलेज पासून एकमेकांच्या सहवासात असलेल्या या सर्व सहा जणांमध्ये घनिष्ठ मैत्री होती. कधी ट्रेकिंगला जाणे, कधी बाहेरगावी पर्यटन करणे अशा अनेक कारणास्तव ते नियमितपणे एकत्र येत आणि आपल्या या वर्षानुवर्षीच्या मैत्रीच्या स्वच्छ आनंदात मनसोक्त डुंबून जात. रॉनी हा जसा हाडाचा ख्रिश्चन होता तसाच मंदार हा कट्टर संघीय होता. तो लहानपणापासून शाखांमधल्या कवायतीत भाग घ्यायचा परंतु हे वेगळेपण त्यांच्या निश्चल मैत्रीच्या कधी आड आलं नाही. किंबहुना त्या सहा जणांमध्ये रॉनी आणि मंदारची वैयक्तिकपणे सर्वात घट्ट मैत्री होती. ज्या आस्थेने रॉनी मंदारच्या घरी जाऊन त्याच्या आईने प्रेमाने वाढलेल्या पुरणपोळ्या खायचा त्याच भावनेने मंदार रॉनीच्या घरी येऊन त्यांच्याकडे बनवलेल्या केक अथवा पुडिंगवर ताव मारायचा. मंदार तर नेहमीच मोठ्या गर्वाने सांगत असायचा की सार्वजनिक स्तरावर सांप्रदायिक मुद्द्यांवरून कितीही उहापोह होवो, रॉनी आणि मी प्रथम भारतीय आहोत आणि प्रसंग आला तर त्याच्यासाठी प्राणही द्यायला मी तयार आहे.

रॉनी एका कॉल-सेंटरमध्ये नोकरीला होता तर मंदार एका खाजगी कंपनीत काम करायचा. रॉनीला मात्र जीवनात नोकरी करण्यापेक्षा ह्या चौकटीतून बाहेर पडून एखादा

उद्योगधंदा काढावा असे नेहमी वाटे. घराच्या बाजूला जमीन होती आणि अनेक वर्ष त्यावर काहीही पीक न घेतल्यामुळे ती ओस पडली होती. शेतीविषयक काही उद्योग असतील तर या जमिनीचा योग्य उपयोग करणे शक्य होते. त्याच वेळेला पेपरमध्ये आलेली एक बातमी बघून रॉनीने आपल्या भावी उद्योगाच्या दिशेवर शिक्कामोर्तब केले. पोलिसांनी एक छापा मारला असता युरियाची भेसळ असलेली दुधाची पाकिटे सापडली होती. "पुर्णा" ब्रँडचे हे दूध पंचक्रोशीतले अनेक जण वापरत होते. भरपूर राजकीय लागेबांधे असलेल्या एका परप्रांतीय आसामीच्या मालकीच्या असलेल्या पुर्णा डेअरीने मात्र ही भेसळ बाहेर झाली आहे आणि आपला यात काहीही हात नाही असे जाहीर पत्रक काढून प्रकरण निभावून नेले; नव्हे, मिटवून घेतले. परंतु संशयाची सुई होतीच. रॉनीने विचार केला, का नाही आपणच एखादी डेअरी चालू करूया आणि लोकांना निदान शुद्ध दुधाची शाश्वती देऊ या.

गायीचे शुद्ध दूध मिळेल म्हणून जाहिरात करून प्रथम चार जर्सी गायी खरेदी करून रॉनीने आपला उद्योग चालू केला. रॉनी आपल्या डेअरीवर दूध-शुद्धता चाचणीची उपकरणे ठेवत असे आणि कोणीही ग्राहक त्याच्या दुधाची चाचणी करून खात्री करून घेऊ शकत होता. काही काळानंतर म्हशी देखील घेऊन रॉनीने आपला उद्योग चांगला नावारूपास आणला. "रॉनीप्युअर" या नावाने आता पिशवीबंद दुधाचीही निर्मिती त्यांनी चालू केली. शुद्धतेची हमी असल्यामुळे रॉनी डेअरी हे प्रचलित घरगुती नाव झाले. आपल्या डेअरीचा पहिला वर्धापन दिन रॉनीने आपल्या सहा जीवश्च-कंठश्च मित्रांना बोलावून साजरा केला. नेहमीप्रमाणे या वेळेला मात्र मंदारबरोबर विशेष वाद झाला नाही. या कालावधीत मंदारने राजकारणात पदार्पण केले होते. पक्षाच्या संस्कृती रक्षण मंडळाचा तो आता मुख्य होता. गळ्यामध्ये आता स्वास्तिकाचे लॉकेट असलेली गोळ्या-गोळ्यांची जाड साखळी होती. उजव्या हाताच्या मनगटाला रुद्राक्षा सारख्या दिसणाऱ्या दोन माळा बांधल्या होत्या. गळ्याच्या खाली पूर्वीपासूनच त्याच्या स्वर्गवासी वडिलांचे 'यशवंत' हे नाव गोंदलेलं होतं. उच्च दर्जाचे मद्य आणि स्वादिष्ट भोजन प्रकार असलेली ही पार्टी चांगली उशिरा रात्रीपर्यंत चालली. रॉनीच्या उद्योगातील त्याच्या यशाचे मित्रांनी कौतुक तर केलेच पण अशीच प्रगती केली तर अमूलला आपला धंदा बंद करावा लागेल अशी हलकी थट्टा केली. मंदार घरचा शाकाहारी पण रॉनीच्या घरी मात्र मटण चिकन आवडीने खायचा.

"काय रे रॉनी", मंदारने रॉनीची थोडी खेचण्याकरिता विचारले, "हे बकऱ्याचेच आहे ना? की 'त्याचे' आहे?"

रॉनी हसला. "काय मंदार? अरे "त्या" ला माझे आई-वडील स्पर्श सुद्धा करीत नाहीत. किंबहुना इकडचा नव्वद टक्के समाज आहे त्यालाही त्याची आवड नाही आणि

तशी परंपराही नाही. खरं म्हणजे येथे आगरी म्हणा, कोळी म्हणा, भंडारी म्हणा किंवा ख्रिस्ती म्हणा सर्वांवर भारतीय संस्कृतीचाच प्रभाव आहे. त्या परंपरेला पुढेही कधी तडा जाईल असे मला वाटत नाही."

"चेष्टा केली रे तुझी!", मंदार म्हणाला, "मी हे जाणत नाही का? जस्ट बाय द वे सांगायचे म्हणजे मी आता संस्कृती रक्षण संघाचा मुख्य आहे आणि त्यामध्ये गोसंरक्षण देखील आहे."

"वा अभिनंदन! अरे, जरूर संस्कृती रक्षण कर पण चोर सोडून संन्याशाला फाशी देऊ नकोस म्हणजे झाले." रॉनी हसत म्हणाला. त्यानंतर रॉनीने आपले पुढचे प्लॅन्स काय आहेत याबद्दल सर्वांना माहिती दिली. लोणी आणि पेढे याचे उत्पादन करण्याचा आपला मानस त्याने विशद केला. त्याकरिता आणखी एक तबेला उभारण्यास सुरुवात झाली होती.

पुर्णा डेअरीचा मालक चंदुलाल बजरंगी हा परप्रांतीय, अनेक वर्षांपासून आपली डेअरी चालवत होता आणि त्याने चांगला जम बसवला होता. त्याचबरोबर आपल्या धंद्यास अडसर येऊ नये म्हणून आसपासच्या राजकीय धेंडांशी तसेच सरकारी यंत्रणेशी व्यवस्थित संधान बांधून होता. भेसळ प्रकरणातून तो सहीसलामत बाहेर पडला होता परंतु रॉनीच्या शुद्धतेची हमी या घोषवाक्याचा जनमानसांवर चांगलाच प्रभाव पडला होता. रॉनीप्युअर दुधाच्या यशामुळे पुर्णा दुधाचा मार्केट शेअर अपूर्णत्त्वाकडे चालला होता हे कटू सत्य होते. आता पेढे आणि लोणी यांचे उत्पादन करण्याचा घाट घालून परप्रांतीयांच्या या हक्काच्या उत्पादनांच्या विक्रीवरही आफत येण्याचा संभव नजरेस येत होता.

रॉनी अन्नपदार्थ उत्पादनाकरता लागणाऱ्या विविध प्रकारचे परवाने याकरिता अन्न प्रशासन व इतर कार्यालयात फेरे घालत होता. त्यात यशही येत होते. आता नवीन तबेल्यासाठी काही दुभत्या गायी आणण्यासाठी पालघरला जायचे होते. एके संध्याकाळी रॉनीला फोन आला. रुक्ष आवाजाची एक व्यक्ती पलिकडून बोलत होती.

"क्यों रॉनीभाई, कैसे हो?"

"मै ठीक हुं. कौन बात कर रहा है"

"आप ठीक हो सुनकर अच्छा लगा. आगे भी ठीक रहना है या नही?"

तेवढ्यात आणखी एका व्यक्तीने पलीकडून फोन घेतला. "हे बघ रॉनी. जास्त उडायचा प्रयत्न करू नकोस. जेवढे आहे त्यावर समाधान मान नाहीतर... समझनेवालों को इशारा काफी!"

"हॅलो, हॅलो, कोण बोलतोय? हॅलो.... " फोन कट झाला होता.

त्यानंतर काही दिवसांनीच रॉनी आणि त्याच्या मित्राचे नेहमीप्रमाणे गेट-टुगेदर झाले. आपल्याला आलेल्या धमकीबद्दल त्याने सांगितले. "तुझे यश बघून कुणाचे तरी पोटात दुखतंय. गो अहेड, अवर फ्युचर वर्गीस कुरियन. आम्ही तुझ्या पाठीशी आहोत." मित्रांनी दिलासा दिला. मंदारने मात्र थोडी पोक्त भूमिका घेतली. "रॉनी, तू आतापर्यंत चांगली प्रगती केली आहेस. आर्थिक दृष्ट्या सुस्थापित झालाहेस. ह्या पलीकडे जाऊन कोणाशी शत्रुत्व होत असेल आणि जीवाला धोका होत असेल तर त्याचे सारासार अवलोकन करूनच काहीतरी निर्णय घे. अनेक लोकांचे आणि राजकीय पुढाऱ्यांचे यात हितसंबंध गुंतलेले असतात."

"अरे मंदार, तू असताना मी का घाबरायचे", रॉनी म्हणाला, "कॉलेजमध्ये राडा झाला होता तेव्हा नव्हतास का छातीची ढाल करून बुरुजासारखा माझ्या समोर राहिला होतास? चला, आता जरा इतर गोष्टी करूया. चिअर्स!" मग मंदारने एक गोड बातमी दिली होती. "माझे एंगेजमेंट होतेय दोस्तांनो!"

"अरे, वसंत म्हणाला, कोण आहे ती स्वप्नसुंदरी? आमच्या भावी वहिनीचा फोटो तरी आम्हाला बघायला मिळेल का?"

"नो, नो, नो, नॉट नाव! मंदार म्हणाला, "ते सद्या सिक्रेट आहे. तुम्हाला सर्वांना एंगेजमेंट पार्टीला आमंत्रण करण्यात येईल, मगच सरप्राईज देऊ!"

त्यानंतरच्या पुढच्याच आठवड्यात रॉनी पालघरला गेला. दोन जर्सी गायी खरेदी करून एका मोठ्या टेम्पोमध्ये त्या आणल्या जात होत्या. रॉनी पुढे ड्रायव्हरशेजारी बसला होता. रॉनीला वाचनाचीही भरपूर आवड होती. इंग्रजी क्लासिकल साहित्यात त्याला विशेष रस होता. आता देखील प्रवासात टाईमपास होण्याकरिता टेम्पोमध्ये शेक्सपियरची ज्युलियस सीझर ही कलाकृती वाचण्यात तो गर्क होता. जिवश्च-कंठश्च मित्र असून देखील ब्रुटसने सीझरचा कसा विश्वासघात केला हे वाचून आपण मित्रांच्या बाबतीत किती सुदैवी आहोत याचा तो विचार करू लागला. एकमेकावर जीव ओवाळून टाकणारे मित्र आपल्याला दिल्याबद्दल त्यांनी देवाचे मनोमन आभार मानले.

वाड्याहून वसईकडे येणाऱ्या रस्त्यावर टेम्पो असताना समोर रस्त्याच्या मधोमध एक ट्रक उभा असलेला त्याने पाहिला. त्याच्या आजूबाजूला पंधरा-वीस माणसे उभी होती. ट्रकच्या बाजूने पुढे निघून जायला वाट नव्हती. रॉनीने खिडकीबाहेर डोकावत विचारले, "काय झालंय, टायर वगैरे गेलाय का?"

रॉनीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून त्यातील एका आडदांड तरुणाने दरडावणीच्या सुरात विचारले, "गाडीत काय आहे?"

"गायी आहेत," रॉनी म्हणाला, "माझा डेअरीचा उद्योग आहे"

"आम्हाला अशी तक्रार आहे की तुम्ही कत्तलीसाठी जनावरं नेत आहात!"

"अहो, असे काय करता?" आर्जवाच्या स्वरात रॉनी म्हणाला, "माझ्याकडे सर्व कायदेशीर कागदपत्रे आहेत. पशुपालन विभागाची सर्व सर्टिफिकेट्स आहेत. वाटल्यास पालघरच्या गोसेवा फार्म येथे फोन करून खात्री करून घ्या. त्यांच्याकडून अधिकृतरित्या मी खरेदी केली आहेत. मी स्वतः फोन लावून देतो." टेम्पो भोवती आता टपोरी दिसणाऱ्या तरुणांचा वेढा पडला होता.

"खेचा त्याला आणि चांगला धडा शिकवा." त्यांच्यातील एक जण बोलला. परिस्थितीचे गांभीर्य आता रॉनीच्या लक्षात आले होते. टेम्पोचा चालक रदबदली करीत असता त्याच्याही दोन चार कानशिलात बसवून त्याला त्यांनी गप्प बसवले होते. दोन-चार तरुणांनी त्याला खाली खेचून लाथा बुक्क्याने तुडवायला सुरुवात केली.

"भावांनो," रॉनी आकांताने ओरडला, "मी निर्दोष आहे. अहो त्यात दुभत्या गायी आहेत. मी लाखाने पैसे मोजलेत, आणि तुम्ही...!" असे बोलता बोलता सायकल चेईनच्या जोरदार वाराने त्याचे एक गालफड फोडून काढले. गयावया करीत कसाबसा उठून रॉनी त्यांना म्हणाला, "थांबा! मला दोन मिनिटे द्या. अहो मंदार यशवंत माझा खास मित्र आहे. त्याला मी फोन करतो."

थरथरत्या हाताने मंदारचा नंबर शोधत असतानाच लाठीने हातावर एक जोरदार फटका बसला आणि फोन दूर फेकला गेला. त्या अगतिक परिस्थितीत टेम्पोच्या पायरीवर कण्हत बसलेला असताना त्यांने ते धारदार अस्त्र पाहिले आणि भीतीने त्याचा श्वास रोखला गेला. पुढच्या क्षणीच तो अजस्त्र चाकू त्याच्या आतड्याना चिरत पोटात गेला. पोटामध्ये जणूकाही अग्नी पेटलाय अशा वाटणाऱ्या त्या जळजळीत वेदनेतही त्याचे डोळे विस्फारले गेले. त्याची जीवन-ज्योत मालवण्यास कारणीभूत होणारा तो अखेरचा आघात करणाऱ्या व्यक्तीच्या मनगटाला रुद्राक्षासमान दोन माळा बांधल्या होत्या, त्याच्या गळ्यातली स्वास्तिकाचे लॉकेट असलेली गोळ्या-गोळ्यांची जाड साखळी सांजप्रकाशात चमकत होती. उडालेल्या रक्ताच्या काही चिळकांड्यानी त्याच्या गळ्याखाली गोंदलेल्या "यशवंत" नावाला जणू काही अभिषेक केला होता.

"मंदा..., मं, मं, तू?"  अखेरचा श्वास घ्यायच्या आधी रॉनी तेवढेच बोलू शकला. त्या सुनसान रस्त्यावर विसावलेल्या त्या निष्प्राण देहाच्या बाजूला पडलेल्या पुस्तकाच्या पानावर ‘एट टू ब्रुटे!’ (ब्रुटस तू सुद्धा!) असा मथळा असलेले दृश्य दाखवणारे चित्र फडफडत होते.

काही दिवसांनी पुर्णा डेअरीचे मालक चंदुलाल बजरंगी यांच्या मुलीचा श्री. मंदार यशवंत यांच्याबरोबरचा झालेला साखरपुडा थाटामाटाने पार पडला.

# घडत्या कादंबरीचा तुकडा

■ प्रसाद कुमठेकर, मुंबई

"संज्या निस्त कोरडं कोरडं या इकडं या इकडं या मननुक तू, तुला बरोबर माहितिय या जल्माला तरी तुझ्या बापाला हा वाडा सुटना, माझी हाडं या इथंच जळणारायत..."

बोलत बोलत मी घोड्याच्या पागत आले. सगळ्या वाड्यात इथंच काय ती चांगली रेंजय.. ऐकू निट येतंय कानाला."

व्हय हाव सारख्याला वारखेच हाव बस. झालं समादान.... काय? वामांगी रुख्मायी दिसे दिव्य सोभा... संज्या भाड्या लय आरत्या आठीवलाल्यात रे तुला आं.."

संजा पिसाळल्यासारखा हासला. मी रोखलं नाही आणि बोलायचं पण थांबले नाही.

"तुझ्या बापानं होतं तितकं घालून केलेला मळा बी भावायला दिला. आता त्या बरड तुकड्याचं काय नवल हाय..."

आता मी बी बोलताना हसण्यावरच निवलालते... पर काळजात निस्त चर्र चर्र करलाल्त.

"या मंगळवारी तर यांनी शरन्याबरबर सोता हुबारून ही पाग सारवून नीट करून घेतलीय, जुनी खुट्टी काढून नवी मारलीय.."

मी जूनंच गार्हानं नवं असल्यासारकं मांडन्यावर होते. संज्यापण काही बाही शानपणाच्या गोष्टी सांगण्यावर होता.

"आता घ्या त्येंना... मालकाला अन मी सांगू?"

बाई हे पोरगं आजकाल ताल नसल्यावानीच बोल्तय. उग काई सांगायचं मंजी काय. त्येन्ला तर त्येन्ला आता मलाई ईळ रात पंचकल्याणी दिसूलालाय कोण हसलं तरी खिंखाळल्यावनी वाटतंय. आत्ताई मोबाईलवर बोल्लालेव पर ऐकताळा कानात खिंखाळण्याचाच आवाज युलालाय.

“व्हय वामांगी रुख्मायीचय मी अन इटेवर उभे माझे मालक. न्हैतरी ह्येनी मन्तेतच शालीहोत्रात लिव्ह्लयय मनं की घोडा यज्ञ करतांना डोळ्यात आलेल्या पाण्यानंच बनलाय. उजव्या डोळ्यातून आलेल्या पाण्यानं घोडा. अन डाव्या डोळ्यातून आलेल्या पाण्यानं घुडी.”

मी आता मट्या शानपणानं ज्या गोष्टीनं माज समद्यात जास्त डोस्क खवळतय तीच मुरकु मुरकु सांगूलालते लेकरांना. कान गरम गरम हुलालता फोननं तरीपण. “ती वाण्याची येनी लय टोचू टोचू बोलतिय रं, मागावरंच राहती सटवी. जरा एकांद्या मंगळवारी पोरहायला सुट्टी दिली का हिनं काय ना काय निम्मित काडून येणार अन मनणार येवल्याला गेलेत वाटतं घोडबाजाराला, हाळीला, अकलूजला गेल्यात वाटतं घोडबाजाराला? संज्या लोक नीट न्हाई रे.. लय टपून बसतंय टिंगली उडवायला.” "रडनुक रडनुक मनायला का चाल्लंय तुमचं. इथं युन बगा माजी नै तर नी तात्याची तरी..." आता निस्ता खर खर आवाज युलालता. बोललेलं ऐकू मनुनच जाइना गेलत नीट.

"मला कधी काय सांगतेत इचारल्याशिवाय? या बारीला शाळंत जाऊन आल्यापासून तर कैच म्हंजे कैच बोलना गेलेत. मड बसू दे त्या मोमल्याचं, किडे पडून मरील बघ त्येनं."

बोलताना नुसता जाळ जाळ हुलाल्ता डोक्यात अन धारा डोळ्याला. मी खसखस पुसले पदरानंच तोंड उगू पाण्यानं मोबाईलचा खराबा नगो व्हायला. मी फोन ठीवला. बोलणं तरी काय नवं होतं.

‘आत्तापरेंत बोल्लेनीं मी आत्ता कसं जमन उगच... ह्येनला मी कशी अन का मानून बोलू व्हय.’ मी रडू रडू संज्याला, रंज्याला, जेचा फोन आला त्येला हेच सांगण्यावर होते.

पोर तिथं हुंटावर बसून दुरुन सांगणार मला कि ‘आई असं कर, तसं कर, बोल तात्याला, इचार तात्याला.’

घ्या आता मजा जल्म गेला यांच ऐकिण्यात, आता बोल मनल्या मनल्या बोलणं कसं जमन मला. अन चूक असलेल्या माणसाला बोलता तरी येईल एक वेळ पण माझ्या निसंग मालकाला काई बोलायला कसं जीब रेटन माझी.

पर हे पन खराय की लय काळजी वाट्लालीय आजकाल मला मालकाची. येडे वाकडे सपनं पडलालेत. परवा तर मला दिसलत की, मालक पंचकल्यानीवर बसलेत अन घोडा जोऱ्यात उधळलाय. हे लामच्या लाम ढांगा टाकीत पळलालाय हेनला घिऊन. अन मागी मी हाका मारीत पळूलालते 'मालक थांबा मालक थांबा' म्हणू

म्हणू. घोडा ऐकणार थोडीच आहे मला. तो मालकाला लय लय लांब घेवून चाल्लोता. म्या झटमुन्या उठ्लते. निस्त घामानी डबडब झाल्त आंग. पाट्टेपाट्टे पडलेलं सपान. त्या दिशी दिसभर सारकं छातीत लक लक लक करलालं. हे जागीच होते. माझ्याकडं पाहिलं फक्त विचारलं काहीच नाही...

ह्यांना काही झालं तर मी लगी लगी वळखीते. पण यांना काहीच कळलं नाही. पुरुष माणसाला तेवढी पारख कुठ राहतीय. पण आशेवरच चालतोय न सोंसार. आत्ता त्येयला माज टेंगषण कळल मग कळल मनून तर एवढे दिवस कळ काडली. तो पचकल्यान इळ रात सूड घेऊलाल्यावर आखीरला न राहवून सोताहूनच मालकाला सांगितल या पाट्टे पाट्टेच्या सपनाचं. ऐकून घेतल अन मनले,

"पारू तुला कवाबवा दिसलंय हे... मला रोजच दिसतंय की मी सूद-मूद आपल्या किरिष्ण्यासारख्याच पंचकल्याणीवर बसून दौडत निघालाव. घोडं उधळलंय मला घिऊन"

मला कळनाच गेलं आता काय बोलावं ते. मनात मनलं ‘मालक तुम्हाला पायजेल पंचकल्याणी. तुमच्या मर्जीनं तुम्ही त्यावर सवार होणं येगळं, तवा त्याचं उधळनं येगळं. अन मला असं घाबरं घाबरं करून उधळनं येगळं.

मी तोंड उगडून बोलणार होते कैतर तोपरेंत हेनीच तिसरीकडं बगत मला मनले “जरा चहा टाकतीस का ?”

मी सैपाक घरात चहा टाकलालते. अन मालक सैपाकघरच्या दारापाशी उभं ऱ्हाऊन मला त्या 'ऐतश' घोड्याची गोष्ट सांगलालते. दिसभरात मी जितके कामं करलालते तितक्या कामाच्या मधी युन त्येनी हेच गोष्ट संगलालते. ऱ्हाई मनलं तरी कमीत कमी दहा बार सांगीटलती ही गोष्ट की, ऐतश म्हणून देवांयचा एक पांडरा पांडरा पांडराशीपट नुक्रा घोडा आकाशामधीच जल्मलता मनं. अन जल्मल्या जल्मल्या हे उधळला मनं. ऐकिनावनी इतका उधळला मन कि समदी दुनिया,ग्रह, तारे समदे तेच्या टापानं हादरून पार आता आपली जागा सोडतीन का काय वाटलालतं मनं.

असं झालं तर का आपली पिरिथवीबिथ्वी समदं संपणार असं झालं असतं. चिंतेत पडलेले समदे देवं मंग इंद्रराजाकडे उपाय द्या कै तरी मनून गेले. मनले इंद्रभगवाण येसण घाला. नै नै माझं सांगण्यात चुकलं. येसन घालायला ती काय गाय हाय का. हां, देव मनले लगाम घाला ऐतश घोड्याला. तवा इंद्रभगवाननं त्या घोड्याला म्हणजे ऐतशला आपले मानसं लावून लगाम घाटला. अन मंग त्या सूर्याला

ऐतश दिला जेच्या रथाला आदीच सात घोडे होते. घ्या ज्येला लोकं आधीच सप्तसप्ति मनत होते त्या सुर्व्याला आठवा घोडा ऐतश. अग माय ग! कळनाच गेलंय मला "

आदीच्या आपल्या सातात आठवा ऐतश बांधला तरी कसा आसन ना सूर्यानं?" मला ऐकिनावनी तोंडातून बाहेर पडलेला मजा सवाल ऐकून मालक मनले,

"पारू श्रीकृष्णाला दिक्खील तूज्यावानीच प्रश्न पडला होता बघ."

मी तवा बोल्लेनी पण जसं मी मालकाचं बोलणं ऐकिते की नै ध्यानानं. तसं त्येनी करनात. आपल्यातच राहतेत, त्येन्ला जे ऐकायचाय त्येच ऐकीतेत. या बी बारीला नीट ऐकायनीत त्येनी. माज म्हणनंच नै समजून घेतलं. खऱ्यानं तर मला इंद्रदेवानं दिल्यावर त्या घोड्याचं काय झालं? कुठं गेला ऐतश? हा सवाल नव्हताच पडला. मला सवाल पडला व्हता."

देव येवडा शाना तरी त्येनं जेच्याजवळ आधीच सात सात घोडे हायीत त्येलाच आणि पुन्ना आठवा घोडा दिलाच का ? जरूर असणारे पण घोडा घेऊ न शकणारे लोकं शेकड्याने लाखाने असतानासुद्दा?"

मला आजकाल वाटलालयच देव भंजाळलेला माणूस हाय मनून. आधीच ज्या माणसानं कधी पैशाची जोड ठिवायलनी. वतनाची जमीन जेच्यापरेंत यायलनी. हक्काची पेन्शन आनी येवड्या वर्षात मिळायनी. अश्याच माणसाच्या डोस्क्यात, मनात का मनून त्या देवानं नं आवरणाऱ्या पंचकल्याणाची भर का घाटला असन???

देवाच्या रागानं माजी तिडीक उठली. अन तसं लगलगी थोबाडावर थपंथपंथपं हाणून घेतलं. काय दुर्बुद्दी, देवाला भंजाळलेलं मनलं. मी माझी जीभ रगत इ परेंत चावावं मनले. पण नीट जमना गेलं मनून चटमून देवपाटापशी आले अन जिमीनवर लाल हुन हुळहूळेस्तोर नाक घासलं. अन देवाला पुन्ना इनंती केली,

"बाप्पा महादेवा मालकापाशी तोंड उघडीतनी मनून तुझ्याबद्दल वंगळ बोल्ले.. निस्त वानीतून, मनातून कै यायनी बाबा. आतापस्तोर हातीपायी धड ठीवलायस आता उरले तितके दिस बी असंच ठिव तेवढं पुण्य वाटून घे" आन आले भाईर.

मालक पेन्शनचे कागदं पसरून बसले होते वसरीवर. त्येनी तिथूनंच एक्या कागदाकडे बगत मनले "सफर्जेट"

अन मंग मी कळल्यावनी सैपाक घराकडं वळले. चूल पिटीवली. च्याचं भगोनं वर चढवीलं. अन शिजलालेल्या च्याकड बगत तिच इलेक्शनच्या बारीत इद्यार्थ्यायिला, शरनप्पाला, यंकटराव भावजीला, मला, सुनीताला माझ्या छोटीनं सांगिटलेलं द्न्यान म्हणून मालकांनी सांगितलेली गोष्ट आठवूलाले.

“सफर्जेट एमिली विल्डिंग डेविसन... तिकडं लांब इंग्लंडमदे डर्बी शर्यत सुरु असताळा भर शर्यतीत घुसून तिथ्थल्या पंचम जॉर्ज राजाच्या अन्मेर घोड्यासमोर आल्ती. घोडा आडवा झाला जॉकी हिबाळला गेला, तिनं बी टापंखाली आल्ती जून. चार दिवसानं दवखान्यात तिचा जीव गेल्ता. अन येवढा सगळा परपंच तिनं केल्ता ते फक्त महिलांना मतदानाचा हक्क द्या म्हणून. फक्त बाय्कापायी माणसाचे, नाही नाही नराचे सगळे लक्षणं असलेल्या घोड्यापुडे जीव दिलेली ही बाई. अन जीव दिलेलं साल म्हंजी बगा आपल्या शिवाजी महाराजांच्या जल्माच्या दोनशे तीर्व्यांऐंशी सालानंतर म्हंजी १९१३ला...”

मी बसल्या जागी तूराटीनं सैपाकघराच्या सारीवलेल्या जिमिनीवर गणित घाटलं होतं. अन पंचम जॉर्जच्या त्या घोड्याची धडक खाऊन एमिली मेल्यावर बराबर पंधरा वर्सानी बायकायला मतदान करायला मिळालं साल एकोणीसशे आट्टाविस... तारिक बगा...

स्स्स्सस्स्स! उतू गेला की माय माजा च्या...जर्रा कुटं ध्यान इकडं तिकडं झालं का मातलाच मना की चहा... गेला उतू.

(पंचकल्याणी या आगामी कादंबरीचा तुकडा)

# जानू

**■ बेर्नादेत रुमाव, गास**

गाठीगाठीच्या उंबरापाशी विहिरीजवळचा कोपरा पकडून शंकर म्हणजे दत्तू मिस्त्रीचा बिगारी, छोट्या लोखंडी पिंपातील सिमेंटपाण्यात लाल गेरू कालवित होता. त्याच्या कामात तो मग्न होता. अधनंमधनं पायाजवळचा मोठा दांडा उचलून बुडाशी घट्ट बसलेले सिमेंट तो जोर लावून ढवळत होता. तेव्हा त्याच्या काटकुळ्या दंडातून दोन छोटी बेडकं उड्या मारून वर येत. ओटीच्या जोतावर, मेढीजवळ त्याचा कुडमुड्या अंगाचा मालक सिमेंटच्या माखलेल्या हाताने मजेत विडी ओढत बसला होता. आपल्या विडी ओढण्याच्या कामात जराही व्यत्यय येऊ न देता तो 'हूं,' 'हा' करीत होता. मध्येच पेद्रू फरेलच्या बोलण्यातील अलिकडचे पलिकडचे दोन शब्द घेऊन बोलत होता. म्हटलं तर जाड्या पेद्रुच्या प्रश्नांचीच उत्तरे देत होता. पेद्रूसमोर कसं दबून राहावं. जपून बोलावं हे दत्तूने चाणाक्षपणे हेरलं होते. कधी नाकपुड्यांच्या दोन भोकांतून तर कधी तोंडाच्या चिमणीतून धुराची नळकांडी सोडण्यात त्याला मज्जा येत होती, हे त्याच्या डोळ्यांतून स्पष्टपणे जाणवत होते.

बिडीचे दोन चार झुरके मारताच त्याची सारी मरगळ झटकून गेली. थकवा दूर झाला आणि आलेली तरतरी त्याच्या ताणलेल्या चेहऱ्यावर रेंगाळू लागली. तरी त्याचे सारे लक्ष शंकरच्या, 'शेठ, माल तयार हाय.' या वाक्याकडे लागले होते. ती हाळी कानी येताच नेहमीच्या शिरस्त्याने तो उरलेली विडी जोतावर कच्कन दाबून लेंगा झटकून लगोलग उठणार होता. त्याच बेतानं एक पाय मोकळा आणि एक पाय मुडपूनच तो मेढीजवळ बसला होता. आज कसंही करून त्याला इकडचं काम आटोपतं घ्यायचं होतं. त्याचबरोबर पेद्रूसारख्या बेरकी विखारी माणसाच्या तडाख्यातून लवकर सुटायचं होतं. बराच वेळ शंकरची हाक येत नाही हे पाहून दत्तू म्हणाला, 'अरे शंकर, हात चालव जरा. माल तयार झाला की नाही? जरा सिमेंट पाण्याचा रंग दाखव'.

आपला लडबडीत हात वर उचलून शंकरने मालकाकडे नजर टाकली. 'थोडा गेरू घाल अजून. रंग कसा लख्ख दिसायला हवा, पेद्रूशेटचा ओटा कसा लख्ख मस्त लालभडक टॉमेटोसारखा उठून दिसायला हवा.' पिंपात चिमूट चिमूट गेरू टाकत तो ढवळत बसलेल्या शंकरवर दत्तू उगाचच डाफरला. बारा गावचं पाणी प्यालेला दत्तू

आणि त्याचा बिगारी शंकर यांना धंद्यातील बारीक खाणाखुणा माहीत होत्या आणि मालकाची नाडी कशी बरोबर सांभाळायची हे देखील ठाऊक होते.

ओटीवर उजव्या हातावर ठेवलेल्या भरभक्कम फलाटीवर पेद्रूशेट ऐसपैस पसरले होते. हाडापेराने धट्टेकट्टे असलेल्या शेटचा काळासावळा तुंदिलतनू उघडा देह फलाटीत विसावल्यामुळे आधीच भक्कम असलेली फलाटी गरत्या बाईसारखी आता गच्च भरल्यासारखी वाटत होती. गावातील सगळेजण पेद्रू फरेलला 'जाड्या पेद्रू' या नावानेच ओळखत होते. अंगातील बंडी उजव्या हाताने गोलगोल फिरवित ते वारा अंगावर घेत होते. बाहेर ऊन रणरणत होते. वारा पडला होता. झाडाचं पानही हलत नव्हतं. चिमणी पाखरे झाडापानांच्या आडोशाला निवांत बसली होती आणि आगवठीआधीच पेद्रू फरेलनी बेड्याचं, घराचं काम काढलं होतं. बारीक कपाळाखालच्या डोळ्यांच्या खोबणीतून त्याची भेदक बेरकी नजर दत्तूवर रोखल्यासारखी वाटत होती आणि तो गुरगुरल्यासारखा दत्तूशी बोलत होता.

'यंदाचा वैशाख कडक आहे. गरमीनं जीव हैराण झालाय.... त्यात या घामोळ्यानं.... मायला त्याच्या.... अंगाची नुसती काहिली झाली...' भिरभिरती बंडी काखेखाली घेऊन पेद्रूने काखेखालील, पोटावर ओघळणाऱ्या घामांच्या धारा पुसल्या व तो पुढे म्हणाला, 'पण यंदा मृग वेळेवर पडणार. कावळ्यांनी घरटी बांधून झाली बघ झाड़ावर.' उत्तरांची अपेक्षा न ठेवता स्वत:शीच म्हटल्याप्रमाणे तो बोलला. पेद्रू फरेल कधी शाळेची पायरी चढले नव्हते. पण, निसर्गाचे उघडे पुस्तक मात्र त्याला बिनचूक, न अडखळता वाचता येत होतं. भिजलेल्या कोंबडीगत विडी फुंकीत बसलेल्या दत्तूनं पेद्रू फरेलच्या दिशेने मान वळवली आणि धुराचा एक लोट सोडला. त्या लोटात पेद्रूच्या धूसर चेहऱ्याकडे पाहत त्याने मान डोलावली, हा मध्ये हा मिसळला. मग जाड्या पेद्रूला मध्येच तोडत कुडमुड्या दत्तू चाचरत म्हणाला, 'आज काम संपेल तेव्हा संध्याकाळी पैसे लागतील.'

'हूं ...' पेद्रू फरेल गुरगुरला.

'त्याचं काय आहे नं...' दत्तू मिस्त्री चाचरत बोलू लागला पण त्याचं वाक्य पुरतं बोलून होण्याआधीच पेद्रूशेठ वैतागले.

‘होऽऽ होऽऽ माहित आहे. मी कुठे पळून जात नाही की घर टाकून जात नाही. गावातच आहे. मिळतील पैसे' पेद्रू बेफिकीरपणे म्हणाला. पण त्याच्या 'मिळतील' या एका शब्दावरदेखील विश्वास ठेवायला दत्तू राजी नव्हता. म्हणून चिकाटी न सोडता अजिजीने संवाद दामटत तो म्हणाला, 'तुम्ही गावचेच हो. पण शंकर उद्या गावाला जायचं म्हणतोय. गावाकडच्या घराची डागडुजी करायची आहे म्हणतो.' पुढचं वाक्य

बाहेर पडण्याआधी पेद्रूच्या करड्या धारदार नजरेने दत्तूचा आरपार वेध घेतला. दत्तूचे शब्द तोंडातच राहिले.

'मालक SSS’ शंकरची हाक आली. लेंगा सिमेंटसह झटकीत दत्तू उठला पण आता त्याच्या मनात दुविधा निर्माण झाली. संध्याकाळी पैशांचा सगळा हिशोब नीट होईल याची त्याला खात्री नव्हती. दत्तू मिस्त्रीच्या पैशांच्या मागणीमुळे पेद्रू फरेल कावला होता.

'ए... तुझ्या मायला घामोळ्या फोडतेस की चेष्टा चाललीय, साली xxxx आईच्या वळणावर गेलीय.... आळशी... बिनडोक... टच् टच् फोड घामोळ्या. हातात जीव तरी आहे की नाही?' पेद्रू फिस्कारला. त्याबरोबर पाठीवरचे घामोळं फोडणारा तो इवला जीव दचकला. कावराबावरा झाला आणि पुन्हा झटपट वेगाने कामाला लागला: आपल्या कठोर पाषाणहृदयी बापाची वरवंट्यासारखी दिसणारी काळी कुळकुळीत पाठ आणि त्यावरील घामोळी फोडण्याचं काम खरं तर, त्या छोट्या जीवाला नको होतं. त्या कामाचा तिला कंटाळा आला होता. पण बापासमोर उभं राहून तोंड उघडून बोलायची तिची हिंमत नव्हती. पण या कामाऐवजी गोठ्यातील शेण गोळा करण्यात, गोवऱ्या थापण्यात, विहिरीतून पाणी शेंदून आणण्यात, घर सारवण्यात, गोठ्यात गाईम्हशीचं खुराकपाण्याचं बघण्यात तिला कंटाळा येत नसे.

आताही तिची नजर पिंपळाखाली चिकट पिवळीधम्मक राजण, काळीभोर करवंदं आणि गोड सुवासाच्या पिवळी केसरी काजूची बोंडं असला सगळा रानमेवा टोपल्यात घेऊन बसलेल्या बायांकडे लागली होती. काल दुपारी वालाच्या बिरड्यासाठी म्हणून टोपलीतील वाल घेताना तिने थोडे वाल बाजूला काढून ठेवले होते. आणि आता त्याच्या बदली तिला तो रानमेवा घ्यायचा होता. सकाळपासून तिचं लक्ष पिंपळाखाली लागलं होतं आणि जेव्हा पिंपळाखाली धावायची वेळ आली तेव्हा तिच्या या हैवान, तारवटलेल्या बापानं नेमका घरात प्रवेश केला होता.

'बाय कडे हाय?' त्याने मेरीच्या नावाचा पुकारा केला. मेरीला तो लाडाने बाय नावाने हाक मारीत असे तेव्हा आभाळात ढग गडगडल्याप्रमाणे त्याचा आवाज त्या बंगलीत घुमला. दुसऱ्यांदा त्याची गर्जना होण्याआधीच मेरीच्या हातातील काम लगबगीने काढून घेत जानू, मेरीची आई दबकत दबकत म्हणाली, 'जाय. लवकर पळ. राक्षस आलॅ वाटते. त्याला का पाय ता बगॉन ये. (त्याला काय हवं ते बघ) हातात उचललेलं आंगाठ / खॉलॉ (केळीचं पानं) तसंच 'पाणेरी' वर (स्वयंपाकघरातील पाण्याची भांडी ठेवण्याची जागा) ठेवित मेरी धावत पळत ओटीवर आली. आणि आता ती हे कंटाळवाणं काम निपटीत बसली होती. समोर पाठ करून बसलेल्या आडदांड

बापाविषयी तिच्या कोवळ्या मनात ना प्रेम होतं ना आदर. होता तो प्रचंड राग आणि तिरस्कार. असल्या कोपिष्ट, व्यसनी बापाबरोबर आईनं लग्न कसं केलं? का केलं? हे न सुटणारं कोडं तिच्या समोर होतं.

साऱ्या गावानं पेद्रू फरेलला ओवाळून टाकलं होतं. 'त्याच्या हाताखाली जानूच दिवस काढू जाणे शेजारीपाजारी, गावकरी, पैपाहुणे नेहमी म्हणत. पेद्रू म्हणजे जमदग्नीचा अवतार. त्याचा भडका कसा उडेल याचा नेम नव्हता. त्यामुळे जानू नेहमीच धास्तावलेली असायची. नातेवाईकांकडील लग्नांत, कार्यक्रमांत जरा कुठे खुट्ट झालं की जानूच्या काळजात धस्स् व्हायचं. भेदरलेल्या सश्याप्रमाणे ती अख्ख्या सोहळ्यात खालमानेनं वावरायची. कसायाच्या दावणीला आजोबानं आईसारख्या गरीब गाईला आणून का बांधलं असे तिच्या वयापेक्षाही मोठे प्रश्न मेरीला अलीकडे कायम पडू लागले होते. सहा भावांची ती एकमेव बहिण होती. सगळेजण लाडाने तिला 'बाय' म्हणत. तिचे लाड करीत पण तिच्या वयातील इतर मुलींच्या चेहऱ्यावर दिसणारा उत्फुल्ल खेळकर भाव तिच्या चेहऱ्यावर कधी या बापामुळे दिसला नाही. लहान वयातच ती प्रौढ झाली.

आताही बापाच्या पाठीवर हात फिरविताना तिला त्याचे मोठे अक्राळविक्राळ पंजे दिसत होते. त्याच हाताने त्यांनी अनेकदा आईला लाथाबुक्क्यांनी तुडवले होते, मारले होते. त्याच्या रागाचे निमित्त काय तर भाजीत मीठ नाही, भात कच्चा कसा, भाकरी करपली तर लक्ष कुठे होते, शेतात वेळेवर चहा का पोहचला नाही, म्हशीला का धुतले नाही, एक ना अनेक. न संपणारी अशी ती यादी होती. परवा तर याच बापाने चुलीवरील सगळा स्वयंपाक भांड्यासह परसदारी भिरकावून दिला. आणि मग दुखऱ्या डोळ्यांनी चुलीत फुंकर घालून जाळ करीत बसलेल्या आईचा शेंडा आपल्या राकट पंज्यात कचकचून पकडून याच राक्षसाने तिला फरफटत दाराबाहेर काढलं होतं. ते काही पहिल्यांदा नव्हतं. असं किती तरी वेळा झालंय, आपलं सगळं बालपण या बापामुळे करपून गेलंय. अकाली पडणाऱ्या पावसामुळे सारा मोहर करपून जावा तस्सा! प्रत्येक आठवणीबरोबर मेरीच्या मनातील बापाविषयीची कटूता वाढत होती. आणि खालमानेनं सगळं सहन करणाऱ्या आईचाही तिला हल्ली राग येत होता. त्यामुळे असेल कदाचित पण आता मेरीच्या कामाला वेग आला होता आणि बाप सुखावला होता.

पदरात निखारा बांधून जानू आला दिवस ढकलीत होती. पदर जळता कामा नये आणि निखाराही विझता नये. रोजचीच तारेवरची कसरत होती. माजघरात (गय) बसून जानू केळीचं बोंड (केळफूल) साफ करत होती. कालच शेतातून येताना त्याने ते आणले होते. आणि ओटीवरच्या फलाटीखाली चीक निथळत ठेवलं होतं. पुढचं काही बोलण्याची जरुरी नव्हती. बायकोने काय ते समजून घ्यावं ही रीत होती. आता त्यांचा

संसार तेवीस वर्षांचा झाला होता. त्यामुळे 'शब्दावाचून कळले सारे शब्दापलिकडलं' ही गत होती. त्यात प्रेम, आपुलकीचा गिलावा होता का? देव जाणे. पण पेद्रूला आपल्या नवऱ्याला 'बोंडाआ ढेस्का' खाण्याची इच्छा झालीय, हे जानूला कळलं होत.

'ए ऽऽ माझ्या मरे ऽऽ ऐकलंस का?' माजघराच्या दारातूनच त्यांची तिरसट हाक आली. पण बोंडावरील थंडगार गोड गुलाबी मऊसूत पाकळ्या हलक्या हाताने काढण्यात जानू मग्न झाली होती. माजघरात अंधार, उकाडा आणि धूर याचं साम्राज्य होतं. पण त्या राज्याचीच जानू अनभिषिक्त मालकीण होती.

मुख्य हाताला सहावं बोट फुटावं तसं माजघर (गय) मुख्य घराच्या एका अंगाला होतं आणि सर्व घरातील रिवाजाप्रमाणे तेथे पुरुषाचा वावर जवळजवळ नगण्य होता. म्हणून घरातील सगळ्यांच्या आरोग्याची काळजी घेणारं माजघर कायम दुर्लक्षित होतं.

'ऐकलंस की कान फुटले तुझे.' मुख्य दारातून माजघरात डोकावत पेद्रुनं डरकाळी ठोकली. त्या डरकाळीने जानू मोरलीवरून (विळीवरून) धडपडत उठली. घांजीपिंजी (घाबरीघुबरी) होऊन पेद्रूसमोर आ वासून उभी राहिली. त्यामुळे आधीच छोट्या चणीची फिकुटशी जानू वाघासमोर भेदरलेली शेळी दिसावी तशी दिसू लागली. आणि ह्यांना काय सांगायचंय याकडे कानात प्राण आणून ती ऐकू लागली.

'मी म्हणतो, चुलीपुढे काही दुरुस्ती करायची आहे का?' माजघरात बायकांचं राज्य! एवढ्या वर्षांत त्यात कधी घरातील पुरुषांनी लुडबुड केली नाही की आवड दाखविली नाही. नाही म्हटलं तर हे सासऱ्याच्या हातचं जुनं घर पण, भरलं कुटुंब असताना मोठ्या दिरानं लाकडी माळा 'शिळूण' (लाकडी फळ्याची जमीन) घेतला. मधल्या काळात फळ्यांचा कूड काढून त्या जागी मोठ्या जाड भक्कम विटेच्या भिंती उभारल्या. सामानसुमान ठेवायला फडताळ केली. लाकडी शिडी जावून त्या ठिकाणी मोठा लाकडी सागवानी जिना बसवला. त्याला चांगला जाड कठडा बनवून घेतला. पण माजघरात (गय) काहीही बदल झाले नाहीत. वर्षानुवर्षे ते आहे तसंच राहिलं.

मध्यंतरीच्या काळात दोन मोठ्या जावा नव्या बंगल्यात राहायला गेल्या. जुनी बंगली पेद्रूच्या वाट्याला आली. त्यामुळे पेद्रूच्या बोलण्यानं जानू एकदम गोंधळून गेली. माजघरात काही गोष्टी बदलण्याची गरज आहे याचा कधी तिने विचारच केला नव्हता. आणि तसा विचार करायला नवऱ्यानं कधी तिला संधीही दिली नव्हती. सारखा हिडीस फिडीस करणारा नवरा मिळाल्यावर याहून वेगळं ते काय होणार? जानू गप्प मख्खासारखी उभी राहिलेली पाहून पेद्रूचा पारा चढू लागला. 'मी काय बोलतो कळतंय का? डोक्यात जातं की काही?' तिच्या बावळट ध्यानाकडे कुत्सित नजरेने पाहत तिला खिजवित पेद्रू गरजला. त्यामुळे स्वतःविषयी वाटणाऱ्या जानूच्या कमीपणात आणखीच भर पडली. पण मग स्वतःला सावरत ती म्हणाली, 'आपली पाणेरी ..... मोडली आहे

एका बाजूला' भेंडीच्या लाकडापासून सासऱ्याच्या काळात बनविलेली पाणेरी आता इतक्या वर्षानंतर सारखी भिजून एका कुसात मोडली होती. ती दगडविटांची बनवली तर ती जानूला हवी होती. 'तेवढा माल नाही शिल्लक. काय ते पटकन बोल. मिस्त्री जातील निघून. जाण्याच्या आधी बोल' हात नाचवित पेद्रू गुरगुरला.
'मग, चुल तरी...’
'हुं' घरधन्यानं हुंकार भरलेला पाहून जानूला बरं वाटलं. दर वर्षी ती मातीची नवीन चुल घालायची. पण उंदीर, घुशी रात्री 'उकॅरॉ' (उकिरडा) करून ठेवायचे. चुलीपुढील बारमाही ओल तर पाचवीला पुजलेलं. ओटीवर जाताजाता पेद्रू फरेलने शिल्लक दगड, रेती, विटा, सिमेंटचा अंदाज घेतला. चुल बनण्याएवढा माल शिल्लक होता. आणि तो वापरल्याशिवाय पेद्रू फरेलचा पै-पैसा वसूल होणार नव्हता. मनातल्या मनात ताळमेळ बांधत तो ओटीवर आला. त्याने दत्तूला माजघरात पाठवलं. चुलीपुढच्या जीवनाला जानू कंटाळली नव्हती. तो ओटा तिच्या सुखदुःखाचा साक्षीदार होता. जिवाभावाचा मित्र होता. जानूने गाळलेल्या असंख्य दुःखाश्रूंचा तो ओटा एकमेव साक्षीदार होता. घरातल्या त्या एकाच कोपऱ्यावर खऱ्या अर्थाने तिचा हक्क होता.

आणि पेद्रूनं खरंच मनावर घेतलं. संध्याकाळपर्यंत माजघरातील एका अंधाऱ्या कोपऱ्यात छोट्या झरोक्याखाली चार बाय तीनचा दोन चुलींचा ओटा दत्तू मिस्त्रीने घाईगर्दीने उरकून दिला आणि आपली थापी खाली ठेवली.
जानू कौतुकाने चुलं न्याहाळत होती. सबंध उभ्या आयुष्यात नवऱ्याने तिच्यासाठी म्हणून केलेल्या एकमेव कामावर ती मनोमन खूष होती आणि जानूची अक्कल चुलीत घालायला आपल्याला आणखी एक कारण मिळाल्याचं समाधान पेद्रू फरेलच्या चेहऱ्यावर रेंगाळत होतं.

# घरजावई

**■ लेस्ली से. डायस 'गीत'**

माझ्यासाठी तेथे भारी थाटमाट सुरू होता. समोरची ताटे नानाविध प्रकारच्या मिठायांनी खचाखच भरली होती. नैसर्गिक रंगातील त्या मिठाईचे विविध प्रकार कुणालाही आकर्षित करतील असेच होते. शुद्ध देशी तुपाचा घमघमाट तेथे सर्वत्र पसरला होता. अनेक प्रकारच्या तामिळी पंचपक्वान्ना बरोबर गुलाबजाम, म्हेसूर पाक, काजूबर्फी, जिलेबी या सर्व पदार्थांसाठी अगदी असली देशी तूपाचा भरपूर वापर केलेला दिसत होता. त्या चकित करणाऱ्या स्वागताने भारावून जाऊन प्रत्येक पदार्थाचा थोडा थोडा आस्वाद मी घेत होतो.

"डॉक्टर, लाजायचं नाही हं. ही सर्व आपल्या घरीच बनवलेली मिठाई आहे. कितीही आस्वाद घेतला तरी कोणताही त्रास होणार नाही तुम्हाला. थोड्या वेळाने दिव्याचे पप्पा तुम्हाला शेतीवर फेरफटका मारायला घेऊन जाणार आहेत. तेथे फिरताना दुपार होऊन जाईल. खूप भूक लागेल तेथे."

समोर रसमलाईची भली मोठी प्लेट ठेवून माझ्या भावी सासूबाई मला खाण्याचा आग्रह करीत समोर उभ्या होत्या. मी नको नको म्हणत असताना वेगवेगळी मिठाई उचलून मोठ्या प्रेमाने त्या माझ्या हाती देत होत्या. त्यांना नकार देणं मलाही अवघड जात होतं.

माझे चाललेले आदरातिथ्य पाहून दिव्यासुद्धा खूप चकित झालेली दिसत होती. तिच्या चेहऱ्यावरील तणाव आता बऱ्यापैकी निवळलेला दिसत होता. गालातल्या गालात हसत ती दारात उभी होती. तिनं माझ्या मदतीला यावं व आपल्या कुटुंबियांच्या तावडीतून माझी 'सहीसलामत' सुटका करावी म्हणून मी तिच्याकडे मोठ्या आशेने पहात होतो.

पण कसलं काय?

गालावर हात ठेवून माझं होणारं 'अनोखं' स्वागत पहाण्यात ती चांगलीच रमली होती. बाहेर पडावं तर दिव्याचे पिताश्री समोर बसलेले. धडकी भरवणारी उंच आणि

भरदार शरीरयष्टी त्यांना लाभली होती. यथायोग्य कारणाशिवाय उठून उभा राहिलो असतो तर त्यांचा अपमान होईल ही भीती माझ्या मनाला वाटत होती. चेहऱ्यावरील स्मित कायम ठेवत ते माझे निरीक्षण करीत असावेत. बऱ्याच वेळाने अतिशय हळूवारपणे त्यांनी माझ्याशी बोलायला सुरूवात केली.

"डॉक्टर, तुमचं नाव काय? घरी कोण कोण असते? वडील काय करतात?"

अशा सामान्य प्रश्नांपासून त्यांनी माझ्यावर सुरू केलेली प्रश्नांची सरबत्ती नॉनस्टॉप 'चेन्नई एक्सप्रेस' सारखी आता धावू लागली होती. मोठ्या अदबीने मी त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तरे देत होतो.

हळूच उठावं आणि काहीतरी निमित्ताने दिव्याच्या दोन आज्याही माझ्या समोर बसल्या होत्या. त्यासुद्धा मोठ्या उत्साहाने माझे आदरातिथ्य करण्यात आघाडीवर होत्या. तामीळ बोलीभाषेतून त्या दोन्ही आजीबाई मोठ्या मायेने माझ्याशी संवाद साधण्यासाठी धडपड होत्या. "तम्बी इद सांपडं, तम्बी ईद सांपडं."

"खा रे पुता ... खा ... , खा रे पुता ... खा ... " असे त्यांच्या गोड बोलीभाषेतून मला त्या सांगत असाव्यात. माणसे तालेवार होती. खानदानी होती. तेवढीच प्रेमळसुद्धा! ही मंडळी चांगली समजूतदार दिसत असूनही एवढ्या तातडीनं त्यांनी आम्हा दोघांना येथे का बोलावून घ्यावं हा मला प्रश्न पडला होता.

चेन्नईतल्या 'मद्रास मेडिकल कॉलेज' मध्ये एकत्र शिकत होतो. दिव्या एम.डी. करत होती आणि मी एम.एस. डॉक्टरकी शिकता शिकता गेली चार पाच वर्षे कॉलेजमध्ये आम्ही एकमेकांचे खास मित्र होतो. पुढे पी.जी. करताना आम्ही एकमेकांच्या प्रेमात पडलो आणि आयुष्यभर एकमेकांना साथ देण्याची वचने देऊन मोकळेही झालो.

"विवेक, आपल्या प्रेमाबद्दल माझ्या घरी कळलंय. काही दिवसांपूर्वी मी माझ्या अम्माला आपल्या दोघांच्या प्रेमाची कल्पना दिली होती. तिने पुढे ते पप्पांना सांगितले. त्यांना कळताच आमच्या घरी मोठे वादळ निर्माण झाले आहे.

या घरातील लेक दिव्या आणि मी कोण तो मुलगा? कोणत्या राज्यातून तो येथे शिकायला आलाय? या प्रश्नांनी घरात खळबळ माजलीय. अखेर बरीच उलटपालट चर्चा होऊन अखेर त्यांनी तुझ्याशी बोलायचं ठरवलंय. गावी जाऊन आपल्याला त्यांना भेटावं लागेल. तेही लवकरात लवकर. तसा त्यांचा निरोप आहे. कधी निघायचं रे आपण?

आमच्या प्रेमाबद्दल घरी उमटलेली वादळे दिव्यापर्यंत रोज येऊन पोहचत असावीत. त्यामुळे गेले काही दिवस ती मला खूप तणावग्रस्त दिसत होती.

अधूनमधून तिच्या मनातली भीती ती माझ्याकडे व्यक्त करायची. सुरूवातीला मला त्याबद्दल विशेष काही वाटलं नाही. पण तिच्या स्त्री मनाची होत असलेली फरपट लक्षात येताच समजूत घालून मी तिला दिलासा देत राहिलो.

आपल्या होणाऱ्या नवऱ्याला भेटायला पप्पा तयार तरी झालेत हे समाधान तिच्या चेहऱ्यावर आता झळकत होते. ही बातमी कॉलेज कॅम्पसमध्ये सकाळी मॉर्निंग वॉक घेताना तिने मला दिली. आमच्या कॉलेजमध्ये आपल्या लेकीला भेटायला येणाऱ्या तिच्या वडिलांना मी दोन-तीन वेळा पाहिलं होतं. या पेहलवान व्यक्तीला त्यांच्या गावा जाऊन भेटायचे म्हणजे? रागाच्या भरात त्यांच्याकडून काही अघटित घडलं तर?

मी घाबरत होतो असं नाही पण यदाकदाचित तेथे मला कुणी अपमानास्पद वागणूक दिली तर दिव्याला ते अजिबात सहन होणार नाही ही भीती मला सतावत होती. म्हणून काहीतरी सबबी सांगून ही भेट मी बरेच दिवस टाळत राहिलो. कारण अतिसंवेदनशील दिव्याला मी अगदी जवळून ओळखत होतो.

"अगं, पुढील महिन्यात आलेल्या आपल्या परीक्षा तरी होऊन जाऊ देत. मग भेटू तुझ्या वडिलांना. त्यांना भेटण्याआधी मला माझ्या आईबाबांशीही थोडं बोलायला हवं."

"मला खात्री आहे विवेक, तुझे आईबाबा आपल्या प्रेमाला नक्कीच संमती देतील. ते तुझ्यावर रागावणार नाहीत. पण माझे पप्पा? आपण गेलो नाहीतर त्यांच्या रागात आणखी भर पडेल. ते बोलावतायेत तर आपण जाऊन भेटू. तू काही बोलू नकोस."

तिच्या आग्रहामुळे एका भल्या सकाळी मला तिच्या गावी निघावंच लागलं. चेन्नईहून तामिळनाडूच्या तंजावर गावाच्या दिशेने आमची मोटार पळत होती. चेन्नईहून भाड्याने घेतलेली माझी आवडती कार टाटा सफारी. जोडीला दिव्या. शांत व सालस स्वभावाची माझी प्रिय सखी ती. वेळप्रसंगी रात्री-अपरात्रीही मोठ्या विश्वासाने माझ्या अवती भवती वावरणारी.

आपल्या अंगच्या कला गुणांनी कॉलेज कॅम्पसमध्ये प्रसिद्ध असलेली सर्वगुणसंपन्न मुलगी. उंच शेलाटी बांधा, काजळ नक्षी टपोरे डोळे, घनदाट गर्द काळाभोर केशसंभार, इतकेच नव्हे तर दक्षिणी गव्हाळ वर्णाबरोबर गालावरील गोड खळ्यांचे वरदान विधात्याकडून तिला लाभले होते. मजल दरमजल करीत आमचा प्रवास सुरू होता.

"विवेक, माझ्या पप्पांना जरा समजून घे हं. प्लीज डोंट आर्ग्यु विथ हिम. स्वभावाने ते जरा रागीट वाटतील तुला, पण मनाने अगदी साफ आहेत ते."

"डोंट वरी दिव्या. मी तुझ्या वडिलांचा योग्य तो मान सन्मान राखूनच बोलेन."

ड्रायव्हिंग करताना समोरच्या धोकादायक वळणावर लक्ष ठेवत मी तिला शब्द दिला. तंजावर नजरेच्या टप्प्यात येता येता आम्ही उजव्या बाजूला वळालो. तामिळनाडूच्या अत्यंत सुंदर, निसर्गरम्य परिसरातून आमचा प्रवास सुरू होता. गावे तशी छान चित्रातील गावाप्रमाणे सुंदर दिसणारी. वळणावळणाचे सिमेंटचे रस्ते आणि बाजूला सुखवस्तू आणि सधन लोकांची टुमदार घरे रांगेत उभी होती. दिव्याचा बाप त्या परिसरातील खूप मोठी असामी असावी.

गावाच्या बाहेर पडताच त्यांच्या भल्या मोठ्या फार्महाऊस समोर आम्ही पोहचलो होतो. घरासमोर वेगवेगळ्या बनावटीच्या आलिशान मोटारी, जीप्स, ट्रॅक्टर्स रांगेत उभी होते. आणि दूरवर पसरलेले भातशेतीचे विराट शिवार.

काहीशी धाकधूक मनात ठेवूनच त्या मोठ्या घराची पायरी मी चढत होतो. दिव्या सावली सारखी माझ्या पाठीशी उभी असली तरी माझं पोरकट मन काहीसं टरकलं होतं. पण .. दिव्याच्या आईवडिलांनी केलेल्या शाही स्वागताने माझी भीती कुठल्या कुठे पळून जाऊन मी भारावून गेलो होतो.

शिवारातून गेलेल्या पक्क्या रस्त्यावरून आमची 'थार' हळूवारपणे पुढे निघाली होती. महेंद्राच्या त्या नव्या करकरीत जीपचे सारथ्य करीत होते स्वतः दिव्याचे पिताश्री राजकुमारन्. आपल्या शेतीवाडीवरून फेरफटका मारण्यासाठी ते मला घेऊन निघाले होते.

ते हरित साम्राज्य पाहून मी चकीत झालो. अधून मधून रस्त्याच्या बाजूला थांबत तेथे सुरू असलेल्या कामकाजांची ओळख ते मला करून देत होते. कुठे भात लागवड सुरू होती, तर कुठे भात कापणीची कामे. कुठे झोडणी तर कुठे पेरणी.

ही सर्व तंजावरच्या कडेकडेने वाहत जाणाऱ्या 'पोन्नी' नदीची कृपा होती. नदीवर उभे राहिलेले 'कल्लानाई' धरणाचे पाणी या शिवाराला मुबलक प्रमाणात मिळत होते. त्यामुळेच तर येथे शेती-बागायतीला वैभवाने दिवस आले होते.

त्या विराट शिवारात पसरलेले त्यांचे शेतीच्या बांधावर नारळीची असंख्य झाडे उभी होती. मलबारी लोकांची एक मोठी टीम झाडावरील नारळ काढण्यात गुंतली होती. या शेती-बागायतीबरोबर तेथे दूरवर पसरलेले गाई म्हशींचे तबेले लक्ष वेधून घेत होते. त्या सर्व तबेल्यांची छान रचना केलेली दिसत होती. शेणापासून तयार होणारा बायोगॅस, सेंद्रिय खते आणि मोठ्या प्रमाणात ऊर्जा निर्मितीही तेथे होत होती.

दूरवर 'दिव्या डेअरी'चा भव्य दूध प्रकल्प कार्यरत असलेला दिसत होता. शेती-बागायत, दूध डेअरीज, कोकनट ऑईल, राईस मील असे दिव्यांच्या वडिलांचे सुरू असलेले वेगवेगळे उद्योग पाहून मी चकीत झालो. आपल्या घरच्या एवढ्या मोठ्या उद्योग व्यवसायाचा मितभाषी स्वभावाच्या दिव्याने कॉलेजमध्ये कधी बडेजाव मिरवला नव्हता.

आता दुपार टळून जात होती. झाडांच्या गर्द सावलीत आमची जीप थांबली. 'डॉक्टर, येथे आपण थोडे थांबू या' राजकुमारनी मला विनंती केली. आम्ही दोघे जीप बाहेर पडलो आणि झाडाच्या त्या गार सावलीत विसावलो. दूध प्रकल्पाच्या ऑफिसर कैंटीनमध्ये नुकतंच आम्ही दुपारचे लंच उरकलं होतं. तो आधुनिक प्रकल्प पहाताना दोन-अडीच तासांची वेळ निघून जाऊन दुपार झाली हे कळलेही नव्हते. हा दुध प्रकल्प म्हणजे दक्षिण भारतातलं एक मोठं नावाजलेलं नाव होतं. माझ्या बरोबर निघताना त्यांनी सर्व मॅनेजरना फोन करून सांगून ठेवलं, आज मला कुणीही डिस्टर्ब करायचे नाही. त्यांनी आजचा दिवस केवळ माझ्यासाठीच राखून ठेवला असावा.

"तुमच्याशी खूप महत्त्वाचे बोलायचंय डॉक्टर. खूप महत्त्वाचे. त्यासाठीच आपण येथे आलो आहोत." राजकुमारनी बोलायला सुरूवात केली. माझी मुलगी दिव्या. तिचा जन्म झाला आणि लक्ष्मी माझ्या घरी चालत आली. या पोरीच्या जन्माच्या वर्षीच हे धरणाचं पाणी या शेतीवाडीला मिळालं आणि या सर्व जमिनीचे सोने झाले. दिव्या मोठी झाली. शाळा-कॉलेजात खूप हुशार असलेल्या माझ्या पोरीने व्यावसायिक शिक्षण घ्यावे व ही शेती बागायतीबरोबर हे सर्व व्यवसाय सांभाळावेत ही माझी इच्छा. पण मेडिकल प्रवेश परीक्षेत खूप चांगले गुण मिळवून माझ्या मुलीने सरकारी मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळवला. मी तिच्या आड आलो नाही. तिला डॉक्टर होऊ दिलं. पण तिचे पुढील शिक्षण सुरू असताना मला कळले ती कॉलेजमधील कुणा एका मुलावर प्रेम करतेय. हा माझ्यासाठी मोठा धक्काच होता. कारण तो मुलगा दूर राज्यातून येथे आलेला होता. लग्न करून माझी मुलगी दूर सासरी गेली तर येथे हे माझे व्याप कोण सांभाळणार? माझ्यासमोर मोठा प्रश्न उभा राहिला. मी चिडलो. वैतागलो. तो मुलगा म्हणजे तुम्हीच होता...

मग आम्ही विचारांती ठरवलं तुमच्याशी बोलायचं. माइया अटी आणि शर्ती तुम्हाला सांगायच्या. म्हणूनच चेन्नईहून आम्ही तुम्हाला बोलावून घेतलं आहे. आम्हाला आमच्या मुलीसाठी मुलगा येथे 'घरजावई' म्हणून येणाराच हवा. तुम्हाला हे शक्य आहे? स्पष्ट आणि प्रामाणिकपणे काय ते सांगा. मला आताच या वेळी तुमचे

मत जाणून घ्यायचे आहे. शेती शिवारातील या पवित्र जागी तुम्हाला तसे वचन मला द्यावे लागेल.“

बापरे ...

मी आणि घरजावई? त्यांची ही अपेक्षा ऐकून मी गोंधळून गेलो. वेगात दौडणाऱ्या चेन्नई एक्सप्रेस सारखी त्यांची ही अट माझ्या अंगावर धावून आली. मला कालच्या प्रवासातले दिव्याचे बोल आठवले.

"विवेक माझे वडील जे काही सांगतील ते ऐकून घे. त्यांना नाही बोलू नकोस. पुढे जे होईल ते मी बघून घेईन."

"ठीक आहे दिव्या. तू म्हणशील तसे" असे मी तिला वचनही देऊन बसलो होतो.

पण आता? आता खोटं कसं बोलावं?

अन्नधान्याचे कोठार असलेल्या या पवित्र जागेचे नाव घेऊन मी खोटे बोलण्याची चूक करणार नव्हतो. कारण या आईसमान असलेल्या काळयाभोर मातीशी बेईमान मला व्हायचं नव्हतं. तात्काळ मला माझे बाबाही आठवले. लहानपणापासून आजपर्यंत माझ्यामागे सावलीसारखे उभे राहणारे बाबा. शाळा-कॉलेज, सर्व परीक्षांच वेळी मला धीर देऊन माझा आत्मविश्वास वाढविणारे माझे बाबा. आयुष्यभर त्यांनी माझ्यासाठी कितीतरी स्वप्न पाहिली असतील. मी मोठा डॉक्टर होऊन घरी परतण्याची ते वाट पहातायत. चांगली डॉक्टरी करून आजूबाजूच्या परिसरातील लोकांची मी सेवा करावी म्हणून माझ्या वाटेकडे डोळे लावून बसलेत ते. त्यांना विसरून येथे कोणता शब्द देऊ मी? नाही मला ते शक्यच नाही! शब्द ओठावर आले पण ..

'माझी अट मान्य नसेल तर आता या क्षणी तुमचा आमचा संबंध संपला' हे उत्तर समोर तयारच होतं हे राजकुमारन् यांच्या देहबोलीवरून मला स्पष्ट दिसत होतं. त्यांचा हा निर्णय मी बिनबोभाट स्वीकारलाही असता.

पण दिव्या? या पोरीला हा प्रेमभंग सहन होणारा नव्हताच. तिचं संवेदनशील मन माझ्या चांगलंच परिचयाचं होतं. या दुःखात ती काय करून बसेल नेम नव्हता. अचानक मोठी गुंतागुंतीची वेळ माझ्यावर येऊन ठेपली होती. समोर दक्षिणेकडील मोठा जमिनदार माझया समोर उभा ठाकला होता. पहिलवान शोभावा असा बलवान. पैशाने तर तालेवार.

पण त्याक्षणी ...

त्यांच्यातील त्या दुबळ्या बापालाही समजून घेणेही गरजेचे वाटले मला. आता घाई गडबड कामाची नाही हे मला समजून चुकले. आजवर मी वाचलेले पुस्तकी ज्ञान माझ्या मदतीसाठी धावून आले. नेहमीच स्पष्ट आणि रोखठोक बोलणं मी बाजूला ठेवलं. 'मौन सर्वार्थ साधनम्' हे धोरण अवलंबवित मी म्हटले.

"सर जरा थांबाल, प्लीज. मला जरा तुमच्या या मातीशी बोलायचे आहे" अशी विनंती मी करीत मी उठलो व मागे वळून न पाहता समोर भात लागवड सुरू असलेल्या शेतीच्या बांधावर जाऊन उभा राहिलो. शक्य होईल तेवढे कपडे सांभाळत सरळ शेतीत उतरून आवणी करणाऱ्या मजूर लोकांत मिसळून गेलो.

मला बघून तेथे काम करणाऱ्या मजुरांना भलताच हुरूप आलेला दिसला. आवणी करता करता त्यातील म्हाताऱ्या कोताऱ्या स्त्रिया आणि पुरूष तामीळ बोलीभाषेतून गाणी गात होते. त्यामधीलच एक होऊन मी भात लावणीला हात घातला.

मीही एका शेतकरीच. माती आणि चिखल मला नवीन नव्हता. गावी असताना आई-वडिलांना शेती बागायतीत मदत करीतच मोठा झालो होतो. कामातील माझ्या सहभागाने त्या मजूर वर्गाचा उत्साह खूप वाढला होता. मी मालकाचा खास पाहुणा आहे हे दूरवरून त्यांनी पाहिले होते. माझ्याकडे पहात त्यातील स्त्रिया मिश्किलपणे हसत आपसात काहीतरी बोलत होत्या. हा आपल्या मालकाचा होणारा जावईच असावा हा तर्क त्यांनी केला असावा.

काही वेळाने टी... टी... ओरडत एक तरतरीत पोरगा कामगारांसाठी संध्याकाळचा चहा घेऊन आला. बांधावरील एका विशिष्ट झाडाचे एकेक पान प्रत्येक माणसाच्या हातात दिले गेले. माझ्याही हातात ते पान आले. सफाईदारपणे त्याचा कोन करून मी त्यातून गरम चहाचा आस्वाद घेतला. संध्याकाळ झाली. आता दिवसाचे काम संपले होते. माझ्या कामावर खूष होऊन शेतीबाहेर पडताना ते तामीळ कष्टकरी माझे तोंड भरून कौतुक करत होते.

कालव्यातून शेतीत येणाऱ्या स्वच्छ पाण्याने हातपाय धुऊन मी पुन्हा बांधावर आलो. मला वाटले दिव्याचे वडील निघून गेले असावेत. पण नाही, ते जागेवरून जराही हलले नव्हते. माझ्याकडे ते अभिमानाने पहात उभे होते. एक बाप आपल्या मुलाकडे पहातो तसा.

आता फार्महाऊसच्या दिशेने आमची जीप सुसाट पळत होती. दिव्याचे वडील "एन्नाआची, एन्नाआची. अरे काय राजकुमारन् आता भलतेच खुशीत दिसत होते. काही न बोलता आणि घरजावई होण्याचे कोणतेही वचन न देता मी त्यांचा प्रश्न छान

टोलवला होता. अंगणात येऊन आमची जीप थांबली. दिव्या, तिची अम्मा आणि त्या दोन्ही आज्या माझ्या स्वागताला बाहेर धावत आल्या पण बराच वेळ मला कुणी ओळखलं नसावं. त्या सर्व जणी प्रश्नार्थक नजरेने माझ्याकडे पहात होत्या.

झालं? काय झालं? या पोराला चिखलात बुडवून कोणी काढलं?" दोन्ही आज्या राजकुमारन्ना आता जाब विचारत होत्या. "तसं नाही मम्मा. खूप गोड आणि गुणवान आहे हा पोरगा. माझी पोर मी या पोराला दिली. जगाच्या कोफ्यात कुठेही जाऊन राहिला तरी हा पोरगा आपल्या पोरीला सुखी ठेवील हे नक्की. शेतीत काम करायला उतरले होते हे साहेब." राजकुमारन्नी त्यांच्याकडे खुलासा केला आणि फार्म हाऊसवर बराच वेळ हास्याची कारंजीच उडत राहिली.

राजकुमारन् यांच्या दिलखुलास खुलाशाने सासरी मंडपाच्या दाराशी उभे राहिलेल्या नवरदेवासारखी मी लाजून चूर होऊन गेलो. कारण त्या दोन्ही आज्या ओटीवर उभ्या राहून माझी थट्टा मस्करी करीत होत्या. पण पायऱ्या उतरून दिव्या माझ्या मदतीला खाली उतरली तिनेही माझ्या कपड्याकडे अभिमानाने पाहिलं व कानाशी येऊन म्हणाली, "चला साहेब आता आंघोळीला."

घरात शिरून मी बाथरूमकडे वळालो. हाती सर्व जामानिमा घेऊन दिव्या माझ्यामागे धावत येत म्हणाली, "विवेक काय रे जादू केलीस माझ्या आप्पावर? एवढे कसे खूश झाले ते तुझ्यावर?"

"जादू वगैरे काही नाही गं. एका बापाने दुसऱ्या बापावर थोडीशी मात केली" एवढं बोलून मी बाथरूममध्ये शिरलो. पण तत्पूर्वी माझ्या कपड्यावरील चिखल मातीच्या खुणा दिव्याच्या कपड्यावरही छान उमटल्या होत्या.

diasleslie@gmail.com

# थँक्सगिविंग

■ फ्लॉरी विल्यम रॉड्रिग्ज, पापडी, वसई
फोन - 9764163495

ट्रिंग-ट्रिंग ट्रिंग-ट्रिंग... पाववाल्याच्या बेलने सारा खडबडून जागी झाली. परमेश्वराला धन्यवाद देत ती फ्रेश होऊन किचनमध्ये शिरली, गॅसच्या एका शेगडीवर तीने चहाचे आंधण ठेवले व दुसऱ्या शेगडीवर चपात्या भाजण्यासाठी तवा चढवला. रात्रीच भिजवून ठेवलेली कणिक फ्रिजमधून काढून तीने भरभर चपात्या लाटायला सुरवात केली. दहा-बारा चपात्या भाजून तीने त्या हॉटपॉटमध्ये ठेवल्या. तवा उतरवून तीने मुलांसाठी दूध उकळवायला ठेवलं व चहा गाळून थर्मासमध्ये भरला. दुधात साखर व ड्रायफ्रूटची पावडर टाकून मुलांसाठी दुधाचे दोन ग्लास, चहाचा थर्मास आणि चपात्यांचा हॉटपॉट डायनिंग टेबलवर ठेवून तीने बेडरूममध्ये जावून नवऱ्याला व मुलांना उठवलं.

त्यांचे आवरून होते तोवर अंडी फेटून तव्यावर साजूक तूपामध्ये तीन-चार ऑम्लेटस बनवली. ऑम्लेटचा सुगंध घरभर दरवळला होता. एक-एक ऑम्लेट चपातीमध्ये गुंडाळून मुलांसाठी डब्बे भरले. मुलांना दुधाचे ग्लास व त्यांच्यासाठी आदल्यादिवशीच बनवून ठेवलेल्या कुकीज खायला दिल्या. नवऱ्याला ऑम्लेट व चपाती देऊन चहाचा कप भरला. त्यांचे खाऊन होते तोवर तीने वॉटरबॅग भरून मुलांच्या स्कूलबॅग चेक केल्या व सर्व व्यवस्थित असल्याची खात्री केली. मग मुलांना तयार केले. तोपर्यंत तिचे पतीदेवही तयार झाले. त्यांना टाटाबायबाय करीत दोन्ही मुले वडिलांच्या स्कूटरवरुन शाळेत रवाना झाली व तेथूनच तीचा नवरादेखिल ऑफिसमध्ये गेला.

नंतर साराने मुलांना शाळेतून आल्यावर खाण्यासाठी पाच-सहा पॅनकेक बनवले. मग पटपट नाश्ता करून ती स्वतः तयार झाली व घरापासून जवळच असलेली तीची शाळा गाठली. त्या शाळेतील विद्यार्थ्यांची ती आदर्श शिक्षिका होती.

हे सर्व करताना तीची खूप तारांबळ उड़त असे. तीचा मुलगा सार्थक सहावीला तर मुलगी सायली दुसरीला होती. दोघंही इंग्रजी माध्यमात शिकत होते व अभ्यासात हुशार होते. बेल झाल्यावर ती वर्गात गेली. त्या दिवशी तिच्या वर्गातील हुशार विद्यार्थी गैरहजर होता. चौकशी केल्यावर कळलं की, त्याला शाळेत येणं शक्य होणार नव्हतं

तीने त्याच्या मित्राला सांगून त्याच्या आईला भेटायला बोलावले आहे असा निरोप दिला. त्या विद्यार्थ्याचं नाव आकाश.

दुसऱ्या दिवशी आकाशची आई सलोमी तीला मधल्या सुट्टीत भेटण्यासाठी आली. साराने आकाशविषयी विचारल्यावर सलोमीने आपली कर्मकहाणी सांगितली की, "माझे मिस्टर प्लंबर आहेत, प्लबिंगचं काम करुन ते चांगले कमवत होते पण दोन महिन्यांपूर्वी काम करता करता ते पहिल्या मजल्यावरून खाली पडले व त्यांचा एक पाय पूर्ण अधू झाला व दुसऱ्या पायाच्या गुढघ्याला मार लागल्यामूळे ते आत्ता घरातच आहेत. मी दोन घरची धुणीभांडी करते पण घरखर्च, नवऱ्याचे औषधपाणी व मुलांच्या वह्यापुस्तकांचा व इतर खर्च मला झेपत नाही. त्यामूळे आकाश आता एका वडापावच्या गाडीवर काम करतो. यापूढे तो शाळेत येवू शकणार नाहीं, मॅडम... मला समजून घ्या.”

साराने तिला धीर देत सांगितलं, "तुझी परिस्थिती मी समजू शकते, पण आकाशसारख्या हुशार मुलाने शाळा सोडावी हे काही मला पटत नाही पण मला जर तू घरकामात मदत केली तर मी तूला चांगला पगार देईन व आकाश कमावतो त्यापेक्षा तू अधिक कमावलेस तर आकाशलाही शाळा सोडावी लागणार नाही. तेव्हा सलोमी म्हणाली, “मॅडम, असं असेल तर खरंच बरं होईल. पण मला काय काम करावं लागेल? तेव्हा साराने तीची रोजची होणारी धावपळ व नोकरीसाठी करावी लागणारी तारेवरची कसरत सांगितली. तेव्हा सलोमी तीला घरकामात मदत करायला तयार झाली, दुसऱ्या दिवशी शाळेला रजा होती, त्यादिवशी तीने साराकडे जाऊन सर्व कामं कशी करायची हे पाहून घेतलं तसेच साराने तिची मुलांशी आणि नवऱ्याशीही ओळख करून दिली.

हळूहळू सलोमी साराच्या हाताखाली स्वयंपाकातही निष्णात झाली. सलोमीने ते कुटुंब आपलसं केलं. सकाळी नवऱ्यासाठी व मुलासाठी स्वयंपाक केला की सलोमी साराच्या घरी येवून घराची साफसफाई, धूणीभांडी, भाजी चपात्या, मूलं शाळेतून आल्यावर त्यांच्यासाठी नाश्ता इत्यादि कामे आटोपून सारा आल्यावर तिच्याबरोबर चहा घेऊन संध्याकाळच्या स्वयंपाकाची तयारी करून मगच स्वत:च्या घरी परत जात असे. जाताना सारा तीला आकाशसाठी खाऊही देत असे.

बघता बघता वीस वर्ष सरली. सलोमीचा मुलगा आता नोकरीला लागला होता तर साराची मुलगा व मुलगी लग्नाची झाली होती, सलोमीमुळे नोकरी सांभाळून मुलांची शिक्षणं व आता मुलांच्याही नोकऱ्या, मित्रमैत्रिणींचं घरी येणंजाणं, मिस्टरांचा BP व ब्लडशूगरचे पथ्यपाणी सांभाळणे साराला सहज शक्य होत होते. त्यात अलीकडे भावी जावईदेखिल अधूनमधून येत होते त्यामूळे त्यांच्या पाहूणचारातही सारा कुठे काही कमी पडू देत नव्हती. ह्या सर्वात सलोमीचं योगदान मोठं होतं. म्हणून साराने ह्यावेळी सलोमीला नेहमीपेक्षा जास्त पगारवाढ दिली. सलोमी ते स्विकारायला तयार नव्हती.

त्यावेळी सारा सलोमीला म्हणाली, "अगं, नम्र असणं चांगले असते. मलाही त्याचे कौतूक आहे ! पण आपल्या कष्टांचा, घामाचा मोबदलाही ठोक वाजवून घेता आला पाहिजे. हे एका कष्टकऱ्याचं लक्षण आहे. त्यासाठी लाजायचं नाही, तो मोबदला तुझ्या हक्काचा आहे आणि आता माझ्याबरोबर माझी मुलंही कमवतात. ठेव ते पैसे. तुझ्या भवितव्याची तजवीज समज.

तो गुरुवारचा दिवस होता, रविवारीच साराच्या मुलीचं लग्न गुण्यागोविंदानं पार पडलं होतं. शनिवार, रविवार व सोमवारचा सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडल्यामुळे सारा खूप खूष होती. कालच तीची मुलगी व जावई मॉरिशसला हनिमूनसाठी गेले होते. आज साराने तीच्या नणंदा, भावजई, भाचरं, भाऊबंद व जवळचा मित्रपरिवार यांना Thanksgiving party साठी आमंत्रित केलं होतं.

सलोमी आदल्या दिवसापासूनच पार्टीच्या तयारीसाठी साराबरोबर धावपळ करीत होती. पार्टीसाठी स्टार्टर्सची ऑर्डर बाहेर दिली होती. तरी लग्नकार्य पार पडल्यामूळे घराची विस्कटलेली घडी पून्हा नीट लावण्यासाठी, अंगणाची व परस-दाराची साफसफाई, बैठक व्यवस्था, धुणीभांडी आणि पाहुण्यांचे आदरातिथ्य व स्वयंपाकाची आणि सर्विंगची तयारी करण्यामध्ये सलोमी लहान बहिणीप्रमाणे साराला प्रत्येक कामात मदत करत होती. शेवटी सर्व पूर्वतयारी झाल्यावर दोघीजणी फ्रेश होऊन बाहेर आल्या.

आमंत्रित मंडळी यायंला सुरवात झाली होती, साराच्या वहिन्या व नणंदा देखील Thanksgiving पार्टी असल्यामूळे आयत्या वेळेवर येऊन स्थानापन्न झाल्या. थोड्याच वेळात कार्यक्रमाला सुरुवात झाली. साराच्या नवऱ्याने सर्वांचे स्वागत केले व साराला बोलण्याची विनंती केली. साराने हात जोडून सर्वांना नम्रपणे अभिवादन केले व ती बोलू लागली.

“रविवारी आपल्या सायलीचा लग्नसोहळा निर्विघ्नपणे पार पडला. त्याबद्दल परमेश्वराला मी धन्यवाद देते. कार्यक्रम म्हटला की अनेक हात मदतीसाठी पुढे आल्याशिवाय तो यशस्वी होत नाही. महत्वाच्या तीनही दिवशी आपण सर्वांनी झेपेल तेवढी कामे करून आम्हाला मदत केलीत, मौजमजा केली आणि कार्यक्रमाला शोभा आणलीत, त्याबद्दल मी माझ्या कुटुंबियांच्या वतीने आपले आभार मानते व आजच्या कार्यक्रमाला आवर्जून आलात त्याबद्दल धन्पवाद देते. शेवटचे व महत्वाचे आभार मानायचे ते आमच्या सलोमीचे ! तिच्याशिवाय एवढ्या मोठ्या कार्यक्रमाची मी कल्पनाच करू शकत नव्हते. त्यामुळे सलोमीचेही मनापासून आभार मानते.

तेवढ्यात साराची नणंद उठली व म्हणाली, “वहिनी, तुझा आमच्यापेक्षा जास्त तिच्यावरच विश्वास आहे. तू सर्व अधिकार तीलाच दिले होतेस....”

तेव्हा सारा हसून म्हणाली, तुमचा काहीतरी गैरसमज होतोय. गेली वीस वर्षे सलोमी मला घरात मदत करते. तिच्यामुळे मी माझी नोकरी करु शकते. तीने बाल-पणापासून माझ्या मुलांना अंगाखांद्यावर खेळवले आहे. मुलांना काय खावसं वाटलं की ती डीश बनवून त्यांच्यासमोर हजर व्हायची. एकदा खेळता खेळता आपल्या सायलीच्या हाताचं हाड तीच्या मनगटातून थोडं सरकलं त्यावेळी सायली खूप रडत होती. मी घरात नव्हते, सलोमीने वेळेचं गांभीर्य ओळखून तीला हाडवैद्याकडे नेले व त्याने ते हाताचं हाड सायलीला गोष्ट सांगता सांगता पुन्हा जागेत बसवले व वैद्य म्हणाले, तुम्ही जास्त उशीर केला असता तर हे हाड पुन्हा जागेवर बसवण्यासाठी ऑपरेशन करावं लागलं असतं, मग आम्ही तीला अस्थितज्ञांकडे नेऊन दाखवलं, त्यांनीही तेच सांगितलं. सायलीच्या बाबांचे ऑपरेशन झाले होते तेव्हा मुलांना शाळेत ने-आण करण्यापासून ते आम्हाला नाश्ता, जेवण, चहा-फराळ  करून हॉस्पिटलमध्ये पोहोचवण्यापर्यंत तीने आमची मनोभावे सेवा केली. माझ्या प्रत्येक अडचणीत ती माझ्यासाठी देवदूत बनून माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली. तीने काय काय केलं ते सांगायला लागले तर आजची रात्रही पूरणार नाही.

इतरांना आनंदी बघून ती तृप्त होते, ती माझ्यासोबत असल्याबद्दल मी तीची सदैव ऋणी आहे. “Thanks Salomi” म्हणत साराने तीला आलिंगन दिलं.  उपस्थित पाहुण्यांनी साराची आपल्याला मदत करणाऱ्या बाईप्रती असलेली शेजारप्रिती पाहून जोरदार टाळ्या वाजविल्या.

त्यावेळी सलोमीने अश्रूपूर्ण नयनांनी साराला दोनच शब्दात प्रतिवादन करून सांगितले, "ताई, सोहळा उत्तम झाला त्यातच मी भरून पावले. माझ्या पाठीवर तुमच्या मायेची भक्कम थाप आहे तेवढीच माझ्यासाठी पुरेशी आहे. आपल्या सायली बाळाचा संसार सुखाचा होवो हिच परमेश्वराजवळ प्रार्थना करते व माझ्या कुटुंबाकडून आपणासाठी एक छोटीसी भेट आणली आहे, ती आपण स्विकारावी अशी विनंती करते. सलोमीने तिला एका छोट्या जेजूबाळाची मूर्ती दिली व तुमचा वंश मुलाबाळांनी फुलत रहावा अशा शुभेच्छा देऊन ती तिच्या पाया पडली. त्यांचे प्रेम पाहून पाहुणेमंडळी भावूक झाली. तेवढ्यात साराच्या नवऱ्याने टाळ्या वाजवून त्यांचे कौतुक केले.

गरमागरम स्टार्टर्स व वाफाळलेल्या चण्याच्या बशा सर्व्ह करण्यात आल्या व सलोमी आणि सारा ह्यांनी बनवलेल्या चविष्ट जेवणाचा आस्वाद घेवून अविस्मरणीय अशा Thanksgiving पार्टीची सांगता झाली.

# भिक्षां देहि

■ **मॅटिल्डा अँथनी डिसिल्वा, मर्सेस**

"राघवऽऽ रवीऽऽ चला लवकर. चहा तयार आहे." दिनाकाका मुलांना हाकारत म्हणाले.

"आलो.. आलो..." राघव धावत पळत येत म्हणाला.

"राघवा, जरा लवकर उठावं रे माणसांनी. वेळेवर पोहोचायला नको का कामावर. नविन नोकरी आहे तुझी." काका राघवला समझावत म्हणाले. "रवीऽऽ"

"येस, बाबा, आलोच मी." रवीसुद्धा ऑफिसला जायच्या तयारीतच आला होता.

"चहा घ्या आणि दोघांचे डबे भरून ठेवले आहेत. ते घ्यायला विसरु नका." दिनाकाकांनी सांगितले.

दोन्ही मुले गेली आणि मग दिनाकाका अंमळ टेकले. रोज त्यांची खुप धावपळ व्हायची. सकाळी उठून सगळ्यांचे चहापाणी, मग मुलांना न्यायचे डबे तयार करीपर्यंत ते थकून जात असत.

राघव त्यांच्या भावाचा मुलगा. गावाकडेच असायचे ते. दादा अख्खा दिवस शेतावर काम करून दमुन आले की त्यांना घरी आल्यावर एक-दोन 'पेग' लागायचे. पण हळूहळू दोनाचे चार आणि चाराचे सहा पेग कधी झाले ते समजलेच नाही. वहिनी सांगून थकली पण त्यांनी काही ऐकले नाही. आणि शेवटी दारुनेच त्यांचा घात केला. राघव लहान होता तेव्हा. नंतर वहिनींनी काबाडकष्ट करुन राघवला वाढवले. पण लाडही तेवढेच केले. त्यामुळे झालं काय; राघव थोडा आळशी, ऐतखाऊ झाला. शिक्षणातही फारशी गती नव्हती त्याला. जेमतेम एसएससीपर्यंत त्याची गाडी पोहोचली होती. वहिनीला आताशा कष्ट झेपत नव्हते. अशातच करोना घुसला आणि ती ही दादामागोमाग राघवला सोडून गेली. राघव एकटा पडला. म्हणून मग दिनाकाकांनी त्याला आपल्या घरी आणले.

त्यांनाही एकच मुलगा होता. रवी... पण तो अभ्यासात हुशार होता. आईबाबांच्या शिस्तीत वाढत होता. जबाबदार होता. राघवला घरी आणल्यावर त्याने

त्याला सहज स्विकारले. घर काही मोठे नव्हते, आपल्या खोलीतच त्याला सामावुन घेतले. राघव गावाकडचा असल्यामुळे शहरी रितीरिवाज त्याच्या अंगवळणी पडावयास वेळ लागला. पण तरी रवीने त्याला सांभाळून घेतले होते. दिनाकाकांची बायको, सुमीताकाकीनेही त्याला मुलासारखेच मानले. दोन्ही मुलांचे लाड पुरवता पुरवता तिचा दिवस कसा भरायचा ते तिलाही कळत नव्हते.

सारं काही ठीक चालले होते. रवी इंजिनियरींगच्या शेवटच्या वर्षाला होता. राघवला काकांनी आयटीआयचा एक कोर्स दिला होता. कंटाळ्याने का होईना काकांच्या सांगण्यावरून तो जात होता. काका रिटायर्ड झाले त्याच वर्षी ह्रदयविकाराच्या झटक्याने सुमिताकाकूंना देवाज्ञा झाली. सगळ्या घराचा भार आता दिनाकाकांवर पडला. थोडे दिवस काकूंशिवाय त्यांना खूप जड गेले. पण मग त्यांनी स्वत:ला सावरले. आता त्यांच्यापुढे एकच ध्येय होते. दोन्ही मुलांना मार्गाला लावायचे.

“अरे राघवा, तुझा कोर्स पूर्ण झाला आता नोकरीधंद्याचे काही बघावे लागेल.” काका राघवला बोलले.

“हो.. हो.. काका किती घाई करता हो तुम्ही ? आताच तर कोर्स संपलाय. जरा थोडे दिवस आराम करतो. मग बघु नोकरीचं...” राघव आळस देत म्हणाला.

“अरे आराम कसला करतोय ? तो रवी बघ, त्याला कॅम्पसमधूनच जॉबची ऑफर मिळाली आणि तो जायला पण लागला.“ काका रागाने बोलले.

“इथे तुमचे भलतेच असते काका. सारखी धावाधाव करायची. थोडा आराम करावा तर नसतोच कधी.” राघव तणतणत बोलून निघून गेला.

काकांना काही समजतच नव्हते, या मुलाला सुधरवावे कसे ? एकदा नोकरी लागली असती म्हणजे याचे लग्न करता आले असते. मग याच्या बायकोनेच ह्याला वेसण घातली असती. पण राघव स्वत: काही नोकरीसाठी प्रयत्न करीत नव्हता. शेवटी त्यासाठी सुद्धा काकानांच प्रयत्न करावे लागले. त्यांच्या एका मित्राच्या मुलाला सांगुन एका छोट्या खाजगी कंपनीत त्याला चिकटवून टाकला.

मुले मोठी झाली तशी त्यांच्या लग्नाची काळजी दिनाकाकांना लागून राहिली. रवीने त्याच्या ऑफिसमधलीच मैत्रिण शोधली होती. पण त्याआधी राघवचे बघावे लागणार होते. शेवटी गावाकडचीच एक मुलगी काकांनी राघवसाठी पसंत केली. धुमधडाक्यात राघवचे लग्न लावले आणि रेखा घरात सून म्हणून आली. काकांचा घरातला थोडा भार कमी झाला. काही महिन्याच्या अंतराने रवीचेही लग्न झाले. त्याची मैत्रिण सविता, दुसरी सून म्हणून घरात आली. काकांचे घर भरले. खूप खुश

होते ते. दिवस आनंदात चालले होते. रवी आणि सविता दोघेही नोकरी करणारे होते. दोघांचे पगारही चांगले होते. त्यामुळे घरात सुबत्ता होती. राघवचा पगार कमी असला तरी त्याला कसली काळजी नव्हती. रवी आणि काका दोघेही समर्थ होते त्यांना सांभाळायला. पण तरी रेखाला मात्र आपला नवरा जास्त कमवत नाही त्याचा त्रास व्हायचा.

"राघव, तुम्हाला काहीच कसे वाटत नाही हो ? जरा दुसरीकडे पण बघा ना कुठे ह्यापेक्षाही चांगला जॉब मिळतो का. आहेत तेथेच कमी पगारावर किती दिवस राहाणार ?" रेखा रागाने बोलली.

"तुला काय करायच्यात ह्या गोष्टी ? आपल्याला खायला प्यायला व्यवस्थित मिळतय ना ! मग गप्प बैस. जास्त डोकं चालवू नकोस तूझे." राघव आपले हातपाय ताणत, आळस देत तिच्यावर डाफरला.

रेखाला माहित होते, आपला नवरा आळशी आहे. रोज कामावर जायला निघायचा पण रोज ऑफिसला पोहचत होताच असे नाही. मधेच एखादी दांडी मारून मित्रांबरोबर मजामस्ती, पार्ट्या करायला जायचा हे तिला कळले होते. त्याउलट रवी आणि सविता होते. त्यांचे जॉबही चांगले होते नी इमानेइतबारे करत होते. एकत्र कुटुंब होते म्हणून राघव व रेखाला त्याची झळ लागत नव्हती. पण त्या दोघांचे रहाणीमान, कपडे पाहून रेखाला त्यांची असुया वाटायची. आपला नवरा चांगला कमावता असता तर आपणीही असेच टेचात राहिलो असतो असे तिच्या मनात येई. त्यासाठीच ती सतत राघवच्या मागे लागत असे. पण तो मात्र तिला कायम उडवून लावी.

हळूहळू काका आता वयोमानाप्रमाणे थकू लागले होते. नातवंडाची वाट पहात होते. पण दोन्ही पोरांनी अजुन विचारच केला नव्हता. रवी आणि सविता ऑफिसच्या कामामुळे कायम थकलेलेच असायचे. तर राघवची उलटीच तऱ्हा होती. आताशा तो काकांचेही ऐकेनासा झाला होता. कामावर जायला त्याला कंटाळा यायचा. एक तर घरात लोळत पडायचा किंवा सोबत्यांबरोबर बाहेर मजा करायला जायचा. मनात आले तर कामावर जायचा. त्यामुळे पगारही कमीच मिळायचा. तो त्याच्या मजामस्तीलाच संपून जायचा. घरात खायला प्यायला मिळत होते. म्हणून त्याला कसली फिकीर नव्हती. पण आता रवी आणि सविताला ते जाणवू लागले होते. आपल्या जीवावर फुकट बसुन खाणाऱ्या आपल्या भावाचा त्याला राग येऊ लागला. एक दिवस असेच सगळे बसले असताना रवीने विषय काढला.

"काय रे राघव, हल्ली बऱ्याच सुट्ट्या व्हायला लागल्या तुझ्या ? करतो काय तू अख्खा दिवस घरात बसून ?" रवीने जरा रागातच विचारले.

“अरे रवी, तुझ्यासारखा मी एसी ऑफिसमधे जाऊन नाही बसत काम करायला. एकदा आमचे काम करून पहा म्हणजे कळेल.” राघव उध्दटपणे म्हणाला.

“याचा विचार आधी करायचा असतो. आता पस्तावून काय फायदा ? आणि आम्ही एसी ऑफिसमधे बसतो म्हणजे आम्हाला काम नसते असे थोडेच आहे ? अरे डोक्याचा भुगा होतो नुसता.” रवीने सांगितले.

“ते काही नाही. आम्ही घरात पैसे देतो तेवढेच राघव भाऊजींनी पण द्यायला हवे घरखर्चाला.” सविता पहिल्यांदाच असे काही तरी बोलली.

“अगं पण त्यांना तुमच्याएवढा पगार थोडाच आहे ? “ रेखानेही लगेच उत्तर दिले.

“म्हणूनच मी सांगतो ना ! व्यवस्थित नोकरी कर. दुसरा काही कामधंदा शोध. ते काहीच नाही. घरात आराम करायचा नी आमच्या जीवावर मजा मारायची. असे किती दिवस चालणार ?“ रवीचा राग अनावर झाला.

“रवी म्हणतो ते बरोबर आहे राघवा. तुला आता दुप्पट काम केले पाहिजे.“ काका समजावणीच्या स्वरात म्हणाले.

“मला ते काही जमणार नाही. तुम्हाला काय करायचे ते करा.” असे ताठ्यात बोलून राघव निघुन गेला. त्यामागोमाग रेखाही गेली.

त्या दिवसापासून राघव आणि रवी यांच्यात थोडासा दुरावा निर्माण झाला. पण राघवला त्याचा काही फारसा फरक पडला नाही. तो नेहमीप्रमाणेच मनमानी करत राहिला.

“बाबा, आम्ही दोघेही थोडे दिवस बाहेर फिरायला जायचे ठरवतोय. चालेल ना ?“ रवी बाबांकडे परवानगी मागत होता.

“हो का ? कुठे जातायेत तुम्ही ? “ रेखाने उत्सुकतेने विचारले.

“अगं वहिनी, रोज कामाचे एवढे प्रेशर असते ना ऑफिसमधे; की जाम दमायला झालंय. थोडे आऊटिंग केले की बरे वाटेल.” सविता महणाली.

“हो का ?“ कसनुसं हसून रेखा म्हणाली. मनात आपण कधीकाळी जाऊ की नाही बाहेर फिरायला याची खंत होती.

“अरे पोरा विचारतोस काय मला. जाऊन या तुम्ही. कामातून थोडा श्वास मिळेल.“ काका उत्साहाने म्हणाले. घरातल्या नेहमीच्या कटकटीने वैतागलेल्या आपल्या पोरांना जरा विसावा मिळेल म्हणून काकांनाही बरे वाटले.

रवी आणि सविता लोणावळ्याहून चार-पाच दिवसांनी येणार होते; त्यादिवशी काकांनी रेखाला त्यांच्या आवडीचे जेवण बनवायला सांगितले. स्वत: काकांच्या

हातची शेवयांची खीर रवीला विशेष आवडत असे. ती ही त्यांनी बनवुन ठेवली. संध्याकाळी त्यांची वाट पहात असताना काकांना का कुणास ठाऊक काहीतरी विचित्र भावना मनात दाटून येत होत्या. बराच वेळ त्यांची वाट पाहात होते काका. जेवण सारे थंड झाले होते. रेखा दोनतीन वेळा सांगून गेली. पण जेवायची त्यांची इच्छाच होत नव्हती. राघव मात्र चमचमीत जेवणावर ताव मारून भरपेट जेवला होता.

आणि ती बातमी आली ! रवी आणि सविता ज्या उबर कारमधे येत होते त्या कारचा अपघात झाला होता. टॅंकरने त्यांना एवढी जोरात टक्कर मारली होती की गाडीची दशा पाहावत नव्हती. ड्रायव्हरसकट दोघेही जागीच ठार झाले होते. बातमी ऐकुन काका एकदम सुन्न झाले. काही बोलतही नव्हते नी धड रडतही नव्हते.

त्या तशा स्थितितच त्यांनी दोघांना अग्नी दिला. तसेही चेहरे ओळखण्यापलिकडे गेले होते. त्यानंतर ते मात्र एकदम भ्रमल्यासारखे वागू लागले. मधेच लोकांना ओळखायचे, तर कधी एकटक रवी-सविताच्या लग्नाच्या फोटोकडे पाहात बसत. रेखा त्यांना बळेबळे जेवायला लावायची. पण तेही थोडे खाल्ले की त्यांची तंद्री लागायची. पण या गोष्टीचा फायदा कोणाचा झाला असेल तर तो राघवचा ! सगळे घडून गेल्यावर त्याने कामावर जायचेच बंद केले. काही दिवसांनी रेखा त्याला म्हणाली.

“अहो... दिवस झाले, सुतकही संपले. तुम्ही कामावर कधी जाणार ?

“अगं सोड. आता कामावर जायची गरजच नाही आपल्याला. रवीचे आणि काकांचे पैसे आहेत तेच खुप आहेत आपल्यासाठी. तू टेन्शन नको घेऊस.” राघव बेफिकिरपणे म्हणाला.

“ते पैसे काय आयुष्यभर पुरणार आहेत का आपल्याला ? उद्यापासून जायला लागा कामाला.” रेखाने ठणकावले.

“तू गप गं ! मला शहाणपण शिकवू नकोस.” राघवने तिला उडवून लावले.

दुसऱ्या दिवसापासून त्याने हळूहळू काकांकडून त्यांच्या चेकवर सह्या घेण्याचे काम सुरु केले. एक दिवस काकांना बॅंकेत घेऊन जाऊन रवीच्या खात्यावरचेही पैसे काकांच्या खात्यावर वळते केले. आता जेव्हा हवे तेव्हा तो पैसे काढू शकत होता. रेखाला हे सारे काही पटत नव्हते पण नवऱ्यापुढे तिचे काही चालत नव्हते. आणि शेवटी पोटाची भूक होतीच.

काम न करता दिवसभर मजामस्ती करायची राघवला सवय पडली होती. फुकटच्या पैशांवर मजा मारायला मित्रांचीही कमी पडत नाही. हळूहळू बॅंकेच्या

खात्याला ओहोटी लागली. घरात खायचे वांधे होऊ लागले. मग मात्र राघवचे धाबे दणाणले. नोकरी तर कधीच गेली होती. दुसरी शोधायची तसदी त्याने घेतली नाही. काय करावे याचा विचार करता करता त्याला एकदम एक गोष्ट आठवली.

तो जेव्हा नोकरीला जायचा तेव्हा रेल्वेचा मोठा ब्रिज पार करायला लागायचा. त्या ब्रिजच्या पायऱ्यांशी एक आजी भिक मागायला बसायची. एकदोन वेळा त्याच्या लक्षात आले होते की एक माणूस रोज तिला तेथे सोडून, बसवून जायचा. त्याच्या डोक्यात पटकन एक कल्पना चमकली.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच राघव उठला. काका उठलेलेच होते. राघवने त्यांना तयारी करायला सांगितली. रेखाला समजेना काय चालले आहे ते.

“अहो, काकांना कुठे घेऊन चालले आहात तुम्ही ?”

“तू मला काही आता विचारू नकोस, मला एक काम आहे ते करुन येतो.” राघव बोलला.

राघव काकाना घेऊन स्टेशनवर गेला. लिफ्टने रेल्वे ब्रिजवर काकांना नेले. सकाळची ऑफिसला येणाऱ्या जाणाऱ्यांची गर्दी वाहत होती. तेथे एका जागी काकांना उभे केले.

“काका हात जोडा पाहू.” राघव बोलला. काकांनी हात जोडले आणि उभे राहिले.

“मी आलोच हं“ म्हणून राघव हळूच बाजुला सरकला.

काका हात जोडलेले तेथेच उभे राहीले. पांढरा शुभ्र सदरा आणि धोतर नेसलेले. गळ्यात वारकरी माळ घातलेले आणि डोळ्यातील हरवलेले भाव अशा अवतारात उभ्या असलेल्या काकांकडे बऱ्याच जणांचे लक्ष जात होते.‘ चांगल्या घरातले दिसतायेत आजोबा, काय परिस्थिती आली बघा.’ असे संवाद कानावर पडत होते. प्रत्येक जण दोन रूपयांपासून पन्नास रुपयांपर्यंत पैसे बळेबळे त्यांच्या हातात कोंबत होते. ते काहीही न बोलता हातात घेत होते. परत हात जोडत होते. हाताचा खोपा भरला तसे पैसे खाली पडू लागले. राघव दूर उभा राहून गुपचुप पहात होता. थोड्या वेळाने तो गर्दीत शिरला आणि काकांना म्हणाला.

“चला काका घरी जाऊया.”

त्याआधी काकांचा हात राघवने आपल्या खिशात रिकामा केला. घरी आल्यावर राघवने पैसे काढून मोजले. तीनशे पाच रुपये जमा झाले होते. तेही फक्त एक-दीड तासात ! राघव एकदम खूश झाला. मेहनतीविना पैसे कमवायचा एक नवा मार्ग त्याला सापडला होता.

“रेखाऽऽ हे रेखाऽऽ हे घे पैसे. आण तुला काय आणायची भाजी बिजी ते.“ दिडशे रुपये रेखाच्या हातावर ठेवत राघव म्हणाला.

“अहो. काय ? कुठुन आणले पैसे ? चोरीबिरी केली की काय कुठे ?“ रेखा आश्चर्याने विचारत होती.

“चोरी नाही गं. लॉटरी लागली मला.” राघव हसत म्हणाला. “हं पण लॉटरीचे तिकीट काढायला काकांना मात्र न्यावे लागेल रोज.. पण कमनशिबी आहोत ना ! आपल्याला लागत नाही ती लॉटरी.” राघव निलाजऱ्यासारखा हसत म्हणाला.

मग हे आधी एक दिवसाआड किंवा कधीकधी रोज; वेगवेगळ्या पुलावर काकांची यात्रा निघत असे. काका हात जोडून उभे राहात असत. मधेच त्यांची स्मरणशक्ती जागृत होत असे. त्यांना कळत नसे आपण काय करत आहोत; इथे कसे आलो. मग भांबावल्यासारखे ते इथे तिथे पाहत असत. राघव आजुबाजुलाच कुठेतरी असे. त्याच्या लक्षात आले की लगेच तो काकांना घेऊन घरी निघायचा. त्या दिवशी कधीकधी काहीच कमाई झालेली नसे. मग काकांच्या वाट्याला पूर्ण रस्ताभर शिव्यांची लाखोली यायची. पण तरीसुद्धा हा ‘बिझनेस’ राघवला पसंत होता. कधीकधी आजुबाजुच्या गुंडांचा त्रास व्हायचा, पण राघवची नजर आता सरावली होती. त्यांच्यापैकी कोणी येताना दिसले की लगेच काकांना घेऊन तो निघुन जायचा.

काकांना आता थोडे थोडे लक्षात येऊ लागले होते की, राघव आपल्याबरोबर काहीतरी चुकीचा वागतोय. म्हणून एक दिवस त्यांनी राघवला सांगितले.

“मी आज येणार नाही राघवा तुझ्याबरोबर. तू एकटाच जा बरं.”

“ते काही चालणार नाही काका.“ राघव काकांना दरडावून म्हणाला.

“अहो ते नाही येत तर कशाला त्यांना जबरदस्ती करता तूम्ही ?“ रेखा मधेच बोलली.

“अगं हा मला स्टेशनवर उभे करतो नी स्वत: कुठेतरी गायब होतो.” काकांनी लहान मुलांसारखी तक्रार केली.

“चुप काका एकदम चुप बसा. काही सांगु नका. आणि तू गं तुला खायला प्यायला मिळते ना ! तू तर गप्पच रहा.” राघव दोघांवर डाफरला. आजकाल काकांचे आणि रेखाचे काहीच चालत नसे राघवपुढे. काकांना जावेच लागले त्याच्याबरोबर.

राघवने आज जरा लांबचे स्टेशन शोधले होते. त्याला माहित होते, नविन जागी पहिल्या दिवशी जास्त कमाई होते. राघवने गर्दीत काकांना उभे केले आणि तो बाजुला लांब जाऊन उभा राहिला. काका आज पूर्ण शुद्धीत होते. त्यांना कळून चुकले होते की मला राघव इथे भिक मागायला उभे करतो. त्यांना स्वत:ची लाज वाटू

लागली. हे असे जिणे जगण्यापेक्षा मेलेले परवडेल असे त्यांना वाटून गेले. पण तेवढा धीरही होत नव्हता. त्यांचे डोळे पाण्याने भरले. लोकं आपले येता जाता त्यांच्या हातात पैसे देत होते. ते त्यांच्या हाताच्या खोप्यात जमा होत होते. रडणाऱ्या काकांना पाहून लोकांना आज जास्तच दया येत होती. काकांचा हात लवकरच भरला. राघव दुरून पाहात होता. त्याला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. ‘आज लवकरच चांगला माल जमणार.‘ मनातल्या मनात तो मांडे खात होता.

इतक्यात एक सुटाबुटातला माणूस काकांजवळ आला.

“काकाऽऽ? रवीचे बाबा ना तूम्ही ? मला ओळखलत का ? मी समीर.. रवीचा मित्र. पण मला सांगा तुम्ही इथे काय करता ?“ तो माणूस एकावर एक प्रश्न विचारत होता.

काकांनी त्याला ओळखले होते. रवीचा कॉलेजपासूनचा मित्र होता तो. रवी असताना तो त्यांच्या घरीही यायचा. त्यामुळे राघवही त्याला ओळखत होता. समीरच्या नजरेस पडू नये म्हणून तो तोंड फिरवून जरा लांब निघून गेला. न जाणो काकांनी काही सांगितले तर !

काकांनी समीरला पाहिले आणि त्यांचा चेहरा लाजेमुळे कसानुसा झाला. आता काय करावे; काय सांगावे त्यांना कळत नव्हते. असा दिवस पाहायला मला कशाला ठेवले असे मनातल्या मनात ते देवाला कोसू लागले. त्याच बरोबर समीरपासून लवकर दूर जावे म्हणून ते भरभर चालू लागले. लोकांचे धक्के लागत होते. पण तसेच हात जोडलेले ते पुढे सरकत होते. हातातुन काही पैसे, नाणी खाली सांडत होती. समीरही त्यांच्या मागे ‘काकाऽऽ काकाऽऽ‘ करीत चालला होता. एका क्षणी जीन्याच्या पायरीवर काका पोहचले. पण गडबडीत पुढची पायरी चुकली आणि काका गडगडत खाली आले. अर्ध्या पायऱ्यांवर त्यांना कोणीतरी पकडले. पण आधीच कष्टाने, दु:खाने आणि लाजेने रक्तबंबाळ झालेल्या काकांना तेवढाही धक्का पुरेसा होता.

काका खाली पडले आणि त्यांच्या हातातले पैसे इतस्तत: पसरले. त्यांच्या पाठोपाठ आलेल्या समीरला ते पाहून वाईट वाटले, हे सगळे माझ्यामुळे झाले याची त्याला खंत वाटू लागली. तो खाली पडलेल्या काकांना उठवू लागला. पण काका कधीच अनंतात विलीन झाले होते. लपून मागे आलेल्या राघवला मात्र आपले लॉटरीचे तिकीट फाटल्याचे अतीव दु:ख झाले.

# हुंदके

■ अमर म्हात्रे, वसई

एखाद्या स्त्रीला नवऱ्याने दारू पिऊन किती मारावं? पंधरा-वीस वर्षापासून ते त्यांच नित्यकर्म होतं. तो दारू प्यायचा, कुठलंही काम न करता तिच्याकडे पैसे मागायचा, तिने पैसे दिले नाहीत, की तिला अगदी गुराढोरा सारखी मारहाण व्हायची. ती बिचारी चार घरची धूणी भांडी करून आपल्या घराचा चरितार्थ चालवायची. पदरात तीन मुलं होती. त्यांना शिक्षण मिळावं आणि या नरकातून त्यांनी आपलं जीवन सार्थकी लावून आपल्या पायावर उभे राहावं अशी त्या माऊलीची इच्छा होती.

लग्न झाल्यापासून तिने इतके अत्याचार सहन केले होते कि, ती आता संवेदना शून्य झाली होती. ती हसणं विसरली. ती बोलणंही विसरली. तिच्या चेतना क्षमता संपल्या होत्या. ती चारचौघात मिसळणे बंद झाले होते. तिला मैत्रिणी नव्हत्या, आपलं मन हलकं करण्यासाठी कुणी जवळचे नातेवाईक नव्हते. फक्त तिची म्हातारी, आजारी असलेली आई हा एकमेव तिच्यासाठी आधार होता.

वाट्याला आलेले प्रचंड कष्ट, हाल अपेष्टा, दु:ख, शारीरिक मानसिक त्रास यामध्ये तिचं संपूर्ण आयुष्य होरपळून निघालेलं होतं. या अत्याचाराचं परमोच्च टोक तेव्हा झालं ज्यावेळी तिला घरातून हाकलून काढण्यात आलं. मूलं उघड्यावर पडली. शाळेची फी न भरल्याने तिघांची नावे कमी करण्यात आली. मुलांना दोन वेळ जेवणाची भ्रांत नव्हती. लोकांकडे अक्षरश: भिका मागून १२ वर्षाची मुलगी आणि तिचे दोन लहान भाऊ पोट भरत होते. इकडे त्याचे पिणे सुरुच होते. याकामी त्याची वहिनी भाऊ त्याला प्रोत्साहन द्यायचे. मुलांना आईला भेटण्यासाठी बंदी घातली गेली. तरी ती गुपचुप भेटायची, जवळचा खाऊ त्यांना द्यायची. इतकं सर्व होऊनही तिचे चार सख्खे भाऊ काहीही करू शकले नव्हते. ते ही हतबल होते. यावरून त्यांचेही अनेकदा वाद झाले होते.

तिने जवळच्या शाळेतल्या मुलांसाठी खिचडी बनवण्याची नोकरी शोधली. याची माहिती त्याला लागल्यावर त्याने ही नोकरी सोडायला लावली. ११ महिन्याचा अवधी गेला होता. स्थिती जैसे थे होती. तिच्या भावापैकी एक माझा जवळचा मित्र होता.

एकदा स्नेहभोजनासाठी मला बोलावल होतं. दुपारी निवांत गप्पा झाल्यावर हा विषय समोर आला. ११ महीने झाले, बहिण घरी आहे, मुलं उघड्यावर पडली तरी तू मला सांगितल नाहीस. यावरून त्यालाच सुनावलं.

'उद्या सगळे नातेवाईक जमणार आहेत, काहीतरी निर्णय घ्यायचा आहे. तू येशील न.. काहीतरी करावं लागेल ना' मित्राची विनवणी.

सगळे जमले. या सर्वामधे फक्त तिची सख्खी बहिण मला माहिती देत होती. सगळ्या घटना, माहिती तिने दिली. त्याचे क्रिमिनल रेकॉर्ड आहेत. तो कुणाला घाबरत नाही. मी मध्यस्थी केली तर मलाही मारलं. ऐकून टाळक सणकलं... तुम्ही समजवा त्याला.. कदाचित  तुमच ऐकलं तर.. असा पिडीत महिलेच्या बहिणीचा विश्वास होता.

त्यावर मी : “नाही तस नाही होणार, पोलीस स्टेशन करावे लागेल. त्रास होईल, तरी मार्ग काढू ..”

मला तर त्याला अर्धा तास पोलीस स्टेशन मधे एरियल, सर्फने चांगलं धुऊन वाळत घालायला मन झालं होतं.

“आधी तिला समोर आण, मला तिच्याशी बोलायच आहे. तिची सर्व तयारी पाहिजे. तर काहीतरी करू शकू.' मी म्हणालो.

ती आली समोर बसली. एकाही प्रश्नाचं उत्तर देऊ शकली नाही. तिच्या तोंडून शब्द फुटेना, तिचे अश्रु तर संपले होतेच. कावरी बावरी, भेदरलेली वाटली.

“हे क़ाय आहे? ती काहीही बोलत नाही.” मी विचारलं.

त्यावर तिची बहीण : “दादा, तिला मारून मारून अस केलं आहे.”

“अरे असं कसं चालेल? पोलिसांनी विचारल्यावर काय उत्तर देणार? मी सुद्धा मद्त करू शकणार नाही. तिने बोलायला हवं, किमान रडुन मोकळं व्हायला हवं, तर काहीतरी केस बनवू शकू आणि जे घडले आहे ते सांगायचे, आपण खोटे तर बोलत नाहीत.”

त्यावर ते : “हो, पण ती तशीच झाली आहे, काहीतरी तुम्हीच करा.”

ह्म्म्म मग काय? या स्थितीत हुकमी एक्का हवाय असं मनोमन ठरवलं. प्रत्येक स्त्रीला तिची मुलं खुप प्रिय असतात. मातृत्वाला हात घातल्यावर कुठलीही स्त्री पेटून उठतेच. मला फक्त तिला पोलीस प्रोसेससाठी तयार करायचं होतं.

“बघ ! तूझ्या हातून सगळं गेलं आहे. तरी तू फक्त मुलांना वाचवु शकतेस. ते उपाशी किंवा त्याच्या हातून मेल्यावर तू बोलणार का? तसं ठरवं. मग ही मामा लोकं तयारी करतील सगळी मयताची. माझ्या या वाक्यावर ती चमकली.

“मला तूझ्या तोंडून ऐकायचे आहे. तुला कुठे राहायचे आहे? नवऱ्या सोबत की आई कडे? “

सर्वसाधारण माझा अनुभव आहे. अश्या केसमधे बायकांना घर संसार, मुलं, नवरा (मारझोड करणारा असला तरीही) हवा असतो. तिने नवऱ्याकडे जाण्याची इच्छा व्यक्त केली.

“ठीक आहे, मी सांगेल तसं करायचं.”

“हो”, तिने मान हलवली.

“जे घड़लं ते सगळं सांगायचं, तू बोललीस तर पोलीस मदत  करतील. सगळं नीट होईल.“

पुढले २४ तास मोठे राडे घेऊन येणार होते. त्याची कुणालाही कल्पना नव्हती, अगदी मलाही नाही. निकटवर्तीय वरिष्ठ पोलीस निरीक्षक या पोलीस ठाण्यात कार्यरत होते. माणूस भला होता, तसा शिस्तप्रियही होता. आमचे मैत्रीपूर्ण संबंध होते. त्यांना सर्व प्रकार सांगितला. त्यांनी तिला समोर उभं करून पोलीसी झाडझडती सुरु केली.

या प्रकरणात त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यावेळी पोलीस ठाण्यात स्वयंसेवी संस्था अशी प्रकरणे हाताळत होत्या. त्यांच्याकडे या महिलेला समुपदेशन करण्यासाठी पाठवले. तिची तक्रार दाखल झाली. तो पर्यंत तिच्या नवऱ्याला उचलण्यासाठी पोलीस रवाना झाले. यानंतर तिच्या माहेरच्या कुटुंबासोबत सासरचे कुटुंब याची जोरदार वादावादी सुरु झाली. पोलीसांच्या समोरच तिथे कायदा सुव्यवस्था निर्माण होईल अशी स्थिती होती. तसा मित्राचा कॉल आला.  पोलीस निरीक्षकांना याची कल्पना दिली. 'एक लेडीज पीएसआय आणि किमान चार कर्मचारी पाठवा.' त्यांना मागणी केली.

त्याप्रमाणे जीप पोहोचली. पोलिसांनी स्थिती आटोक्यात आणली. त्याला उचलून आणलं. गडी मजबूत होता. चार पाच जणाना आवरणार नाही. दुपार झाली. त्याचा योग्य पाहुणचार झाला. यानंतर स्वयंसेवी संस्थाच्या दोन महिलांनी ही स्थिती अतिशय नाजुकपणे सांभाळली.

दूसरा दिवस उजाडला. दोघांचे वेगवेगळ्या वेळेत समुपदेशन सुरु होते. संध्याकाळपर्यंत तो तिला घेऊन जाण्यासाठी तयार झाला. सर्व कायदेशीर सोप संस्कार पार पडले. तिला कुठलाही त्रास देणार नाही असे लेखी हमीपत्र लिहून घेण्यात आले. संस्थेतील बाईनेही जीव तोडून या प्रकरणी मदत केली.

त्याची अट एकच.. रात्री घरी जाऊ.

रात्री का? दिवसा न्यायचं, लग्नाची बायको आहे न? आम्ही मधेच फेरी मारणार. तिची एकही तक्रार असेल तर, आतमधे बसायची तयारी ठेवायची. त्या बाईने सज्जड दम भरला. त्याला ईगो असेल, माघार घेतली असे जगाला दिसेल म्हणून त्याची भूमिका

तिला रात्री घरी नेण्याची असावी. असा कयास आम्ही चर्चे अंती काढला. रात्र होणार होती. आणि त्यावेळी तिला त्याच्या सोबत पाठवणं योग्य वाटलं नाही.

उद्या तू तुझं सर्व सामान, कपडे सकाळी घेऊन यायचं. पोलीस ठाण्यातुन थेट घरी.. स्वयंसेवी संस्थेतली बाई गरजली.

अखेर तो दिवस उजाडला. दुसऱ्या दिवशी आम्ही तिच्या सर्व कुटुंबासह पोलीस ठाण्यात हजर होतो. सगळ्या सूचना तिला दिल्या. तिच्या सासरकडची दोन दिवसापासूनची स्फोटक स्थिती पोलीसांनी नियंत्रणात आणली होती.

तो आला. त्यालाही सगळ्या सूचना देण्यात आल्या. पोलीसी पाहुणचारा नंतर अगदी गाय झालेला तो, सगळं सहकार्य करत होता. देहबोली बदलली होती.

तिने पटकन सामान उचललं. सर्वांचा निरोप घेतला.

"भेटत रहा गं मधुन मधुन.." स्वयंसेवी संस्थेची बाई मुद्दाम ओरडली.

त्यावेळी अगदी अगदी मंद स्मित तिच्या चेहऱ्यावर पाहिलं. दोघे चालत निघाले. त्यांच्या हळूहळू बारीक होत जाणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पाहत होतो.

ती यापुढे मौन सोडेल का? ती खळखळून हसेल का? ती पूर्ववत सर्वसाधारण जीवन जगू शकेल का? मनावर असलेल्या असंख्य ओरखड्यांना मनातल्या मनात मलमपट्टी करू शकेल का? असे अनेक प्रश्न माझ्या डोळ्यासमोरून तरळून गेले. तिचं अबोलपण खूप वेदनादायक होतं. एखाद्या न बोलणाऱ्या व्यक्तीच्या पाठी किती वेदना, हुंदके असू शकतात त्याचं हे मूर्तीमंत उदाहरण होतं. अशा कितीतरी स्त्रिया रोजच्या रोज नागावल्या जात असतील. काही तर पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचूही शकत नाहीत. जरी पोहोचल्या तरी अपरिहार्य कारणामुळे त्यांना न्याय मिळू शकेल का? हा प्रश्न असतोच.

दुसऱ्या बाजूने कायद्यांचा गैरवापर करून एखाद्याचं आयुष्य उध्वस्त करणाऱ्या स्त्रियांमुळेही परिस्थिती भीषण आहे. 'ज्याचा शेवट गोड ते सर्व गोड' या प्रकरणाचा अंत चांगला झाला. पण प्रत्येक कहाणीचा अंत सुखद होईलच असं नसतं. जगभरात असे अनेक 'हुंदके' असतात. अगदी आपल्या जवळच्या हातभर अंतरावर सापडतात. विविध वाईट अनुभव व कारणांमुळे समाज यात हस्तक्षेप करीत नाही. हे अजूनच घातक आहे. यातूनच गंभीर गुन्हे घडतात.

धोक्याची घंटा देणारी चाहूल लागल्यावर योग्य वेळी योग्य ठिकाणी शहाणपण केलं तर, परिस्थिती बदलू शकते. अजून तरी समाज तितकासा वाईट नाही. जग चांगल्या माणसामुळे सुरु आहे. मदतीचे हात समोर येतात. फक्त आपलं दु:ख आणि संवेदना योग्य व्यक्तीकडे व्यक्त करण्याची गरज आहे. सगळ्यांचे वैयक्तिक आभार मानून पोलीस ठाणे सोडताना ....

सुरेश भटांच्या ओळी यावेळी आठवल्या.

जगत मी आलो असा की, मी जसा जगलोच नाही!
एकदा तुटलो असा की, मग पुन्हा जुळलोच नाही!

जन्मभर अश्रूंस माझ्या शिकविले नाना बहाणे;
सोंग पण फसव्या जिण्याचे शेवटी शिकलोच नाही!

कैकदा कैफात माझ्या मी विजांचे घोट प्यालो;
पण प्रकाशाला तरीही हाय, मी पटलोच नाही!

सारखे माझ्या स्मितांचे हुंदके सांभाळले मी;
एकदा हसलो जरासा, मग पुन्हा हसलोच नाही!

स्मरतही नाहीत मजला चेहरे माझ्या व्यथांचे;
एवढे स्मरते मला की, मी मला स्मरलोच नाही!

# चिंचेचे झाड

**■ बॅप्टिस्ट एम वाझ. दारसेंग**

आगाशी-निर्मळ रोडवर एका सुंदर टुमदार बंगल्यामध्ये एक आजी आपल्या दोन मुलं व नातवंडासोबत राहत होती. आजीचे यजमान कोरोना साथीत दगावल्यामुळे आजी एकटी पडली होती. तिच्या घरासमोर एक बावखल होतं. त्या बावखलच्या कडेवर रस्त्याला लागून एक चिंचेचं डेरेदार झाड होतं. त्या झाडाच्या फांद्या सभोवार पसरल्या होत्या. त्यातल्या काही फांद्या रस्त्यावर आल्या होत्या. त्या रस्त्यावर अनेक वाटसरूची वर्दळ असे. शाळकरी मुलंही त्याच रस्त्यावरून शाळेत जात असत.

आजीची दोन्ही मुलं व सूना कामावर आणि नातवंडं शाळेत गेली की त्या भल्यामोठ्या घरात आजी एकटीच असे. मग ती ओटीवर बसत असे. जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरूंना व शाळेत जाणाऱ्या मुलांना बघत आपला वेळ घालवत असे. दुपारच्या वेळेला काही फेरीवाले वा भंगारवाले झाडाच्या छायेखाली आराम करत असत. क्वचित प्रसंगी एखादा तहानलेला वाटसरू आजीकडे पाण्याची मागणी करत असे. आजीही मोठ्या आनंदाने त्याला पाणी आणून देत असे. त्यांच्याशी बातचीत करत असे. संध्याकाळी मुलं शाळेतून घरी परतेपर्यंत आजी ओटीवरच बसत असे. आजीसाठी हा मोठा विरंगुळा होता.

सकाळच्या प्रहरी झाडाच्या शेंड्यावर बसून कोकिळा मधुर व मंजुळ आवाजात गुंजन करत असे. तिचा तो मंजुळ आवाज ऐकून कान तृप्त होत असत. उन्हाळ्यात चिमण्या दुपारच्या प्रहरी चिवचिव करत या फांदीवरून त्या फांदीवर उडत असत व त्यांच्या चिवचिवाटाने आसमंत भारून टाकत असत. ते पाहून आजीचे डोळे तृप्त होत असत. भरपाई म्हणून आजी पाण्याने भरलेले पसरट भांडे घराच्या कंपाऊंडवर टांगून ठेवी. चिमण्या चिवचिव करत चोचीने पाणी प्राशन करीत व पुन्हा झाडावर बसत. आजीला ते पाहण्यात खूप गम्मत वाटत असे. उन्हाळ्यात ओटीवर पाण्याने भरलेले मटके ठेवी. तहानलेले वाटसरू मटक्यातले थंडगार पाणी पिऊन तृप्त होत असत. मग आजीची खबरबात घेत ते पुढे मार्गस्थ होत असत. आजीचा दिवसाचा

वेळ कसा निघून जात असे हे तिलाच कळत नसे. आजी खुश होती, आनंदी होती. परंतू नियतीला आजीचे सुख पहावले नाही.

चिंचेला लागून असलेले बावखल सुमारे ७-८ गुंठ्याचे होते. त्या बावखलवर एका बिल्डरची नजर होती. बिल्डरने जमीनमालकाशी सौदा करत ते बावखल ताब्यात घेतले. आजीला बावखल विकल्याची कुणकुण लागली. ती थोडीशी चिंतातुर झाली. परंतू बिल्डर झाडाला हात लावणार नाही ह्याची तिला खात्री वाटत होती. त्यामुळे तिने चिंता झटकून टाकली. परंतू तिची खात्री अल्पजीवी ठरली.

एके सकाळी झोपेत असताना ट्रकच्या हॉर्नचा कर्कश आवाज तिच्या कानावर पडला. ती घाईघाईने उठली. तोंड धुतले व ओटीवर आली. त्यावेळी ट्रक रस्त्यावर ओळीने उभे असलेले दिसले. मातीने भरलेले ते ट्रक बावखलात रिकामी होत होते. ते पाहून बावखल बुजवण्याचे काम चालू असल्याचे तिच्या लक्षात आले. संपूर्ण गावातील विहिरींना पाणी पुरविण्याचा तो एकमेव स्रोत बंद होणार हे बघून तिला खूप चीड आली. आजीचा संताप अनावर झाला. त्या तिरमिरीत ती एका ट्रकसमोर उभी राहिली व मोठ्याने किंचाळत बावखल बुजवून देणार नाही म्हणून ट्रक ड्रायव्हरला सांगितले. तिचा तो आवेश पाहून गावातले लोक जमा झाले. मागे उभे असलेले ट्रकचे ड्रायव्हरसुद्धा तिथे आले. त्यातल्या एकाने बिल्डरला फोन केला. तो आपल्या कारने थोड्याच वेळात घटनास्थळी हजर झाला, आजीचे म्हणणे ऐकले. गावातील लोकांनीही आजीला साथ दिली. एकंदरीत परिस्थिती पाहून बिल्डरने थोडीशी माघार घेऊन गावातील लोकांना पिण्यासाठी त्या जमिनीवर विहीर बांधून देण्याचे आश्वासन दिले. गावातील लोकांनी त्याला दुजोरा दिला. तरीही आजीचे समाधान झाले नाही. तिच्या मुलांनी तिला समजावले त्यामुळे तिचा नाईलाज झाला व ती घरात गेली. काही दिवसांनी बावखल पूर्ण बुजवलं गेलं. त्या ठिकाणी एक मोठा प्लॉट तयार झाला. तो प्लॉट पाहून बिल्डरने खुशीने तोंडातल्या तोंडात शिळ घातली. त्या जागेवर टॉवर बांधण्याचे त्यांनी पाहिलेले स्वप्न लवकरच पूर्ण होणार ह्याची त्याला खात्री वाटू लागली.

दिवसामागून दिवस जात होते. आजीचा जीवनक्रम पूर्वीसारखाच चालू होता. त्यात प्लॉटवर गावातली मुलं खेळत होती, बागडत होती त्यामुळे आजीच्या आनंदात आणखी भर पडली. परंतु हा आनंद जास्त दिवस टिकला नाही. एकेदिवशी बिल्डरचे कामगार आले व त्यांनी झाडाच्या फांद्या कापायला सुरुवात केली. एकेक फांद्या खाली जमिनीवर पडत होत्या. आजीला ते पाहून जणूकाही आपले एकेक अवयव निकामी होत असल्याची जाणीव होऊ लागली. तिच्या डोळ्यातले अश्रू थांबत नव्हते.

ती असहाय्य झाली होती, पण हरली नव्हती. ती पुन्हा एकदा बिल्डरच्या कामागारांसमोर उभी राहिली. तिचा रुद्रावतार पाहून कामगारांनी काम थांबवले. थोड्या अवधीत तेथे बिल्डर हजर झाला. आजी व बिल्डरमध्ये खूप वादावादी झाली. शेवटी बिल्डर ‘उद्या मी पोलिसाला घेऊन येतो’ असा आजीला दम देऊन निघून गेला.

आजीला काय करावे ते कळत नव्हते. काहीही करून ते झाड वाचवायला हवे असे तिला वाटत होते. ती खूप हिरमुसली होती. संध्याकाळी मुलं कामावरून परत आल्यावर रस्त्यावर दोनचार झाडाच्या फांद्या पडलेल्या बघून व आईकडे पाहून त्यांना परिस्थितीची गंभीरता जाणवली. परंतु ते काही बोलले नाही. रात्री जेवताना आईनेच झाडाचा विषय काढून ‘मी कोणत्याही परिस्थितीत ते झाड वाचावणार’ असे सांगू लागली. मुलांनी सांगितले ‘आई तू त्या फंदात पडू नको. ते पोहचलेले लोक आहेत. त्यांना राजकीय वरदहस्त आहे. पोलिसांचा सुद्धा त्यांना पाठिंबा आहे. त्यामुळे तू त्या फंदात पडू नकोस.’

पण आजी ऐकणारी नव्हती. दुसऱ्या दिवशी आपल्या नातवाला घेऊन ती पालिकेच्या ऑफिसात पोहोचली. तिथे चौकशी करून संबंधित अधिकाऱ्याला गाठून सर्व वस्तुस्थिती त्याला कथन केली. अधिकाऱ्याने संबंधित प्रकरणाची फाईल मागवली व फाईल मधले सर्व पेपर चाळले आणि आजीकडे पाहून म्हणाले ‘बिल्डरने सर्व रीतसर परवानग्या घेतल्या आहेत. त्यामुळे त्यांच्यावर काही कारवाई करता येणार नाही.’ हे ऐकताच आजीचा पारा चढला व तिने पालिकेचे ऑफिस डोक्यावर घेतले. ‘तुम्ही सगळे खुनी आहात. एका ऋषितुल्य झाडांचा तुम्ही खून करत आहात. आकाशात विहंगम करून, भरारी घेऊन आपल्या घरट्यात परतणाऱ्या पक्षांचा तुम्ही आसरा हिरावून घेत आहात. थकल्या भागल्या कामकरी वर्गाचे विश्रामस्थान नष्ट करण्याच्या सैतानी महत्वाकांक्षेला तुम्ही खतपाणी घालत आहात. झाड कापण्याची परवानगी तुम्ही कशी काय देऊ शकता? तुम्ही पर्यावरणाचे शत्रू आहात. तुम्ही पर्यावरणाचा ऱ्हास करत आहात. तुम्हाला या खुर्चीवर बसण्याचा अधिकार नाही.’

आजीचा तो अवतार पाहून अधिकाऱ्याची पाचावर धारण झाली. आजीला शांत कसे करावे हे त्याला कळेना. ‘उद्या बिल्डरला बोलावून काय तो निर्णय घेतो व तुम्हाला तसे कळवतो.’ असे सांगून त्यांनी आजीची बोळवण केली.

त्याच दिवशी दुपारी त्या अधिकाऱ्याने बिल्डरला बोलवलं. आजीने तक्रार केल्याचे सांगितले. दोघांमध्ये बंद दरवाजाआड 'अर्थपूर्ण' बोलणी झाली. अधिकाऱ्याने त्याला आवश्यक कागदपत्रे घेऊन पोलिसाची मदत घेण्याचा सल्ला दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी पोलिसांच्या उपस्थितीत चिंचेचे भले मोठे झाड

पाडण्यात आले. झाड पडताना झालेल्या आवाजात आजीची किंकाळी विरून गेली. झाडावर पक्षांनी बांधलेली घरटे उध्वस्त झाली. त्यामुळे पक्षी इकडे तिकडे उडत होती. ती सैरभैर झाली होती. त्या पक्षांचा कलरव पाहून आजीचं काळीज तुटत होतं. तिला ते दृश्य पहावले नाही. ती आपल्या खोलीत जाऊन आक्रोश करू लागली. मुलांनी कशीबशी समजूत घालून तिला शांत केले. रात्र झाली. ती आपल्या मुलानातवंडांसोबत जेवायला बसली. पण घास तिच्या घशात उतरत नव्हता. तसेच दोनेक घास खाऊन ती उठली. मुलं, सूना व नातवंडांचा निरोप घेऊन ती आपल्या खोलीत झोपायला गेली. रात्रभर तिला झोप लागत नव्हती. या कुशीवरून त्या कुशीवर ती वळत होती. डोक्यात विचारांचे काहूर माजले होते. आपण झाडाला वाचवू शकलो नाही ही खंत तिच्या मनाला सतावत होती. आपल्या डोळ्यासमोर सगळ्यांना आसरा देणारे झाड पाडले गेले आणि आपण काहीच करू शकलो नाही हे दुःख तिला सहन होत नव्हतं. रात्री कधीतरी तिचा डोळा लागला असावा. सकाळी पहाटे उठणारी आपली आजी आज उठली का नाही म्हणून नातू तिला पहायला गेला. त्याने आजी आजी म्हणून हाक मारली. परंतु तिने प्रतिसाद दिला नाही. म्हणून त्याने आपल्या वडिलांना बोलावले. त्यांनी तिला हलवून पाहिले. ती अगदी निपचित पडली होती. हात पाय थंडगार झाले होते. डोळे उघडे होते जणूकाही ते काहीतरी शोधत होते. आपली आई आपल्यातून निघून गेल्याचे मुलाच्या लक्षात आले. त्याने आपल्या हाताने तिचे उघडे डोळे मिटून टाकले व हंबरडा फोडला.

दफनभूमीकडे नेताना काही क्षणांसाठी निपचित पडलेल्या झाडापाशी आजीचे कलेवर थांबविण्यात आले. त्यावेळेला अंत्यविधीसाठी जमलेल्या लोकांचे डोळे पाणावले होते. जणू काही साश्रूनयनाने पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या आजीला ते श्रद्धांजली वाहत होते...!

# वायलसार

## (वेगळा संसार थाटणे)

(कौटूबिक कथा)

■ पॉल घोन्सालविस, पापडी, 9096976538

फरसूपायतूव व जानूबाय, म्हणजे गावातील त्यावेळचे श्रीमंत कुटुंब. घराशेजारीच मोठी वाडी, त्यात पानवेल, केळीची झाडे, नारळी, आंबाफणसाची झाडे. शिवाय भातशेती होती ती वेगळीच. तसे पायतूव व जानूबाय हे फारच मायाळू व प्रेमळ स्वभावाचे. अडल्या-नडल्यांना मदत करण्यास तयार असत. त्यामुळेच त्यांना गावात आणि समाजात पुष्कळ मान मिळत असे.

फरसूपायतूव व जानूबाय ह्यांना एकंदर पाच अपत्ये, पैकी तीन मुली व दोन मुलगे. पहिल्या दोन मुली, अपलन आणि फेलू ह्यांनी सातवीनंतर शिक्षिकी करण्यास सुरवात केली. त्या पाठचा मुलगा, जशीन हा शिकायला कच्चा होता. तो चौथीपर्यंत जाताजाता तीन-चार वेळा गडगडला. त्याला घरच्या कामात जास्त रस असल्यामुळे चौथीतून निघून फरसू पायतूव बरोबर वाडीतल्या कामात गुंतला. त्याच्या पाठची बहीण जेनी ही त्यावेळची मॅट्रिक होऊन तिनेही आपल्या बहीणींच्या सहाय्याने शिक्षिकी पेशा स्विकारला. तीच्या पाठचे पाचवे अपत्य म्हणजे मर्शा (मार्शल) हाही मॅट्रिकपर्यंत शिकला. त्याला त्याचा पदरीन आलेस ह्यांनी आपल्या बरोबर माझगांव डॉकमध्ये कामाला लावले.

एका पाठोपाठ फरसूपायतूव व जानूबाय ह्यांच्या मुलींना चांगले नोकरीवाले वर घराणे मिळून त्यांची लग्ने थाटामाटात पार पडली. राहता राहिले दोन्ही भाऊ. जशीन हा घरच्या कामाचा असल्यामुळे त्याला मुलीही तशाच चालुन येत. त्यातील एक म्हणजे जशीनच्या आतूच्या नंदणेची मुलगी मदुली (मदल्यान). तीही पाचवीतून निघून घरकामात तरबेज होती. चांगली सुस्वभावी अगदी जानूबायच्या मनासारखी प्रेमळ-मायाळू व कामसू होती. जशीन आणि मदुलीचेही लग्न अगदी थाटामाटात पार पडले. आता जानूबाय व फरसू पायतूव ह्यांनी वाडीच्या आणि बाजारहाटाच्या सर्व

जबाबदाऱ्या जशीन व मदूली ह्यांच्यावर सोपवून ते फक्त त्यांना योग्य सल्ला देणे, वेळप्रसंगी सर्व बाबतीत आपल्या अनुभवांतून मार्गदर्शन करणे व वेळ पडल्यास कामांत मदतही करीत. अशीच आनंदात व भरभराटीत वर्षे निघून गेली. तोपर्यंत फरसू पायतूव व जानूबायला तिन्ही मुलींकडून पाच तर घरात जशीन व मदुलीकडून दोन नातवंडांची देवकृपेने देणगी मिळाली. त्यांना आता वेळ कमी पडत होती. आता त्यांना ध्यास लागला होता मर्शाच्या लग्नाचा. त्यांनी मर्शापाठी लग्न करण्याचा तगादा लावला व मुलगी शोधण्याचे काम आपल्या तिन्ही मुलींवर सोपवले.

अपलन-फेलू आणि जेनी ह्या सकाळी एकाच वेळी गाडीचा प्रवास करून मुंबईत शाळेत जाताना त्यांच्या नजरेत एक सुशील व सुंदर मुलगी आली. तीही शिक्षिकाच होती. तीही वसईचीच होती. तिघींनीही तिच्याशी मैत्री केली. आणि सर्व बाजूने तिची सविस्तर माहिती काढून आपल्या आईबाबा व भाऊ मर्शा ह्यांना सांगून तीला मागणी घालण्यास प्रवृत केले. तसे त्या तिघींनी त्या मुलीला (रिटा) आपल्या लहान भावाविषयी, त्याच्या नोकरीविषयी सांगून तिचे मन राजी केले होते. तिनेही मर्शाविषयी हमी भरली. तिघी बहीणींनी मर्शा आणि रिटा ह्यांना समोरासमोर भेटविले. दोघांनी एकमेकांस पसंत केले आणि त्यांचे सर्वानुमते शुभमंगल पार पडले.

फरसू पायतूव आणि जानूबाय ह्यांना आता स्वर्ग ठेंगणा वाटू लागला. त्यांना दुसरी सुनही मनासारखी मिळाली होती. रिटाही घरात एकदम सुशीलपणे सर्वांना मान देऊन कामे करून आज्ञाधारक मुलीप्रमाणे वागत होती. ती आपल्या जेठानीला, मदूलीला बाय म्हणूनच बोलावून तिने सांगितलेली सर्व कामे करत असे व नंतर शाळेत जात असे. मदुलीही तिच्याशी मोठ्या बहिणीसारखी वागून तिचे सर्व खाण्यापिण्याचे लाड पुरवीत होती.

अशीच सर्व आनंदी-आनंदात दहा-पंधरा वर्षे निघून गेली. मर्शा आणि रिटा ह्यांना दोन मुलगे झाले होते. ते ही आता अकरा-बारा वर्षाचे झाले होते. तसेच जशीन आणि मदूली ह्यांची दोन मुले मिळून सर्व एकाच घरांत राहत असताना त्यांना आता आपले घर लहान वाटू लागले. त्यात शेतीचे अवजारे, आलेला बाजार ठेवणे त्यामुळे सर्वांनाच अडचण भासू लागली. तेव्हा मर्शाने आपल्या बाबास सर्व अडचणी समजावून सांगून बाजूला असलेला चार गुंठ्याचा तुकडा मागितला. जशीननेही आपल्या परीने मर्शाला साथ देत बाबांना राजी केले. मर्शाने आपल्यासाठी वेगळे घर बांधून त्यात तो, रिटा आणि त्यांची मुले राहू लागले. वेगळ्या घरात वेगळे राहूनही ती सर्व फॅमिली एक कुटुंब म्हणून मनाने एकच होती.

मर्शा आपला भाऊ जशीन व त्याच्या मुलांचे कमी-जास्त पाहून गरज भासल्यास पैशाचीही मदत करत असे. मर्शा व रिटा दिवसा कामावर जात. त्यांच्या दोन्ही मुलांचे दुपारचे जेवण, खाणे-पिणे हे सर्व त्यांची आंटी मदूली करत होती. मुलेही मदुलीला मोठी मम्मी म्हणून बोलावत होती. वडील भाऊ जशीनच्या दोन्ही मुलांना बारावीनंतर मर्शाने आपल्या कंपनीत म्हणजेच माझगाव डॉकला कामाला लावले. कारण मर्शा आता तिथे चांगल्या हुद्दयावर काम करत होता. जशीनच्या मुलांचीही लग्ने झाली आणि तोपर्यंत फरसू पायतूव व जानूबाय म्हातारपणामुळे थकून हालचाल करणे त्यांना जमेनासे झाले. कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती त्यांची आपापल्या परीने चांगली सेवा करत होती. एके दिवशी जानुबायची तब्बेत खालावली आणि तिने या जगाचा निरोप घेतला. त्या धक्क्याने फरसू-पायतूवही तीन-चार महीन्यातच देवाघरी निघून गेले.

मर्शा आणि रिटा ह्यांची दोन्ही मुलेही मोठी होऊन एक बँक मॅनेजर तर दूसरा एका कंपनीत परचेज मॅनेजर पदावर काम करू लागले. ते दोघे आता नोकरीतून निवृत झाले होते. त्यांनी मुलांची लग्ने करायचे ठरविले. त्यांनी अगोदर बांधलेले घर पाडून त्या ठिकाणी दोन्ही मुलांसाठी दोन मजली बंगला बांधायचे ठरविले व तात्पुरते राहण्यासाठी एका कोपऱ्यात किचन-बाथरूम व एक हॉलसारखी जागा पक्के बांधकाम करून पुढे मागे ते स्टोररूम सारखे वापरता येईल या उद्देशाने बांधून त्यात राहू लागले. आणि राहते घर पाडून नवा दोन मजली मोठा बंगला बांधून घेतला. खालच्या व वरच्या भागात सारखेच किचन-बाथरूम व तीन-तीन बेडरूम बाथरूम-सह असे तयार केले की एक मुलगा वर व दूसरा खाली राहील.

बंगल्याची वास्तुशांती करताना त्याच कार्यक्रमात मोठ्या मुलाचा साखरपुडाही करण्यात आला. मुलीकडील माणसेही सुसज्ज बंगला पाहून खूप खुश झाली. आलेल्या पाहुणेमंडळींनी घर पाहून मर्शा, रिटा व त्यांच्या मुलांची वाहवा केली. लवकरच मोठ्या मुलाचे लग्न झाले आणि पहिली सून घरी आली. मर्शा आणि रिटा खालच्या भागात एका रुममध्ये राहत होते. लहान मुलगा वरच्या भागात राहू लागला. दोन वर्षांनी त्याचेही लग्न झाले. सर्व एकत्रच खाली स्वयंपाक करून जेवत होते. दोन्ही सुना नोकरीवाल्या असल्यामुळे रिटावर कामाचा खूपच बोजा पडत असे. त्यात मोठ्या मुलाची मुलगी सांभाळणे होतेच. मर्शाही घराची साफसफाई करून थकत असे. आणखी तीन-चार वर्षे अशीच जात असताना दोन्ही सुनांमध्ये खटपट वाढली. दोन्ही सुनांची दोन-दोन मुले सांभाळून घरातील कामे करून रिटा व मर्शाच्या नाकी-नऊ येऊ लागले. त्यात सुनांचा रोजचा त्रागा वाढतच होता. शेवटी मर्शा व रिटाने

दोन्ही मुलांना एकत्र घेऊन त्यांचा वायल-सार करून घेतला. ते स्वत: मोठ्या मुलाजवळ खालीच राहिले. धाकट्या सुनेने आपल्या मुलांना सांभाळण्यासाठी स्वत:च्या आईवडिलांना आपल्या घरी आणले.

सहा-सात वर्षांनी मोठ्या मुलाची मुले स्वत:चे सर्व काही करू लागली. आता मोठ्या सूनेला सासू-सासऱ्यांची अडचण भासू लागली. काहीबाही निमित्त करून ती त्यांना घालून-पाडून बोलू लागली. आणि एकेदिवशी तिने त्यांना आता धाकट्याकडे रहा असे सांगूनच टाकले. धाकट्याकडे अगोदरच त्याचे सासू-सासरे राहत होते. मर्शा आणि रिटाने आपल्या मुलांस खूप समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा काही फायदा झाला नाही. मोठ्या मुलाने मागच्या तात्पुरत्या राहण्यासाठी बांधलेल्या पदवीचा दरवाजा उघडून मर्शा व रिटाचे सर्व सामान त्यात नेऊन टाकले. आणि त्यांना त्यात जाऊन राहायला सांगितले. रिटा भडकली. तिने दोघांची तासडपट्टी काढली. परंतु मर्शाने तिला शांत करून आपलेच शिक्के खोटे निघाल्याचे सांगून तिची समजूत घालून ते मोठ्या उद्विग्न मनाने ती पदवी राहण्यासाठी योग्य करण्यासाठी साफ-सुफ करू लागले.

ही गोष्ट जशी जशीनच्या कुटुंबाला कळली तसे ताबडतोब ते सर्व येऊन अंकल मर्शा व आंटी रिटा ह्यांना बाजूला बसवून ते सर्व साफ-सुफ करून जी व्यवस्था करावयाची ती करून दिली. जशीन व मदुलीने येऊन त्यांना धीर दिला. जशीन अंकल व त्याच्या मुलांनी आपल्या सासू-सासऱ्यांना मदत करताना पाहून दोन्ही सुनांचा जळफळाट झाला. त्यांनी आपल्या नवरोबांना जशीनकडे असलेल्या आपल्या जमिनीचा हिस्सा मागण्यास प्रवृत केले. दोघेही येऊन जशीन व त्याच्या मुलांबरोबर भांडून जमिनीचा हिस्सा घेतला. जशीन व त्याच्या मुलांनी काहीही त्रागा न करता त्यांचा हिस्सा त्यांना देऊन टाकला. आणि ते आपल्या अंकल व आंटीची काळजीही घेऊ लागले.

ज्यांनी घराच्या वास्तुशांती दिवशी मर्शा व रिटाच्या मुलांची वाहवा केली होती. तेच लोक आज त्यांच्या स्वार्थीपणावर शी थू करू लागले.

# पोलिस नावाचा माणूस...

■ ॲलेक्स अंब्रोज मच्याडो, 7208161213

सिग्नलचा पिवळा रंग बघून गोविंदाने गाडीचा स्पीड वाढवला. त्याच्या पुढच्या गाड्या भराभर सिग्नल क्रॉस करून गेल्या आणि नेमकी त्याची गाडी येता येता सिग्नल लाल झाला. कुठून कोण जाणे, हवालदाराच्या शिट्टीचा आवाज आला आणि पाठोपाठ आडवा हात. गोविंदाने मनातल्या मनात चरफडत गाडी थांबवली. गेली ना आता आणखी पाच मिनिटं... आधीच उशीर झालाय आणि त्यात आणखी हा घोळ. त्याने बाजूच्या सीटवर बसलेल्या अमोघकडे पाहिलं. तो सुद्धा वैतागला होता.

"आपण पोहोचू ना रे वेळेवर?" पाठीमागच्या सीटवरून सूनिताचा आवाज आला.

"हो गं, पोहोचू आपण वेळेवर. तीन मिनिटांचा तर आहे सिग्नल." गोविंदा बोलला.

"पप्पा, मधला रस्ता एकदम मोकळा आहे. एकपण वाहन नाही दिसत." अमोघ गोविंदाला म्हणाला.

अचानक गोविंदाच्या लक्षात आलं. अरे खरंच, मधला रस्ता अगदी रिकामा आहे. हा सरळ एअरपोर्टला जाणारा रस्ता. त्याच्या समोरच्या सिग्नलवर विरुद्ध दिशेला जाणाऱ्या गाड्यांची रांग लागली होती. त्याने बाहेर आजूबाजूला नजर टाकली. रस्त्याच्या दुतर्फा आणि सभोवताली बराच पोलीसफाटा दिसत होता. गोविंदा मनातल्या मनात चरकला. आज एवढा कसा पोलीस बंदोबस्त?

तीन मिनिटं करता करता दहा मिनिटं होऊन गेली गाडी थांबल्याला. गाड्यांची रांग वाढतच चालली होती. हॉर्नचे चित्रविचित्र आवाज चालले होते. बाजूच्या फुटपाथवर दोन बाजूंनी, दोन पोलिसांनी दोर पकडून अडवून ठेवलेली लोकांची गर्दी आता वैतागली होती. मध्येच कोणीतरी खोळंबलेला, रागाने पोलिसांशी हुज्जत घालत होता.

अमोघची आणि सूनिताची देखिल अस्वस्थता आता वाढत चालली होती. गोविंदाने गाडीच्या खिडकीची काच खाली घेतली. डोकं थोडंसं बाहेर काढत, बाजूलाच उभ्या असलेल्या कॉन्स्टेबलला हाक मारली.

"साहेब, आम्ही खोळंबलोय कधीपासून. सिग्नलला एवढा उशीर का होतोय आज?"

"मिनिस्टर जाणार आहेत आज इकडून. त्यामुळे बंदोबस्त आहे आज." कॉन्स्टेबल त्याच्याकडे पाहात म्हणाला.

हे सगळे व्हीआयपी लोकांना त्रासच देत असतात. आता ह्या गर्दीच्या वेळी, एवढं लोकांना खोळंबून ठेवायची काही गरज आहे का? कोणी काही अर्जंट कामासाठी निघालं असेल, कोणी कोणाला हॉस्पिटलमध्ये घेऊन चाललं असेल...

"पप्पा, आपल्याला उशीर तर होणार नाही ना?" अमोघच्या आवाजात काळजी आणि अस्वस्थता जाणवत होती.

"गोविंद, त्यांना जरा रिक्वेस्ट करून बघ ना. सोडतील आपल्याला कदाचित. समोरचा रस्ता मोकळा तर आहे." सुनिता खिडकीच्या काचेतून बाहेर त्या कॉन्स्टेबलकडे पाहात म्हणाली. सूनिताचं बोलणं जरी बालिश वाटलं तरी गोविंदाला त्यापाठच्या तिच्या भावना समजत होत्या...

अमोघ त्यांचा एकुलता एक मुलगा. अतिशय हुशार. यावर्षीचा युनिव्हर्सटीचा गोल्ड मेडलिस्ट. आज कुलगुरूंच्या हस्ते, युनिव्हर्सिटीच्या प्रशस्त प्रांगणात त्याचा सन्मान होणार होता. अमोघ, गोविंदा आणि सूनितासाठी ही खूप मोठ्या अभिमानाची आणि आनंदाची बाब. त्यांना सगळ्यांनाच खूप उत्सुकता लागली होती कार्यक्रमाची.

सकाळी अकरा वाजता कार्यक्रम सुरू होणार होता, पण अमोघला त्याच्या पालकांसोबत एक तास आधीच हजर राहायला सांगितलं होतं. अमोघने घड्याळात बघितलं. दहा वाजून गेले होते. तो खूप अस्वस्थ झाला.

"गोविंद, बघ ना त्यांना विचारून एकदा." पुन्हा एकदा सुनीताचा आवाज आला. तिला अमोघची अस्वस्थता बघवत नव्हती. गोविंदा मनातल्या मनात विचार करत होता, पोलिसांना काही विचारावं तर कधी वसकन अंगावर येतील याचा नेम नाही. चारचौघात उगाच अपमान. गोविंदाने मंद स्मित करत एकदा सूनिताकडे आणि अमोघकडे पाहिलं. त्याने उघड्या खिडकीतून पुन्हा जरा डोकं बाहेर काढलं. गाडीपासून काही अंतरावर एक इन्स्पेक्टर उभे होते. अमोघने गाडीचा दरवाजा उघडला आणि खाली उतरून तो चालत त्यांच्याजवळ गेला. राकट चेहरा, सावळा वर्ण आणि धिप्पाड देहयष्टी असलेल्या इन्स्पेक्टरांची भेदक नजर गोविंदावर पडली.

"साहेब." गोविंदाने सगळा धीर एकवटला होता.

"काय आहे?" त्यांच्या आवाजात एक जरब होती. बाहेर खूप ऊन होतं. घामामुळे त्यांचा खाकी युनिफॉर्म ठिकठिकाणी भिजला होता. कपाळावरून, चेहऱ्यावरून घामाच्या धारा निथळत होत्या.

"साहेब, आमची गाडी सोडा ना प्लीज. कधीपासून खोळंबलोय आम्ही. एका महत्वाच्या कार्यक्रमासाठी जायचंय साहेब.खरंच आम्हाला उशीर होतोय."

"एवढे सुशिक्षित असून कळत नाही का हो तुम्हाला?"

"अहो पण..."

"अहो, आम्हाला आमची ड्युटी करू द्या ना. सांगितलं ना एकदा की नाही सोडता येणार म्हणून."

"तुमचा स्वतःचा मुलगा असता तर तुम्ही असे राहिले असतात का थांबून?" गोविंदाच्या ओठावर आले होते शब्द, पण उच्चारण्याचं धाडस झालं नाही त्याला. त्याची नजर त्यांच्या छातीवरील बिल्ल्याकडे गेली. तो तसाच माघारी वळून गाडीत येऊन बसला.

"नाही ऐकत का हो?" सूनिताच्या प्रश्नावर त्याने फक्त मान वळवून तिच्याकडे बघितलं आणि पुन्हा एकटक समोरच्या रस्त्यावर बघत राहिला.

इतक्यात आजूबाजूला उभ्या असलेल्या पोलिसांची धावपळ सुरू झाली. शिट्ट्या वाजू लागल्या. लोकांना मागे सरकविण्यासाठी पोलिसांचे हातवारे सुरू झाले.दुरून, समोरच्या रस्त्यावरून गाड्यांचा मोठा ताफा वेगाने पुढे येताना दिसू लागला. लोकांमध्ये मोठमोठ्याने कुजबूज सुरू झाली. गर्दीतील लोकं आपल्या पायांच्या टाचा उंचावून बघण्याचा प्रयत्न करू लागले. क्षणार्धात गाड्यांचा तो ताफा, सुसाट वेगाने सिग्नल वरच्या गर्दीला पार करून निघून गेला. काही वेळ त्या गाड्यांचा आवाज त्यांच्या मागे घुमत राहिला.

सिग्नलला एव्हढा वेळ खोळंबून राहिलेल्या गाड्यांचे हॉर्न चित्रविचित्र आवाजात बाजू लागले. बाजूला अडकलेली लोकांची गर्दी सुद्धा पुढे सरकली.

गोविंदाने मनगटावरील घड्याळाकडे बघत गाडीचा वेग वाढवला. त्यांची गाडी कार्यक्रमस्थळी पोहोचली तोपर्यंत साडेदहा वाजून गेले होते. गोविंदाने गाडी पार्क केली आणि ते सगळे घाईघाईले प्रवेशद्वारातून आत शिरले. स्वयंसेवकांने छान हसत त्यांचं स्वागत केलं. त्यांना घेऊन तो एकदम पुढच्या रांगेकडे निघाला.अमोघ आजचा मानकरी होता. त्यामुळे त्यांची बसण्याची व्यवस्था एकदम पहिल्या रांगेत होती. पहिल्या रांगेत इतर मानकरी देखील आपल्या पालकांसोबत बसलेले होते. अमोघ थोडासा उत्तेजीत झाल्यासारखा वाटत होता. साहजिकच होतं म्हणा ते. इतक्या लोकांसमोर, कुलगुरूंच्या हस्ते सत्कार होणार होता त्याचा आज. त्याने केलेल्या मेहनतीची आणि कष्टाची जणू पोचपावती मिळणार होती त्याला. गोविंदाने आणि सुनिताने हळुच मान वळवून मागे पाहिले. सभागृह लोकांनी भरून गेलं होतं. त्यांचा ऊर अभिमानाने भरून आला. दोघांची कौतुकभरली नजर एकाच वेळी अमोघच्या चेहऱ्याकडे गेली.

व्यासपीठावरील साधीच पण मनमोहक सजावट लक्ष वेधून घेत घेत होती. कार्यकर्त्यांची लगबग सुरू होती..सौम्य आवाजात सभागृहात सनईचे सूर घुमत होते. वातावरण खूप प्रसन्न वाटत होतं. काही वेळातच निवेदन सुरू झालं. कुलगुरु आणि अन्य मान्यवर व्यासपीठावर येऊन बसले स्थानापन्न झाले. कार्यक्रमाला सुरुवात झाली.

प्रास्ताविक वगैरे आटोपलं आणि सत्काराच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. निवेदक एकेक नावाची घोषणा करत होते, त्या उमेदवाराची थोडक्यात माहिती देत होते आणि त्याप्रमाणे ते उमेदवार आपल्या पालकांसह स्टेजवर येत होते. टाळ्यांच्या गजरात कुलगुरूंकडून मानपत्र घेत होते. कुलगुरु दोन शब्द प्रत्येकाशी बोलत होते त्यांना शुभेच्छा देत होते. कॅमेराची क्लिकक्लिक होत फ्लॅशेस उडत होते. सत्कारमूर्ती आणि त्याचे पालक

ह्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहताना जाणवत होता. अमोघ आता अधिकच उत्तेजीत झाला होता.

त्यांच्या शेजारच्या खुर्चीवर एक उमेदवार बसला होता. त्याच्याबरोबर फक्त त्याची आई होती. वडील दिसत नव्हते.

"ह्या मुलाचे वडील कसे काय आले नाहीत बरं? " अगदी हळू आवाजात सुनीता गोविंदाच्या कानात पुटपटली.

"काय माहित. कदाचित मोठे बिझिनेसमॅन असतील. बिझी असतील.वेळ नसेल मिळाला." गोविंदाची मिश्किल टिप्पणी.

"कसला मेला बिझिनेस तो. आपल्या मुलांचं कौतुक पण करायला वेळ नाही म्हणे." थोडं थांबून ती पुन्हा पुटपुटली,

"मला वाटतं कदाचित ते..."

सुनीताचं वाक्य पूर्ण होतंय एव्हढ्यात स्टेजवरून निवेदकाने पुढचं नांव उच्चारलं...

"केतन जयवंत गायकवाड" त्यांच्या बाजूच्या खुर्चीवर बसलेला तो तरुण आणि त्याची आई उठून उभी राहीली आणि स्टेजच्या दिशेने चालू लागले. अभिमानाने.त्या तरुणाच्या चालण्यामध्ये एक निराळाच आत्मविश्वास आणि रुबाब दिसत होता. त्याच्याकडे पाहताना गोविंदाला काहीतरी ओळखीचं असल्यागत वाटत होतं.

निवेदक त्या उमेदवाराविषयी माहिती देत होते. त्यांनी पुन्हा एकदा त्याचं नांव उच्चारलं,

"केतन जयवंत गायकवाड."

...आणि गोविंदाच्या डोळ्यासमोर तो सिग्नलवरचा प्रसंग उभा राहिला. मिनिस्टर जाणार म्हणून रणरणत्या उन्हात बंदोबस्तासाठी उभे असलेले ते पोलिस इन्स्पेकटर. अंगावरील युनिफॉर्म घामाने भिजलेला.  कपाळावर घामाच्या धारा. त्यांच्या छातीवरील तो बिल्ला गोविंदाला ठळकपणे दिसू लागला...

"जयवंत लक्ष्मण गायकवाड."

स्टेजवर 'केतन जयवंत गायकवाड' कुलगुरूंकडून मानपत्र स्वीकारत होता. त्याची आई कौतुकभरल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहात होती.

नकळतपणे गोविंदा बसल्या जागेवरून उठून उभा राहिला होता. केतनकडे पाहात त्याचे हात टाळ्या वाजवू लागले होते...

कर्तव्यतत्परतेमुळे आपल्या मुलाचा कौतुक सोहळा पाहू न शकणाऱ्या जयवंत लक्ष्मण गायकवाड ह्या पोलिस नावाच्या माणसाला जणू त्याची ती मानवंदना होती...

# डोंबारी

■ फ्रँक डॉ. मिरांडा, उमराळे

संध्याकाळची वेळ, दिवस मावळतीला झुकला होता. हातात सायकली आणि त्यावर बरेच सामान घेऊन त्या तिघांचा मुख्य रस्त्यावर प्रवेश झाला. मळकटलेले कपडे, वाढलेले-विस्कटलेले केस, नागड्या पायाने ते गावाच्या वेशीवर पोहचले. त्यांना तेथे पाहताच गावातील लोकांनी चोर म्हणून ओरडण्यास सुरुवात केली. त्यांनी लोकांपुढे हात जोडले, त्यांचे पाय पकडले आणि तेथे काही दिवस राहण्याची भिक मागितली; पण उपकार तर सोडाच, त्यांच्यावर भ्याड हल्ला केला गेला. त्या तिघांच्या नाका-तोंडातून रक्तस्त्राव होईस्तोवर त्यांना मारहाण करण्यात आली.

शेवटी गावातील पाटलांनी हस्तक्षेप करून त्यांना त्या संकटातून वाचवले. पाटलाने त्यांना आपल्या घराशेजारी तंबू ठोकण्यात परवानगी दिली आणि पिण्यासाठी पाणी दिले. बरीच पायपीट झाल्याने त्यांना फार तहान लागली असावी, त्यांनी गटा-गटा पाणी प्यायले आणि पाटलाचे आभार मानले. पाटलाने त्यांना आंघोळ करण्याची जागा दाखवली आणि आत गेले.

त्या सर्वांनी झटपट आंघोळी उरकून घेतल्या आणि डोंबाऱ्याची मुलगी पाटलाच्या घरी जाऊन जेवण घेऊन आली. त्यांनी जेवण उरकले आणि रिकामी भांडी परत देण्यासाठी डोंबाऱ्याच्या पत्नीने मुलीला पुन्हा पाटलाकडे जाण्यास सांगितले, पण मुलीने स्पष्ट नकार दिला. मग डोंबाऱ्याची पत्नी स्वतःच तेथे गेली. बराच वेळ झाला तरी ती काही परत येत नव्हती म्हणून डोंबारी थोडा अस्वस्थ झाला. तो तंबूमधून बाहेर पडणार तोच त्याची पत्नी तेथे आली. डोंबाऱ्याने तिला बरेच प्रश्न विचारले, पण ती काहीच उत्तरली नाही आणि जाऊन आपल्या मुलीला कुशीत घेऊन झोपली. तिची मुलगी पाटलाकडे पुन्हा जाण्यास का तयार नव्हती ह्याचे कारण तिने अनुभवले.

पाटलाने तिला आणि तिच्या मुलीला आंघोळ करताना पाहिले होते आणि त्याच्या डोळ्यावर चढलेली शरिरसुखाची नशा त्याला शांत राहून देत नव्हती. त्याने डोंबाऱ्याच्या मुलीशी गैरवर्तन केले होते म्हणून ती पुन्हा तेथे जाण्यास तयार नव्हती,

पण त्याची पत्नी मात्र ह्यातून वाचू शकली नाही. पाटलाने गरजवंत एकट्या स्त्रीला आपली शिकार बनवले आणि तिच्या शरीराचे लचके तोडले. ती फार बिथरली होती, तिच्या तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता. सदर प्रसंग ती आपल्या पतीला सांगू इच्छित होती, पण तिला भीती होती की पाटील तिच्या कुटुंबाला नष्ट करेल, तिच्या मुलीशी काही चुकीचे करेल; म्हणून तिने कल्लोळ न करता शांत राहणे पसंत केले.

तिचे डोळे जराही बंद होत नव्हते, तिचे मन अजूनही स्थिर नव्हते, पाटील पुन्हा येथे येईल आणि ह्यावेळी माझ्या मुलीला शिकार बनवेल ह्या भीतीने सबंध रात्र ती जागत होती. सकाळ झाली, पण रात्री घडलेली घटना तिला बेचैन करत होती, तिच्या मनात धडकी भरली होती. तिने तात्काळ आपल्या पतीला येथून परत जाण्याचे विनवले, पण त्याने नकार दिला. पतीला सत्यता माहित नव्हती. राहण्यासाठी जागा आणि काल रात्री मोफत जेवण दिलेला पाटील चांगला माणूस आहे ह्या आभासी दुनियेत तो होता, पण ह्या उपकारांचा मोबदला त्याने कसा चुकता केला आहे ते त्याला माहीत नव्हते, पण त्याची पत्नी त्याचे काहीही ऐकणार नव्हती.

शेवटी तिची मागणी म्हणून त्यांनी हे गाव सोडून जाण्याचा निर्णय घेतला. आता अडचण अशी होती की त्यांच्या खिशात एक कवडीही नव्हती, त्यामुळे त्यांनी गावात एक प्रयोग करण्याचा निर्णय घेतला आणि जमलेल्या पैशांतून पुढे मार्गक्रमण करण्याचे पक्के केले. काही वेळेत ते गावच्या मध्यभागी जमले आणि खेळ चालू झाला. नेहमीप्रमाणे डोंबारी गाणे बोलत, ढोलकी वाजवत दोरीवरून चालणाऱ्या त्याच्या पत्नीला प्रोत्साहन देत होता, तर त्याची चिमुरडी हातात करवंटी घेऊन सर्वांकडून पैसे मागत होती. दोरीवरून चालताना तिची नजर तिच्या दिशेने येणाऱ्या गावातल्या पाटलावर पडली आणि मन विचलित होवून ती घाबरून खाली कोसळली.

एका क्षणात सर्वत्र शांतता पसरली. डोंबाऱ्याने भीतीपोटी आरोळी ठोकली आणि तिच्या दिशेने धावला. पण ती निपचित पडली होती, तिच्या डोक्याच्या मागील भागातून अखंड रक्तस्त्राव होत होता. त्याने तात्काळ मदतीची मागणी केली, सर्वजण हा प्रकार पाहत होते, पण मदतीसाठी कोणीही पुढे सरसावले नाही. बराच वेळ त्याने पत्नीला वाचवण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ! तिने ह्या जगाचा निरोप घेतला आणि त्या मातीत ती कधीही न उठण्यासाठी झोपली.

त्याने आजूबाजूला पाहिले, पण त्याची मुलगी त्याच्या नजरेस पडली नाही; तो जागेवर उभा राहिला आणि सर्वत्र तिला शोधू लागला, गावभर "लक्ष्मी-लक्ष्मी" ओरडत धावू लागला, पण त्याला कोठूनही तिचा प्रतिसाद आला नाही. बेभान होवून

तो गावालगत असलेल्या जंगलात धावू लागला आणि त्याचा वेग मंदावला; तो शांत झाला. त्याला त्याच्या मुलीचे कपडे इथस्तत: पडलेले दिसले. तो अजून पुढे गेला आणि देवालाही गहिवरून येईल इतका त्याने आक्रोश केला.

त्याची नुकताच वयात आलेली चिमुरडी, त्या नरकात निर्वस्त्र पडली होती, तिचे तोंड पूर्णपणे ओरबडले होते, शरीरावर जखमा होत्या आणि तिच्या गुप्तांगातून रक्ताची धार लागली होती. त्याने लगेच आपले कपडे काढले आणि तिला त्यात लपेटले. शरीरातील सर्व शक्ती एकवटून तो तिला घेऊन गावाच्या मध्यभागी आला. गावातील कोणी त्याला मदत तर केलीच नाही, पण कोणाला त्यांची दयाही आली नाही. त्या गरीब डोंबाऱ्याचा ज्या खेळावर उदरनिर्वाह चालला होता, ते सर्व साहित्य आणि त्यांच्या सायकली गावकऱ्यांनी पसार केल्या.

त्याने मुलीच्या तोंडावर पाहिले, तिने डोळे अर्धे उघडले आणि एक दीर्घ श्वास घेऊन प्राण सोडला. कोवळ्या मुलीचा जीव स्वतःच्या हातात जाताना पाहून त्या बापाचे हृदय चिरफाटले, ते दुःख त्याला असह्य झाले, त्याने बाजूला पडलेले ब्लेड उचलले आणि हाताची नस कापून घेतली; क्षणात तो खाली कोसळला. त्याचा प्राण जात होता, त्याने मोठ्या कष्टाने डोळे उघडले, डोक्यावर उगवलेला सूर्य त्याने पाहिला आणि डोळे कायमसाठी मिटले. सर्वांसाठी सूर्य नुकताच उगवला होता, पण त्या डोंबारी कुटुंबाचा सूर्य भर दिवसा मावळला होता, पुन्हा कधीही न उगवण्यासाठी...

# सोलो ट्रिप

■ डॉ. रिबेका दोडती, निर्मळ

जीवनाचं अनमोल दान सगळ्यांनाच मिळतं पण त्यातनं जगणं शोधणं फार थोडयांना जमतं. आयुष्यात स्वतःच्या हक्कांचे असे काही ‘उनाड क्षण’ असावेतच. जिथं कुणाची भीडमूर्वत नसावी, जबाबदाऱ्यांचं लटांबर नसावं, अपेक्षांची ओझी नसावीत. व्याप नसावेत, कटकटी नसाव्यात, त्रागा नसावा. कुणी किरकिर करणारं नसावं. कुणी उगाच पॅम्पर करणारंही नसावं. फक्त आपण असावं. आपणच आपलं असावं.

मोकळ्या आभाळाखाली, खळखळत रित्या होणाऱ्या धबधब्याखाली, उन्हं नाचवणाऱ्या जंगलात, लुसलुशीत आच्छादन ल्ह्यायलेल्या माळरानावर, संथ गतीनं सागरात विलीन होणाऱ्या नदीपाशी आपणच आपल्या संगतीला असावं. तिथं आपल्या श्वासाचं गीत असावं, आपल्या पावलांनी लय दिलेली असावी आणि आपल्याच तालात रमत गमत भटकत आपणच आपला 'सखा' व्हावं...

मे महिन्यात आमच्या शेजारची झिप्री हातात एक पुडकं नाचवत आली..

"काकू, मी ना 'बाकू'ला जाऊन आले. तिथनं थोडे नट्स आणि चॉकलेट्स आणलेत."

"सगळे गेला होतात का? की तू आणि तन्मय?"

"छे छे! इट वॉझ अ सोलो ट्रिप!"

बाई गं. ही आणि सोलो ट्रिप? सोसायटीतल्या तरूण पोरी हिला 'पापा की परी' म्हणतात. हिच्या स्कूटीचे ब्रेक कमी आणि चपलांचे सोल जास्त झिजतात. पाली झुरळं दिसली की ही कसली मोठ्यांदा ओरडते! शॉपिंग ही करते आणि तन्मय मागून बॅगा उचलत चालत असतो. लिफ्ट बंद पडली की चार जिने चढता चढता दमछाक होते हिची! साध्या तापाला चार-आठ दिवसांच्या सिक लीववर असते ही! गुगल मॅप नसतं ना तर मंडईतनं घरी येता येता चारदा हरवली असती ही बया !

ही आणि सोलो ट्रिप? काय हिंमत केलीए! आजकाल म्हणे बायकांना जेव्हा फक्त सासूचं काहीतरी खटकतं तेव्हा त्या मैत्रिणीला फोन करतात. मॅटर थोडं कॉम्प्लिकेटेड असेल तर त्या माहेरी आईशी जाऊन बोलतात. सासू, नवरा आणि नणंद तिघांची फिर्याद असेल तर 'किटी पार्टी'...

आणि जेव्हा अख्ख्या सासरच्या खानदानाच्या नावाने शंख करायचा असेल तर लेडिज सोलो ट्रिपला पर्याय नाही. तसलाच काहीतरी प्रकार असावा.

"कमालच ए बाई तुझी? कसं काय जमलं तुला ?, ह्या सोलो ट्रिपा म्हणजे जरा कठीणच प्रकरण असतं, नाही?

"काय काकू, काही कठीणबिठीण नसतं हा! मनानं ठरवलं ना की सगळं शक्य होतं बघा. आजकाल हाच ट्रेंड आहे. फेमिनिझम यू सी! थोडं सेफ्टी फॅक्टर असतं पण आजकाल इंटरनेटमुळे खूप सोप्पं झालंय सगळं !"

"भारी ग! माझी पण फार वर्षांपूर्वीची इच्छाए! मला हौसही आहे फिरायची ! मीही एकदा करावी म्हणते सोलो ट्रिप!"

"तुम्ही आणि सोलो ट्रिप ? या वयात? जरा सांभाळून बरं का!"

"अगं म्हणतात ना 'इच्छा तेथे मार्ग'. प्रयत्न करायला काय हरकत आहे ? तुझी मदत लागली की सांगते."

तिथनं डोक्यात 'सोलो ट्रिप'चा भूंगा गुणगुणायला सुरवात... सोलो ट्रिपचा विचार डोक्यातनं जाईनाच. आजवर नवऱ्याचं, मुलांचं, नातवाचं, घरचं, पाहुण्यारावळ्यांचं करता करता आपली अगदी 'टिपऱ्यांची शामल' झालीए. आपण आपल्या एकट्यानं कुठे जाऊ हा आत्मविश्वासच संपून गेलाय. किती किती स्वप्न तशीच कपाटांत जून्या पैठणीसारखी दडून राहिलीएत. कोविडनंतर ज्येष्ठ म्हणून घरात अडकून पडणंच जास्त पसंतीचं झालंय. कॉलेजातल्या कॅम्पला आपण एकटे एकटे जायचो तेव्हा काय धम्माल यायची. परत तशीच धम्माल अनुभवायचीच.

संन्याशाच्या लग्नाला जशी शेंडीपासून तयारी तसं 'म्हातारीच्या सोलो ट्रिपला परवानगीपासून तयारी!' त्या संध्याकाळी जेवता जेवता मी फतवा काढला 'मी सोलो ट्रिपला जायचं ठरवलं आहे!" मुलगा जोराजोरात हसू लागला, आमचे' हे 'भूवया' कपाळात नेऊन पाहू लागले. आईची ही खूळं नेहमीचीच आहेत असं समजून मुलगा आणि हे उद्गारले "जा, जा, बिनधास्त जा!" पण सून मात्र विश्वासानं म्हणाली "आई, तुम्ही जाच. जमेलच तुम्हाला... मी सगळी मदत करते. माझी मैत्रीण गेली होती मागे. खूप छान वाटलं तिला .मुलं मोठ्ठी झाली की मी पण जाणारेय."

निदान एकतरी हिरवा कंदिल मिळाल्यानं मी हौसेनं तयारीला लागले. यावेळी जवळ नको, मस्त लांब कुठंतरी जाऊ! झिप्रीचं बाकू बिकू नको, डॉमॅस्टिक ट्रिप तरी करू! ट्रॅव्हल एजन्सीत काम करणाऱ्या माझ्या भाच्याला फोन करून सोलो ट्रिप कशी करायची, यासाठी कुठली ठिकाणं विचारात घेता येतील, जेवणा-राहण्याची सोय काय होईल, अडीप्रसंगाला कसं स्वतःला सांभाळायचं, काय काय सामान सोबत न्यायला लागतं, तिथं कोणती ठिकाणं पाहायची वैगेरे सगळी माहिती काढून द्यायला सांगितली.

दोन दिवसांनी त्यांचा फोन आला, "मनाली, हंपी, गोवा किंवा पुद्दुचेरी." यातलं मनाली आणि गोव्याला सहकुटुंब ट्रिपा झालेल्या होत्या. इतिहास नको त्यामुळे हंप्पी रद्द झालं. शेवटी पुद्दुचेरीच मला काहीतरी गमतीचं वाटलं. जायचंच असं ठरलं. मीना प्रभूंच्या प्रवासवर्णनांनी अनेकदा माझ्यावर मोहिनी घातली होती. एकटं फिरणं, जग पाहणं, वेगवेगळ्या संस्कृती अनुभवणं, त्यातनं शिकणं, स्वत:ला शोधत जाणं, आत्मसबळ होणं, नवीन मैत्र जमवणं, आयुष्याला पुरेल अशी शिदोरी गाठीशी बांधून घेणं यासाठी एकदा हा अनुभव घ्यायला हवाच.

पण जशीजशी जमवाजमव सुरू झाली तसतसं लक्षात येऊ लागलं. हे सारं वाटतं, भासतं तितकं सोप्पं नव्हतंच. उमेदीच्या वयात सहज होत असावं. आता वयानुसार शरीराचं पोतेरं झालेलं, मांड्यांच्या मजबूतीची वॅलिडीटी संपलेली, इतका प्रवास करायच्या भीतीनंच मणका माघार घ्यायच्या तयारीत, डोळ्यांच्या शिंपल्यात 'मोती' म्हणून फ्यूचरचं आणि पूढचं जरा धूसरच, सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे कानांच्या तारा जरा नाजूक झालेल्या. इतके दिवस बाहेरचं खाणं पिणं म्हणजे पचनसंस्थेचे हाल व्हायचे आणि त्यांनी ऐनवेळी संप पुकारला तर चालत सोलो ट्रिपला जायचे आणि झोपवून घेऊन यायचे अशी वेळ.

त्याचं असं झालंय ना की 'ये दिल मांगे मोर. पण देह कमजोर!' मग मी दोन दिवस जरा झिप्रीच्या संमोहनातनं बाहेर पडत वास्तवाच्या चौकटीतनं विचार केला. दिसत नसलेल्या निशाण्यावर तीर मारायचे आपले दिवस नव्हेत. आपली ही असली सोलो ट्रिप डायरेक्ट फायनल टिकीट देऊन जायची... सूनबाईला जवळ बोलावून सांगितलं. "बायकांचं कसं असतं ना, सगळ्यांसाठी जगता जगता आपण जगायचं विसरून जातो. मुलं मोठी झाली की हौसमौज करू असं करता करता पाखरं घरट्यातून उडून जातात त्याबरोबरच आपली उमेदीची वर्षेही कापरासारखी उडून जातात. त्राण पाऱ्यासारखं गात्रातनं निसटत राहतं.

भविष्यांत बंगले बांधताना वर्तमानाचा पोखरत जाणारा पाया दिसत नसतो. जगाचं खुणावतं क्षितीज मृगजळासारखं सतत पाठलाग करत राहतं म्हणून जे जगायचं ते आताच. याच क्षणात... जेव्हा मन सांगेल तेव्हा. शरीर ठणठणीत आहे तेव्हाच. तू जाशील तेव्हा मुलांची काळजी मी घेईन. मूलं मोठ्ठी होता होता तुझी पण माझ्यासारखी शामल व्हायला नको. माझ्याऐवजी तू जायचंस सोलो ट्रिपला. फिरून ये. स्वत:ला शोध. तू नवी क्षितीजं शोध. मी तूझ्या डोळ्यातनंच क्षितीजं नव्याने समजून घेईन."

आमची सुनबाई गेली 'पुद्दुचेरी'ला. धम्माल करून आली. आल्या आल्या घट्ट मिठी मारून गोड पापा घेऊन 'खूप खूप थॅन्क्स' म्हणाली. सोलो ट्रिप करण्याइतकाच कुणाला तरी योग्य वयात सोलो ट्रिपला पाठवण्यातही आनंद असतो, नाही?

पण चांगलं पेरलेलं उगवतंच की... जून महिन्याच्या अखेरीस मुलगा आणि सून मला हट्टानं सोडून गेले जवळच्या एका कृषी पर्यटन केद्रांत. माझ्या हक्काच्या आणि झेपेल अश्या सोलो ट्रिपला. पावसाच्या सरीत मनसोक्त भिजले, मृद्गंधाचं अत्तर हुंगत निवांत बसले, आवण चाललेल्या चिखलात खेळले, हुश हाश करत इवलुशी टेकडी सर करून आले, तळ्याकाठी सूर्यास्ताची रक्तवर्णी उधळण न्याहाळत बसले, वासरांच्या गळ्यातल्या किणकिणत्या घुंगरमाळांचा हात धरून बालपणाची सैर करून आले, गवताच्या चिमुरड्या पात्यांचा पायांना थंडगार सुखद स्पर्श अनुभवत आवडत्या लेखकांसोबत पुस्तकांतल्या गावीही भ्रमंती करून आले.

अखंड संगीतमग्न रातकिडे, मंद तेवणाऱ्या काजव्यांसोबत शांत, निवांत रात्रीत जगण्याचं गुज कानी सांगून गेले. निसर्गाच्या कुशीत लेक माहेराला जावी तसं जाऊन चार दिवस मायेने वाढलेलं चांगलं चुंगलं खाऊन मन आणि पोटानं तृप्तीचे ढेकर दिले. चार दिवसानंतर स्वत:च्याच 'कंपनी'तनं बाहेर पडताना पाय जडावले.

घरी परतल्यावर मुलाला अन् सुनेला सांगितलं. "चार पाच वर्षांनी जवान झाल्यासारखं वाटतंय. पुढच्याला मलाही पुद्दुचेरीची सोलो ट्रिप झेपेल असं वाटतंय."

मला वाटतं जिथं स्वतःला स्वतःचा 'सोल' भेटतो ना ती सोलो ट्रिप. जगण्याची गणितं सुटत जातात, सांडलेले हिशेब पुनश्च मांडता येतात, अंतरंग हितगुज करू लागतं, शोध लागतो आतवर खोल दडलेल्या स्वतःचा, जखमा भरतात, भार रिते होतात... विंझणवारा घातल्यागत हळूवार सुखावत जातं अंतर्मन, तिथं उंच बर्फाच्छादित पर्वत नसले तरी चालतं, खळाळता समुद्र नसला तरी चालतो. घनदाट अरण्य नसलं तरी चालतं. उंची चकचकीत पंचतारांकित हॉटेलस्, मॉल्सचा कृत्रिम झगमगाट, चमचमीत खाद्यपदार्थांची रेलचेल, सेल्फीमग्न सख्यांना सोबत घेऊनच सोलो ट्रिप होते असं नाही. सोलो ट्रिप साध्या पद्धतीनेही जमते की!

फक्त अलिप्त व्हायचं. जगापासणं, त्याच्या रहाटगाड्यातनं, त्याच्या भूलथापांमधनं सेपरेट व्हायचं, चार दिवस स्वतःला जाणूनबुजून 'क्वारेंनटाईन' करून घ्यायचं, आत आत एकटं राहात असलेल्या 'सोलमेट' भेटायला जायचं, इतकी वर्षे धूळ खात बसलेलं असतं आयुष्याचं पुस्तक. धूळ झटकून उघडायचं. एक एक पान निवांत चाळत राहायचं. आठवणींना हळूवार उगळत गंधाळत राहायचं. सोलमेटशी मनसोक्त गप्पा मारत राहायचं. हलकं हलकं व्हायचं.

म्हणून मला वाटतं प्रत्येकानं जमेल झेपेल रूचेल पचेल तसं जावं, इतरांनाही जाऊ द्यावं. हरसाल हक्काच्या आणि एकट्याच्या ट्रिपला.

सोलो ट्रिपला...

# एक अनोखी भेट

■ सुनिता बर्नड परेरा, गास

वैशाखाची काहिली संपून निसर्ग राजाने शीतल अश्या ज्येष्ठ महिन्यात आगमन केले होते. नैऋत्य मोसमी वारे सह्याद्रीच्या कडेने घोंगावत होते. मधूनच जलाधारांचा अभिषेक होत होता. वातावरणात काहीसा गारठा साठून राहिला होता. नुकताच बारावीचा निकाल लागला होता. मुग्धा दीक्षित संपूर्ण राज्यातून विज्ञान शाखेत ९५% गुण मिळवून प्रथम आली होती. तिने पुढे कॉम्प्युटर सायन्स या क्षेत्रात करियर करण्याचे ठरवले होते. पुण्यातील एका उच्च अभियांत्रिकी महाविद्यालयात तिला प्रवेश मिळाला होता. आज तिचा कॉलेजमधील पहिला दिवस होता. वर्षा ऋतूचे आगमन झाल्यामुळे सर्वत्र शीतल आणि मंत्रमुग्ध वातावरण होते. पुण्यातील रस्ते न्हाऊन निघाले होते. पर्वत राजीने अंगाखांद्यावर हिरवाई परिधान केली होती. मेघ राजे जणू वसुंधरेला भेटण्यासाठी आतुर झाले होते. अश्या ह्या धुंद वातावरणात मुग्धा छान तयार होऊन कॉलेजला पोहचली.

नवीनच असल्यामुळे कोणाशीच तिची ओळख नव्हती. ती वर्गात जाऊन बसली, काही वेळातच वर्गात सर्व विद्यार्थी हजर झाले. प्रोफेसर वर्गात आले, ओळख परेड झाली आणि प्रत्यक्ष अध्यापनास प्रारंभ झाला. तिच्या बाजूला नेहा मूर्ती बसली होती. नेहाची आणि तिची ओळख झाली आणि मैत्रीचे ऋणानुबंध जुळले. त्या दिवसापासून नेहा आणि मुग्धा अगदी जीवाभावाच्या मैत्रिणी झाल्या. दोघीही अभ्यासात खूप हुशार, स्मार्ट आणि ॲक्टिव होत्या, अर्थातच हॉस्टेलमध्ये पण एकत्र रूममेट म्हणून त्या राहू लागल्या.

मुग्धा खरं तर कोकणस्थ ब्राह्मण, रत्नागिरी जिल्ह्यात तिचे गाव होते. तिचे वडील उच्चशिक्षित होते. ते सरकारी कार्यालयात उच्चपदावर कार्यरत होते. तर आई गृहिणी होती. गावात दीक्षित परिवाराला आदर होता. मुग्धाचे आजोबा, पणजोबा, वडील संपूर्ण खानदान भिडस्त ब्राह्मण होते. पंचक्रोशीत त्यांना पूजेचा मान होता. अर्थातच जाती धर्माच्या बंधनात हे कुटुंब अडकले होते. मुग्धाला देखील ह्याच संस्कारात त्यांनी वाढवले होते. अजूनही ह्या कुटुंबावर जातीचा पगडा होता. बाहेरून आल्यावर आंघोळ करणे, सोवळेओवळे मानणे, खालच्या जातीच्या लोकांना जवळ न करणे, ह्या गोष्टी

अजूनही ते मानत होते. अशा ह्या कर्मठ परिवारातील मुग्धा दीक्षित पुण्यातील कॉलेजमध्ये रमली होती.

गोरीपान, देखणी, निळसर डोळे, लांबसडक केस, गालावर पडणाऱ्या टपोऱ्या खळ्या, पातळ ओठ, हसमुख चेहरा आणि सर्वगुणसंपन्न अशी मुग्धा वर्गात सर्वांची आवडती होती. मुग्धाला लहानपणापासून गाण्याचे भयंकर वेड होते. सिनेमातील रोमँटिक गाण्यापासून ते भावगीत, लोकगीत ह्यात ती अगदी माहीर होती. स्वरबद्ध गळ्याची देणगी लाभल्यामुळे तिच्या सानिध्यात तिचे सर्व वर्गमित्र अगदी हरपून जात असत. त्या दिवशी कॉलेजमध्ये गीतगायन स्पर्धा होती. तिने त्या स्पर्धेत भाग घेतला होता. त्या दिवशी तिने सुंदर गुलाबी रंगाचा ड्रेस परिधान केला होता. केसांची लांबसडक वेणी घालून त्यावर सुगंधी मोगऱ्याचा गजरा माळला होता. हलकासा मेकअप केला होता, त्यामुळे तिचे रूप अधिकच उठून दिसत होते. तिने ‘सूर तेच छेडिता...’ हे रोमँटिक गाणे गायले आणि तिच्या त्या मधुर आवाजाने परीक्षक व प्रेक्षक सर्वच मंत्र मुग्ध झाले. अर्थातच प्रथम क्रमांक तिनेच पटकावला. पण तिच्या त्या रुपावर आणि गाण्यावर एक जण मात्र अक्षरशः पागल झाला होता... विजय कांबळे... तो त्याच कॉलेजमध्ये इंजिनिअरींगच्या शेवटच्या वर्षाला होता. अतिशय हुशार, देखणा, काहीसा सावळा रंग, उंच आणि पिळदार शरीरयष्टी लाभलेला विजय अतिशय हुशार आणि सर्वात मिळूनमिसळून राहणारा होता. मुग्धाचे गाणे ऐकून तो तिच्या प्रेमात पडला होता.

गायन स्पर्धा संपून एक आठवडा लोटला होता. मुग्धा लायब्ररीमधून हॉस्टेलकडे जात होती, इतक्यात विजय समोरून आला. मुग्धाची ओढणी अडकली, तिचा तोल गेला, त्याच क्षणी विजयने तिला आपल्या बाहुपाशात सावरले, नजरानजर झाली आणि ‘दो दिल मिल गये’!!! तिच्या निळसर डोळ्यात विजय कायमचा जायबंदी झाला तर त्याच्या राकट स्पर्शाने तीही घायाळ झाली. झाले... प्रेमाचे बीज रोवले गेले, त्या बीजाला हळूहळू अंकुर फुटू लागले. नजरेचा खेळ सुरू झाला, मग शब्दाची झालर लागली, प्रेमपत्र सुरू झाले आणि शब्दातून भावना व्यक्त होऊ लागल्या. भेटीची एक अनामिक हुरहुर, आस लागली. दोघेही एकांतात भेटू लागले. कधी बागेत, कधी पर्वतीवर, कधी सदाशिव पेठेत तर कधी तुळशीबागेत. त्यांचे प्रेम फुलू लागले.

विजय मूळचा नगरचा! तो देखील खूप हुशार होता, बारावीला पहिला क्रमांक मिळवून त्यानेसुद्धा कॉम्प्युटर क्षेत्रात करियर करण्याचे ठरवले होते. दोघांचेही सूर जुळले होते. एकमेकांना भेटल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. त्यांच्या प्रेमाची एकमेव साक्षीदार होती ती म्हणजे नेहा... मुग्धाची जीवाभावाची मैत्रीण ! नेहा त्या दोघांनाही भेटण्यासाठी मध्यस्थ म्हणून काम करत असे. भेटीची जागा, वेळ ह्याची माहिती देत

असे. जणू ती दोघांची पोस्टमन होती. मुग्धा आणि विजय ह्यांचे प्रेम फुलत होते. दोघांनाही जगाचे भान नव्हते. ते प्रेमात आकंठ बुडालेले होते.

प्रेमाचा सुगंध दूरवर पसरला होता. कॉलेजमध्ये सर्वांना त्यांच्या प्रेमाची कुणकुण लागली होती. कॉलेजने इंडस्ट्रिअल विजिट आयोजित केली होती. शिमला येथे दहा दिवसाची कॅम्प होती. मुग्धा आणि विजय त्यांचा ग्रुप शिमला येथे कॅम्प साठी आले होते. डिसेंबर महिन्याची बोचरी थंडी, शिमल्याच्या डोंगर माथ्यावर बर्फाचे आवरण आणि गार वाऱ्यासोबत प्रेमाची गुजगोष्टी करणाऱ्या पक्ष्याची किलबिलाट.. ह्या मंदधुंद वातावरणात त्यांची प्रेमाची कळी फुलत होती. विजयचा राकट स्पर्धा मुग्धाला भुरळ घालत होता. तर तिच्या गालावरील खळीत विजय हरवला होता. त्या रात्री पूनवेचे पांढरे शुभ्र चांदणे पडले होते. जेवणे आटोपून सर्वजण आपापल्या खोलीत झोपण्यासाठी गेले होते. मात्र विजय आणि मुग्धा टेरेसवर चांदणे न्याहाळत एकमेकांच्या बाहुपाशात होते. विजय तिच्या लांबसडक केसातून आपली बोटे फिरवत होता. मधूनच तिच्या गालावर चुंबनाचा वर्षाव करत होता. चंद्राचा शीतल प्रकाश तिच्या गोऱ्यापान देहावर पडला होता. तिचा गोरा रंग अधिकच उजळून निघाला होता. तर त्याची पिळदार शरीरयष्टी मन मोहून टाकत होती. प्रणय चाळे सुरु असतानाच दोघेही एकमेकांच्या मिठीत साखरेसारखे विरघळले. वस्त्रांचे बंधन झुगारून दिले आणि 'दो जिस्म मगर एक जान' ह्या उक्तीप्रमाणे एकदेह झाले. आकाशातून चंद्र मंदस्मित करत होता, तर तारका आनंदाने नाचत होत्या. बर्फातून येणारा गार वारा प्रणय गीत म्हणत होता. आणि विजय मुग्धा प्रेमात बेभान झाले होते. ती मिलनाची रात्र त्यांच्या साठी अत्तराची कुपी होती. त्या रात्रीतील सर्व आठवणी त्यांनी मनाच्या कप्प्यात साठवून ते आपापल्या घरी परतले.

पण नियतीने वेगळाच डाव मांडला होता. मुग्धा विजय ह्यांच्या प्रेमवेलीला अंकुर फुटला होता. विजयने मुग्धाला एक अनोखी भेट दिली होती. मुग्धा प्रेग्नंट होती. विजयच्या बाळाची ती आई होणार होती. तिला ह्या गोष्टीची कुणकुण लागली आणि ती अंतर्बाह्य हादरली. तिने विजयच्या कानावर ही गोष्ट घातली, विजयने तिला आधार दिला आणि आपण लग्न करू असा सल्ला दिला. पण... मुग्धाच्या घरी ही गोष्ट कळली आणि तिच्या कर्मठ परिवाराने तिला सक्त विरोध केला. विजय परजातीचा, आपल्या पेक्षा हलक्या जातीचा, त्यामुळे तिची कानउघडणी केली गेली. माणसांनी स्वतःच्या सोयीसाठी आखलेल्या जातीच्या चौकटीत त्यांचे प्रेमसंबंध अडकले आणि प्रेमाला कायमचा पूर्णविराम लागला. मुगधाच्या वडिलांनी तिच्या उदरात वाढणाऱ्या विजयच्या अंशाला कायमचे नष्ट करायचे ठरवले, पण वेळ निघून गेली होती. त्यामुळे बाळ जन्मता क्षणी त्याचा नायनाट करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मुग्धाचे कॉलेज सुटले. ती घरात बंदिस्त झाली. विजयने तिच्या वडिलांकडे खूप विनवण्या केल्या, पण त्याला भेटू दिले नाही. विजयची परीक्षा संपली, त्याने घवघवीत यश संपादन केले. येथे मुग्धाने एका गोंडस बाळाला जन्म दिला. निळसर डोळ्याचे ते गोंडस बाळ अगदी निष्पाप पणे पाळण्यात पहुडले होते. तिच्या वडिलांनी त्या बाळाचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी त्याला बाहेर नेले, मुग्धाने हंबरडा फोडला,पण तिच्या वडिलांच्या हृदयाला पाझर फुटला नाही. वॉर्डबॉयकडे पैसे देऊन त्या बाळाला त्याच्याकडे सुपूर्त केले आणि कायमची कटकट मिटवली.

ह्या घटनेला २२ वर्ष लोटली होती. मुग्धाने बी.एड. करून एका शाळेत ती शिक्षिकेची नोकरी करत होती. भूतकाळ विस्मृतीत गेला होता. तिने आयुष्यभर लग्न न करण्याचा निश्चय केला होता. अगदी शांतपणे ती पुण्यातील एका शाळेत नोकरी करत होती. एका छोट्याश्या घरात एकटीच राहत होती. अगदी शांतपणे आयुष्य कंठत होती. विजय तिचा भूतकाळ झाला होता... आणि अचानक तिच्या फेसबुकवर विजय कांबळे ह्याची फ्रेंडशिप रिक्वेस्ट दिसली, ती काहीशी हादरली. तिने अनेक वेळा त्याची प्रोफाइल चेक केली. तिची खात्री झाली, हा तोच आहे, माझा भूतकाळ...

नेहमीप्रमाणे ती शाळेतून परतली होती, सर्व आवरून ती वॉकिंगसाठी बाहेर पडत असताना बेल वाजली, तिने दार उघडले, समोर विजय... त्याला बघताक्षणी तिच्या डोळ्यासमोर अंधारी आली. विजयने तिला सावरले आणि दोघेही घरात गेले. काही क्षण शांततेत गेले. संवादाशिवाय असणारी मुक भाषा त्यांची सखी झाली. मग औपचारिक गप्पा झाल्या. तिला भूतकाळ आठवला, बाळाच्या आठवणीने ती अगदी व्याकूळ झाली. तिने विजयची क्षमा मागितली, बाळाला वाचवू न शकल्याची अपराधीपणाची घोर भावना तिच्या डोळ्यातून अश्रू बनून वाहत होती. क्षणात विजय जवळ आला, तिला मिठीत घेतले आणि आपले बाळ, आपल्या प्रेमाची खूण जिवंत असल्याचे सांगितले, क्षणभर ती वेड्यासारखी त्याच्याकडे बघतच राहिली, त्याने संचितला बोलावले, त्या २२ वर्षाच्या तरुणाकडे मुग्धा भान हरपून पाहतच राहिली. तेच राजबिंड रूप, निळसर डोळे, गोरापान रंग, ६ फूट उंची... तिने संचितला घट्ट मिठी मारली. प्रश्नार्थक नजरेने तिने विजयकडे पाहिले, तेव्हा विजयने सांगितले की, वॉर्डबॉयकडून त्याने संचितला घेऊन कायमस्वरुपी अमेरीकेत स्थायिक होण्याचे ठरवले. तिथे चांगली नोकरी करून संचितला त्याने शिकवले, आईवडील दोघांचे प्रेम देऊन त्याचे पालनपोषण केले. आयुष्यभर अविवाहित राहून फक्त तुझ्यावरच प्रेम केले.

मुग्धाला गहिवरून आले. आज तिची तपस्या सफल झाली होती. तिघेही एकमेकांच्या मिठीत शिरले... आणि आनंद अश्रू मुक्तपणे ओसंडून वाहू लागले.... मुग्धाला आज एक अनोखी भेट मिळाली होती.

# मॅनेजर

■ सुनिल सायमन डिमेलो, गास

गोल्डन स्टार ह्या हवाई वाहतूक कंपनीच्या काऊंटरवर आज खूपच गर्दी दिसत होती. त्याला कारणही तसेच होते. ह्या कंपनीच्या मॅनेजर वनिता मॅडम आज रिटायर्ड होणार होत्या. आज त्यांच्या कामाचा शेवटचा दिवस होता.

सेवानिवृत्तीचा कार्यक्रम सुरु झाला तसतश्या वनिता मॅडम भूतकाळात गेल्या... त्यांना तो दिवस अजूनही आठवत होता. २९ फेब्रुवारी १९८४, बुधवार होता. माहीमच्या संत मायकल चर्चला सकाळी जाऊन प्रार्थना करून त्या या गोल्डन स्टार या हवाई वाहतूक करणाऱ्या कंपनीत रुजू झाल्या होत्या. कार्यालयात शिरताबरोबर त्यांना दरदरून घाम फुटला. तेथील प्रशस्त ऑफिस, डिझायनर फर्निचर, विमानाची भलीमोठी प्रतिकृती आणि भिंतीवर लावलेला जगाचा भौगोलिक नकाशा त्यावर रेखाटलेले विमान वाहतुकीचे ते मार्ग आणि डोळे दिपवणारे ते लखख प्रकाश सारंसारं स्वप्नवत होते. कंपनीचे मालक श्री. परेश खटमलानी यांनी वनिता मॅडमचे हसून स्वागत केले.

शून्यातून विश्व निर्माण करण्याचीं धमक असणारे खटमलानी साहेब हे एक मेहनती, प्रचंड आत्मविश्वास असणारे मालक होते. हाताच्या बोटावर ते मोठमोठया बेरजा सहज करीत.  कामाचा दिवस छान गेला. बोरिवली ते दादर हा प्रवास तसा फार दूरचा नसला तरी जवळचाही नव्हता. तरी वनिता मॅडमला आता या प्रवासाची सवय झाली होती.

वनिता मॅडम दिसायला सावळ्या असल्या तरी आकर्षक होत्या. गारे डोळे लांबसडक काळे दाट केस चेहऱ्यावर नेहमी स्माईल आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, नवीन काम शिकण्याची इच्छा, कोणत्याही कामाला नाही शब्द न वापरता त्या इमाने इतबारे आपलं काम करू लागल्या होत्या. या सर्व गुणामुळे परेश सर त्यांच्यावर आणि त्यांच्या कामावर खूप खूष होते.

लवकरच खटमलानी सरांनी बिझनेसमध्ये जम बसवला होता. बुकिंग काउंटरवर ललिता आणि हेतल ह्या दोन नवीन मुली रुजू झाल्या होत्या. व्हिसा पासपोर्ट वगैरे पाहण्यासाठी वरद आणि प्रभूदेव, इतर कार्यालयीन काम करण्यासाठी भास्कर, दिनकर आणि अकाउंटसाठी गिरीधर व आर्या अशी सगळी फौज होती. हवाई वाहतूक

कंपन्यांचे प्रतिनिधी नेहमी येत असत. येताना खास करून दिवाळी आणि ख्रिसमसच्या सिझनमध्ये पेन, केक अश्या पुष्कळ  भेटवस्तू घेऊन येत. कारण त्यांना त्यांच्या विमान कंपन्यांचा सेल वाढवायचा होता.

अश्या आलेल्या भेटवस्तू एकत्र करून वनिता मॅडम जवळजवळ सर्व सहकाऱ्याना वाटत असे. अल्पावधीतच त्या सर्वांना आवडू लागल्या, नेतृत्व गुण तर त्यांच्या रक्तात होता असे म्हटले तरी वावगे होणार नव्हते. खाजगी कार्यालय असल्यामुळे तसं लंचटाईम नसायचे. पण वनिता मॅडम अगदी प्युन पासून तर सिनियर स्टाफ पासून सर्वांना एकत्र करीत. सगळे एकत्र जेवण करीत असत. हास्य विनोद करीत सर्वांचा वेळ मस्त जात असे...

नेमके हेच परेश सरांना खटकले. मेहनत, जिद्द आणि कुठेही काम करण्याची प्रबळ इच्छा आणि असे काम करताना  कुठल्याही थराला जाण्याची त्यांची मानसिकता असल्यामुळे ते एक यशस्वी उद्योजक बनू लागले होते परंतु एक मालक म्हणून त्यांनी ऑफिस मध्ये कामाचा चाबूक ओढला होता. मुंबईतील बऱ्याच नामवंत कंपन्या त्यांचं क्लायंट बनल्या होत्या. लक्ष्मी दोन्ही हाताने पाणी भरत होती. सर्व स्टाफ अगदी ढोर मेहनत करीत होता.

तो काळ हवाई वाहतूक कंपन्यांचा सुवर्णकाळ होता. विमान कंपन्या भरभरून प्रवाशी भाड्यात कमिशन देत होत्या. आंतरराषट्रीय  भाड्यात तर कुठे ९% तर कुठे ३५% पर्यंत कमिशन द्यायला सुरुवात झाली होती. यात विमान कंपन्या एक युक्ती करीत असत. हवाई प्रवास करणारे प्रवासी जेव्हा आपलं तिकीट पाहत तेव्हा त्यांच्या तिकिटावर पूर्ण भाडे लिहलेले असे मात्र अश्या एंजट कंपन्याना अश्या प्रवासी तिकिटाचे पेमेंट करताना मात्र आपले कमिशन कापून नेट पेमेंट करन्याची मुभा होती.

हळूहळू वनिता मॅडम मॅनेजरपदावर पोहोचल्या. ऑफीसची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. तरुण वयातच अशी जबाबदारी आल्यामुळे त्यांनी सर्व लक्ष कामावर केंद्रित केले. हिरीरीने त्या काम करु लागल्या. ऑफिसला १०.:३० पर्यंत येत होत्या परंतु सकाळी सकाळी घरीच क्लायंटचे कॉल येऊ लागल्यामुळे त्यांना घरची कामं, ऑफीसचे कॉल अशी तारेवरची कसरत करताना त्यांना ऑफिसला यायला उशीर होऊ लागला. १०:३० ते ११ - ११.:३० आणि हातात तर त्या १ वाजता येऊ लागल्या. परेश सरांची काही हरकत नव्ह्ती कारण जे क्लायंट त्यांना सकाळी कॉल करीत असत त्या सर्वांना ते वनिता मॅडमचा नंबर देत त्यामुळे सकाळी क्लायंटच्या सेक्रेटरी तर कधी स्वतः मालक लोक वनिता मॅडमना कॉल करू लागले.

हळूहळू त्यांचे कॉल घेताना आणि त्याना बुकिंगची माहिती देता देता घरीच दुपारचे १२ वाजू लागले. शेवटी वनिता मॅडमचा पण संयम सुटला. त्यांनी परेश सरांना

स्पष्ट सांगितले की, “सर एकतर तुम्ही माझा पर्सनल नंबर आपल्या सर्व क्लायंट्ना देऊ नका कारण ते सकाळी ७ वाजल्यापासून फोनवर चौकशी करायला सुरुवात करतात त्यामुळे माझी घरची सगळं काम राहतात आणि त्यांना उत्तर देता देता घरीच १२ - १२:३० वाजतात. मग मला ऑफिसला यायला उशीर होतो. किंवा मला घरून कामं करण्याचीं परवानगी दया.

पक्का धंदेवाइकपणा रक्तात  मुरलेले खटमलानी यांनी हे सर्व शांतपणे ऐकून घेतले. वनिता मॅनेजर आहे, मेहनती आहे, तिने जर कामातून अंग काढून घेतले तर कठीण होईल म्ह्णून त्यांनी तिला घरूनच काम करण्याची मुभा दिली. आठवड्यातून फक्त १ किंवा २ दिवस तिने ऑफिसला यावं, बाकीं दिवस घरूनच ऑफीस सांभाळावं असं ठरलं.

आणि तिथून वनिता मॅडम, परेश सरांचे ऑफिस या सर्वांची भरभराट सूरू झाली. पण... नकळत वनिता मॅडम आपल्या कुटुंबियांकडून दुरावू लागल्या, आईवडील, भाऊ यांना वेळ मिळेनासा झाला... भाऊ कॉलेजला जायचा. सुरुवातीला दोघे एकत्र जेवण करीत, एकत्र गप्पा करायचे, मौज मस्ती करायचे, घरात एकमेकांना मारण्यासाठी धावू लागले कि त्यांची आई रागावे पण वडील मात्र हसत आणि आपल्या मुलांना कौतुकाने पाहत असत.

घरून काम, दिवसभर कॉम्पुटरवर टकटक, क्लायंटचे फोन त्यात ऑफीस स्टाफचे फोन, परेश सरांचे तर दिवसाला १०-१० फोन येऊ लागले. वनिता मॅडम अक्षरश वैतागू लागल्या. जेवणाच्या वेळा बदलू लागल्या. बँकेत बॅलन्स वाढू लागला पण आरोग्याचा बॅलन्स कमी होऊ लागलेला.. लहान भाऊ सौरभशी बोलायलाही वनिता मॅडमना वेळ मिळेनासा झाला... पण आता काहीच करता येत नव्हते.

मॅनेजरच्या वेशात त्या गोल्डन स्टारच्या विमानात बसल्या होत्या. आता Departure झाले होते पण Arrival खूप दूर होते... हे सर्व आठवून वनिता मॅडमचे डोळे पाण्याने भरले...!! परेश सर तर २४ तास घोड्यावर स्वार झालेलं असत त्यांना सर्व काम आत्ताच्या आत्ता तेही कोणतीही चूक नसताना हवी होती. एक काम सांगताना दुसरी ४ काम त्याच वेळेला सांगत आणि सर्व स्टाफ Confuse होत असत. तसे परेशसर प्रेमळही होते. कारण दुर्दैवाने त्यांना मुलबाळ नव्हते. नेहमी म्हणायचे सर्व स्टाफना की हे सगळं मी तुमच्यासाठी करतो.  मी आणि माझी पत्नी, आम्हा दोघांना खायला किती हवं. पण तुम्ही तुमची मुलबाळ यांना दोन घास मिळावे म्हणून हा सगळा आटापिटा, बरोबर ना ? अशी भावनिक साद घालून सर्वाकडून गोडीगुलाबीने काम करून घायचे, पगारवाढ वगैरे त्यांनी मागू नये यासाठी हे त्यांचे हत्यार असे असा सर्व बंदोबस्त ते करायचे. पगार फक्त वनिता मॅडमचा वाढत असे.

गोल्डन स्टार कंपनीचा एक चांगला नियम होता. दरवर्षी ते न चुकता संपूर्ण स्टाफची एक पिकनिक नेत असत. ते देखील ऑफिसच्या खर्चाने. अशीच एक पिकनिक त्यांची अलिबागला गेली होती. सर्वजण आले होते परंतु अप्रत्यक्षरीत्या युनियन लीडर सारखं काम करणारे प्रभुदेवा मात्र त्या वेळेला तिथे उपस्थित नव्हते. प्रभुदेवा असल्याशिवाय ऑफिसचा कोणताच काम ठीक होत नव्हतं. वनिता मॅडम तर कोणतीच रिस्क घ्यायला तयार नव्हत्या. सर्वजण तयार होते परंतु प्रभुदेवांचा फोनच लागत नव्हता तेव्हा ऑफिस मधून सर्वजण प्रभुदेवांच्या घरी गेले. तिथून त्यांना पिकअप केलं आणि मगच ते पिकनिकसाठी रवाना झाले. अंगात ताप असून देखील प्रभुदेव यायला तयार झाले कारण ऑफिस मध्ये त्यांची एक फॅमिली झाली होती. तो पूर्ण दिवस गोल्डन स्टार कंपनीचे सर्व कर्मचारी घरी असल्यासारखे वागत होते. सर्वांनी खूप खूप एन्जॉय केली.

वनिता मॅडमना हे सर्व अगदी कालपरवा झाल्यासारखे आठवत होते... एकदाचा सर्व कार्यक्रम संपला आता गोल्डन स्टार कंपनीत नव्या दमाचा सर्व तरुण स्टाफ रुजू झाला होता. हार, पुष्पगुच्छ वगैरे घेऊन झाल्यावर सर्वाना थँक्स इतकंच त्या बोलू शकल्या. सर्वांचा निरोप घेऊन त्या निघाल्या. कारमध्ये विचार करत होत्या. काय मिळवलं मी.? आई वडील गेले, भाऊ लग्न करून अलग फ्लॅट घेऊन राहू लागला. त्याची पत्नी मुंबईच्या मोठया शाळेत प्रिंसिपल होती. तिने वनिता मॅडमशी सारे संबध तोडले होते. आता त्या प्रशस्त फ्लॅटमध्ये २४ तास असणारी नोकरानी प्रमिला हिच्या सोबत राहणार होती. पैसा होता, कार होती, फ्लॅट होता सर्व सुखं हात जोडून उभी होती पण नव्हते ते मानसिक समाधान, शारीरिक आरोग्य. कोणी हक्काचं माणूस नव्हता. मॅनेजर असूनही आपलं उर्वरित आयुष्य मॅनेज करायला त्या एकट्या पडल्या होत्या.

# माझे आजोबा

■ मुक्ता अशोक टिळक, नाशिक

***ॲडवोकेट देववदत्त नारायण टिळक***
***ख्यातनाम साहित्यिक आणि विधिज्ञ... दे.ना.टिळक, नाशिक -***
***(१६:७:१८९१ - २७:१२:१९६५)***

माझे प्रिय आजोबा देवदत्त नारायण टिळक हे रेव्हरंड नारायण वामन आणि लक्ष्मीबाई टिळक या सुप्रसिद्ध आणि महान दंपतीचे सुपुत्र. इतका मौल्यवान वारसा असल्यामुळे त्यांना आपोआपच प्रसिद्धी मिळाली असे म्हणणे साफ चूक आहे. दत्तोपंतांचे व्यक्तिमत्त्व अगदी त्यांचे, त्यांचेच आहे! १० फेब्रुवारी १८९५ रोजी पणजोबा, नारायण वामन टिळक यांनी मुंबईला बाप्तिस्मा घेतला तोपर्यंत हे कुटुंब वणी, राजनांदगाव, नागपूर वगैरे ठिकाणी राहत होते.

वडिलांचा सहवास दत्तूला साडेतीन वर्षे मिळाला. पणजोबांच्या धर्मांतरानंतर होत्याचे नव्हते झाले जणू. दत्तूच्या अंगी कसा कोण जाणे कमालीचा समजूतदारपणा आणि स्वाभिमान आला. पणजी-लक्ष्मीबाई दत्तूसह आपल्या भावाच्या घरी गेल्या. पतीच्या ख्रिस्ती होण्याच्या धक्क्याने त्या भ्रमिष्टासारख्या झाल्या. फार कठीण परिस्थिती होती ती. दत्तूला खेळता-खेळता मामेभावंडे 'दत्तूकडे शेत, घर, बैल काहीच नाही म्हणून चिडवीत. एके दिवशी दत्तू उत्तरला, “ही पाटी माझे शेत, ही पेन्सिल माझा नांगर, ही बोटे माझे बैल आणि ही अक्षरे माझे दाणे आहेत.”

हे विखुरलेले कुटुंब काही वर्षांनंतर पुन्हा एकत्र आले. वडिलांचे प्रेम, सहवास दत्तूला मिळू लागले. व्यायाम, जादूचे खेळ, चित्रकला, अभ्यास, पशुपक्षी आणि झाडांबद्दल प्रेमभाव, बालबोधमेव्यासाठी छोटेखानी कविता लेखन ही त्याची आवड होती. माझ्या आजोबांना लहानपणापासून सायकलचे वेड होते ते अगदी वयाच्या सत्तरीपर्यंत. 'Cycling is my second nature.' असे ते म्हणत. आजोबांचे शारीरिक सामर्थ्य अचाट होते. एका हाताच्या मुठीत दोन अक्रोड काय, नी एका बुक्कीने नारळ काय, ते अगदी सहज फोडीत असत. जड सामानाने भरलेली कपाटे सरकविणे-

उचलणे आणि महाबळेश्वरचे अंगावर येणारे उभे चढ सायकलीने सर करणे हे त्यांचे अगदी सोपे काम असे. त्यांच्या मनगटावर घड्याळ कधीही चालत नसे, बंदच पडे!

आपल्या ताकदीचे कारण त्यांनी सांगितले, “मला मांसाहार वर्ज्य आहे. स्वच्छता, कारुण्य आणि प्रकृतीस्वास्थ्य म्हणून शुद्ध शाकाहार. फोडण्या-मसाले नसलेला!" फळे-दूध ही त्यांची आवड. मद्याप्रमाणे ते तंबाखूचेही द्वेष्टे होते. पान-सुपारी-तपकीर यांचेही. चहा-कॉफीला तर वयाच्या वीस-पंचवीस वर्षापर्यंत त्यांनी स्पर्शही केला नव्हता. निर्व्यसनीपणा, नियमितपणा हे त्यांच्या सुदृढ प्रकृतीचे कारण होते. तसेच त्यांच्या मानसिक सामर्थ्यालाही तोड नव्हती. आई लक्ष्मीबाई आणि कालांतराने पत्नी रुथबाई अकाली देवाघरी गेल्या. त्याप्रसंगी हळव्या वृत्तीचे आजोबा कमालीचे शांत होते. अप्पा, म्हणजे माझे वडील एक आठवण सांगत, 'एकदा बाबांनी घरात शिरलेला भला मोठा साप झुरळासारखा उचलून बाहेर फेकून दिला होता!' भीती त्यांना माहितीच नव्हती. त्यांचा देवावर दृढ विश्वास आणि प्रार्थनेवर भाव होता. प्रार्थना ठराविक वेळेला, गाजावाजा करून केलेली बडबड त्यांना मान्य नसे. त्यांना अशी प्रार्थना येतही नसे.

'सोडीन जितुक्या श्वासाते ।

तितुक्या वेळा स्तुती अर्पितो ।

मानुन घे ती ते ॥ '

असे त्यांचे जीवन प्रार्थनामय होते. ते कट्टर ख्रिस्ती होते. आपल्या धर्माबद्दल त्यांना अभिमान आणि परधर्माबद्दल सहिष्णुता वाटत असे. प्रभु ख्रिस्ताविषयी ते म्हणतात "गदरेकरांच्या देशातला वेडा, जक्कय जकातदार, विहिरीवर भेटलेली शोमरोनी स्त्री, ख्रिस्ताच्या पायाला अत्तर लावून केसांनी ते पुसणारी पापिणी ही सर्व उदाहरणे 'त्याच्या' हृदयाला स्पर्श करू शकली याची आहेत. 'त्याचा' निषेध करणाऱ्यांची किंवा त्यांच्यातील दोष चिवडीत बसणाऱ्या कावळ्यांची भूमिका 'त्याने' घेतली नव्हती."

आजोबांची परमपित्यावर पराकोटीची श्रद्धा होती. ते आपला भार परमेश्वरावर टाकीत आणि खरोखर परमेश्वर त्यांना कधीही कमी पडू देत नसे. त्यांची निकडीची गरज अकस्मात भागत असे. 'आयुष्यातल्या घटना, त्या पिता परमेश्वराच्या प्रेरणेने, अनुज्ञेने घडतात. आपण आपला भाग चोखपणे उचलला पाहिजे' या वृत्तीने त्यांच्या मनात अथांग शांती असे.

१८९९ मध्ये पणजीबाई पणजोबांकडे परतल्या. तेव्हापासून त्या आणि दत्तू घरी रोज सकाळ संध्याकाळ होणाऱ्या प्रार्थना, पवित्र शास्त्र वाचन- पणजोबांचे विवेचन,

भजने यासाठी नियमित हजर असत. दत्तू दर रविवारी वडिलांबरोबर चर्चमध्ये जाई. पणजीबाईंना प्रार्थना आवडू लागली. 'आपल्या हृदयस्थ परमेश्वराशी बोलणे' हा अनुभव फार आल्हाददायक आहे हे त्यांना समजले. बायबलचीही त्यांना हळूहळू ओळख होऊ लागली. आणि रविवार दिनांक ८ जुलै १९०२ रोजी राहुरी येथे उभयता माय-लेकरांनी बाप्तिस्मा घेतला. सात आठ वर्षाच्या दत्तूच्या मनात घरातील या वातावरणामुळे ही धर्मसहिष्णुता रुजून वाढत गेली असावी. नेहमी त्यांचे स्नेही सर्व प्रकारच्या स्वभावधर्माचे होते. ह. भ. प. लक्ष्मणबुवा पांगारकर, खासदार भाऊराव गायकवाड, केशव सिताराम म्हणजे प्रबोधनकार ठाकरे, रावसाहेब पिंगळे, प्रिं.भा.ल. पाटणकर, सोपानदेव चौधरी, देवराम भाऊ वाघ, बनेमिया शेख वगैरे.

आजोबा धर्म-जातीभेदाचे कट्टर विरोधक होते त्यांनी हिंदू धर्माचा त्याग केला होता, हिंदी संस्कृतीचा नाही. भारताबद्दल त्यांना जाज्वल्य अभिमान होता. त्यांचे स्वदेश प्रेम अवर्णनीय होते. पहिल्या महायुद्धात 'आपल्या तरुणांनी सैन्यात भरती व्हावे' असे पुढाऱ्यांनी प्रसिद्ध करताच त्यांनी आपले नाव सैनिक म्हणून नोंदविले होते. महाविद्यालयीन शिक्षण चालू असताना विद्यार्थ्यांना बायबल शिकविण्याची कामगिरी नागपूरच्या प्रिन्सिपल साहेबांनी त्यांच्यावर सोपविली होती. कित्येकदा ते चर्चमध्ये उपदेश करीत. या बरोबर त्यांचे ख्रिस्ती समाजात कार्य-सेवा सुरूच असे. नंतरच्या काळात उपासना संगीत संपादन, ट्रॅक्ट सोसायटी, मराठी बायबल रिविजन, अमेरिकन मराठी मिशनची लिटरेचर कमिटी अशा अनेक कमिटीतून त्यांनी कामे केली.

अनेक सदस्यांचे ते 'फ्रेंड फिलॉसॉफर आणि गाईड' होते. वेळोवेळी ते त्यांना स्नेह, प्रेम देऊन साहाय्य करीत. यांच्या ख्रिस्ती समाज विषयक लिखाणात तीव्र जाणीव, सेतुबंधन, कृष्णा, पाऊल वाट, ठिणग्या ही पुस्तके ख्रिस्ती कौटुंबिक जीवनाचे चित्रण करणारी आहेत. तसेच तीन प्रकाशझोत आणि 'बायबलची तोंडओळख' हे बायबल विषयी सर्वांगीण माहिती देणारे पुस्तक आहे. मुंबई-पुणे रेडिओ, केसरी, सकाळ, बातमीदार, लोकसत्ता, गावकरी या वर्तमानपत्रांमध्ये त्यांचे उत्तम अभिप्राय प्रसिद्ध केले जात. या सर्व पुस्तकांचे शिखर म्हणजे 'महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई.' एका कैसर-ए-हिंद ने दुसऱ्या कैसर-ए-हिंद चे लिहिलेले हे चरित्र आहे. रमाबाई मेधावी यांचे चरित्र आजोबांनी अपार कष्ट घेऊन लिहिले. १९६० साली ते प्रसिद्ध झाले, सहा महिन्यातच महाराष्ट्र शासनाचे एक हजार रुपयाचे अनुदान त्याला मिळाले. उत्तम सुबोध भाषा, समतोल भाव, इतिहासाचे सत्य कथन, रसाळ भाषाशैली आणि विवेचन पद्धती, मनोरंजन आणि कुतूहल वाढविणारे मथळे, बोलकी छायाचित्रे हे सारे उल्लेखनीय. या कर्तबगार समाज सेविकेचे विस्तृत चरित्र आजोबांनी अनेक संदर्भांसह परिश्रमपूर्वक लिहिले.

कवी सोपानदेव चौधरी म्हणतात, “हा ग्रंथ लिहिताना यातील प्रकरणांचे टंकलेखन करताना भाऊंनी अक्षरश: रात्रीचे दिवस केले. त्यांच्या पुढ्यातला कामाचा ढिगारा पाहून मी तर हबकून जात असे. एकदा त्यांना सहज म्हणालो, ‘भाऊ, अशाने तुम्ही आजारी पडाल.' त्यावर हसत हसत भाऊ म्हणाले, 'माझ्या आवडीचे आणि जिव्हाळ्याचे हे काम मला लाभले आहे, लाभलेल्या कामाने माणूस आजारी पडत नाही. लादलेल्या कामाने माणूस आजारी पडू शकतो.' खरे पाहिले तर लाभलेले असो किंवा लादलेले असो दोन्ही कामे भाऊ हसत हसत उरकून टाकतात.”

गोखले आजोबा म्हणतात, "लक्ष्मी व सरस्वती सख्ख्या बहिणी असल्या तरी त्यांचे आपसात कधी पटत नाही असे म्हणतात. पण या ग्रंथाच्या बाबतीत या बहिणींचे सत्य भाऊंना सहाय्य करण्यात दिसून येते. पुस्तकाला खर्च झालेली अवाढव्य रक्कम लक्ष्मीने जवळजवळ त्यांच्या पुढ्यात आणून टाकली. मराठी वाङ्मयाचा हा एक अनमोल ठेवा आहे."

'स्मृतिचित्रे' तीन भाग संपूर्ण आणि चौथ्या भागाची अकरा प्रकरणे पणजीबाईंनी लिहिली आहेत. चौथ्या भागाची पुढची पाच प्रकरणे आजोबांनी लिहून स्मृतिचित्रे पूर्ण केले. पणजोबांनी ख्रिस्तचरित्राचे 'ख्रिस्तायन' हे खंडकाव्य लिहायला घेतले. ११ अध्यायातील काही ओव्या झाल्यानंतर काम थांबले. त्याच्या पुढच्या ओव्या पणजीबाईंनी लिहिल्या आहेत. सत्तराव्या वर्षी काहीही लेखन न करता, तहान भूक विसरून पणजीबाईंनी ६४ अध्याय लिहिले. 'ख्रिस्ताचे पुनरूत्थान' हा तो शेवटचा अध्याय. त्यानंतर आजोबांनी 'प्रभूदर्शन' हा ७६वा अध्याय लिहून 'लक्ष्मीनारायणाचे ख्रिस्तायन' पूर्ण केले. या खंडकाव्याचा उल्लेख कवी गिरीश यांनी 'टिळकत्रयींच्या रस वाहिनीचा त्रिवेणी संगम' असा केला आहे.

पणजोबांची राहून गेलेली सारी कामे आजोबांनी पूर्ण केली. ख्रिस्तानुवर्तनाची दोन प्रकरणे भाषांतरित केली. अभंगांजली मध्ये १११ अभंगांची भर घातली. उपासना संगीताची १८ वी आवृत्ती, मराठी बायबल रिविजनचे काम पूर्ण केले. नवीन इसापनीती आणि मराठीत प्रचारात असलेल्या संस्कृत म्हणींचे पुस्तक ही पूर्णत्वास नेले. आणि मातृ-पितृ ऋण फेडून कर्तव्य पार पाडले.

'नारायण वामन टिळक - व्यक्तिदर्शन व काव्यविवेचन' या आजोबांच्या ग्रंथाविषयी प्रबोधनकार ठाकरे म्हणतात, “भाऊसाहेब, बहार केलीत बुवा! आपल्या दिवंगत संत पित्याची इतकी कोरीव-रेखीव मूर्ती घडविणारा शिल्पकार सुपुत्र ही सुद्धा महाराष्ट्रातील एक अभिनंदनीय घटनाच म्हटली पाहिजे. अशा कामाला जातीचे तर लागतेच पण जिव्हाळ्याचेही लागते.”

ज्ञानोदय आणि बालबोधमेव्याचे आजोबांचे काम सर्वश्रुत आहे. त्यांना मुलांच्या स्वभावाची उत्तम जाण होती. मुलांच्या भाषेत, त्यांना अनुरूप, रुचेल, आवडेल असेच ते लिहीत. वेणू वेडगावात - म्हणजे ॲलिस इन वंडरलॅंड, बाबूबाळाचा ग्रंथराज, बोधसुधा, आपले मुके मित्र, विनोद मूर्तीची पुण्यावर स्वारी आणि जातक कथा ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आणि लोकप्रिय ठरली.

आजोबा नेहमी नव्या-जुन्या लिहिणाऱ्यांना प्रोत्साहन आणि संधी देत. तात्यासाहेब शिरवाडकर म्हणतात, 'श्री. दे.ना. टिळक आणि त्यांचा बालबोधमेवा यांना माझ्या वाङ्मयीन जीवनात फार महत्त्वाचे स्थान आहे. त्यांचे ऋण अविस्मरणीय आहे. देवदत्तांचे प्रोत्साहन मला न मागता मिळाले. यांनी मला आपल्या घरी बोलावले. माझी फारशी प्रशंसा किंवा चौकशीही केली नाही. माझ्या लेखणी वरील विश्वास त्यांनी अन्य मार्गांनी व्यक्त केला. पुढे हा संपादक-लेखक संबंध दृढ झाला त्यांच्या बाजूने प्रेमाचा-वात्सल्याचा आणि माझ्या बाजूने आदराचा-तीर्थरूप भावनेचा.' असाच अनुभव कवी कृ. ब. निकुंब यांनाही आला.

Y.M.C.A. चे सेक्रेटरी असताना आजोबांनी सोशल अपलिफ्ट हे केंद्र सुरू केले. नाशिकमध्ये आरोग्य मंडळ, वाङ्मय मंडळ, डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड, स्कूल बोर्ड या संस्थेत त्यांनी जीव ओतून कामे केली. जीवदया संस्थेचा जनावरांचा दवाखाना आणि रिमांड होम ही त्यांची संस्मरणीय कामे. ते पोलिस प्रॉसिक्युटर होते. मुलांसाठी विशेष कायदा आणि बाल गुन्हेगारांसाठी वेगळी न्यायालये नुकतीच स्थापन होत होती, त्याच्या पहिल्या पायऱ्या रचण्याचे काम आजोबांनी केले. बालगुन्हेगार सोडला की प्रोबेशन साठी आजोबांकडे येई. अशा अनेकांना त्यांनी आपल्या घरी ठेवून घेतले, त्यांना शिकवून शिस्त लावली, नोकरीला लावले, संसार सुद्धा थाटून दिले.

कुष्ठरोगी वसाहत-पुनर्वसन यासाठी विशेष सहकार्य केले. नाशिक नगरपालिकेचे ते सहा वर्षे अध्यक्ष होते. त्यांच्या कारकिर्दीत बांधलेली नगरपालिकेची इमारत आजही मेनरोडवर दिमाखात उभी आहे. शांत, सुस्वभावी, समतोल वृत्तीचे, सहकाऱ्यांसह हसत-खेळत काम करणारे म्हणून ओळखले जात. सत्यप्रियता, बुद्धिनिष्ठ कष्टाळूपणा, कायिक-वाचिक, आणि मानसिक मेहनत करण्याची तयारी, नि:स्वार्थ बुद्धीने कार्य करण्याची हौस हे त्यांचे स्थायीभाव होते.

गांधीजींचा बारडोलीचा सत्याग्रह सुरू होण्यापूर्वी आजोबा बापूंना भेटायला बारडोलीला गेले. दोन-अडीच तासांची भेट. बारडोलीतच आजोबांनी खादीची धोतरे विकत घेतली. तेव्हापासून त्यांचे अर्धेअधिक कपडे खादीचे असत.

बडोद्याला सहविचारिणी सभेमध्ये आजोबांचा सत्कार झाला. तेव्हापासून चि. वि. जोशी आणि आजोबा यांचा दांडगा पत्रव्यवहार सुरू झाला. आजोबांना पत्र

लिहायला आवडे. त्यांचे पत्र म्हणजे प्रत्यक्ष गप्पा असे वाटे. रसिकता, समरसता आणि स्नेह यांनी ती ओथंबलेली असत. कोणत्याही प्रसंगाचे ते जिवंत चित्र उभे करीत. वाढदिवसाच्या शुभेच्छा पाठविणे हा त्यांचा आवडता छंद. ते पत्रांची उत्तरेही लगेच देत. मला आजोबांचा सहवास-प्रेम दहा-बारा वर्षेच लाभला. ते मला नेहमी चित्र-पत्रे लिहित. आजही ती माझ्या कडे जपलेली आहेत.

बारा मे एकोणीसशे अडतीस रोजी इंग्रज सरकारने आजोबांना "कैसर-ई-हिंद"ही सर्वोच्च पदवी देऊन गौरविले. आजच्या पद्मविभूषण या सर्वोच्च किताबाच्या तोडीचा हा तत्कालीन किताब. नाशिकचे सार्वजनिक वाचनालय आणि नागरिकांनी आजोबांच्या ७१ व्या वाढदिवशी भव्य सत्कार केला. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार अध्यक्षस्थानी होते. साहित्यिक आणि विविध क्षेत्रातले मान्यवर यांचा हा कुंभमेळाच होता असं म्हणायला हरकत नाही! एक श्रेष्ठ बालवाङ्मयकार, साक्षेपी संशोधक, परखड विचारांचे सामाजिक कार्यकर्ते, हळवे भाऊ, ख्रिस्तभक्त, व्यासंगी भाषा पंडित, मानवेतर सजिवांवर उदंड प्रेम करणारे, माणसांचे भुकेले त्यांना लळा लावणारे देवदत्त नारायण टिळक : 'प्रौढांचे भाऊ, तरुणांचे बाबा, आणि बाल गोपाळांचे आजोबा' म्हणून प्रसिद्ध होते. त्यांना माझे नम्र अभिवादन.

# एक प्रथितयश उद्योजक

■ **जॉन गोन्सालविस, उमराळे**

**मो. – ९९६०६५९२८५**

तब्बल पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट. आपल्या वयाच्या पंचवीस-सव्वीसाव्या वर्षी सरकारी नोकरी सोडून गोबरगॅस प्रकल्पाचा स्वतंत्र व्यवसाय सुरू करावा म्हणून तो हरहुन्नरी युवक या बाबतीत मत आजमावण्यासाठी आपल्या आजोळच्या आजोबांकडे म्हणजे आपल्या आईच्या वडिलांकडे गेला. तेव्हा आजोबांनी आपल्या नातवाला समजावण्याचा सुरात सांगितले, "अरे, या गोबरगॅसमध्ये तुला काय मिळणार? सुखासुखीची सरकारी नोकरी सोडू नकोस. पुढेमागे तू गॅझेटेड ऑफिसर होशील !" आजोबांचे ते नित्यपठडीतले विचार ऐकून आपल्या मनातील विचारांना जो मुरड घालेल तो युवक कुठला ! तोच धागा पकडून तो युवक आपल्या वडिलांकडे गेला. त्याचे वडील व्यापारी प्रवृत्तीचे दूरदर्शी व्यक्तिमत्त्व होते. ते त्या युवकाला म्हणाले, "बिनधास्तपणे तू नोकरी सोड. धंदा कर. तुझ्या कर्तृत्वावर माझा पूर्ण विश्वास आहे. माझ्याकडे रात्याचे भात आहे. वालाच्या शेंगांची भाजी आहे. प्रतिकूल परिस्थितीमध्ये मी तुझे पोट भरू शकेन."



नोकरी करत-करत आपली बीएससी पदवी संपादन केलेला तो युवक एकटाच सटरफटर नव्हता. त्यावेळी त्या युवकाचे लग्नही झाले होते. मुंबईतल्या खादी ग्रामोद्योग केंद्रीय संस्थेतील बायोगॅस संशोधन केंद्रामध्ये 'डेव्हलपमेंट ऑफिसर' पदावर तो युवक कार्यरत होता. त्या युवकाने आपल्या वडिलांनी दिलेला वरील सल्ला प्रमाणभूत मानून सुरक्षित कवचातली केंद्र सरकारच्या सहा वर्षांच्या नोकरीला

रामराम ठोकला. आणि गोबरगॅस-हरित ऊर्जेमध्ये भवितव्य घडविण्याचा चाकोरी-बाह्य मार्ग निवडला.

अगम्य उत्साह असलेला, मोठी दूरदृष्टी असलेला, दुर्दम्य इच्छाशक्ती असलेला, संशोधन मनोवृत्ती धारण केलेला, लाथ मारीन तेथून आपल्या कल्पकतेने पाणी काढणारा हा युवक म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवलेला वसईच्या नंदाखालच्या नंदनवनातील वटार-जेलाडी गावातील प्रथितयश उद्योजक म्हणजे श्री. बावतीस ब्रिटो ऊर्फ बी. जे.!

श्री. बाववीस ब्रिटो यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९४९ रोजी झाला. वडिलांचे नाव जॉन चिमा दिब्रिटो आणि आईचे नाव उमा. त्यांना तीन भाऊ आणि एक बहीण आहेत. त्याकाळातील एकत्र कुटुंबाच्या रीतिरिवाजानुसार चाळीस-पन्नास जनांच्या गोतावळ्यात ते लहानाचे मोठे झाले. काबाडकष्ट करणाऱ्या शेतकरी कुटुंबात जन्म. बावतीस यांचे शालेय शिक्षण सेंट जोसेफ जोसेफ हायस्कूल, नंदाखाल येथे झाले. एप्रिल १९६७ च्या एसएससी परीक्षेत संपूर्ण शाळेतून ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. शाळेच्या बोर्डावर त्यांचे नाव झळकले. उपजत हुशार व्यक्तिमत्त्व. शाळेत असल्यापासून मराठी भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. इयत्ता आठवी ते इयत्ता अकरावी पर्यंत मराठी विषयात शाळेतील गुणांचा उच्चांक त्यांनी कधीही सोडला नाही. त्याकाळी त्यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्याची आत्मकथा' हा निबंध मराठी विषय शिकविणाऱ्या अभ्यंकर सरांना इतका आवडला की त्यांनी तो निबंध मुंबई येथील मालाडच्या उत्कर्ष मंदिर या नामवंत मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना वाचून दाखवला होता.

एसएससी उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी डॉक्टर होण्याचे स्वप्न मनी बाळगले होते. मात्र इंटर सायन्समध्ये प्रथम श्रेणी मिळवता न आल्यामुळे त्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न भंग पावले. शिक्षण आणि नोकरी दोन्ही एकत्र करून त्यांनी हळूहळू प्रगती केली. १मे १९७९ रोजी स्वतःचा बायोगॅस प्रकल्पाचा कारखाना सुरू केला. खादी ग्रामोद्योग संस्थेचा अनुभव, अभ्यासू वृत्ती, विषयातील प्रावीण्य, भगिरथ श्रम करण्याची प्रवृत्ती आणि संशोधनात्मक मनोवृत्ती त्यामुळे आपल्या विषयात त्यांनी नैपुण्य मिळविले. वसई, पालघर, वाडा, भिवंडी, शहापूर, अलिबाग, कोकण, धुळे या ठिकाणी जोरदार दौरे काढून वातावरण निर्मिती केली. लोकांचा विश्वास संपादन करून हजारो गोबर-गॅस सयंत्रे उभी केली. आर्थिक सुबत्ता आल्यावर १९८१ मध्ये आपला कारखाना सत्पाळा येथील प्रशस्त जागेमध्ये हलवला.

हरित ऊर्जेचे अनेक प्रकल्प उभे करीत असताना त्यांचे अध्ययन-संशोधन आणि नवनिर्मितीचे कार्य अखंडित सुरू होते. त्यातच त्यांनी केलेल्या एका प्रकल्प उभारणीत एका तथाकथित शास्त्रज्ञाने ब्रिटो यांचे तंत्रज्ञान स्वतःच्या नावावर प्रकाशित केले. तरी ते नाउमेद झाले नाहीत. 'की तरु कापिता फुटे आणिक भराने.' या वृत्तीने त्यांनी आपले अध्ययन आणि संशोधन कार्य अधिक जोमाने सुरू केले. परंपरागत बायोगॅस सयंत्राच्या उभारणीसाठी बहुमूल्य वेळ जात असे.

प्रत्यक्ष बांधकाम करण्यासाठी सुमारे आठ-दहा दिवसांचा कालावधी जायचा. एकूण दीड-दोन महिन्यांचा कालावधी लागायचा. यावर मात करण्यासाठी त्यांनी फायबर ग्लास ह्या आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेऊन अनेक आराखडे तयार केले. रात्रंदिवस अनेक प्रयोग करून एका आराखड्याची निवड केली व त्यानुसार डिझायनिंग करून बायोगॅस प्लांटची बांधणी पूर्ण केली. त्यातूनच त्यांनी 'नॅनो बायोगॅस' प्लांटची निर्मिती केली. एका दिवसात या प्लांटची उभारणी होते. अशा प्रकारचे पाचशे-सहाशे प्लांट त्यांनी कार्यान्वित केले आहेत.

श्री. ब्रिटो यांनी बायोगॅस प्लांटच्या क्षेत्रात क्रांती केली. १९८१ साली वसई-धानीव गावात भारतातील पहिल्या सामुदायिक बायोगॅस प्रकल्प उभारला त्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. श्री. ब्रिटो एनर्जी कंपनीद्वारे बायोगॅस व सौरऊर्जा संबंधी उपकरणे आणि साधने तयार करून खेड्यापाड्यांत बायोगॅसची व्याप्ती वाढविली. १९८३-८४ मध्ये त्यांच्या कार्यशाळेमध्ये कॉमनवेल्थ कंट्रीज म्हणजे टांझानिया, मलेशिया, झिम्बाब्वे आणि मॉरेशियस या देशांतील उमेदवारांना बायोगॅस मधील प्रशिक्षण देण्यात आले. आजपर्यंत त्यांनी अनेक प्रकल्प उभारले आहेत. उदा. जलपर्णीवर आधारित बायोगॅस प्रकल्प मुंबई आयआयटी येथे उभारला. विखे पाटील साखर कारखाना, अहमदनगर येथे प्रेसमढ म्हणजे ऊसाची प्रथम गाळणी केल्यानंतर राहिलेल्या गाळ्यावर आधारित मोठा प्रकल्प उभारला. सांगली येथील चितळे डेअरी येथे वीजनिर्मितीसाठी बायोगॅस प्रकल्प याचाही उल्लेख करावा लागेल.

बायोगॅस मधील त्यांची घोडदौड सुरू असताना त्यांनी १९९०पासून सौरऊर्जा क्षेत्राकडे आपला मोर्चा वळवला. प्रचंड अध्ययन-संशोधन करून, वैज्ञानिक दृष्टी वापरून स्वतःचे 'ब्रिटो मॉडेल' विकसित केले. हे मॉडेल लार्सन ॲण्ड टुब्रो (चेंबूर), क्रॉम्पटन ग्रिव्हज, जेएनपीटी, बी.के. बिर्ला, गोदरेज फूड, सन ॲण्ड सॅण्ड, भाभा अणुसंशोधन केंद्र, चेंबूर आदी मान्यवर संस्थेंनी स्वीकारून सौरऊर्जा प्रकल्प राबविले. ठाणे महानगरपालिकेच्या प्रकल्पासाठी परदेशी तंत्रज्ञान वापरले असते, तर

दोन कोटी रुपयांपर्यंत खर्च आला असता, परंतु ब्रिटो यांनी सुमारे पन्नास लाख रुपयांत या प्रकल्पाचे काम पूर्ण केले आहे. याशिवाय अमेरिकेतही डुकराच्या विष्ठेपासून उभारलेल्या एका बायोगॅस प्रकल्पासाठी त्यांनी सल्ला दिला आहे. तेथेही त्यांनी दोन-तीन वेळा भेटी देऊन मार्गदर्शन केले आहे. देशांतील नव्हे; तर परदेशांतील प्रतिनिधिंनी त्यांच्या कार्यशाळेला आणि बायोगॅस प्रकल्पांना भेटी दिलेल्या आहेत. अनेक मोठमोठे मान्यवर अधिकारी, शास्त्रज्ञ, डॉक्टर त्यांच्या संपर्कात आले. अनेक सेमिनारमध्ये त्यांनी आपले शोधनिबंध सादर केले आहेत.

ते स्वतः डॉक्टर झाले नाहीत; पण अनेक डॉक्टरेट लोक त्यांच्या सान्निध्यात आले. मुंबईतील आयआयटी मधील एका विद्यार्थ्याने जलपर्णी आधारित बायोगॅस प्रकल्प ह्या विषयावर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळविली आहे, त्यांचे ब्रिटो मार्गदर्शक होते. बायोगॅस, सौरऊर्जा यात पर्यावरणपूरक केलेल्या महान कार्यासाठी त्यांना केंद्र सरकारने 'उद्योगरत्न' आणि 'नॅशनल अवॉर्ड' दिलेला आहे. महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीजचा 'डहाणूकर अवॉर्ड' आणि महाराष्ट्र राज्य सरकारचा 'महाऊर्जा अवॉर्ड' देऊन त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात, ’जोडोनिया धन उत्तम वेव्हारें ! उदास विचारे वेच करी!!’ या उक्तीनुसार श्री. ब्रिटो यांनी सामाजिक बांधिलकी जपलेली आहे. अनेक सेवाभावी संस्था आणि व्यक्ती यांना मदतीचा हात दिलेला आहे. आकाशात उंच भरारी घेऊनही त्यांचे पाय सदैव जमिनीवरच आहेत हेच त्यांचे वैशिष्ट आहे. सप्ताळा-राजोडी येथील ज्ञानदीप मंडळ संचालित सेंट जोसेफ कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन म्हणून चार वर्षे धुरा वाहिलेली आहे. त्या समयी त्यांनी कॉलेजच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सर्वंकष विविध नवोन्मेष सर्जनशील उपक्रम राबवून कॉलेजची प्रगती केली.

महाविद्यालयास नवीन दिशा देण्याचे भरीव कार्य त्यांनी केले. त्यांच्या चेअरमनपदाच्या कारकिर्दीत विद्यार्थी संख्या १८४६ इतकी झाली होती. आजपर्यंतचा हा उच्चांक आहे. त्यांच्या चेअरमन काळात कॉलेज आर्थिक बचतीचा उच्चांक (सरप्लस ३३.५० टक्के) गाठला गेला. संत मदर तेरेसा ह्यांची नंदाखाल येथे ६ एप्रिल १९८६ रोजी भेटीच्या वेळी मदर यांना पुष्पहार घालण्याची संधी ब्रिटो यांना मिळाली होती. हा आपल्या जीवनातील अमृतानुभव म्हणून ते नमूद करतात.

श्री. ब्रिटो हे उत्तम लेखकही आहेत. आपल्या बायोगॅस आणि सौरऊर्जा या क्षेत्रांतील अनुभवांचा धांडोळा त्यांनी आपल्या "nano britto biogas" या इंग्रजी पुस्तकात घेतलेला आहे. आपल्या वयाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने

त्यांनी आत्मपर असे ‘माझी जीवन गाथा : काही काजवे - काही काजळी’ पुस्तक लिहिले आहे. या मराठी पुस्तकाचे प्रकाशन ३० ऑक्टोबर २०२४ रोजी फा. रेमंड रुमाव यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

आपल्या उद्योगव्यवसायाची घडी सुव्यवस्थित बसविल्यानंतर त्यांनी आपल्या दोन्ही मुले ऑस्कर आणि डॉलिव्हर यांना व्यवसायात सामावून घेतले. इतकेच नव्हे; वयोमानानुसार सेवानिवृत्त होऊन आता दोन्ही चिरंजीव वडिलांचा व्यवसाय समर्थपणे प्रगतीपथावर नेत आहेत. या सर्वांच्या मागे त्यांची पत्नी सौ. कोशाव ब्रिटो सावली सारख्या सदैव त्यांच्या पाठीशी उभ्या आहेत. कोरोना काळानंतर ब्रिटो यांना एका दुर्धर आजाराने ग्रासले असतानाही त्यावर त्यांनी आपल्या चिकाटीच्या जोरावर मात करून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे पुन्हा उभे राहिले आहेत.

श्री. ब्रिटो हे यशस्वी उद्योजक जरी असले तरी ते एक कर्तव्यदक्ष पती, कुटुंबवत्सल पिता, लडिवाळ आजोबा, जिंदा दिल दोस्त आणि सामाजिक बांधिलकी इमानेइतबारे जपणारे एक समाजधुरीण!त्यांचा जा जीवनपट आजच्या तरुणांसाठी दीपस्तंभासारखा दिशादर्शक आणि मार्गदर्शक आहे.

# वसईतल्या खाद्य क्रांतीच्या जनक

■ अमर म्हात्रे, वसई

रूटीन मधून कधी वेळ मिळाला तर परिसराला १२ किलोमीटरचा एक मोठा प्रवास होतो. या दरम्यानच मुख्य रस्त्यालगत आमची शाळा दृष्टिस पडते. शाळा परीसर पाहिला की खुप निवांत वाटतं. नेहमीच तिथे थांबणं होतं. ती इमारत मन भरून पाहिली की जीव सुखावतो. या शांत वातावरणातुन आपलीच वाट धरून पायी जात असलेलं एक श्वेत व्यक्तिमत्व नेहमी दृष्टिस पडायचं.

त्यांना पाहिलं की आठवणी आणखी उजाळा द्यायच्या. मग आठवडाभर अधून मधून शाळेतले प्रसंग आठवायचे. काळओघात दूर कुठेतरी गेलेले मित्र आठवायचे. सगळं आठवून सुखावलो की पुन्हा मन या व्यक्तीच्या आठवणीत गुंतायचं. त्यांच्या ट्यूशन्स मधले सारे जुने दिवस ताजे व्हायचे.



त्या कश्या असतील? त्यांची तब्येत ठीक असेल ना? खुप मोठा काळ निघुन गेलाय. त्याचं वयही खुपच जास्त झालयं अजुन त्या जश्याच्या तश्या आहेत यावर विश्वास बसायचा नाही. त्या अजूनही सोशली इतक्या एक्टीव्ह कश्या असतील? त्यांनी स्थापन केलेलं पोळी भाजी केंद्र पाहिलं तरी त्यांची आठवण आल्या वाचून रहायची नाही. श्रीमती इंदुमती बर्वे आमच्या बर्वे मॅडम..

समाजासाठी किती करायचं? बरं ते करताना ना कुठली अपेक्षा, ना कुठली तामझाम, ना बॅनर फ्लेक्स, ना सोशल मीडिया.. अगदी अल्पावधित त्यांनी संस्थाची यशस्वी पायाभरणी केली. यात त्यांना काही महिलांचीही चांगली साथ लाभली. एका छोट्या पापड उद्योगातुन केलेली सुरवात विविध संस्था, शाखांचे वटवृक्ष कसे बनवू शकतात त्याचं हे मूर्तिमंत उत्तम उदाहरण...

महिलांचे सक्षमीकरण आणि त्यातून रोजगार किती सहज उपलब्ध केला जाऊ शकतो तो ही बिनबोभाट..

काही वर्षापूर्वी स्पेशल स्टोरी करता भेट झाली. महिला दिनाच्या विशेष पुरवणी करता ती जमवाजमव होती. एका चांगल्या व्यक्तिमत्वाच्या शोधात असताना अचानक त्यांचं नाव स्मरणात आलं. तातडीने माझी पावलं त्यांच्या घराच्या दिशेने वळली.

माझ्या सोबत आमचे स्नेही स्व. जोसेफ डिकुन्हा होते. त्याच कौलारू घरात जिथे पूर्वी आमच्या ट्यूशन घेतल्या जायच्या. त्यांना सुरुवातीलाच माझी ओळख दिली. ज्यामुळे त्यांना व मला सोपं होईल. त्या मितभाषी त्यामुळे त्यांच्या जीवनाच्या इतक्या मोठ्या प्रवासातल्या घटना, प्रसंग बाहेर काढणं थोडं कठीण होतं. तरीही सुरुवात केली. तब्बल १ तास आमच्या गप्पा सुरु होत्या. या वेळेत बर्वे मॅडम मला नव्याने उलगडत गेल्या. आपण एका देवतुल्य व्यक्तीचे विद्यार्थी राहून गेलो आहोत आणि विद्यार्थी दशेत आपल्याला त्याची सुतराम कल्पना नव्हती याचं नवल वाटलं.

कल्याण येथील त्यांचा जन्म, पेशवेकालीन असलेल्या मेघश्याम वाड्यात त्यांचं बालपण गेलं. वयाच्या सातव्या वर्षी त्यांच्या मातोश्रीचं अकाली निधन झालं. वडील आणि सोबत तीन बहिणी, एक भाऊ असा परीवार येथे वास्तव्यास होता. त्याचं शिक्षण जळगाव येथील जी एन सी स्कूल मधे संपन्न झालं. १९४० च्या सुमारास त्या विष्णुपंत बर्वे यांच्या सोबत विवाहबद्ध झाल्या. त्यावेळी अवघ्या १७ वर्षाच्या होत्या. लग्नानंतर पतीचे अल्पावधित निधन झालं. यावेळी त्यांची मुलगी तेजस्विनी सोबत होती.

१९६३ साली त्यांनी शिक्षकी पेशा स्विकारला. येथूनच त्यांच्या सामाजिक कार्याचा प्रारंभ झाला. वसईच्या लाखो विद्यार्थ्यांना घडविण्यात स्वतः शिक्षिका म्हणून त्यांचे मोठं योगदान आहे. १९४२ आंदोलनात भाग घेतला म्हणून ज्या विद्यार्थ्यांना वसईतल्या एका खाजगी शाळेतून काढून टाकण्यात आले. त्या विद्यार्थ्यांसाठी स्व. सदानंद वर्टी सर, स्व.म्हापणकर सर यांना शाळा स्थापनेसाठी बर्वे कुटुंबीयां मार्फत जागा देण्यात आली.

इथेच बर्वे एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून 'न्यू इंग्लिश स्कूल' ही शाळा उभी राहिली. वसईच्या लाखो विद्यार्थ्यांना घडविण्यात न्यु इंग्लिश स्कूल या शाळेचा आणि त्या शाळेतील शिक्षिका म्हणून इंदुमती बर्वे यांचे स्वतःचे मोठे श्रेय आहे. आर्थिक परिस्थितीने गांजलेले विद्यार्थी त्यांनी पाहिले. त्यांच्या करता काही करता येईल का? हा ध्यास त्यांना शांत बसु देईना. स्व. लीलाताई वर्टी यांच्या सहाय्याने त्यांनी शाळा सांभाळत घराच्या घरी पापड निर्मितीचा उद्योग सुरु केला. त्यास मागणी वाढली. याबरोबरच चिवडा, लाडू, फरसाण इत्यादी पदार्थांची मागणीही वाढायला लागली.

यातून येणाऱ्या नफ्यातून गरजु मुलांना गणवेश, वह्या, पुस्तके उपलब्ध होऊ लागली. मोठ्या जिद्दीने उभारलेला हा पापड उद्योग तब्बल १७ वर्षे सुरु राहिला. १९९१ साली काही होतकरु महिलांना सोबत घेऊन त्यांनी न्यू इंग्लिश स्कूल लगतच्या जागेत पोळी भाजी केंद्र सुरु केले. 'श्रमिक महिला विकास संघ, वसई' असे त्याचे नामकरण करण्यात आले. आर्थिक विवंचनेत असलेल्या महिलांना येथे काम मिळू लागले. तसेच अल्प किमतीत घराच्या सारखे

स्वच्छ, रूचकर जेवण येथे उपलब्ध झाल्याने सर्वच वर्गातील गर्दी वाढू लागली. महिला केंद्र आणि त्याची विश्वासहर्ता या बळावर पंचक्रोषीत या संस्थेचं नाव झालं.

या पोळी भाजी केन्द्राची व्याप्ती वाढली. यावेळी या केन्द्रासह ७ शाखा स्थापन करण्यात आल्या. केंद्रात येणाऱ्या महिलांच्या समस्या जाणून घेऊन कर्मचारी महिलांच्या लहान मुलांसाठी पाळणाघरही स्थापन केले. यातूनही त्यांनी रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. तसेच मैत्रेय महिला सहकारी पतपेढीही नावारूपास आणली. आज शेकडो महिला स्वाभिमानाने या विविध संस्थेत काम करतात. त्याचं श्रेय इंदुमती बर्वे यांना जातं.

आपल्या मृदु , सुस्वभावी वृत्तीमुळे केवळ वसई, मुंबईतच नाही तर साता समुद्रा पार युरोपात कॅनडा, अमेरिका, इंग्लंड मधेही त्यांनी माणसं जोडली. वैयत्तिक आयुष्यात एकटेपणा आला तरीही कणखर, खंबीरपणे त्या उभ्या राहिल्या. सामाजिक बांधीलकी जपत विविध उपक्रमातून त्या सुप्रसिद्ध यशस्वी उद्योजिका ठरल्या. इतकी प्रसिद्धी मिळूनही त्यांनी आपले पाय कायम जमिनीवर ठेवले हे विशेष...

समाजानेही त्यांची दखल घेतली. २००६ सालचा महाराष्ट्र फाउंडेशनचा किताब त्यांच्या संस्थेस देण्यात आला. कल्याण या त्यांच्या माहेर गावातून 'कल्याणची उद्योजिका' हा पुरस्कारही प्रदान करण्यात आला. वसईतला अत्यंत मानाचा समजला जाणारा 'वसई भूषण' पुरस्कार त्यांना देण्यात आला होता.

शून्यातुन विश्व साकारणाऱ्या आणि तरुणाईला लाजवेल अशी प्रचंड ऊर्जा बाळगुन शांतपणे मार्गक्रमण करणारं, विद्यादानाचं पवित्र कार्य करताना सामाजिक जाणीव ठेऊन अडलेल्या, गरीब, गरजु करता मदत करता करता विविध संस्थेचे रोपटे लाऊन त्याचं वटवृक्षात रूपांतर करणारी, पूर्णपणे निस्वार्थपणे काम करणारी अशी उदाहरणे कमीच... हा इंटरव्यू संपल्यावर त्यांच्यासह त्यांच्या केन्द्राचं फोटो सेशन केलं होतं. निघताना त्यांनी बळेबळेच पूरणपोळ्या दिल्या होत्या.

वसईच्या इतिहासात न्याय हक्का साठी अनेक क्रांती झाल्या. मात्र सामाजिक हितासाठी 'खाद्य क्रांती' करून त्यातून रोजगार मिळवून अनेक महिलांचं आयुष्य समृद्ध बनवणाऱ्या बर्वे मॅडम जेव्हा  इहलोकीच्या प्रवासाला निघाल्या. तेव्हा काही दिवस मन खिन्न होतं.

यापुढे त्या आवारात कधीच दृष्टिस पडणार नाहीत. आठवणीचा गोतावळा नेहमी प्रमाणे जमा झाला. जो काही केल्या जायला तयार नव्हता.

एक मात्र नक्की...९९ वर्षाचं इतकं मोठं आयुष्य भगवंताने त्यांना या समाजाला, अडलेल्यांना, गरजूंना भरभरून मदत करण्यासाठीच दिलं होतं.

# मालाडसॉ भैय्या !

■ पेट्रेशिया गोन्सालवीस, मराडी/ बोरीवली.

"सरजी, जरा दसवे माले की चावी दे दो.."

अंडर कन्स्ट्रक्शन असलेल्या इमारतीमध्ये दहाव्या माळ्यावर घेतलेला फ्लॅट पाहण्यासाठी गेलो होतो. तिथे असलेला वॉचमन म्हणाला,

"मॅडमजी, लिफ्ट तो आठ मालेतकही जाती है, आपको दो माला चलके जाना पडेगा."

आम्ही उत्तर दिलं, "ठीक है."

माझ्यासोबत असलेल्या बहिणीला घेऊन मी त्या वॉचमन कडून फ्लॅटची चावी घेतली. आठव्या माळ्यापर्यंत लिफ्टमधून तो वॉचमन आमच्या सोबत आला. आम्हाला सारखा निरखून पहात होता. मनस्वी त्याचा रागही आला होता. परंतु हा नित्याचाच अनुभव.. फ्लॅटचे काम पाहून झाल्यावर परत दोन माळे उतरून आम्ही आठव्या माळ्यावर आलो आणि लिफ्टमध्ये पुन्हा शिरलो, तर त्या वॉचमनने आम्हाला परत एकदा निरखून प्रश्न केला,

"आप नालासोपारासे है ना ?"

आम्ही मानेनेच होकार दिला. तर त्याने पुढचा प्रश्न केला,

"आप उंबरालासे है क्या ?"

आता मात्र आम्हाला त्याचे नवल वाटले. नवलाने त्याच्याकडे पहात 'हो 'म्हणणार, तर त्याने मला आणखीन एक प्रश्न केला,

"आप आसाजी है ना?"

आणि बहिणीचेही त्याने नाव घेतलं. आता मात्र आम्ही अजून चकीत झालो. हा कसा ओळखतो? मनातला राग कुठच्या कुठे निवळला आणि मग आम्ही त्याला विचारले,

"आप हमे कैसे जानते हो ?"

मग तर त्याने त्याची पूर्ण कुंडली सांगायला सुरुवात केली. हळूहळू आम्हाला उलगडा झाला. आम्ही त्याला पूर्ण ओळखले. इतक्यात लिफ्टही खाली आली. आम्ही लिफ्टमधून उतरलो आणि दोघींही एकासूरात ओरडलो, "अरे ऑ तर आपलॅ मालाडसॅा भैय्या."

इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. त्याची प्रगती जिद्द, मेहनत सर्व कथित करीत एक मुलगा सीए व दुसरा मुलगा एमबीए करून नोकरीला असल्याचे सांगितले. बोरीवलीमध्ये दोन फ्लॅट असून सर्व काही आलबेल असताना घरी करमत नाही म्हणून त्याने वॉचमनची नोकरी पत्करली हे तो अगदी आनंदाने आणि अभिमानाने सांगत होता. त्याचा हसत मुखाने

निरोप घेतला. मालाडच्या ह्या भय्याच्या अनपेक्षित भेटीने आम्ही बहिणी मात्र नॉस्टेल्जिक झालो आणि मग आमच्या गप्पाना नेहमीप्रमाणे उत आला.

साधारणतः १९७५-८० चा काळ म्हणजे आमचा शालेय जीवन काळ. ३०-४० वर्षांपूर्वी आमच्या गावात आपल्या काकासोबत कपडे विकायला हा भैय्या खांद्यावर कपड्याचं गाठोडं घेऊन यायचा. हिंदीत एमए केलेला हा पदवीधर तरुण नोकरीच्या शोधात मुंबईला आला होता. मूळचा उत्तर प्रदेश कडील ! नोकरी नसल्यामुळे काकाबरोबर आमच्या गावात मालाड मार्केटमधून कापड आणून तो आजूबाजूच्या गावी विकत असे. त्याचं नाव कुणालाही माहित नव्हतं. तरी पण 'मालाडसॉ भैय्या' या नावानेच त्याची ओळख होती. आमच्या घरची गरिबी, जेमतेम युनिफॉर्म व नाताळच्या सणाला एक नवीन ड्रेस, असं वर्षातून दोनच ड्रेस मिळत असत. त्यामुळे नाताळच्या सणाच्या ड्रेसचे कापड सदरहू मालाडहून येणाऱ्या भैय्याकडूनच खरेदी केले जायचे. कारण तो हप्त्याने पैसे घेत असे. एकरकमी पैसे द्यावे लागत नसत.

ह्या भैयाचे प्रत्येक गावातले वार ठरलेले असायचे. आमच्या गावात आठवड्यातून दोन वारी म्हणजेच मंगळवारी आणि शनिवारी तो येत असे. कापडाचे भले मोठे गाठोडे खांद्यावर घेऊन काकांबरोबर गावोगावी फिरून तो कापड विकत असे. ओटीवर कापडाचे गाठोडी सोडल्यानंतर आम्ही आमच्या पसंतीचे कापड निवडायचो. असे करताना कौटुंबिक गप्पाही व्हायच्या. त्याच्या काकाला चार मुली! 'हमारे मे बेटी की शादी में बहुत दहेज देना पडता है, इसके लिए इतनी सारी मेहनत करनी पडती है!' हे सांगितल्याचे आठवते. सर्वत्र एकाच ताग्यातले कापड विकले गेल्यामुळे नाताळच्या सणाच्या रात्रीच्या मिस्साला आठ-दहा जणींचे आपसूक ट्विनिंग (मॅचिंग) व्हायचे. मग पुढच्या खेपेला भैय्याला सांगायचं, 'अलग अलग कपडा लेके आओ.' यावर त्याचं नेहमीच ठरलेले वाक्य होतं "मार्केट मे माल ही नही है"

दिवाळीच्या दरम्यान कापड खरेदी केले की साधारणतः मे-जून महिन्यापर्यंत पैशाची परतफेड व्हायची. भैय्याच्या या कापड व्यवसायामुळे आमच्यासारख्या कितीतरी गरीब मुला-मुलींच्या अंगाला नवीन कपडा लागायचा. सणाचा आनंद मिळायचा. पुढे आम्ही सर्वच नोकरी व्यवसाय करू लागलो. काळ बदलला. सामाजिक परिस्थिती सुधारली. चार पैसे हातात येऊ लागले, जरा हटके कपडे असावेत, युनिक काहीतरी वापरावे, हा ट्रेंड आला. त्यामुळे हवे तसे कपडे खरेदी करू लागलो. हळूहळू मालाडच्या भैय्याकडून कपडे खरेदी करणेच बंद झाले. त्यानेही आपला गाशा गुंडाळला. कालौघात भैया विस्मृतीत गेला.

आज असा अचानक वॉचमनच्या वेशात "मालाडचा भैय्या" पुन्हा एकदा समोर दिसला. त्याने त्याच्या व्यवसायाची ती केलेली सुरुवात आज अचानक झालेल्या भेटीमुळे आठवली. गतकालीन आठवणी जाग्या झाल्या. माणुस कितीही प्रगतीच्या कळसावर असला तरी तो पाया विसरत नाही हे त्याच्या भेटीने जाणवले.

# कृतीशील 'पेरणी' फा. एलायसची

■ सिडनी जस्टीन मोरायस, नायगाव पाली
मो. - 9604385985

माणसं मरत नाहीत ती जिवंत राहतात, आठवणीच्या रूपाने. कारण ते चांगल्या संस्कारांची 'पेरणी' करून गेलेले असतात, कुणाच्या मनात तर कुणाच्या हृदयात. असाच एक कर्मयोगी जनमाणसात खिस्ताची सुवार्ता गाजवून आध्यात्माची पेरणी करणारा **स्व. फादर एलायस रॉड्रीग्ज** !

'गास रे गास तिथं सोन्याची रास' हया सोन्याच्या राशीतून निपजलेले हे शब्दकोषाचं एक माणिक. आपल्या बुध्दीमत्तेचं दान स्वत:पुरतंच न ठेवता अनेकांचे जीवन सुसंवादी सुरमयी होण्यासाठी वापरले व अनेकांची जीवनं ख्रिस्ताच्या शिकवणूकीने हिऱ्याप्रमाणे चमकवली ते हे **फा. एलायस** !

६ नोव्हेंबर १९७१ ला हा उंच धिप्पाड असा तरूण खिस्तसभेत सुवार्तेची पेरणी करण्यांस दिक्षित झाला आणि ७ महीने पाली चर्चला स्व. रेव्ह. फा. पिटर गोम्स हया अमराठी गोवन पॅरीश प्रिस्टच्या सहाय्याला आले, त्यांची १ जून १९७२ पासून नंदाखाल चर्चमध्ये सहाय्यक धर्मगुरू म्हणून नेमणूक होईपर्यत. ७ महिन्यात 'पाली दिलवाली' असल्याचा अनुभव घेऊन गेले ते हे **फा. एलायस** !

१९७१ साल माझ्या तारूण्याचा काळ. मी शुभवर्तमान पॅरिश प्रिस्टना वाचून दाखवी. ते गोवन भाषेत वहीत लिहित. ती वही वेदीवर बायबलमध्ये गुंफवून ते शुभवर्तमान वाचत. तिच नक्कल त्यांनी 'मिस्साएल' ची केलेली. त्यामुळे भाविकांना वाटे फादरांना मराठी वाचता येते. हे पाहून फादर एलायसला हसू ही आले आणि पॅरीशनर्सची कीव ही आली की, १० वर्षात तुम्ही धर्मगुरूंना मराठी वाचायला शिकवले नाही ? मग ७ महीने फा. एलायसने वेदीचा ताबा घेतला. शुभवर्तमान प्रवचने सुचना अस्सखलीत मराठी भाषेत ऐकण्याची संधी पालीवाशियांना दिली ते हे **फा. एलायस**!

१९७१ ची खिस्तजयंती, १९७२ सालची उपवासकालीन पासाची प्रवचने, पवित्र आठवडा पालीकरांसाठी जणू आध्यात्माचा वसंतऋतूच होता. त्या वर्षी प्रथमच पालीला 'उपवासकालीन समाचार पत्र' प्रकाशित केले. मला लिहीते केले. 'आशेचा उपवासकाळ'

हा माझा पहिला लेख फादरांनी संस्कारीत करून छापला. मला हाताशी ठेवून छपाईचे काम केले. माझ्या लेखणीस प्रथम प्रसिध्दी देणारे ते होते **फा. एलायस**!

जगण्याला ग्रहण लागलेली त्या काळातील गरीब जनता. माणसं भयभीत झाली होती. आयुष्य आजच्या इतकं सुरक्षित व सुसंपन्न नव्हतं, गरीबी आ वासून उभी होती. जेव्हा नव्या समस्या, नवे प्रश्न उभे राहतात तेव्हा समाजात धीराचे शब्द पेरणारे ज्ञानी लोक देव पाठवतो. खिस्ताच्या विश्वासाची पेरणी करण्यासाठी. त्या ७ महिन्यात 'पवित्र आत्म्याची आराधना' प्रार्थना संघ सुरू केला, त्यांचे शास्त्र निरूपण, प्रबोधन याची ख्याती परीसरात पसरली व गुरुवारच्या प्रार्थना सभेस मुळगाव, पापडी व कोळी समाज हयांची उपस्थिती वाढली. नवोदित धर्मगुरूंच्या पवित्र हाताच्या स्पर्शाने पवित्र आत्म्याचे दान स्विकारण्यास लांबलचक लाईन असायची ते होते **फा. एलायस** !

पुढे वसई धर्मप्रांत स्वतंत्र झाल्यावर सुमारे २० वर्षे त्यांनी कॅरीजमॅटिक चळवळीचे नेतृत्व केले. 'बायबलचे मराठी अवतार' हयावर त्यांनी डॉक्टरेट केली होती. त्याचा लाभ वसईच्या श्रद्धावंताना दिला. स्तुती आराधनेसाठी विविध प्रार्थना पुस्तके प्रकाशित केली. प्रत्यक्ष अनुकरणही केले. 'आधी केले मग सांगितले' हया उक्तीप्रमाणे जीवन जगून अनेकांच्या जीवनाला नवी दिशा दिली ते हे **फा. एलायस**!

हया साहित्यीक तत्वज्ञानी धर्मगुरूने आठ वर्षे सुवार्तेची संपादक म्हणून धूरा सांभाळली. मी लीजन ऑफ मेरी संस्थेचा वसईचा अध्यक्ष होतो त्या संस्थेच्या कार्यक्रमाच्या बातम्यांना ते प्रसिद्धी देत. माझे पाच ललीत लेख त्यांनी संपादकीय संस्कार करून छापले व मला लेखक झाल्याचा गर्व झाला. १५ ऑगस्ट १९८२ फक्त सुवार्ता वितरकांचा मेळावा गिरीज चर्च हॉलमध्ये भरवला. मला प्रमुख वक्ता म्हणून बोलावले 'सुवार्ता वितरण हे माझे प्रेषित कार्य आहे' हया विषयावर मी वितरकांना प्रबोधन केले. माझी वितरक प्रमुख म्हणून नेमणूक केली. सप्टेंबरच्या अंकात माझे भाषण फोटो सहित छापून आले, ज्याचे कात्रण मी अजूनही जपून ठेवलंय. मला सुवार्ते मधून प्रसिद्धी देणारे हेच ते **फा. एलायस** !

भारतीय कॅथोलिक पत्रकार परिषदेचे ते बोर्ड सदस्य व खजिनदार झाले व प्रोटेस्टंट पंथीयांना पचित्र मरियेचे महत्व पटविणे त्यांना एकत्र आणणे यासाठी त्यांनी ज्ञानोदय हया प्रोटेस्टंट मासिकातून केलेले प्रबोधन त्यांच्यासाठी लिहिलेले 'नव्या करारातील खिस्ती समाज' हे पुस्तक अवर्णीय. **फा. एलायस**चे !

१३वी 'महाराष्ट्र मराठी खिस्ती साहित्य परिषद २९ व ३० डिसेंबर १९८४ ला मुंबईला भरली होती. त्याचे अध्यक्षपद फा. एलायस ना दिले. त्या संमेलनाचा आयोजनाचा भाग म्हणून मलाही फादरांनी सहभागी केले. त्यामुळेच आज मी वसई मराठी खिस्ती साहित्य मंडळाचा खजिनदार आहे त्याचे श्रेय **फा. एलायस**ना !

आणि आमचं नातं दृढ़ झालं : 'अजून वेळ टळली नाही' हा माझा हृदयस्पर्शी लेख. मी सुवार्तेला पाठविला. फादरांनी वाचून मला बोलावले. माझ्या बहिणीवर विवाहाच्या काही वर्षातच घडलेला प्रसंग सांगितला. ज्यामुळे ती विधवा झाली, तिच्या दोन लहान मुली माझ्या पदरात आल्या. आता माझं लग्न कसं होणार? मी चिंताग्रस्त झालो! फादर म्हणाले, “सिडनी, हया लेखातून तुझा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक आहे. धीर धर, हे ही दिवस जातील.” असे धीराचे शब्द सांगणारे होते **फा. एलायस** !

'लीजन ऑफ मेरी' हया संस्थेतून कार्य करताना गासातील फादरांचे भाचे आलेक्स घोन्सालविस हयांच्याशी माझी मेत्री झाली. आम्ही एकमेकांच्या घरी येऊ जाऊ लागलो. माझ्या पदरात असलेल्या दोन भाच्या मीना, विना माइया घरी येऊन राहणाप्या हया माझ्या मित्रालाही 'मामा' हाक मारू लागल्या. पुढे मित्र आलेक्स सेमनरीत दाखल झाले. धर्मगुरू झाले. पण मैत्री अबाधित ठेवली अगदी घरापर्यत! माझ्या भाच्यांना दोन मामा मिळाले. आमचे नातेसंबंध घट्ट झाले. माझ्या लेखनाला प्रसिद्धी देणारे दूरदष्टीचे **फा. एलायस** !

९ फेब्रुवारी १९८६ चा तो सोनियाचा दिवस उजाडला ! भाबोळा येथील सेंट अगस्टीन हायस्कूलच्या भव्य पटांगणात एक पहाडी आवाज आसमंतात दुमदमला! "पहा तो येत आहे! सिंहासनावर आरूढ़ होऊन येत आहे! तुमच्या भेटीला येत आहे! ... !! आणि पोप जॉन पॉल दूसरे याचे वसई भूमीवर आगमन झाले. वक्तृत्वाचं दान दिलेल्या हया निवडलेल्या प्रेषिताची त्या दिवशी सुत्रसंचालन करण्यास निवड झाली होती. हा बहुमान मिळाला ते होते **फा. एलायस** !

फा. एलायस तुमचं संपूर्ण समर्पित जीवन वेदीवरून, रिट्रिट मधून, विविध प्रार्थना संघातून, भव्य अशा पवित्र आत्म्याच्या ठायी नवजीवन प्रार्थना मेळाव्यातून, उपवास काळीन प्रवचनातून, खिस्ताची सुवार्ता 'पेरण्यातच' गेले. तुम्ही बोलत रहावं आम्ही ते ग्रहण करावं. सुरेल सुरेख शब्दात तुम्ही खिस्ताच्या सुवार्तेची 'पेरणी' केलीत ज्यामुळे अनेक तरूण तरुणी खिस्ताच्या मळयात कार्य करण्यास गेल्या. तुमचा भाचा आलेक्स ही तुमच्या पाऊलावर पाऊल टाकूनच चालत आहे. अनेक शिक्षण संस्थाना वरदान ठरला आहे. असे हे वकृत्वाचे, नेतृत्वाचे वरदान लाभलेले **फा. एलायस** !

१४ फेबुवारी २०२१, रोजी ३४वा 'दिव्यांग मेळावा' माफी ट्रस्ट वाघोली येथील श्री. पीटर फर्नाडिस याच्या प्रांगणात पार पडला. त्याच्या घराचे कंपाऊंड मर्देस चर्च रोडला समांतर होते आणि त्या वर्षी आपण मर्देस चर्चचे पॅरिश प्रिस्ट होता. म्हणून मेळाव्यास सहाय्य होण्यासाठी मी तुमच्याकडे आलो. तुम्ही खुर्चीवरून उठून उभे राहिलात. "सिडनी हया मेळाव्यासाठी चर्चचे पटांगणच नव्हे तर चर्चही पूर्ण दिवस खुले राहील मला ऐकूणच आनंद झाला. आम्ही दिव्यांगाचे मैदानी खेळ चर्चच्या पटांगणावर घेतले. तुम्ही पॅरीशच्या युवक संघटनेकडे हया खेळाचे नेतृत्व दिले. समारोपाच्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून प्रबोधन करताना 'दिव्यांग' माता पित्याची हृदय हेलावून टाकणारे शब्द 'पेरले'.

त्यांच्या पंखाना शब्दातून बळ देणारे, त्या दिवशी प्रसिद्ध केलेल्या स्मरणिकेतून 'दुखितांचे तिमिर जावो' हा लेख लिहून दिव्यांगाना जिद्द देणारे आपण अद्वितीय **फा. एलायस** !

आव्हानात्मक जीवन जगणारा प्राप्त परीस्थितीचा स्विकार करणारा हा 'स्वामी' भुईगाव पॅरिशच्या लोकांसाठी नव्या चर्चचे आव्हान करतो. अर्थाजनाचा पाया रचितो मात्र वरीष्ठाची आज्ञा ग्राह्य मानून आपली रिकामी झोळी घेऊन वेलंकणी मातेच्या विसाव्याला मर्देस चर्चला जातो. मात्र भुईगावकर आजही नव्या चर्चच्या पायाभरणीचे शिल्पकार तुम्हाला मानतात त्याचे श्रेय देतात **फा. एलायस**ना !

६ फेब्रुवारी २०२० रोजी बॅसीन कॅथोलिक बँक मुख्य कार्यालयाचा भूमीपूजन म्हणजे आशिर्वाद विधी तुमच्या पवित्र हातांनी व्हावा. हे तुमचे भाग्यच म्हणावे. लवकरच मुख्य कार्यालय अस्तित्वात येईल त्या कार्यालयाच्या अग्रस्थानी लागलेल्या मार्बलवर जागेचा आशिर्वाद विधी करणारे म्हणून नाव अजरामर राहील तुमचं **फा. एलायस रॉड्रीग्ज** !

२९ जून २०१४ रमेदी चर्चच्या प्रांगणात संपन्न झालेला 'पेरणी' पुस्तकांच्या पहील्या खंडाचा विमोचन सोहळा आमच्या डोळयाचे पारणे दिपूनच गेला. संपूर्ण भुईगांव पॅरीश फुलांची उधळण नी स्तुती सुमनांची पेरणी करत उभा केलेला तो प्रकाशन सोहळा म्हणजे तुमच्या नेतृत्वाची खरी झलक होती. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' ख्रिस्ताचा प्रकाश पेरणारा अद्वितिय असा **फा. एलायस** !

गुरुवार ६ नोव्हेंबर २०१४ रोजी तुम्ही पेरणी पुस्तकाचा दूसरा खंड समाजासाठी प्रकाशीत केलात तुमच्या जन्मदिवसाची साक्ष देणारी ही पेरणी होती. वधस्तंभावर शेवटचे क्षण मोजताना ख्रिस्त उजव्या हातावरील चोराला उद्गारले, “तू आज माझ्यासोबत स्वर्ग लोकात असशील.” खिस्ती प्रणालीची 'पेरणी' करणाऱ्याने ही हाक ऐकली ७ नोव्हेंबर २०२३ रोजी स्वर्गाच्या वाटेवर निघाले. पेरलेलं उगवले आहे ते पाहण्यासाठी **फा. एलायस**!

प्रिय **फादर एलायस**, आयुष्य हे प्रेम करण्यासाठी असते. हेच सांगत तुम्ही अखंड प्रवास केलात तुम्ही धर्मगुरू होऊन यशस्वीपणे पेरणी केलीत. थांबावंसं वाटलं तेव्हा थांबलात त्या क्लर्जी होममध्ये हे असं थांबण म्हणजे मृत्यू नव्हे. कारण तुमच्या जीवनातील विचारांच्या 'पेरण्या' ने हजार पट पीक आले आहे. तुमच्या अमरत्वाची साक्ष देत आहे.

# अन् आदिती डॉक्टर झाली

## (बाबांचं हृदगीत)

■ भरत वाळींजकर, नालासोपारा प.
फोन - 9869461011

"देवा काय मागू तुला, भाग्य दिले तू मला" अगदी अशीच अवस्था झाली माझी. आनंदाने उचंबळून येणं म्हणजे काय असते, हे मी प्रत्यक्ष अनुभवत होतो. 'आनंदाश्रू'चा आनंद घेत होतो. डोळ्यातलं समाधान टिपत होतो. परमेश्वराने अगदी मुक्तहस्ते हे भाग्य आम्हाला दिलं होतं. लाडक्या आकाशनंतर आज माझी लाडली आदिती डॉक्टर झाली होती. MBBS डॉक्टर. एक प्रतिष्ठित पदवी तिने संपादित केली होती.

१८ सप्टेंबर माझा वाढदिवस आणि १९ सप्टेंबर २०१६ ह्या शुभदिनी चार लाखातून जे ६३०० विद्यार्थी एमबीबीएस पदवीसाठी पात्र ठरले, त्यात माझी लेक होती. अहोरात्र अभ्यास करून मेहनतीने आपल्या बुद्धिमत्तेने तिने हा प्रवेश मिळवला होता. मला वाढदिवसाची अनोखी पण हवीहवीशी वाटणारी भेट मिळाली होती.

मला आताही आठवते त्यावेळेस कोर्ट व आरोग्य संचनालय ह्यामध्ये चाललेला घोळ. CET की NEET परिक्षा ह्यामध्ये मुलांचे खरेच हाल झाले होते. पालक म्हणून आम्हांला ते खूप जाणवत होते. माझ्या आदितीने दोन्ही परिक्षा दिल्या आणि NEETच्या माध्यमातून प्रवेश मिळविला. मला अजूनही तो क्षण आठवतो. ५ सप्टेंबर २०१६, ज्या दिवशी आदितीला प्रवेशाबद्दल समजणार होतं. मी जरा लवकरच उठलो. मनाला हुरहुर, धाकधुक आणि उत्सुकता साऱ्या भावना एकाच वेळेस जाणवत होत्या.

परमेश्वराचं नामस्मरण केलं आणि मोबाईलवर लॉगिन केले. सिट नंबर पाठ होताच. स्क्रिनवर लगेचच आदितीचा ॲडमिशनचा मेसेज झळकला, जळगाव मेडिकल कॉलेज...

सौ. दिपा व आदिती अजून गाढ झोपेतच होत्या. जणू काही त्यांना ॲडमिशनची खात्री होतीच. मी त्यांना उठवून ॲडमिशनविषयी सांगितलं. त्या खुश झाल्या. लगेचच प्रवासाची तयारी केली. आकाशने सारी काही माहिती काढली. आणि आम्ही जळगावला पोहचलो. खूप छान आणि मोठ्ठा परिसर होता. प्रवेशाचे सारे सोपस्कार पूर्ण केले आणि आदितीचा एमबीबीएसचा अभ्यास सुरु झाला.

नवीन जागा, नवीन अभ्यास, नवीन मैत्रिणी थोडक्यात एका पूर्णपणे नवीन वर्तुळात तिने प्रवेश केला. तिथेही तिने आपल्या आवडीनिवडी जपल्या. डान्समध्ये हौसेने भाग घेतला. कॅरमस्पर्धा जिंकली. गरबा खेळली. सांस्कृतिक कार्यक्रमात आपला ठसा उमटविला. चक्क सिआर झाली. नेतृत्व केलं आणि आपले मुख्य ध्येय अभ्यासाचं, तेही रात्रंदिवस मेहनत करून यशस्वीपणे पूर्ण केलं.

का नाही वाटणार अभिमान माझ्या लेकीचा मला. १८ एप्रिल २०२१ रोजी परीक्षा संपवून आदिती घरी आली. घरी मग रोज दिवाळीच. लॉकडाउनमुळे सौ. दीपा पण घरीच होती. आकाश पण आला होता. चिकन, मटण, पापलेट, हलवा, कर्दी, वाव, आमरस, शहाळाचं पाणी, ताडगोळे, कोथिंबीर वडी इ. सारं अगदी तिच्या मनासारखं.

२६ एप्रिल २०२१. हनुमान जयंतीचा पवित्र, मंगल दिवस. रात्रीचे साधारण नऊ वाजले होते. सोनी टिव्हीवरचा ‘स्वराज्य जननी जिजामाता’ कार्यक्रम नुकताच संपला होता. शिवराय माझे दैवत. एकदा दैवत्व बहाल केल्यावर श्रद्धा ही आलीच. नुकताच ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ सुरु झाली होती. समीर चौगुले, विशाखा सुभेदार, प्रसाद खांडेकर इ. पट्टीचे विनोदवीर. मजा येते.

थोडया वेळाने आदिती हॉलमध्ये आली. तिचा चेहरा थोडा अधिकच खुललेला दिसतो. "पप्पा रिझल्ट लागला. "काय !" खरं म्हणजे तिच्या खुललेल्या चेहऱ्याने रिझल्ट समजला होता. तरीही मी सरसावून बसलो. तिने माझ्या हातात तिचा मोबाईल दिला. स्क्रीनवर तिचा रिझल्ट होता. आदिती भरत वाळींजकर --- पास. तिच्या संपूर्ण कॉलेजचा रिझल्ट होता तो. तिने (७२ %)प्रथम श्रेणी मिळवली होती.

माझ्या डोळ्यात अगदी सहजपणे पाणी आलं. कधी कधी भावनेला नाही आवरता येत. नैसर्गिक असतं ते. आनंद, समाधान, अभिमान साऱ्याच भावना डोळ्यात एकवटल्या. आमची लाडली आदिती आज डॉक्टर झाली होती. सौ. दिपाला हाक मारली. "अग आपली आदिती डॉक्टर झाली. आत्ताच रिझल्ट लागला. फर्स्ट क्लास. अभिनंदन आईचं.” सौ. दिपाचा चेहरा खुलला. आपल्या लेकीच्या ह्या

धवल यशाने आईचं मन भरून आलं. मनोमन ती सुखावली. "चला, पहिलं देवापुढे साखर ठेऊया." सर्वांच्याच मनातलं ती बोलली.

देव्हाऱ्यात साखर ठेवली. त्या सर्वज्ञानी परमेश्वराला आम्ही सांगितलं. "आज आदितीचा रिझल्ट  लागला. ती फर्स्ट क्लासने पास झाली. डॉक्टर झाली. तुझे मनोमन आभार." देव्हाऱ्यातील सारे देव थोडे अधिकच प्रसन्न वाटले. त्यांची प्रसन्नता मनोमन जाणवली.

"झाले मनासारखे. आज दोन्ही डॉक्टर मुलांचे आईबाबा झालात."

"आपली कृपा परमेश्वरा”

दोन मिनिटे डोळे मिटले. ध्यानस्थ झालो. कृतकृत्य झाल्याचं एक वेगळंच समाधान शरिराला अन् मनाला जाणवलं. कर्तव्यपूर्तीचा आनंद ल्यालेल्या आदितीने आमच्या दोघाच्या हातात साखर ठेवली अन मनोभावे आम्हास नमस्कार केला. "यशस्वी भव: सुखी भवः"



“चल आधी आकाश भाऊला मेसेज कर.” मेसेज करताक्षणी दोन मिनिटात डॉक्टर आकाश भाऊचा फोनही आला. कित्ती उत्तेजित झाला होता तो. आपल्या लाडल्या बहिणीच्या उज्ज्वल यशाने भरभरून बोलत होता. खूप छान वाटलं. नंतर शुभांगी आत्या. तिचा स्वर किती भावनावश झाला. "चिमणी डॉक्टर झाली." खुप आनंद झाला. बराच वेळ बोलत होती. महेश, सायली, सौरभ साऱ्यानी कौतुक केलं.

हेमा आत्या, खळाळून हास्य. आनंद जाणवला. भास्कर भावोजी, ओम साऱ्यानींच अभिनंदन केले.  आदिती कौतुकात न्हाहत होती . अगदी विनम्रपणे कौतुक स्विकारत होती. मग किसन दादा, वहिनी, सागर भाऊ, रितू... साऱ्यांनी अगदी आलिंगन देवून आपला आनंद व्यक्त केला.

सागर, रितू, आकाश आणि आता आदिती एका प्रभूकृपा वास्तूत चार डॉक्टर ! तिची लाडकी सुधा मावशी.. तिच्या बोलण्यातूनही कौतुक ओसंडत होतं. कसं कौतुक करु कसं नको असं तिला झालं होतं. त्या स्वतः डॉक्टर असल्यामुळे शिक्षणाचं महत्व जाणून होत्या. त्यांच्या मार्गदर्शनाचा आदितीला नेहमीच फायदा झाला. वंदना मावशी, जयश्री मामी, तसेच नंदूमामाने भरभरून कौतुक केले. घरात अगदी आनंदाच वातावरण होतं. रात्रीच्या जेवणाचं आता लक्षातच नव्हतं. शेवटी १०.३० वाजता जेवलो थोडफार. कारण पोट आधीच आनंदानं भरल होतं.

नंतर आदिती रात्री बराच वेळ सानिका, देवश्री, कॉलेजच्या मैत्रिणींबरोबर बोलत राहिली. दुसऱ्या दिवशी मी ग्रुपवर पोस्ट केलं. "आपणा सर्वांच्या आशीर्वाद अन शुभेच्छाने आदिती एमबीबीएस डॉक्टर झाली.” आणि मग दिवसभर अभिनंदनाचे मेसेज अन फोन येत राहिले. रॉकस्टार ग्रुपने  तर  डीपीवर आदितीचा फोटो ठेवला.

"Congratulations Dr. Aditi Bharat Walinjkar."

ऑफिस, ट्रेन, गावातील अगदी प्रत्येकाने आदितीचे अभिनंदन केले. बाबा म्हणून मन आनंदाच्या झोक्यावर बराच वेळ झुलत राहिलं. खूप आनंद, समाधान वाटलं. सध्या डॉ. आदिती नायर कॉलेजमध्ये एमडी (पेडेक्ट्रीस) करत आहे.

# What's stopping you?

■ **Savin Tuscano, Nandakhal**

How to get into films? How to make my first film? How to become a film maker or be associated with films or in creative field? My son loves editing, acting, he/she is constantly on phone doing something or the other.

Today the major population of India is on smart phones and creating content, how can we set apart from the crowd?

Let me take you back to the day I started off, after getting my formal training in aspects of film making, I volunteered myself to be on a film set and to work for free, it was amazing to observe Ashutosh Rana and Tara Deshpande acting, but idea was not to get star struck, my interest was to see how the cinematographer was operating on the sets, how is he cutting the light and avoiding multiple shadows, how does a director speak to the art team, how he runs the set, how a costume stylist convinces the actors for a particular outfit, how action director and choreography team work? How to stand when an action scene is shot. I thought to myself, these lessons were never taught in any film school, my formal training started on a film set.

Joined as an intern in an ad film production house as a 3$^{rd}$ AD and promoted myself in 2 years to become the 1$^{st}$ AD, my mind was full of ideas and inputs but the best thing to do was to shut up and listen to the seniors and speak when you are asked to, on AD film set I learnt the most important skill of my life which is observation, what were we supposed to observe?

What brand of cigarette our client smoked? How many left in his packet? Quickly get one before it's over. Is a lighter kept handy? Is there a clean ash tray? Never stand in the line for food first in lunch break, make sure you feed yourself and be the most invisible person on set, always be ready for the worst-case scenario because that's the only confirmed thing that will happen, always go with solutions never go with a problem to the director. These observations and life lessons no school can teach but then, I think our Kupari upbringing was a major factor in this nature, because as kids we were responsible and trained in the village weddings about man manage-ment, how many guests are expected, how many kgs of mutton and chicken for 1200 guests, how many whiskey bottles and beer bottles? Who will bring the ice and chill the beers, what time to put them on the ice tub for it to be chilled by 7:45pm, who will go at the bride's house? Who will distribute the vade and fugey? Who will get the cake? coordination with the decorator and the stage guy!

We Kuparis have done and learnt the production from very early stage! This is the best management course you can ever have! We are born jugadus!

So, on a set of 150 people never felt like a challenge, always had a smile on my face and an idea, jugad or a solution in my head on the film set, got promoted to be the associate director in two years.

I started cutting the extra film reel which was unused and made a good two-hour worth of raw stock and decided to shoot my first public service ad film idea which I had in my mind, the film was called Kho Kho and it became a sensation then for its punch lines, people in studios used to take VHS copies of it and show it to each other and have a great laugh over it, till date I am reminded of some lines.

One VHS tape landed in Yash Raj films and coincidentally they were looking for an Associate director for the AD cell department they were starting off, I did the interview, and the director Arjun Sablok liked my resume etc and when I mentioned him about the film Kho Kho, he immediately responded, oh you have made it? Man, we all cracked up here and have watched it on loop, that one effort landed me a job in India's biggest studio YashRaj films.

On my very first AD film in YRF got to give dialogue cues to Amitabh Bachchan my purpose in life was fulfilled, that was the happiest day of my life and after that best three years of my life to have worked with the AB and many other super stars, I was part of Dhoom promotions and that's where I met the director of Dhoom Mr. Sanjay Gadhvi who gave two biggest hits of Yashraj and when he decided to move out of YRF he offered me to join him as his associate director and that gave my career a huge boost, having worked with him gave me the confidence to direct my first feature film Vroom for Fox TV. Yashraj films director Arjun Sablok called me back with him as he was starting his own production house and he wanted me to be with his as his creative director, it was a big role.

One day we were called to UP to meet a Young Politician Mr. Akhilesh Yadav to direct a show for Saifai Mahotsav, I wrote the script for the show added the performances and booked all the best stars to perform for the event as the Saifai Mahotsav was cancelled the previous year due to differences between Mulayam Singh Yadav and Amar Singh. We made the show a huge success. Akhilesh mentioned of the state elections that were to follow in 2012 can we do something for him? We started brainstorming and took an initiative to shoot a film for Samajwadi party the idea was to show how the opposition party BSP was slow in their progress, the elephant vs cycle film was

shot, we spent from our pockets and shot the film and presented it to Akhilesh Yadav, he loved the film.

We got the entire campaign for Samajwadi party elections, I spent an entire year to research the state of UP shot some amazing testimonials of the people of UP and the campaign made huge waves, Akhilesh became the youngest chief minister of UP we got featured in Outlook magazine and many other leading publications took notice of our work for Akhilesh, the next 5 years were spent in UP working on the government campaigns and infrastructure. The Metro, the Agra-Lucknow expressway was built in his tenure we made the Home of Taj campaign for UP tourism, and it was loved by one and all, in 2014 Modi wave took over and it washed away the entire nation and it will continue till 2029,

I directed my 2 animation films for Fabelizer and the AD film campaigns kept us busy, right from the launch of India Today news channel to Hindustan times Mint, Shree Om Steel brand campaign all this lead to the latest campaign for our very own Bassein Catholic Co-Operative bank which I feel is a very personal project as I am the customer and the agency both and I very well know where we should head with this, hence had an idea of a Brand Ambassador for BCCB bank, what does it take to make BCCB a 100 year old trustworthy bank, it's the people and the customers and who is a better brand ambassador than the customer himself, hence the teaser and the reveal in Suvarta magazine this December. The customer testimonials to follow where they speak about their journey with the bank.

I personally feel that branding marketing or any product works when there is an emotional or a personal connect to it.

I am working as an educator with some institutions in Mumbai like Whistling woods international, ITM IDM, Manthan design school where I tell the students and also to the

friends who ask for suggestions about how to be a filmmaker, editor, writer, actor etc.

I tell them what is stopping you? We live in the time and age where we are equipped with the best film making tools in our hands and the best audience, no one is waiting for us to give us breaks, if you want to be a all of the above start "READING" first it will open up your mind to the world only you can imagine, as it's not influenced by anyone else.

The next step is to start posting on your social media, make your short films and post, write short articles, make small acting showreels we will realise where we stand, Covid kept everyone at home but it opened a new door for my creativity to make madlips videos where I wrote and dubbed short gags of 15 seconds and kept my fluids running, got great reviews from people who were in lockdown, where they told me when we were in quarantine, your videos gave us a reason to smile and come out of depression we used to wait for the videos everyday, I counted them and I saw I had made 127 videos in that period, nothing can stop us in today's times, if it's in you, make sure it's put out there and expressed, you will know how good or bad you are.

Facebook, YouTube, Instagram has given our community award winning writers, Vloggers and influencers the time is now, We are blessed to be born in these times where AI is available to make our lives easier, use it as a tool put out your work, don't be afraid to fail and experiment, it's better to do and fail then to have not attempted at all.

Our community and India is growing every second!
What's stopping you?

# बाबूल मोरा

■ डॉ. अनुपमा उजगरे, ठाणे

साहित्य अकादमीच्या कार्यक्रमानिमित्त दिल्लीला जायचं ठरल्याबरोबर 'आता ह्यावेळी अमृतसर नक्की' अशी उसळी माझ्या मनाने घेतली. त्यासरशी मी लगेच बेळगावला मीराला फोन लावला. माझा बेत सांगून म्हटलं, "बघ तुला सोयीस्कर आहे का ते, नाहीतर मी एकटी तर जाणारच आहे." हे मी कुठल्या जोरावर बोलून गेले होते कुणास ठाऊक ! मीराने सगळ्या सफरीच्या प्लॅनिंगची जबाबदारी आनंदाने माझ्यावर सोपवून आपण यायला एका पायावर तयार असल्याचं ताबडतोब सांगितलं.

मी मग उत्साहाने अमृतसरची माहिती मिळवण्याच्या कामी लागले. पुढच्या रविवारी चर्चची पायरी चढण्याऐवजी मुलुंड कॉलनीच्या गुरुद्वाराची पायरी चढले. तेव्हा नेट नव्हतं म्हणून नेटाने घरापासून चेकनाका, चेकनाक्यापासून ह्या गुरुद्वारापर्यंत दोन रिक्षा करून आले खरी, पण इथे लग्नाचं जेवण उरकून वऱ्हाडी मंडळीची पांगापांग व्हायला सुरुवात झाली होती. स्त्रियांचा समावेश असलेल्या सरदारजींच्या घोळक्याकडे मी माझा मोर्चा वळवला आणि सुवर्णमंदिर, बाघा बॉर्डर, जालियनवाला बाग इथे कसं जायचं, राहण्याच्या काय सोयी आहेत, वगैरे विचारलं.

"आधी पत्र पाठवून रूम बुक केलेली अधिक बरं ना?" मी विचारलं.

"ना जी ना. उसकी कोई जुरुरत नहीं है. और वे ठहरे सब सरदार. पता नहीं चिठ्ठी पढेंगे भी या नहीं. आप जाओ ऐसेही. जगहकी कोई कमी तो वहाँ है नहीं. अरामसे मिल जायेगी."

"वे ठहरे सब सरदार" हे एका सरदारजींच्याच तोंडून ऐकताना गंमत वाटली.

"आपको तो यह जानकारी ठाणेके हायवे पर जो गुरुद्वारा है, वहाँ भी मिल जाती, आप इतनी तकलिफ उठाकर यहाँ तक आयीं?"

तो हुश्शार सरदार म्हणाला तेव्हा खरंच हे आपल्या कसं लक्षात आलं नाही, असं वाटून गेलं. मुलुंड कॉलनीतलं हे गुरुद्वारा माहीत होतं. इथे दोन वर्षं राहिलो होतो, येण्याजाण्याच्या वाटेवर होतं, म्हणून पाय इकडेच वळले. उत्साहाच्या भरात द्राविडी प्राणायाम घडला होता खरा. मग परतताना आता मिळालेल्या माहितीची खात्री करून घ्यावी, काही नवी माहिती मिळाली तर पाहावी म्हणून ठाण्याच्या गुरुद्वारातही जाऊन आले.

कुठलाही पूर्वसंपर्क न साधता ठरल्याप्रमाणे मी आणि मीरा अमृतसरच्या विमानतळावर उतरलो. बाहेर पडतापडता एक सुखवस्तू पंजाबी वृद्धा माझ्याकडे पाहत असलेली दिसली. हिच्याकडून खरेदीची ठिकाणं माहीत करून घेता येतील म्हणून 'नमस्ते जी' म्हणत मी तिच्याशी बोलायला सुरुवात केली. तीपण खुलून बोलली. मग म्हणाली,

"आप पंजाबी नहीं दिखती?"

"जी, मैं महाराष्ट्रसे आयी हूँ."

"ओह! महाराष्ट्र के लोग बहोऽऽत अच्छे होते हैं। एकदम साफ दिल. हमारी पंजाबी औरतें ऐसी नहीं होती हैं।"

तिचे हे कवतिकाचे बोल ऐकून माझ्या मराठी मनात हर्ष माईनासा झाला. त्याचवेळी हेही जाणवलं की, माझ्या महाराष्ट्रदेशाची ही चांगली प्रतिमा जोपासण्याबाबत मी दक्ष राहायला हवं.

अमृतसरच्या लहानशा विमानतळावर उतरलेले प्रवासी आपापल्या बॅगा ताब्यात घेतल्यावर दहा-पंधरा मिनिटांत पांगले अन् सगळं सामसूम झालं. टॅक्सीची चौकशी केली तर, गुरुद्वारापर्यंत थोडेथोडके नाहीतर चांगले पाचशे रुपये! बाहेर टॅक्सीचे रेट्स कमी असतील किंवा घासाघीस करता येईल म्हणून आम्ही बाहेर जाऊ लागलो तर, टॅक्सी काऊंटरवरच्या पावत्या फाडणाऱ्या त्या भरभक्कम सरदारजीने मळ्यात द्यावी तशी मोठ्ठ्याने हाळी दिली,

"ओ मैडमजीSSS, पर्ची फाडी है। पाँचसौ देकर ले जाईये. बाहर कोई टैक्सी वैक्सी मिलनेवाली नहीं।"

त्याच्या म्हणण्यात कितपत तथ्य होतं, देव जाणे! पण बाहेरचा टॅक्सीवाला तरी कशावरून भरवशाचा असेल? हा निदान विमानतळावरचा अधिकृत तरी आहे. काही झालं तर ह्याला जबाबदार धरता येईल. नाही तरी आता उखळात शिर दिलंच आहे. मीराला तर एकटीने जाण्याची माझी तयारी असल्याचं बोलले होते मी! आता तिच्या सोबतीने प्रत्येक प्रसंगाला सामोरं जायचं, असं मनात म्हणत सरदारजीपुढे पाचशेची नोट सरकवली. निर्विकार चेहऱ्याने त्याने माझ्यासमोर पर्ची ठेवली अन् माझ्याकडे साफ दुर्लक्ष करून तो आपल्या मित्राशी गप्पा करायला लागला. मीच त्याला टॅक्सीची दिशा विचारली. आमच्या टॅक्सीत एक पुरुष प्रवासी आधीच बसलेला पाहून आम्ही विचारात पडलो. हा टॅक्सीवाल्याचा 'माणूस' असेल काय? हा आपल्या पाचशेत फुकट येणार की काय? हा भाडं शेअर करील काय? ह्याची सोबत घेणं योग्य की अयोग्य? आमच्या चेहऱ्यावरची प्रश्नचिन्हं पाहून तो प्रवासी दुसऱ्या टॅक्सीतून निघून गेला. उरलो आम्ही दोघीच. आता एकच टॅक्सी उरली होती. आम्हांला दुसरा पर्यायच नव्हता. खडखड करत चाललेल्या त्या जुनाट टॅक्सीतून जाताना आम्ही आपापल्या खिडक्यांतून रस्त्यावरच्या स्थलनाम मार्गदर्शक पाट्यांवर नजर ठेवून होतो.

एकमेकींना नजरेनेच दिलासा देत होतो. एकीकडे आपापल्या देवांना वेठीस धरून बसलो होतो. बरंच अंतर कापून गेल्यावर आलं एकदाचं सुवर्णमंदिर. आता ह्या टॅक्सीवाल्याला आपण इथे नवीन असल्याचं कळलं तर खुशाल कळू दे म्हणत आम्ही पुढच्या सोयीविषयी त्याला विचारलं. त्याने सरायची चौकशी जिकडे करा म्हणून सांगितलं, त्या दिशेला मी निघाले. मीरा सामानाजवळ थांबली.

"नमस्ते जी. महाराष्ट्रसे हम दो महिलाएँ आयी हैं। खास सुवर्णमंदिर के दर्शन के लिये. रहनेको अच्छी सुविधावाली-।"

मला पुढे बोलू न देता खिडकीपलीकडून भरदार आवाज आला-

"वहाँसे पर्ची लेके आईये."

त्याने इशारा केला तिथून पर्ची आणून मी त्याच्या सुपूर्द केली. त्यावर त्याने काही खरडलं. म्हणाला, "आप रिक्षावालेको यह दे देना जी."

"आपही बात कर लें उससे तो अच्छा रहेगा जी." मी अजिजीने त्याला म्हटलं. कारण त्याने लिहिलेली लिपी मला अगम्य होती. काय लिहिलंय हे तोंडी सांगितलं असतं तर थोडंफार कळेल तरी, म्हणून ही माझी अजिजी.

त्याने माझ्यासोबत एका तरुण सरदाराला पाठवलं. त्यानेच रिक्षा ठरवली अन् रिक्षावाल्याला कुठे जायचं तेही सांगितलं. खरं म्हणजे त्या रिक्षा इतक्या अरुंद होत्या की, त्यात एकच पंजाबी माणूस एसपैस मावू शकला असता. म्हणजे माणशी एक रिक्षा इथे चालतात की काय, असं वाटून गेलं. आम्ही दोघींनी कसंबसं स्वतःला त्या उतरत्या रिक्षात 'मावून' घेतलं. आमच्या पाठीमागे आमच्या सूटकेसेस. एक हात स्व-आधारासाठी रिक्षाच्या दांड्याला तर दुसरा सूटकेसला आधार म्हणून. आमची सायकलरिक्षा अमृतसरच्या अरुंद गल्लीबोळांतून डुलतडुलत, ठेचकाळत- हिंदकळत एकदाची कुठेतरी थांबली.

"ये लो जी, आ गयी आपकी सराय." म्हणत रिक्षवाला घाम पुसत उभा राहिला. मघाच्या त्या साऱ्या गडबडीत मी त्याला पाहिलंच नव्हतं. चेहऱ्यावरचा घाम पुसून फडकं त्याने डोक्याला गुंडाळलं. अरे, हा तर अगदी बलराज साहनी! कुठल्या तरी सिनेमात हातगाडी ओढणारा का, ओझं वाहणारा, उंचापुरा, रेखीव नाकडोळ्यांचा बलराज साहनी मला आठवला.

रिक्षा ठरवून देणाऱ्या त्या सरदारने ह्याला दहा रुपये द्यायला सांगितले होते. आम्ही वीसची नोट त्याच्या हाती ठेवली. सराय म्हणजे मला वाटलं, कुठल्या बकाल धर्मशाळेत घेऊन आलाय कोण जाणे! पण अतिशय सुंदर इमारत समोर दिसत होती. बऱ्याच पायऱ्या चढून जावं लागणार होतं. आपापली सूटकेस घेऊन आम्ही सरायच्या पायऱ्या चढू लागलो तर तो मागून आला. आमच्या हातातल्या सूटकेसेस घेऊन एका दमात तो म्हातारा बलराज साहनी वर जाऊन उभा राहिला! प्रवेशद्वारातच तगडा तरुण सरदार हातात नंगी तलवार घेऊन उभा असलेला दिसला.

काऊंटरवर मी पुन्हा एकदा "नमस्ते जी. महाराष्ट्रसे हम दो महिलाएँ आयी हैं खास सुवर्णमंदिर के दर्शन के लिये ... " वगैरेची रेकॉर्ड वाजवली.

काचेपलीकडच्या दाढीमिश्यांच्या जंजाळातल्या धारदार नजरेत मला कुतूहल आणि आदर डोकावल्याचा भास झाला. त्याने पर्ची फाडण्यापूर्वीच 'हम रूम देखना चाहते हैं' असं मी म्हणणार तेवढ्यात त्याच्या शेजारच्याने पर्ची फाडून समोर ठेवलीसुद्धा. त्याच्यावरच्या रकमेचा आकडा पाहून मी चकितच झाले! मघाच्या टॅक्सीपेक्षा कमी. तरीसुद्धा 'आधी व्यवस्था काय आहे ती बघू दे' म्हणावंसं वाटत होतं. पण 'इथे कमी बोलावे' ची पाटी असल्यासारखे सगळे आपापली कामं करत होते. सरदारपोऱ्या आमच्या सूटकेसेस उचलून निघालासुद्धा. 'आता संध्याकाळ झालीय. आजचा दिवस बघू इथं कसं काय आहे ते, नंतर चौकशी करून जाऊ दुसरीकडे' असा विचार करून मुकाट्याने पैसे भरले आणि त्या सरदारपोऱ्याच्या मागोमाग आम्ही निघालो. काचेचं दार उघडून आम्ही आत गेलो. चार खोल्यांचा स्वतंत्र, राखीव विभाग असावा, असा तो भाग वाटला. एका खोलीतून पोराबाळांचे आवाज येत होते. मी मागे वळून पाहिलं तर, काऊंटरवरच्या धारदार नजरा आमच्याकडेच रोखलेल्या होत्या. त्यांच्या देखरेखीखाली हा विभाग सुरक्षित असावा असं जाणवलं. कॉरिडॉरचं दारसुद्धा मुद्दाम काचेचं होतं. चला, म्हणजे इमर्जन्सीला काऊंटर धावून येईल. काळजीचं कारण नाही.

आमची रूम चांगली प्रशस्त होती. आत बाथरूमही ऐसपैस नि स्वच्छ होती. चोवीस तास पाणी. भरपूर हवा, प्रकाश. हिला सराय कोण म्हणेल? ही तर एखाद्या चांगल्या हॉटेलचीच खोली वाटली. त्या सरायमध्ये स्वस्त, अतिस्वस्त, महाग अशी सर्व प्रकारची व्यवस्था होती, तीही अतिशय अल्पदरात. मला मुलुंड कॉलनीतल्या गुरुद्वारात भेटलेल्या त्या सरदारजीचं बोलणं आठवलं. खरंच राहण्याच्या जागा उत्तम आणि मुबलक होत्या. आपण इथवर येण्याचं अचाट धाडस केलं खरं, पण सोय चांगली झालीय तेव्हा काळजीचं काही कारण नाही.

मुळात एवढं धाडस का करावंसं वाटलं होतं मला? धाडसच नाही तर काय? नगरला मिलिटरीचे रणगाडे रस्त्यावरून जाऊ लागले की, आम्ही लहान मुलं कितीतरी वेळ त्यांच्याकडे बघत उभे राहत असू. कधी कधी रणगाड्यांबरोबर शर्यत लावल्यासारखं थरथरत्या रस्त्याच्या कडेने दम लागेपर्यंत पळत असू. पण शेण गोळा करायला मोकळ्या मैदानावर गेलो तर एखाददुसरा सरदारजी तिथून पायी किंवा सायकलवर जाताना दिसला की, 'अगं शिखडा आला गंऽऽ' म्हणत जीव मुठीत घेऊन आम्ही मुली पळत असू. नंतर कितीतरी वेळ एकमेकींना म्हणत राहायचो 'बघ, अजून माझ्या छातीत धडधडतंय...' आणि आज त्याच सरदारजींच्या मुलखात एकटीने येऊन थडकायचं म्हणजे जरा अतिच नव्हतं का झालं? मीराने साथ दिली, हे छानच झालं.

पण खरंच मी इथे एकटी आले असते तर? सुखाचा जीव का उगाच दुःखात अन् धोक्यातही घालायला निघाले होते मी? फक्त सुवर्णमंदिर? छे: ! स्वर्णमंदिर? नाही नाही, दरबारसाहब बघायला? सोन्यानं झगमगणारं ते मंदिर पाहून तर माझे डोळे जराही दिपले नाहीत. एवढा देखणा तो ताजमहाल निरंजनसारख्या रसिक सख्याच्या सोबतीने पाहतानाही माझ्या मनाच्या तळ्यात एक हलकासाही तरंग उठला नव्हता. आपण तर इतक्या हळव्या स्वभावाच्या. मग इतकी दगडी वृत्ती आपल्यात अधूनमधून का निर्माण होते? इतिहासाच्या पुस्तकातला जालियनवाला बाग प्रत्यक्षात पाहताना थोडंसं आत गलबललं. पण भोवतालच्या लोकांच्या अतिउत्साही पिकनिकी मूडमध्ये आतलं आतच जिरून-विरून गेलं. बाघा बॉर्डरचा तो ध्वज उतरवण्याचा समारंभ मला शांत चित्ताने अनुभवायचा होता. पण तिथेही तोच पिकनिकी गोंधळ. दोन्ही देशांतले तिथे जमलेले लोक आपापल्या राष्ट्राचा जयकार आणि दुसऱ्याचा धिक्कार बेंबीच्या देठापासून ओरडून करत होते. त्यात बुलंद होता तो आपल्या भारतीयांचा आवाज. त्यांना उकसवणारा होता सीमेवरचा आपलाच एक अधिकारी. लोकांच्या पुढे येऊन माईकवरून देशाच्या जयजयकाराच्या घोषणांना उत्तेजन देऊन झालं की, थोडासा मागे जाऊन हातांनी खुणा करत शब्द न उच्चारता तो बोलायचा, "मारा ना बोंब. शांत काय बसलात? मोठ्याने, आणखी मोठ्याने..."

आपले लोक तसतसे चेकाळून नारेबाजी करत होते. मनात आलं, ह्या ऑफिसरला जिवाची भीती नाही वाटत? ह्याला चिथावणी देताना पाहून पलीकडून कुणी गोळी झाडली तर? का हे सीमारक्षकांचं नाटक असेल? नंतर सामसूम झाल्यावर त्यांची आपसात हातमिळवणी असेल? त्या अधिकाऱ्याला हे प्रश्न विचारावेसे वाटले. पण गर्दीमुळे मनातच राहून गेले. त्याच्याशी हस्तांदोलन करायला झुंबड उडाली होती. शिवाय वेळ संपली म्हणून सगळ्यांना तिथून बाहेर काढण्यात आलं. त्या कोलाहलात माणसांचे आतले आवाज मला ऐकूच आले नाहीत. आपण ह्या सांध्यक्षणी फार कासावीस होऊ की काय असं मला मुंबईहून निघताना वाटत होतं. पण मन कोरडंच राहिलं. मी आणि मीराने एकमेकींशी काहीच न बोलता आपापल्या मनातली वादळं मनातच ठेवत, चौकीवर ठेवलेल्या आपापल्या पर्सेसच्या सुरक्षिततेच्या काळजीने सायकलरिक्षावाल्याने सांगितले तेवढे पैसे कबूल करून परतीची वाट धरली. वाटेत सुमोवाला सांगत होता, इथल्या काहींची शेती तिकडे तर, त्यांच्याकडच्या काहींची इकडे असल्याने त्यांचं रोज येणंजाणं आहे. मग त्यांचे आपसात संबंध कसे असतील? फाळणीनंतर आता इतक्या वर्षांत सीमेपलीकडे स्थिरावलेल्या त्यांच्याविषयी इकडच्यांना काय वाटत असेल, असे बरेच प्रश्न माझ्या मनात होते.

रात्री अंथरुणावर पडल्यावर अनेक प्रश्न मीच मला विचारत होते. आपल्याही भावना इतरांसारख्याच बोथट झाल्यात काय? आपल्या जन्मापूर्वीच्या ऐतिहासिक घटना ह्या एवढ्याच दृष्टीने आपण जालियनवाला बागेकडे नि फाळणीकडे बघतो आहोत काय? मग त्यासाठी इथवर तंगडतोड करत येण्याची काय गरज होती? ग्रंथालयात बसून दोन-चार तासात इतिहास उगाळून झाला असता की. ह्या इतिहासाच्या ओढीने जर मी इथे आले नाही, तर मग कुठल्या अदृश्य ओढीने मला अमृतसरचा उंबरठा ओलांडायला लावलाय? ह्या प्रश्नांच्या उत्तराचा मागोवा घेण्याच्या निष्फळ प्रयत्नात कधी माझा डोळा लागला, कळलंच नाही.

'आज जरा पायीच फिरू या' म्हणत मी आणि मीरा सकाळीच बाहेर पडलो. पायी चालणाऱ्या आम्हांला रिक्षावाले येऊन पुन्हा पुन्हा विचारत होते, 'मण्डी चलणा है जी? सिर्फ बीस रुपये दे देना.' आमचा नकार ऐकूनसुद्धा चिकाटीने त्यांची विचारणा

चालूच होती. एकापेक्षा दुसरा रिक्षाचं भाडं कमी कमी करत गिऱ्हाईक गटवण्याचा प्रयत्न चढाओढीने करत होता. बीस रुपयांवरून शेवटी 'दो रुपये दे देना, ले चलते हैं' असा लकडा सुरू झाला, तेव्हा त्या सगळ्या बलराज सहानींची मला अतिशय कणव आली. जरा पुढे गेलो तर 'बाघा बार्डर जाणा है?' म्हणत सुमोवाल्यांनी, टॅक्सीवाल्यांनी आम्हांला घेराव घातला. त्यातून कसेबसे सुटलो तरी एकाने आम्हांला गाठलंच. आपण इतरांपेक्षा कसे स्वस्त दरात नेऊ, आपली टॅक्सी किती आरामाची आहे, दिलेल्या वेळेत सुखरूप नेऊ-आणू ह्याची हमी देत तो माझ्या बरोबरीने चालता चालता सांगत होता. शेवटी मी चालायची थांबले. त्याच्याकडे बघत मिस्कीलपणे हसत उभी राहिले. 'गिऱ्हाईक गाठलं' ह्या खात्रीने तो उत्साहाने तीच माहिती तो पुन्हा एकदा मला ऐकवून पटवण्याचा प्रयत्न करू लागला. मी गालातल्या गालात हसतेय पाहून त्याच्या टकळीला ब्रेक लागला. माझ्याकडे त्याने नव्याने पाहिलं. चकित होऊन तो उद्गारला,

"ऐं? मैडमजी आप?"

मी नुसतीच हसले. हसत हसत तोही शेवटी वाट बदलून दिसेनासा झाला.

काल वाघा बॉर्डरला एक जण आम्हांला अव्वाच्या सव्वा रेटला त्याच्या टॅक्सीतून घेऊन जाणार होता. शेवटची टॅक्सी म्हणून आम्ही बसलोही. तेवढ्यात नेमक्या दोनच सीट्स रिकाम्या असलेली आणि ह्याच्यापेक्षा कमी रेटमध्ये नेणारी एक टॅक्सी समोर आली. आम्ही पटकन त्यात बसलो तर आधीचा टॅक्सीवाला हमरीतुमरीवर आला. आमच्याशी आणि ह्या नव्या टॅक्सीवाल्याशी भांडू लागला. नव्या टॅक्सीवाल्याने सुसाट टॅक्सी पळवली. तोच हा भांडखोर सरदार मुलगा आता 'बाघा बार्डर जाणा है?' विचारत होता.

अमृतसरच्या गल्लीबोळांतून फिरून छान बंगले असलेल्या कॉलनीच्या रस्त्यावरून आम्ही दोघी रमतगमत चालत होतो. सगळं बघून झालं होतं. खरेदी आटोपली होती. निवांत वेळ हातात होता. 'संपूर्णपणे अनोळखी प्रदेशात येऊन खूप मज्जा केली' ह्याचं समाधान आणि 'केवढं धाडस केलं ना आपण?' हे स्वतःची पाठ थोपटणारं कौतुक आमच्या एकमेकींशी चाललेल्या बोलण्यातून, आम्हांला येणाऱ्या

फोनच्या संभाषणातून करणं चालू होतं. मीराचे नि माझे सूर छान जुळले होते. आमच्या गप्पा चालू होत्या. हास्यविनोद चालू होते. तरीही आम्ही एकमेकींच्या मानसिक एकांतात ढवळाढवळ करत नव्हतो. त्यामुळेच ह्या गल्लीबोळांतून अन् सुंदर बंगल्यांच्या कॉलनीतून निरुद्देश फिरताना, माझ्या मनात काय चाललंय ह्याचा थांगपत्ता मीराला असणं शक्य नव्हतं. त्या सुंदर बंगल्यांच्या एका नेमप्लेटवर मला एका नावाआधी मेजर शब्द दिसला आणि लहानपणची एक आठवण उसळी मारून वर आली.

मी पाच-सहा वर्षांची असेन तेव्हा. शनिवारची अर्ध्या दिवसाची शाळा झाली की, मिलिटरी कॅम्पमधल्या आजीकडे माझा मुक्काम रविवार दुपारपर्यंत असायचा. आमचा गोईंद्या मला सायकलवर घेऊन जायचा. घरी पोहचल्यावर मला भेटायला दोन व्यक्ती फार उत्सुक असलेल्या दिसायच्या. एक आमची अल्सेशियन जीब आणि दुसरे कॅप्टन शरणसिंग. ते मी यायच्या आधीच येऊन बसलेले असायचे. मला पाहताच आनंदानेते मला उचलून घ्यायचे. म्हणायचे,

"बिटिया, हमारे साथ अमृतसर चलोगी आप? हम और आपकी चाचीजी आपको बहुत प्यार देंगे। आपको मिठाई बहुत पसंद है ना? आपकी चाचीजी आपके लिये रोज अपने हाथोंसे असली घीवाली नयी नयी मिठाई बनाके आपको खिलायेंगी. रोज नये नये फ्रॉक्स अपने हाथोंसे सिलाकर पहनायेंगी। हम छुट्टियोंमें यहाँ आया करेंगे। चलेंगी ना आप बिटिया रानी? आप तो हमारी लाडो हो..."

बोलता बोलता चाचाजी मला छातीशी घट्ट धरायचे. रडरड रडायचे. माझा जीव गुदमरून जायचा. ते मला अमृतसरला घेऊन जातील, ह्या भीतीने ते येताहेत म्हटलं की, मी संडासात, नाही तर आमच्या बंगल्यामागच्या शेतात तासन्तास लपून बसावं. गवतातले किडे चावायचे. कुसळं टोचायची. पायात गोळे यायचे. पण अंधार पडला तरी घरचे कुणी हाका मारत तिथपर्यंत आल्याशिवाय मी तिथून हलत नसे. मी तयारी दर्शवली असती तर ह्या अमृतसरच्या मातीत 'पंजाब दी कुडी' म्हणून माझी जडणघडण झाली असती आणि घुमानला झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य

संमेलनात पंजाबी कवयित्री म्हणून मी मराठी साहित्यिकांचं कदाचित स्वागत केलं असतं...

मी जी नेमप्लेट पाहिली ती चाचाजींच्या नावाची नव्हती. मला त्या नेमप्लेटवरून चाचाजी आठवले इतकंच. पुढे चालताचालता ओळखीचं नाव दिसतंय का मी बघू लागले. कुठे आहात तुम्ही चाचाजी? मी आलेय तुमच्या अमृतसरमध्ये. कदाचित तुम्ही हाक मारल्यामुळेच... नाहीतर माझ्या पावलांना इकडची ओढ का वाटावी? दिल्लीपर्यंत ह्यापूर्वीही कित्येकदा येऊन गेलेच की. अमृतसरला काही वेळासाठी थांबूनही गेले होते. पण ह्याचवेळी मला अमृतसर गाठण्याची तीव्र इच्छा का व्हावी? असं म्हणतात की, म्हातारपणी वर्तमानकाळाचा विसर पडून भूतकाळच जास्त आठवत राहतो. चाचाजींच्या बाबतीत तसं काही झालं असेल काय? त्यांना माझी आठवण तीव्रतेने झाली असेल काय? पण मग मी इथे आल्याचं माझ्या अप्रत्यक्ष भेटीचं समाधान त्यांच्या मनाला झालं असेल? दिलसे दिलको राह होती है म्हणतात, तसंच आहे का हे? चाचाजी, माझंही मन तुम्हांला अगदी थेट तळापासून हाकारतंय. मला मला तुमचा ठावठिकाणा ठाऊक नाही. तुम्ही हयात तरी आहात का, की एखाद्या युद्धात शहीद झालात, माहीत नाही. ज्या घरात तुम्ही मला आपली 'बिटिया रानी' म्हणून घेऊन जाणार होता, वाढवणार होता त्याच घरावरून तर मी आत्ता जात नाहीय ना? चाचाजी, तुमची लाडो येऊन गेलीय हो तुमच्या अमृतसरला, एवढंच सांगते...

रस्त्याने चालता चालता मी मनातल्या मनात केवढं तरी मनापासून बोलत होते. घराच्या पाट्यांवर कॅप्टन, मेजर, ब्रिगेडियर असं काही लिहिलेलं शरणसिंग चाचाजींचं नाव दिसतंय का, माझे डोळे शोधत होते. माझ्या लहानपणी मी जवळून पाहिलेली मिलिटरीतली कितीतरी पंजाबी माणसं मला एकामागोमाग एक काही क्षणांत आठवून गेली. मोहिंदर सिंग चाचाजी, त्यांची ती मीनाकुमारीसारखी दिसणारी बायको मोहिंदरकौर चाची, त्यांचा मोठा मुलगा बलवंत त्याला आम्ही 'खादाडखाऊ नि लांडग्याचा भाऊ' म्हणून चिडवत असू. त्याला अर्थ कळायचा नाही, पण आशय कळायचा. पत्ते खेळताना स्थितप्रज्ञासारखे बसणारे ते घुमे महावीरसिंग चाचाजी. आमच्यावरच्या मायेने खुशाल पत्ते फोडणारे ते प्रेमळ दीपसिंगचाचाजी. (त्याकाळी

वडीलधाऱ्या सगळ्यांनाच आम्ही चाचाजी म्हणत असू. त्यामुळे आज चाचू हे रूप नाही म्हटलं तरी खटकतंच.) जिच्या नावाचा मला हेवा वाटायचा ती अतिशय नाजूक नि देखणी अशी माझी जिवलग मैत्रीण शशिबाला, धाकटा भाऊ मानून ज्याचे मी भरपूर लाड करण्याची हौस भागवून घेतली होती, तो तिच्याचसारखा गोरापान, नाजूक, लालचुटक ओठांचा तिचा भाऊ अजय... सगळे आठवले पण एकच चेहरा पुन्हा पुन्हा डोळ्यांसमोर येत एनलार्ज होत स्थिरावला, तेव्हाच्या तरुण कॅप्टन शरणसिंगचाचाजींचा. काल अंथरुणावर पडल्यापडल्या अनेक प्रश्न मला पडले होते. आज अमृतसरचे गल्लीबोळ फिरून आल्यावर अंथरुणावर पडले तेव्हा मात्र कुठलाच प्रश्न समोर नव्हता. आपण इथे कुठल्या ओढीने यायला निघालो होतो, ह्याचं उत्तर मिळाल्यात जमा होतं. मन थकलं होतं, पण शांत झालं होतं. अपत्यसुखाला आचवलेले शरणचाचा आठवले. आठवले मला पाहताच वात्सल्याने ओथंबणारे त्यांचे डोळे. माझ्यासाठी तरसणारे आणि बसरणारे त्यांचे डोळे... माझ्या मस्तकावरून फिरणारा त्यांचा मायेचा हात... चिंबभिजल्या उशीवर मला कधी झोप लागली कळलंच नाही.

अमृतसर सोडून संध्याकाळी आम्हांला दिल्लीसाठी निघायचं होतं. बसस्टँडवरच्या एका हॉटेलमधल्या रेडियोत सहगल- खुद्द सहगलच माझ्यासाठी, हो माझ्याचसाठी गात होता, "बाबूल मोराSSS नैहर छूटो ही जाये..."

# कष्टाची बरी भाजी भाकरी...

■ फ्रान्सिस डिमेलो, नंदाखाल

साल नेमकं आठवत नाही. पण १९७९-८०चं साल असावं. मी आमच्या शाळेतल्या मुलांना गोव्याला सहलीला घेऊन गेलो होतो. त्याकाळी गोवा या ठिकाणाबद्दल सर्वांनाच मोठे आकर्षण होते. गोव्याचे समुद्रकिनारे, तेथील वेगवेगळ्या रंगाची वाळू, नारळी आणि काजूच्या हिरव्यागार बागांनी नटलेला निसर्ग, लाल लाल मातीचे रस्ते आणि मुख्य म्हणजे आगळी वेगळी संस्कृती, देवालये यामुळे गोव्याची सहल म्हणजे स्वर्गीय सुख देणारी !

त्याकाळी कोकणरेल्वे अस्तित्वात नव्हती. त्यामुळे एस. टी. बस अथवा खाजगी बस याशिवाय अन्य पर्याय नव्हता. सहलीत सहभागी झालेल्या मुलांची संख्या फार नसल्यामुळे स्वतंत्र बस परवडण्यासारखी नव्हती. आम्ही थोडी सवलत मिळवून एस.टी. बसनेच मुलांना गोव्याला नेलं होतं. मी आणि माझ्यासोबत लेडीटिचर म्हणून तारकुंडे मॅडम होत्या.

सहल खूप छान झाली. मुलांनी छान मजा केली. समुद्र किनाऱ्यावरील मजा लुटली आणि आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. वाटेत पाली नावाचं गाव लागलं. तेथे बसस्थानकावर आमची बस रात्रीच्या जेवणासाठी थांबली होती. दरम्यान मी हिशोब करून पाहिला. बऱ्यापैकी पैसे शिलक होते आणि सहल तर संपत आली होती. आता काटकसर करण्याची मुळीच आवश्यकता नव्हती म्हणून मी मुलांना मुभा दिली, "तुम्हाला हवं ते आणि हवं तेवढं जेवा. वेज-नॉनव्हेज काय हवं ते!"

माझी मोकळिकीची सूचना मिळताच मुलांनाही काही सुचेनासे झाले. काय घ्यावं, काय नाही घ्यावं? काय खावं आणि काय प्यावं? मुलांनी वेटरला भंडावून सोडलं. कोणी आम्लेट मागवतो, कोणी चिकनकरी तर कोणी फिश फ्राय, तर कोणी साधी राईस प्लेट तर काही मुलांनी तर त्यांच्या आवडीचा मसाला डोसा ! वेटर धावत माझ्याकडे आला, 'साहेब बघा ना, कोणी काहीही ऑर्डर देतं, बिल देतील का ते?' मी त्याला आश्वस्त करत म्हटलं, 'काही काळजी करू नकोस, बिल मी देणार आहे, माझं लक्ष आहे. तुम्ही नीट लिहून ठेवा आणि नंतर हिशोब करून सांगा.' त्याला हायसं वाटलं. 'तुम्ही देणार ना बिल ! मग काही हरकत नाही' दुप्पट उत्साहाने ऑर्डर घेऊन तो मुलांना ऑर्डरप्रमाणे प्लेटस् आणून देऊ लागला. सारी मुलं एकदम तृप्त झाली. सहलीतील शेवटच्या जेवणाचा मुलांनी मनमुराद आनंद लुटला हे पाहून आम्हालाही समाधान वाटले.

शेवटी आम्ही दोघं शिक्षक जेवायला बसलो. वेटर अदबीने येऊन म्हणाला, 'साहेब बोला, तुमच्यासाठी काय आणू? चिकन बिर्याणी, मटण बिर्याणी, सुका मटण, बैदाकरी, फिशकरी.....' मी त्याला थांबवत म्हणालो, 'आम्हाला साधं वेज जेवण दे. सोबत दही दे म्हणजे झालं.' तारकुंडे मॅडमनेही वेजच घेतलं.

शेवटी बिल देण्याची वेळ आली. गल्ल्यावर बसलेले वृद्धत्त्वाकडे झुकलेले हॉटेल मालक, श्री. दांडेकर मला म्हणाले, 'साहेब तुमचं एकूण बिल ३५६ रुपये झालं आहे. तुम्ही मला ३५६ रुपये द्यायचे पण मी तुम्हाला पावती किती रुपयांची देऊ?' मी बुचकळ्यात पडलो. मला काही कळेनासे झाले. मी त्यांना म्हटलं, 'आमच्या मुलांनी आणि आम्ही जे काही खाल्लं त्याचे पैसे तुम्ही मला सांगा. तेवढे पैसे मी तुम्हाला देणार प्रश्न मिटला.' तेव्हा पुन्हा माझी समजूत घालत ते म्हणाले, 'अहो, तुम्ही मला ३५६ रुपयेच द्या पण तुम्हाला मी बिल कितीचं देऊ? पाचशेचं, सहाशेचं?' माझं उत्तर पुन्हा तेच. तेव्हा मात्र ते दांडेकर खाली उतरले. वयाने ते माझ्यापेक्षा खूप मोठे होते. तरी देखील मला नमस्कार करीत म्हणाले, 'सर, खरंच तुम्हाला मनापासून नमस्कार. माझे या धंद्यात केस पिकले. पण तुमच्यासारखा शिक्षक मला पहिल्यांदा भेटला. तुमच्या जागी आणखी कोणी असतं तर माझ्याकडून किमान पाचशे रुपयांचं खोट बिल घेतलं असतं आणि माझ्या हातावर मात्र ३५६ रूपयामधलेही काही कमी दिले असते.'

मीही हात जोडत त्यांना म्हणालो, 'बघा मालक ही आमची गिरण कामगारांची मुलं आहेत. कामगारांच्या कष्टाच्या पैशातून चोरून खाण्याइतकी माझी परिस्थिती वाईट नाही. पगार फारसा नसला तरी खाऊन-पिऊन मी सुखी आहे. शिवाय माझे वडीलही शिक्षक असल्यामुळे तुम्ही सांगता त्या गोष्टी माझ्या संस्कारात बसत नाहीत. अस म्हणून त्यांचा निरोप घेऊन आम्ही निघालो.

त्या सहलीत मुलांनी खरच खूप मजा केली. त्यांना गोव्याला मी एक सिनेमाही दाखवला. आईस्क्रिम खाऊ घातले (त्याकाळी आईस्क्रिम खाणे हे ही किती अप्रूप होतं!) तरीही काही पैसे उरले. ते प्रत्येक मुला-मुलीला परत करण्यात आले. हो आमच्या शाळेत तेव्हा अगदी २५ पैशांपर्यंतचे पैसे मुलांना परत करण्याची प्रथा होती. आम्हीच सुरू केली होती. त्यामुळेच पालकांचा व शाळेचाही आमच्यावर प्रचंड विश्वास होता. त्यावेळी तसे प्रामाणिक आणि नेकीने वागलो म्हणून आज ताठ मानेने माजी विद्यार्थ्यांसमोर उभे राहू शकतो.

'कष्टाची बरी भाजी भाकरी, तूप साखरेची चोरी नको'.

# स्त्रीवादाचा क्रॅशकोर्स

■ डॅनिअल मस्करणीस, वसई

जात ! उच्च-नीच, वरिष्ठ-कनिष्ठ अशा वेगवेगळ्या रूपात आपल्याला घेरून असलेली. एक शोषक तर दुसरी शोषित स्वरूपाची. शोषक त्याच्या शौर्य गाथा चवीने सांगत राहतो, जगही ते ऐकत राहते... शोषितांमध्ये मात्र आपली बाजू मांडण्याचे त्राणच नसते. त्यामुळे त्याची बाजू क्वचितच जगासमोर येते. पण म्हणून शोषित घटक अस्तित्वातच नाही असे मानून आपण गपगुमान राहायचे का ?

माणूस हा माणूस म्हणूनच जन्माला येतो पण शोषक वा शोषित अशा कोणत्या बाजूला तो जन्माला येतो त्यावरून समाजव्यवस्था त्याला घडवीत-बिघडवीत राहते. स्त्री आणि पुरुष हीही एक अशी पहिली आदिम जात व्यवस्था ! उत्क्रांतीच्या ओघात निर्माण झालेली आणि अजूनही घट्ट पाय रोवून असणारी. कधी कधी प्रश्न पडतो, निसर्गानं सारं विश्व जन्माला घालण्याची शक्ती दिलेली स्त्री पुरुषव्यवस्थेतील प्यादी झालीच कशी ? आदिम व्यवस्थेत शिकार शोधण्यासाठी बाहेर पडलेला पुरुष बाहेर राहून परस्पर अशी व्यवस्था निर्माण करतोय याची मुलं सांभाळण्यास घरी थांबलेल्या स्त्रीच्या लक्षातच कसं आलं नाही?

ऐश्वर्या रेवडकर यांची 'विहिरीची मुलगी' ही कादंबरी वाचताना हे प्रश्न अधिकच टोकदार होतात.

आलटूनपालटून वाचायची सवय म्हणून दिवाळीच्या रजेसाठी मी दोन भिन्न विषयावरची पुस्तक सोबत ठेवली होती. ऐश्वर्याचं 'विहिरीची मुलगी' हे एक पुस्तक आणि टोनी जोसेफ यांचं 'अर्ली इंडियन्स' हे दुसरं पुस्तक. अनपेक्षितपणे ही दोन्ही पुस्तके मानवी आयुष्यातला विरोधाभास अधोरेखित करणारी ठरली. टोनी जोसेफ यांच्या पुस्तकात आफ्रिकेतील पहिला आधुनिक मानव भारतीय उपखंडात कसा स्थिरावला याचा मोठा पट उलगडला गेलाय तर 'विहिरीची मुलगी' या पुस्तकात लेखिकेनं तिच्या लेन्सचा फोकस वर्तमानातील 'मीरा' या मुलीवर केंद्रित केलाय... 'रानटी ते आधुनिक माणूस' असा प्रवास दाखविणारं एक पुस्तक तर 'रानटी हीच अवस्था बरी होती की काय?' अशी शंका मनात उपस्थित करणारं हे दुसरं ऐश्वर्या रेवडकर यांचं पुस्तक.

'जोपर्यंत शिकार त्याची कहाणी सांगत नाही तोपर्यंत जग शिकाऱ्याची गोष्ट, शौर्यगाथा म्हणून मिरवत राहते. त्यामुळे शिकार होणाऱ्यानेही त्याची कहाणी सांगितली पाहीजे...' या वाक्याची आठवण करून देणारी ही कादंबरी. कादंबरीत 'मीरा' या व्यक्तिरेखेचा प्रवास मांडला गेलाय.

'कादंबरी' या रुपबंधात लेखक/लेखिका 'काय सांगतेय' याबरोबरच ते 'कसं सांगतेय' यालाही एक महत्व असते. आणि ही कादंबरी हे दोन्ही निकष पूर्ण करते. प्रमुख पात्रे आपल्या पुढ्यात ठेवताना लेखिका त्यांच्या वागण्या-बोलण्याचं स्पष्टीकरण देत बसत नाही. तर वाचकांकडून ती संयम अपेक्षिते. एकदा तो संयम धरला की मग पुढे कथेच्या ओघात हे सर्व वागण्यातले तपशील त्यांतील बारकाव्यांसह वाचकाला गवसतात. तो आनंद मग लेखिका वाचकाला भरभरून देते... खरं तर मीरेचा प्रवास आनंददायी नाहीच. तो कसा असेल ? दांभिक समाजाच्या उतरंडीवर असणाऱ्या, 'आदर्श मुलगी' या व्याख्येत न बसणाऱ्या मीरेचा प्रवास हा समाज मुळात आनंददायी होऊन देईलच कसा ? पण तो खाचखळग्यांचा व वळणावळणाचा प्रवास आपल्याला अंतर्मुख करतो ... मीरा अनाहूतपणे आपले बोट धरीत विहिरीपाशी घेऊन जाते, आपल्या दांभिक चेहऱ्याचं प्रतिबिंब आपल्याला दाखविण्यासाठी !

कादंबरीचं वैशिष्ट्य म्हणजे 'स्त्रीवाद' हे जरी कथेचे मध्यवर्ती सूत्र असले तरी त्याला सशक्त व्यक्तिरेखा व उत्तम कथेची जोड देण्यात लेखिका यशस्वी झालीय. हातचं काहीही राखून न ठेवता असा उघडं नागडं लिहिलं की लिखाण कसं प्रत्ययकारी होतं याचंही हे पुस्तक एक उदाहरण ठरावं. कधी टाइमलाइन दर्शविण्यासाठी हिंदी चित्रपट गीतांचा केलेला चपखल वापर तर कधी नाट्यमंचावर नाट्य पाहत असल्याचा येणारा 'फील' त्यामुळे हे पुस्तक page turner झालंय. काही ठिकाणी नायिकेची व इतर पात्रांची येणारी वाक्ये प्रचारकी वाटत असली तरी नायिकेचं भावनिक अवकाश समजून घेण्यासाठी ती आवश्यक ठरतात. मग हे पुस्तक फक्त पुस्तक न राहता स्त्रीवाद समजून घेण्याचा एक उत्तम 'क्रॅश-कोर्स' ठरतो.

स्त्री अत्याचारावर वृत्तपत्रात रोज भरभरून येत असताना हा 'क्रॅश-कोर्स' आपण सर्वांनी करणं कधी नव्हे एवढं आज गरजेचं झालंय.

पुस्तक: विहिरीची मुलगी
लेखिका: ऐश्वर्या रेवडकर
प्रकाशन: न्यू इरा पब्लिशिंग हाऊस
पाने: २७४

# तुला बोलायला कोणी सांगितलं होतं ?

■ सायमन मार्टिन

काय कारण होतं आता आठवत नाही आणि काय बोललो होतो हे देखील आता आठवत नाही पण न कळत्या वयात बोललो म्हणून मार मिळाला होता. घरी येऊन तक्रार केल्यानंतर उत्तर मिळालं होतं, तुला बोलायला कोणी सांगितलं होतं? आता बोलायला कोणी सांगायचं असते किंवा कोणी सांगितल्यावरच बोलायचं असते याचं ज्ञान तेव्हा मला नव्हतं. मी जे काही बोललो होतो त्यातलं ऐकणाऱ्याला खटकलं असेल. माझ्या बोलण्यात ऐकणाऱ्याला निषेधाचा सूर जाणवला असेल. या अजाण मुलाने आपल्याला ऐकवावं यात त्यांचा स्वाभिमान दुखावला असेल त्यामुळे कायम आठवणीत राहील असा माझा पाणउतारा झाला होता. आजही ती आठवण कायम ताजी आहे. कधीतरी उफाळून वर येते आणि आठवण करून देते की बोलायचं की गप्प राहायचं?

आपण खूप काही बोलत असतो पण ते निव्वळ बोलणं असते. तू असं काही बोल की त्यामुळे ऐकणारा मागे वळून पाहिल. कदाचित त्याचा हरवलेला रस्ता त्याला सापडेल आणि तो मुक्कामावर पोहोचेल. बोलणं म्हणजे नव्याने जन्मणे असते. तो बोलत होता म्हणून तो जिवंत होता. त्याने बोलणं थांबवलं नाही. तो बोलायचा थांबला असता तर त्याचा जन्म झाला नसता. आपण एकदाच जन्माला येतो, कधीतरी मरून जातो आणि तेथेच संपतो.

आपला प्रवास मृत्यूकडून मृत्यूकडे होत असतो. मला भेटलेला तो एकमेव होता की तो बोलला म्हणून त्याचा जन्म झालेला होता. जन्माचा आणि बोलण्याचा असा संगम जेथे होतो तेथे जन्मोत्सव साजरा होतो. म्हणून त्याचा जन्म जवळ आला की मला त्याने डोंगरावरून ठोकलेली आरोळी ऐकू येते. त्याचा जन्म जवळ आला की मला त्याचा आक्रोश आठवतो. त्याचा जन्म जवळ आला की मला त्याचे प्रेमाने फुंकर घालणारे शब्द स्पर्श करतात आणि माझं सर्वांग मोहरून जाते. त्याचा जन्म जवळ आला की तो न बोलतादेखील जे काही बोलला होता त्याचे ध्वनी माझ्यापर्यंत पोहोचतात.

कारण तो केवळ मुखावाटेच बोलला नव्हता. तो स्पर्शातून देखील बोलला होता. त्याच्या निव्वळ स्पर्शाने वाहत्या जखमा बऱ्या झाल्या होत्या. त्याच्या एका स्पर्शाने आंधळ्यांना नवीन डोळे मिळाले होते. त्याच्या हातात काय जादू होती ठाऊक नाही पण त्याने हात लावायचा अवकाश कित्येक वर्षापासून लोळा गोळा झालेल्या माझ्या शरीरात नव्याने प्राण फुंकला होता. नंतर मला कळलं होतं की जीवनदायी स्पर्श ज्याला म्हणतात तो हाच आहे. तो जेव्हा डोळ्यावाटे बोलला होता तेव्हा पाण्याचा द्राक्षरस झाला होता. त्याच्या केवळ पाहण्याने सृष्टीने रूप बदललं होतं. तो यायचा अवकाश वादळ शांत झालं होतं आणि लाटांनी मान टाकली होती. केवळ तो सोबत आहे म्हणून माझं जाळं माश्याने तुडुंब भरलं होतं. कुणीतरी विहिरीवर पाणी भरण्यासाठी आली होती. तिचा जन्मच कुलटा म्हणून ठरवलेला होता. तो जेव्हा तेथे अवतरला होता तेव्हा आत्म्याचं संगीत झंकारलं होतं. त्याची नजर पृथ्वी व्यापून राहिली होती. त्याच्या एका कटाक्षाने वासनेचा डोह क्षमला होता. सर्व अमंगळाचा अंत झाला होता.

तो अश्रूवाटे देखील बोलला होता. जेव्हा शब्द संपतात तेव्हा धावून येतात अश्रू. खरं म्हणजे तो आसवांचा धनाढ्य व्यापारी होता. त्याचे डोळे कायम भरलेले असायचे आणि काळ वेळचं बंधन न पाळता ते सतत वाहतेही असायचे. बाळ अश्रूपात करते आणि आईला पान्हा फुटतो. त्याच्या अश्रूमुळेच त्याचं परमात्म्या बरोबर अनुसंधान घट्ट झालेलं होतं. त्याच्या शब्दामागे, त्याच्या स्पर्शामागे अश्रू उभे असायचे म्हणूनच त्याच्या स्पर्शाने चिरदाह शांत व्हायचा. तो रडायचा आणि रडण्यात त्याला कधीही कमीपणा वाटायचं नाही. ज्या सहजतेने त्याच्या मुखावाटे प्रार्थना पाझरायची त्याच सहजतेने त्याच्या डोळ्यातून पाऊस कोसळायचा. कोरडी भूमी केवळ आभाळाच्या पावसानेच उपजवू होत नसते त्यासाठी अश्रूचं शिंपण गरजेचं असते. त्याने बाग फुलवली ती आसवांच्या पाण्यावर म्हणून त्याच्याशी संवाद साधण्याचा एकमेव सोपा मार्ग म्हणजे अश्रुपात.

प्रार्थनेसाठी शब्द गोळा करावे लागतात आणि कोरडे शब्द कुठेही पोहोचत नाहीत. या हृदयाचे त्या हृदयी करायचं असेल तर अश्रूचा पूल उभारावा लागतो. तो मला जेव्हा केव्हा भेटला तेव्हा तो डोळ्यातून वाहत होता. एरव्ही त्याचा गाव वेगळा आणि आपला प्रदेश वेगळा. कुणीतरी विचारीतच असतो त्याचा पत्ता तर हाकेच्या अंतरावरच तो राहतो. केवळ आवाज द्यायचा अवकाश त्याचा अनुभव येईलच. आणि नाहीच ऐकली हाक तर विचारणाऱ्याला सांगतो की कित्येक दिवसात तुझं आभाळ भरून आलेलं नाही म्हणून सगळा रखरखाट आहे. डोळ्यावाटे जेव्हा खारं पाणी पाझरते तेव्हा त्याला पान्हा फुटतो. तो अनुभवण्याचा विषय आहे.

दिवसभर, वर्षानुवर्ष त्याच्या असण्या नसण्याच्या गोष्टी बोलता येतील. पण त्यातून तो कळेलच असे नाही. तो कळला नाही तर त्याची गाठभेट कशी शक्य आहे? जीवाचा कान करून त्याची वाणी ऐकावी लागेल . सर्व शक्ती पणाला लावून त्याला अनुभवावं लागेल. कारण त्याने हाका देणं थांबवलेलं नाही.

रात्र झालेली असते. मला त्याच्या हाका ऐकू येतात. मी झोपेतून उठून बसतो. सभोवताली केवळ अंधार असतो. मला वाटते मला केवळ भास झाला आहे. मी झोपी जातो, काही वेळाने पुन्हा त्याची हाक मला ऐकू येते. मी अंथरुणावर उठून बसतो. कानोसा घेतो... आसपास कोणीच नसते. मी पुन्हा झोपेच्या अधिन जातो मग पुन्हा त्याचा आवाज माझ्या कानावर येतो. या वेळेला मी उठून बसतो. डोळे उघडतो सर्वत्र उजेड करतो आणि म्हणतो, बोल प्रभू तुझा दास ऐकत आहे. तू असं मला हाका ऐकायला शिकवलं म्हणून माझं जीवन बदललं. तू मला पाहायला शिकवलं. तू मला स्पर्श करायला शिकवलं आणि माझ्या बोटामध्ये जादू आली. कधीतरी मी ठरवतो आता गप्प राहायचं. यापुढे बोलायचं नाही. जे जे होईल ते पहात राहायचं. कान डोळे बंद ठेवायचे. पाहिलं तरी न पाहिल्यासारखं करायचं. ऐकलं तरी कानाडोळा करायचा. आपण काय ठेका घेतला आहे काय ? असा निर्धार करून मी शांत निवांत होण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. त्यानंतर निवांत होऊन मी जन्माच्या तयारीला लागतो. सर्व काही सज्ज असते आणि मी वाट पाहत थांबतो.

मी आभाळाकडे नजर लावून बसतो पण तेथे कुठेही ओळखीची खूण दिसत नाही. येणाऱ्याला जाणाऱ्याला विचारलं असतं की याच गावात त्याचा जन्म झाला आहे का ? तर रस्ते निर्मनुष्य आहेत आणि जो कोणी भेटतो त्याला माझी भाषाच अवगत नाही. जर तुझा जन्मच झाला नाही तर उत्सव कसा साजरा करायचा ? हा पेच काही केल्या सुटत नाही. मग मी जीवाच्या आकांताने तुलाच हाका देऊ लागतो. मी सर्व बंधनं तोडून बोलू लागतो. त्यात गाणं असते, गोष्ट असते. माझी भाषा कुणाला कळो वा ना कळो मी बोलतच राहतो. मी बोलतच राहतो तेव्हाच माझा जन्म झालेला असतो. जेव्हा मी जन्मतो तेव्हा तुझा जन्म होतो. अगदी साधी सोपी गोष्ट आहे तुझ्या जन्माची. आता मला कोणीही सवाल करीत नाही की तुला बोलायला कोणी सांगितलं होतं ? मी बोललो नाही तर माझा जन्म नाही. मी बोललो नाही तर तुझा जन्म नाही. बोलणे हे माझं अपरिहार्य प्राक्तन आहे. तुझं आणि माझंदेखील.

आज तुझा जन्म झालाय...

# भारत देशाचा नागरिक म्हणून जगताना..


- अमित उषा जगू घोडके, मो - 8698829707


चर्चगेट ते विरार या ट्रेनमध्ये माझा प्रवास चालू होता. मी विरारला उतरणार होतो. एकामागून एक स्टेशन पार करीत ट्रेन काही वेळाने नायगाव स्टेशनला पोहचली. काही मंडळी त्या ट्रेनमध्ये चढले. बसायला जागा असल्याने मी बसलेल्या बाका समोर एक जेमतेम पन्नास वय वर्ष असणारी चांगल्या घरातली व्यक्ती येऊन बसली. थोड्यात वेळात या महाशयानी हातात असणाऱ्या बॅगेतून चिप्सची दोन पाकिटे आणि कोल्ड्रींक्सची बाटली बाहेर काढली आणि ते आरामात त्याचा आस्वाद घेऊ लागले. वसई स्टेशन गेले. महाशयानी दोन्हीही पाकीटे फस्त केली आणि कोल्ड्रींक्स पण संपवले आणि इकडे तिकडे पाहत सीटच्या खाली संपलेली चिप्सची पाकीटे आणि ती मोकळी बाटली बिनधास्तपणे टाकून दिली.

हा विचित्र प्रकार पाहून मला त्या व्यक्तीचे असं वागणं पाहून वाईट वाटले पण तेवढ्यात नालासोपारा स्टेशन आले. कोणत्याही क्षणांचा विचार न करता त्यांनी फेकून दिलेली चिप्सची पाकीटे आणि ती बाटली उचलली आणि प्लॅटफॉर्मवर कचरा टाकण्यासाठी डबे ठेवलेले आहेत त्याच्यात जाऊन टाकली आणि पटकन त्यांच्या- समोर येऊन बसलो अन् त्यांच्याकडे एकदा पाहिले. एक शब्द सुध्दा त्या शिकलेल्या व्यक्तीला बोललो नाही. या घडलेल्या घटनेत त्यांची हिम्मत झाली नाही विरार येईपर्यंत माझ्याकडे मान वर करुन बघायची... आजूबाजूची बसणारी मंडळी सुध्दा तो झालेला प्रकार पाहून शांत बसली होती. विरारला मी उतरलो आम्ही सर्वजण गाडीतून उतरलो. ती व्यक्ती पटकन उतरुन बाहेर पडली. पुढे गेल्यानंतर मी त्या व्यक्तीकडे शेवटचा कटाक्ष टाकला. त्यांनी मला मान थोडीशी वर करुन माझ्याकडे पाहिले पण त्या नजरेत मला हे जाणवलं की त्या व्यक्तीला त्यांची चूक ही समजलेली होती. ते चालले होते पण मनातं एक अपराधी असलेली भावना घेऊन...

अशा अनेक घटना या दीडशे कोटी जनता असणाऱ्या देशात रोज घडत आहेत मग प्रश्न उपस्थित राहतो की हा देश माझा आहे का ? आणि या देशाची असणारी विविध रुपात उपलब्ध असणारी संपत्ती ही माझी आहे का ? सोबत माझी सामाजिक बांधिलकी नक्की काय असेल ? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारणं अनिवार्य आहे

असं मला वाटतं. यातून समजेल की या देशाला स्वच्छ व आदर्श ठेवायचा असेल तर प्रत्येक भारतीयाचे पाऊल हे सकारात्मक व शांततेच्या मार्गाने पडले पाहिजे तर कुठे तरी चांगला बदल आपण आपल्या देशात पाहू शकतो..

आजकाल ट्रेनमध्ये छोट्या छोट्या गोष्टीत भांडत बसणारी मंडळी म्हणजे स्त्री असो वा पुरुष कधी कधी टोकाचा अपराध करुन बसतात मग हा राग या लोकांच्यात येतो कुठून ? याला जबाबदार कोण ? समाजात नियंत्रण ठेवणारी व्यवस्था यावर भाष्य का करीत नाही..? असे अनेक प्रश्न आजच्या धकाधुकीच्या जीवनात लोकांना फक्त पडत आहेत पण यावर कृतीशील मार्ग शासन करेल किंवा काही जाणकार मंडळींनी पुढाकार घेऊन काढलाच पाहिजे व त्या विचारांना साथ देणं ही प्रत्येक भारतीयांची जबाबदारी आहे..

धावपळीच्या जगात आजचं जगणं खरोखर अवघड होऊन बसले आहे. एकविसाव्या शतकातील वर्तमानात जगत असताना आजूबाजूला असणाऱ्या आधु-निक जगामध्ये निस्वार्थ मैत्री, प्रेम, आनंद, आदर, सन्मान, आपुलकी, माणूसकी, निष्ठा, विश्वास, जाणीव, नेणीव, कृतज्ञता, या जीवन समृद्ध करणाऱ्या शब्दांचा विसर सध्याच्या पिढीला होत आहे आणि म्हणूनच वेगवेगळे अपराध, गुन्हे, भ्रष्टाचार, चोऱ्या व मोठ मोठं कोटीतले स्कॅम या समाजात होताना दिसत आहेत. पैसा सर्वस्व समजून नुसतं धावत राहणारा मोठा वर्ग या समाजात निर्माण झालेला आहे..

एकमेकांविषयी असणाऱ्या आपलेपणाच्या मैत्रीमय भावना या मरुन तर पडलेल्या नाहीत ना कारण आजकाल कोणत्याही कार्यक्रमाच्या शुभेच्छा या सुध्दा मोबाईलमध्ये असणाऱ्या WhatsApp, Facebook व इतर अँपद्वारे देतात पण फोनवर बोलून वा समक्ष भेटून आपण आपल्या भावना व्यक्त केल्या पाहिजेत या गोष्टीच समजणारा वर्ग हा अतिशय कमी प्रमाणात समाजात वावरताना दिसत आहे.

एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की जगामध्ये वरील काही महत्त्वपूर्ण घट-कांचा आधार घेऊन अगदी निस्वार्थपणे जगणारी १० % मंडळी या सुंदर जगाला तारण्याचा उत्तम पध्दतीने प्रयत्न करीत आहेत त्यामध्ये आपण आहोत का हा प्रश्न स्वतःला नक्की विचारावा तरच या सुंदर अशा पृथ्वीला आपण वाचवू शकतो नाहीतर विविध देशातील सत्तापिपासू व धूर्त राजकारणी मंडळी स्वतःच्या स्वार्थापायी स्वतःचाच देश व इतर देश संपवायला सुध्दा कमी पडणार नाहीत ही सध्याची वस्तुस्थिती आहे...

या सोबत टेक्नॉलॉजी आपल्या दैनदिन जगण्यावर राज्य करीत आहे हे सत्य नाकारता सुध्दा येत नाही. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात काही ठराविक मंडळी टेक्नोसॅव्ही (मोबाईल किंवा कॉम्प्युटर सहज हाताळणारे) झालेले आहेत आणि त्याचा ते योग्य वापर करुन फायदा व संधी शोधत आहेत पण या देशातील तरुणमंडळी,

स्कूलमधील विद्यार्थी / विद्यार्थीनी हे विविध मनोरंजन करणाऱ्या ॲपचा व काही मोबाईलवरील उपलब्ध असणाऱ्या गेमचा अतिरिक्त वापर करुन आपला अनमोल वेळ आणि ताकद वाया घालविताना दिसत आहे याचा जो काही परिणाम कालांतराने त्यांच्या शारीरिक व मानसिक अवस्थेवर होताना दिसत आहे आणि तो अजून मोठ्या प्रमाणात सुध्दा दिसणार आहे याची जाणीव समस्त भारतीयांना असणं महत्वपूर्ण आहे असं मला वाटतं.

पालकांनी सवय लावल्यामुळे छोट्या मुलांना मोबाईल दिला नाही तर रडून रडून गोंधळ घालतात, चिडचिड करतात. कधी कधी तर टोकाची भूमिका सुध्दा घ्यायला ही मुले कमी पडत नाहीत. मोबाईलच्या अतिरिक्त वापरांमुळे आजकाल डोळ्यांच्या आणि कानांच्या समस्या या लोकांच्यात खूप प्रमाणात वाढत चाललेल्या आहेत. शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम कसं राहता येईल यावर सुध्दा मोठं कार्य होणं गरजेचे होऊन बसलेलं आहे.

टीव्ही व मोबाईलचा स्क्रीन टाईम हा सर्व वयोगटातील मंडळींनी जितका कमी करता येईल तेव्हढा तो आपल्याला फायदेशीर ठरणार आहे. आपल्या कुटुंबातील लहान मुले हे मोठ्यांचे अनुकरण करीत असतात त्यामुळे या टेक्नॉलॉजीच्या युगात प्रत्येकाला खूप सावधगिरीने पाऊल टाकता आले पाहिजे तरच येणाऱ्या पिढीला पुढील काळात निर्माण होणाऱ्या मोठ्या संकटांना सामोरे तरी जावे लागणार नाही याची दक्षता घेणे ही सर्वस्वी जबाबदारी ही आपल्या सर्वांची आहे.

शिक्षणातून मिळणाऱ्या ज्ञानासोबत चांगल्या व वाईट अनुभवाशिवाय आपण आपल्यामध्ये वैचारिक प्रगल्भता अथवा वैचारिक परिपक्वता आणू शकत नाही त्यामुळे प्रत्येकाने आपल्या जीवनाचा हेतू नक्की काय आहे तो शोधला पाहिजे तरच या देशात वैचारिक क्रांती सोबत आर्थिक क्रांती सुध्दा येऊ शकते तरच सर्व भारतीय मंडळी आनंदाने या सुंदर अशा देशात आपले उत्तम जीवन जगू शकतील.

याबरोबर सांगायचेच झाले तर जापानमधील ओकिनावा बेटावरील काही जापानी लोकांचा अभ्यास करण्यात आला व त्यांच्याकडून जीवन जगण्याचे एक सिक्रेट समजून घेता आले. जापानमध्ये चिंतन व मनन करुन इकिगाई म्हणजेच जीवन जगण्याचे कारण ज्यांना सापडलेले आहे ती मंडळी दीर्घायुषी आहेत व त्यांचे आनंदी राहणीमान इतरांना प्रेरणा देत असते. एकदा का तुमची तुम्हाला इकिगाई सापडली की जीवन जगण्याचा मार्ग सुकर होऊन जातो. इकिगाईचे काही नियम आहेत ते म्हणजे,

- जी गोष्ट मनापासून करायला तुम्हाला आवडते तीच करा.

- ज्या गोष्टीत तुम्हाला गती आहे किंवा तुमच्याकडे काही विशिष्ट कौशल्य आहे त्याचा वापर करा.
- ज्या गोष्टीची जगाला सुध्दा आवश्यकता आहे.
- आणि ज्या कार्यापासून तुम्हाला पैसे पण भेटू शकतात हीच आयुष्य जगण्याची खरी इकिगाई आहे आणि याचा महत्वाचा संदेश म्हणजे तुम्ही काहीही करा पण निवृत्त होऊ नका हे या मागचे मुख्य तत्व आपण सुध्दा जोपासले पाहिजे तर कुठंतरी छानसा बदल आपण आपल्यामध्ये निर्माण करु शकतो.

यासोबत सुंदर जीवन जगायचे असेल तर इकिगाई आणि न्यूयॉर्क टाइम्सचे लोकप्रिय लेखक डॅन ब्युटनर लिखीत ब्लू झोन नावाचे पुस्तक आपल्याजवळ संग्रही असणं आजच्या काळात आवश्यक आहे. अशी अनेक पुस्तके तुमचे आयुष्य समृद्ध करु शकतात पण यासाठी वाचनाची आवड असणं अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रातील किंवा जगातील थोर महापुरुष, महानायिका असो वा मोठे यशस्वी उद्योजक, सेलेब्रिटी असो या सर्वांनी वाचनाच्या जोरावर व अनुभवांच्या शिदोरीवर इतिहास रचलेला आहे त्यामुळे वाचन संस्कृती ही जोपासनं ही प्रत्येक भारतीयांची जबाबदारी आहे.

तसं पाहायला गेलं तर आजकाल भारतात वाचन संस्कृती ही लोप पावत चाललेली आहे. काही ठिकाणी असं बोललं जातय की हा भारत देश म्हणजे न वाचणारा देश आहे पण सुधा मूर्ती सारख्या महान लेखिका कर्नाटकात गावोगावी लायब्ररी देऊन त्या गावातील लोकांना वैचारिक साक्षर बनवित आहेत. Let’s India Read हा उपक्रम उद्योजक प्रफुल्ल वानखेडे मुंबई सोबत विविध ठिकाणी राबवित आहे. अशी खूप चांगली मंडळी महाराष्ट्रात वेगवेगळे वाचनसंस्कृती जोपासावी याविषयी जनजागृती करीत आहे. जीवन विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. ख्रिस्तोफर रिबेलो, श्री. जॉन परेरा, श्री. एडवर्ड डिसोजा, श्री. इमेल अल्मेडा व इतर आजी माजी असणारे सर्व पदाधिकारी यांच्या चेतना वाचनालयाद्वारे विविध उपक्रम राबवून लोकांना जागृत करण्याचे सुंदर कार्य ही सर्व मंडळी प्रामाणिकपणे करीत आहेत म्हणून यांच्या महान कार्याला कडक सलाम व शुभेच्छा आहेत..

महत्वाचे मुद्दे हे आहेत की..

- प्रत्येक भारतीयाने छोटे छोटे सकारात्मक बदल केले पाहिजेत.
- रागावर थोडा संयम ठेवायला हवा आहे.
- लहानांपासून जेष्ठांपर्यंत सर्वांचा आदर सन्मान केला पाहिजे.

- हा देश माझा आहे इथे कोणतीही गोष्ट करताना मला कुणी तरी पाहत आहे याची जाण ठेवून कार्य करणे.
- माझ्याकडून कोणत्याही प्रकारचे चुकीचे कार्य होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.
- या देशात मुलींचा, स्त्रीयांचा आदर हा झालाच पाहिजे.
- पैश्याच्या हव्यासापोटी जर कुणी भ्रष्टाचार करीत आहे तर त्यांचा शेवट सुध्दा विचित्र असणार आहे हे समजणं सुध्दा गरजेचे आहे.
- गाव सोडून शहरात व परदेशात राहणाऱ्या मंडळींनी गावाकडे आल्यावर चांगल्या गोष्टी गावात व शहरात कशा आणता येतील आणि आपल्या लोकांच्यात परिवर्तन सुध्दा कसं करता येईल यासाठी विचार करणे गरजेचे आहे तरच आपण सर्वजण आनंदी राहू शकतो.
- वेळेचा आदर आपण सर्व भारतीयांनी केलाच पाहिजे तो नाही केला तर वेळ तुमचा सुध्दा कधीच आदर करणार नाही हे त्रिकालबाधीत सत्य आहे.
- जातीपातीच्या पलीकडे सुध्दा सुंदर असं जग आहे पण या देशातील देशवासियांना ते कधी उमगेल हे सांगता येणार नाही.
- माणूसकी सोबत मैत्रीबंध जपा आणि मानव म्हणूनच या धरतीवर मोकळ्या श्वासाने वावर करा हीच या लेखाप्रती प्रेमळ इच्छा...!

एक भारतीय..

# कथा नकोशा झालेल्या बाळाची

■ प्रा. स्टीफन आय. परेरा, संपर्क : 9850878189

रोमन सम्राटाचा मांडलिक राजा हेरोद याच्या काळात (खिस्तपूर्व ३७ ते इ.स. ४) यहुदीया प्रांतातल्या बेथलेहेम गावी येशूचा जन्म झाला. त्याच्या जन्मानंतर पूर्वेकडून काही खगोल शास्त्रज्ञ जेरूसलेमला आले आणि चौकशी करू लागले की यहुद्यांचा राजा जन्माला आला आहे, तो कोठे आहे. आम्ही त्याचा तारा पाहून त्याला नमन करण्यास आलो आहोत.

ही बातमी ऐकताच राजा हेरोद भयभीत झाला. त्याने लगेच सर्व याजक आणि धर्मशास्त्री यांना बोलावून खिस्त म्हटलेल्या मसीहाचा जन्म कुठे व्हायचा आहे याची चौकशी केली. तेव्हा 'यहुदीयातील बेथलेहेम गावी' असे उत्तर मिळाल्यावर हेरोदने त्या खगोलशास्त्रज्ञांना बोलावून बेथलेहेम गावी जाण्यास सांगितले, तेथे त्या बाळाचा शोध लागल्यावर मला येऊन सांगा म्हणजे मीही जाऊन त्या बाळाला मुजरा करीन असे हेरोदने म्हटले.

राजाच्या सांगण्यावरून ते बेथलेहेमला आले. त्यांनी येशू बाळाचे दर्शन घेतले, त्याला नमन केले आणि आपल्या थैल्या सोडून त्याला सोने, ऊद आणि गंधरस यांचे नजराणे दिले. त्यानंतर त्यांना स्वप्नात मिळालेल्या संदेशानुसार ते दुसऱ्या वाटेने निघून गेले. तसेच जोसेफला मिळालेल्या संदेशानुसार तो रात्रीच उठला आणि बाळाला व त्याच्या आईला घेऊन इजिप्तला निघून गेला.

खगोलशास्त्रज्ञांनी आपल्याला फसविले असे पाहून हेरोद संतापला. त्याने बेथलेहेम व आसपासच्या भागातील दोन वर्षाखालील सर्व बालकांची कत्तल केली. (मत्तय २.१-१६) मानवजातीच्या तारणासाठी देवाचा पुत्र या भूतलावर अवतरला. पण हेरोद राजाला तो नकोसा होता, कारण यहुद्यांचे आपणच एकमेव राजे आहोत,

आपल्याला दुसरा प्रतिस्पर्धी नको असे हेरोदला वाटे, म्हणून त्याने असंख्य निरपराध बालकांची कत्तल केली.

अशी ही पहिल्या शतकात घडलेली हेरोदाच्या क्रौयाची कथा सांगितली आते. त्यानंतरच्या गेल्या दोन हजार वर्षाच्या काळात हेरोदसारखे अनेक क्रूरकर्मा होऊन गेले. अगदी अलीकडचे उदाहरण द्यायचे तर इ. स. १९३३ ते १९४३ या काळात जर्मनीत हिटलर नावाचा असाच क्रौयाचा बादशहा होऊन गेला. त्याने लाखो निरपधार लोकांना छळछावणीत डांबून आणि अन्य मार्गांनी अक्षरश: किड्यामुंग्यासारखे चिरडून मारले. त्याने केलेला मानवी संहार पाहून त्याच्यात दुष्टात्मा संचारलेला होता असेच म्हणावे लागेल.

मानवाच्या निर्मितीमध्ये देवाच्या पावन मंगल कृतीचा फार मोठा वाटा आहे. त्यामुळे मानवी जीवन पवित्र मानले जाते. जीवनाच्या आरंभापासून शेवटपर्यंत परमेश्वर हाच मानवी जीवनाचा स्वामी व प्रभू आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला निरपराधी जीवाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या नाश करण्याचा अधिकार नाही (कॅथॉलिक श्रद्धाग्रंथ, कलम २२५८) याच संदर्भात प्रभू येशूने म्हटले, “खून करु नकोस आणि जो खून करील तो न्यायसभेच्या दंडास पात्र होईल.” (मत्तय ५:२१)

दुर्दैवाने आज जगभर अजाण बालकांची सर्रास कत्तल केली जात आहे. हेरोद आजही जीवंत आहे. खुद्द आईवडीलच हेरोदाची भुमिका पार पाडीत आहेत. मोठमोठे शिकलेले डॉक्टर नकोशा झालेल्या बालकांसाठी कत्तलखाने चालवित आहेत. हेरोदच्या काळात फक्त एकच दिवस बालकांची कत्तल झाली, पण आज सर्रास रात्रंदिवस शेकडो बालकांची कत्तल होत आहे. त्याकाळी हेरोदचे शिपाई बालकांची कत्तल करताना आईवडील हंबरडा फोडून शोक करीत, आज आमचे आईवडील स्वत:हून कत्तलखान्याकडे जाऊन आपल्या संमतीने पोटच्या बाळाची कत्तल करुन घेत आहेत. रडणे, हंबरडा फोडणे तर सोडाच, पण उलट गर्भपात करुन ‘सूटलो एकदाचे’ अशा अविर्भावात समाधानाने घरी जातात.

पूर्वीच्या काळी लोक अशिक्षित होते, त्यांना दहा-बारा मुले व्हायची. आताची सुशिक्षित पिढी कुटुंबाचे नियोजन करु लागली. नियोजन चांगले असले तरी ते सुशिक्षितांना शोभेल असे असावे. काही वर्षांपूर्वी तीनपेक्षा जास्त मुले होऊ नयेत अशी अलिखित शिकवण दिली गेली, नंतर काही काळाने 'हम दो हमारे दो' असा घोष दिला गेला. लवकरच तो मागे पडून 'हम दो हमारा एक’ असे म्हणण्यात मोठेपणा समजला जाऊ लागला. त्याच्या पुढची पायरी मात्र भयंकर होती ती म्हणजे DINK संस्कृतीची. DINK संस्कृती म्हणजे Double Income No Kid. दोघंही पतीपत्नी नोकरी करीत असल्याने मूलबाळ होऊ न देणे हीच ती डिंक संस्कृती.

शिवाय काही स्त्रियांना असे वाटते की बाळंतपणामुळे आणि नवजात बाळाने स्तनपान केल्यामुळे आपले सौंदर्य बिघडते, म्हणून त्या गर्भपात करून मोकळ्या होतात. त्यावेळी त्यांना विसर पडतो की, ‘मुलांना जन्म देणे आणि शिक्षण देणे तसेच पती-पत्नीच्या कल्याणासाठी विवाह या कृपासंस्काराची स्थापना करण्यात आली आहे.’ (श्रद्धाग्रंथ कलम १६०१)

**गर्भपात म्हणजे काय ?**

वैद्यकीय शास्त्रानुसार ‘An Abortion is a process to end a pregnancy.’ OR ‘A medical operation that ends a pregnancy at any early stage.’ म्हणजेच मूल होण्याआधीच गर्भारपण संपुष्टात आणण्याची कृती म्हणजे गर्भपात.

**गर्भपात करण्याचे प्रकार :**

‘The Womb as a Tomb' या नावाने Alert या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात गर्भपात करण्याचे पुढील प्रकार दिले आहेत.

१) **Suction Aspiration :** बाळाच्या शरीराचे गर्भाशयातच बारीक तुकडे करून एका शोषनलिकेतून ते तुकडे भांड्यात शोषून बाहेर काढले जातात. पहिल्या बारा आठवड्यात सर्वसाधारणपणे हीच पद्धती वापरली जाते.

२) **Dilation and Curettage (D & C)** : या पध्दतीत एका स्टीलच्या सुरीने बाळाचे तुकडे करुन गर्भवेष्टन खरवडून काढतात. असे गर्भाशय पूर्ण रिकामे करीपर्यंत मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होतो.

३) **Dilation and Evacuation (D & E)** : या प्रकारात स्टीलच्या सुरीऐवजी चिमटा वापरतात. जास्त दिवस झालेल्या बाळाची हाडे मजबूत झालेली असल्याने ती हाडे चिमट्याने पकडून अडकित्त्यात सुपारी फोडतात त्याप्रमाणे फोडून तोडून शरीराचे तुकडे बाहेर काढले जातात.

४) **Salt Poisoning** : या प्रकारात आटवून घट्ट केलेले मीठ गर्भाशयात भरतात. सुमारे दोन तासांनी त्या मीठामुळे तयार झालेल्या विषामुळे बाळ मृत्यूमुखी पडते. तशा मृतावस्थेत बाळाला जन्म दिला जातो.

५) **Hysterotomy** : या प्रकारात ऑपरेशन करून बाळाला आईच्या उदरातून उचलले जाते व त्याच्या मानेभोवती दोरी आवळली जाते. काही वेळातच बाळाची धडपड बंद होते. यामध्ये आणखी एक निघृण (अमेरिकन) प्रकार म्हणजे ‘पार्शियल बर्थ अबॉरशन’. या प्रकारात बाळाला चिमट्याने घट्ट पकडून बाहेर काढतात, गर्भाशयाबाहेर त्याचे डोके दिसताच मानेवरून त्याच्या डोक्यातील मेंदूला सुरी मारताच बाळ मान टाकते.

अशा या सर्व प्रकारच्या गर्भपातांना खून नाही म्हणायचे तर काय म्हणणार? वास्तविक पाहता गर्भसंभवाच्या पहिल्या क्षणापासूनच मानवी जीवनाला सुरुवात होते. तेव्हापासूनच त्या अर्भकाला जीवन जगण्याचा हक्क मिळतो. गर्भपात करताना हाच त्याचा मूलभूत हक्क हिरावून घेतला जातो. गर्भाशयातील बालकाचा हा हक्क त्याच्या मातेलाही हिरावून घेता येत नाही. अगदी पहिल्या शतकापासून ख्रिस्तसभेने गर्भपात हे गंभीर स्वरुपाचे पाप मानलेले आहे. ख्रिस्तमंडळाची ती शिकवण आतापर्यंत बदललेली नाही आणि पुढे बदलणारही नाही. गर्भपात हे पापच ठरविलेले आहे (श्रद्धाग्रंथ कलम २२७० ते २२७३)

गर्भधारणेच्या पहिल्या क्षणापासून जीवनाला खरी सुरुवात होते हे सत्य बऱ्याच शास्त्रज्ञांनी आणि जागतिक संघटनांनी मान्य केले आहे. मानवी हक्कांबाबत जिनेव्हा येथे भरलेली महासभा, जागतिक डॉक्टरांची महासभा तसेच युनायटेड नेशन्सच्या चार्टस ऑन चिल्ड्रन या सर्वांनी वरील सत्यावर शिक्कामोर्तब केले आहे. इतकेच नव्हे तर जगातल्या जवळजवळ सर्वच धर्मांनी वरील सत्य स्वीकारले असून गर्भपाताचा निषेध केला आहे.

ख्रिस्ती धर्मकायदा (Cannon Law) कलम १३९८ नुसार गर्भपात करणारी व्यक्ती धर्मबहिष्कृत होते असे पुढील शब्दांत स्पष्ट केलेले आहे. "A person who actually procures abortion incurs a latae sententiae excommunication. (Canon Law New 1398, Old 2350)

यासंबंधीचे प्रबोधन चर्चमधून तसेच चर्चप्रणित निरनिराळ्या प्रसार माध्यमातून वेळोवेळी व्हायला हवे. आज जगभर झाडे वाचवा, कुत्री वाचवा, साप वाचवा, अमुक प्राणी वाचवा, तमुक पक्षी वाचवा अशा चळवळी सुरू केल्या जातात पण ‘बालकं वाचवा’ अशी जीवन संरक्षण (Prolife movement) चळवळ चालविणारे फारच थोडे दिसतात व त्यांना इतरांचा प्रतिसादही फार अल्प प्रमाणात मिळतो हीच शोकान्तिका आहे.

या वर्षीच्या ख्रिस्तजयंतीच्या निमित्ताने आपण प्रार्थना करू या, "हे बाळ येशू, तुझ्या जन्माच्यावेळी हेरोद राजाने बेथलेहेममधील बालकांची कत्तल केली, आज जगभर गर्भपाताद्वारे दररोज असंख्य बालकांची कत्तल केली जात आहे. आम्ही या गंभीर पापापासून परावृत्त व्हावे म्हणून तू आम्हाला कृपा व समजूतदारपणा दे."

# ‘सत्य, मार्ग आणि जीवन मीच आहे!’

**(योहान-१४:६)**

■ रेमंड मच्याडो, वसई

सामान्य माणसाच्या जीवनात अशी अनेक संकटे आणि प्रसंग येतात की ज्यातून ‘खरे काय आणि खोटे काय’ याचे भान ठेवून पुढे जाणे आवश्यक असते. हा निर्णय घेताना विवेकबुद्धीची भूमिका महत्त्वाची असते, कारण प्रत्येक कृतीचा परिणाम केवळ त्याच व्यक्तीवर नव्हे, तर त्याच्या सभोवतालच्या व्यक्तींवर, प्राप्त परिस्थितीवर आणि समाजावरही होत असतो.

जन्मतःच माणसात विवेकबुद्धीचा अंकुर असतो, पण ती आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर अधिकाधिक विकसित होत जाते. बालकाच्या आयुष्यावर वांशिक गुणांव्यतिरिक्त त्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक वातावरणाचाही प्रभाव पडतो. घरातील संस्कार, शाळेत मिळणारे शिक्षण, आजूबाजूच्या लोकांचा वावर आणि समाजातील चालीरीती यांचा त्याच्या विचारांवर प्रभाव पडतो. हे सारे अनुभव आणि संस्कार एकत्र येऊन त्याची नैतिकता, विचारशक्ती, विचारांमधील खोली आणि व्यक्तिमत्त्वाचे प्रमाण ठरवतात.

बाल्यावस्थेतील बौद्धिक आणि शारीरिक विकासाला आपल्या संस्कृतीतून आणि सामाजिक वातावरणातून आकार मिळतो. म्हणूनच माणूस जसजसा प्रौढ होतो, तसतशी त्याची विवेकबुद्धी परिपक्व होत जाते आणि त्यातून त्याच्यात सामाजिक, नैतिक आणि वैचारिक मूल्यांची वाढ होते. या सगळ्या गोष्टी त्याला आयुष्याच्या विविध प्रसंगांतून खरे आणि खोटे यातील फरक ओळखायला मदत करतात.

विवेकबुद्धी ही केवळ ठराविक ज्ञानातच मर्यादित नसते, तर ती एक व्यापक भावना असून माणसाला अन्याय, अनीती, अज्ञान, अंधश्रद्धा यापासून दूर ठेऊन खरे आणि योग्य निर्णय घेण्यास साहाय्य करते. समाजात माणूस सतत असा विचार करीत असतो की, ‘माझ्या कृतीचा दुसऱ्यावर काय परिणाम होईल?’ या प्रश्नाचे उत्तर मिळवण्याच्या प्रयत्नात त्याची विवेकबुद्धीच त्याला आधार देते. समाजातील परिपक्व व्यक्ती ही त्यांची विचारसरणी आणि कृती नेहमी विवेकबुद्धीच्या आधारावर घडवतात. त्यातूनच

व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, समाजाच्या हिताची जाणीव होते आणि जीवनात स्थिरता येते.

म्हणूनच, खरे आणि खोटे यातील फरक ओळखण्याची ही क्षमता म्हणजेच खऱ्या अर्थाने परिपक्वतेचा पाया होय. ही परिपक्वता निर्माण करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या विवेकबुद्धीवर विश्वास ठेवून, योग्य प्रसंगात योग्य निर्णय घेण्याची तयारी ठेवायला हवी.

खरे जीवन जगणे म्हणजे केवळ अस्तित्व नसून आपल्या प्रत्येक कृतीत, निर्णयांत आणि भावनांमध्ये प्रामाणिकपणे आणि परिपक्वतेने एकरसता आणणे होय. यामध्ये सत्याचा आधार घेऊन आपल्या निर्णयांचा सामना करण्याची तयारी असते, आणि तेही सर्व प्रकारच्या परिस्थितींमध्ये. जीवनात घडणाऱ्या प्रत्येक कृतीमधून आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असते आणि या प्रत्येक कृतीमधून आपला प्रामाणिकपणा व परिपक्वता झळकत राहिली पाहिजे.

प्रत्येकजण जीवनात चुका करतो, चुकांशिवाय कोणीही परिपूर्ण होत नाही. मात्र, या चुकांमध्ये अडकून पडणे, त्या कायमस्वरूपी दोष मानणे, म्हणजे स्वतःच्या प्रगतीला अडथळा करणे होय. खरे तर, चुकांमधून शिकणे ही एक अशी कला आहे, जी माणसाला खऱ्या अर्थाने परिपक्व बनवते. यामुळे त्याला त्याच्या पुढच्या प्रवासात नेमके काय टाळावे आणि कोणते बदल करावेत हे कळते. परिपक्वतेचा खरा अर्थ म्हणजे चुका ओळखून त्यांना सुधारण्याची तयारी ठेवणे, नंतर त्याच चुका टाळून अधिक योग्य निर्णय घेण्याचे शहाणपण निर्माण करणे.

त्याचप्रमाणे, चुकीच्या वेळेस स्वतःला बरोबर सिद्ध करण्याची प्रवृत्ती मनाला तात्पुरते समाधान देऊन जाते. खोटे बोलून किंवा आपल्या चुका लपवून तात्पुरता आधार मिळतो; परंतु त्यातून दीर्घकालीन समाधान मिळत नाही. कारण त्यातून तयार होणारा पोकळ अभिमान केवळ आपल्याच विवेकबुद्धीला प्रश्न विचारू लागतो. परंतु जेव्हा आपण सत्याचा अंगिकार करतो, जेव्हा आपण स्वीकार करतो की, "हो, मी चुकलो", तेव्हा आत्मसमाधानाच्या पातळीवर आपण एक पाऊल पुढे जातो.

सत्याचा स्वीकार म्हणजे प्रामाणिकपणाला बळ देणे, आपल्या जीवनात समाधान आणणे, आणि इतरांसोबत निखळ नाते निर्माण करणे होय. दीर्घकालीन समाधानासाठी आपण आपल्या चुकांसह स्वीकारले गेलो पाहिजे, कारण केवळ सत्याच्या आधारेच आपल्याला खऱ्या समाधानाचा अनुभव येऊ शकतो.

अशा प्रकारे, खरे जीवन म्हणजे आपल्या कृतीत प्रामाणिकपणा, आपल्या निर्णयांत शहाणपणा आणि आपल्या भावनांत सामंजस्य साधणे होय. जीवन हे परीक्षांसारखे

असते; यात प्रत्येक प्रसंगातून शिकण्याची, अनुभवातून पुढे जाण्याची आणि सत्याच्या मार्गावर चालण्याची तयारी असणे हेच खऱ्या अर्थाने परिपक्व जीवनाचे लक्षण आहे.

सत्यावर विश्वास ठेवून त्याच्या मार्गाने जगणे खरंच सोपे नसते, कारण सत्य कधी कधी खूप कठोर आणि अप्रिय असू शकते. सत्याचा मार्ग निवडला तर अनेकदा आपल्याला स्वतःच्या चुका मान्य कराव्या लागतात, आपल्या स्वाभिमानाला धक्का बसतो, आणि मनोमनी अस्वस्थता येते. जेव्हा आपण चुकीत असतो, तेव्हा बहुतेक वेळा आपल्याला ते मान्य करायला संकोच वाटतो. त्याऐवजी, त्या चुकांचे समर्थन करून, स्वतःला निर्दोष सिद्ध करण्याचा मोह निर्माण होतो. हा प्रवास खोटेपणाच्या चक्रात गुंतवतो, आणि आपण खरे आयुष्य जगण्याऐवजी फक्त एक मुखवटा धारण करतो.

परंतु, सत्याच्या मार्गावर चालणे म्हणजे खोटेपणातून आणि आत्मवंचनेतून बाहेर पडणे. सत्य स्वीकारले तर ते आपल्या व्यक्तिमत्त्वाला अधिक प्रगल्भ बनवते. आपल्याला अधिक आत्मविश्वास प्राप्त होतो, कारण सत्यामुळेच आपल्या योग्यतेचा खरा आधार निर्माण होतो. यामुळे समाजासमोर आपण एक पारदर्शक आणि विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व म्हणून उभे राहतो, ज्यामुळे आपल्या नात्यांत प्रामाणिकता येते आणि त्यामध्ये असलेला विश्वास दृढ होतो.

सत्याचे आचरण करणे म्हणजे स्वतःची प्रामाणिकता आणि नैतिकता टिकवणे होय. सत्य हा नुसता विचार नसून तो जीवनशैली आहे, जिथे प्रत्येक कृतीत, निर्णयात आणि संभाषणात खरेपणा असतो. सत्याचे आचरण केल्याने आपण नुसतेच इतरांसोबत नाही, तर स्वतःसोबतही प्रामाणिक राहतो, जे आपल्याला आत्मिक समाधान आणि नैतिक उन्नतीकडे घेऊन जाते. यामुळे आपला आत्मविश्वास वाढतो आणि आपण स्वतःला अधिक चांगल्या पद्धतीने ओळखू लागतो. सत्याने वर्तन करणे सोपे नसते, पण तेच खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणते. सत्याच्या स्वीकारामुळे मिळणारे आत्मिक समाधान आणि नैतिकता हीच आपली खरी श्रीमंती आहे, जी आपल्या वैयक्तिक प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक ठरते.

आपण विवेकी आणि सत्यवान असलो तरी कधी कधी परिस्थिती अशी असते की, बहुमत असत्याच्या बाजूने जाते. अशा वेळी सत्याचे आचरण करणे, आपल्या मतांवर ठाम राहणे खूप कठीण होते. बहुमताने एखादी गोष्ट स्वीकारली, तर त्या गोष्टीला मान्यता मिळते, जणू तेच सत्य आहे असे भासवले व मानले जाते. अशा वेळी सत्याच्या मार्गावर असलेल्या व्यक्तीवर मोठा मानसिक आणि सामाजिक दबाव निर्माण होत असतो. सत्याचा पाठपुरावा करण्यासाठी आणि सत्य टिकवण्यासाठी मनोबल, धैर्य आणि आत्मविश्वास यांचा खूप मोठा कस लागतो.

सत्याची कसोटी लावणाऱ्या अशा प्रसंगांत सर्वात महत्त्वाचे म्हणजे धैर्याने आणि संयमाने परिस्थितीचा सामना करणे. सत्याच्या मार्गावर चालताना अनेकदा आपल्याला तात्पुरत्या पराभवाला सामोरे जावे लागते, परंतु त्या पराभवातून शिकून आपण अधिक सशक्त बनू शकतो. सत्यावर ठाम राहिल्याने एक प्रकारचे आंतरिक समाधान मिळते, कारण आपण कोणत्याही प्रकारचा खोटेपणा न करता निःस्वार्थपणे आपली भूमिका मांडलेली असते.

सत्याचा विजय मिळवण्यासाठी, आपल्याला प्रतिकूल परिस्थितीमध्ये संयम आणि विश्वास टिकवावा लागतो. बहुमत असत्याच्या बाजूने गेले असले तरी आपण आपल्या विचारात सत्यता, विवेक आणि नैतिकता ठेवून ठाम राहिलो, तर सत्याचे मूल्य कधीही कमी होत नाही. कधी कधी असे घडते की, सुरुवातीला विरोध करणारेही कालांतराने सत्याचा स्वीकार करतात. सत्याच्या प्रभावाची साक्ष इतरांना पटवून देण्यासाठी संयम आणि वेळ आवश्यक असतो, पण सत्याचे अस्तित्व कधीच मावळत नाही.

सत्याचा पाठपुरावा करताना आपल्या प्रयत्नांमध्ये पारदर्शकता असावी. संवादातून सत्याची बाजू स्पष्ट करत राहणे, आपल्या निर्णयांमध्ये प्रामाणिकता ठेवणे, आणि आचरणातून आपले सत्य दाखवणे महत्त्वाचे असते. सत्य हे एक मूल्य आहे, जे टिकून राहिले तर त्याचा प्रभाव अपरिहार्यपणे जाणवतो. अनेक महापुरुषांनी त्यांच्या सत्याच्या मार्गावर जिद्दीने आणि आत्मविश्वासाने संघर्ष केला आणि शेवटी त्यांचे सत्याचे मूल्य संपूर्ण समाजाने स्वीकारले. निष्कर्षतः, बहुमताचा प्रभाव असला तरी, सत्याच्या मार्गावर चालताना अपार धैर्य, संयम, आणि त्यागाची तयारी आवश्यक असते. सत्य हे शेवटी जिंकतेच कारण त्यात खरी ताकद असते आणि वेळोवेळी समाजालाही ते पटते. सत्याचे सामर्थ्य हेच की ते आपल्याला आतून सशक्त बनवते आणि आपल्याला सत्याच्या मार्गावर सदैव चालण्यास प्रेरित करते.

संयम, परिपक्वता आणि विश्वासाने आयुष्याचा प्रवास करणे म्हणजे आपल्यातील खरे गुण विकसित करणे. संयम हे कोणत्याही कठीण प्रसंगात शांत आणि स्थिर राहण्याचं शिक्षण देतो; परिपक्वता आपल्याला जगाच्या वास्तवाची जाणीव करून देते; आणि विश्वास आपल्याला जीवनातील खऱ्या माणसांना ओळखायला शिकवतो. याच गुणांमुळे आपण खऱ्या अर्थाने यशस्वी आणि आनंदी बनतो. आयुष्यातलं खरं यश हे बाह्य साधनांवर नाही, तर आपल्या आंतरिक विकासावर अवलंबून असतं, कारण संयमाने, परिपक्वतेने आणि विश्वासाने जगणं म्हणजेच जीवनातील आनंद आणि यशाचं खरं गमक आहे.

जेव्हा प्रभू येशू म्हणाले की, "मीच सत्य, मार्ग आणि जीवन आहे," तेव्हा त्यांचा संदेश अत्यंत साधा पण गहन होता. येशूने येथे मानवी जीवनासाठी एक महत्त्वाचे तत्त्व

सदर केले आहे. येशूचा ‘सत्य’ असा उल्लेख सर्वसामान्यांसाठी एक मूलभूत शिकवण होती—खरेपणाच्या मार्गाने चालणे. सत्याचा अर्थ येथे नुसता बाह्य खरेपणा नाही, तर आंतरिक पावित्र्य आणि प्रामाणिकपणा आहे. येशूने असा विश्वास दिला की, कोणत्याही परिस्थितीत सत्याचे अनुसरण करणे म्हणजे ईश्वराशी जवळीक साधणे. खोटेपणापासून दूर राहून, सत्याचे अनुसरण करणाऱ्या प्रत्येकाला ईश्वराचा अनुभव येईल अशी त्याची शिकवण होती.

येथे ‘मार्ग’ जीवनाच्या संपूर्ण प्रवासाचा संदर्भ देत आहे. येशूने आपल्याला सांगितलं की, सत्य आणि प्रेम यांचा मार्ग सोडता कामा नये. हा मार्ग असंख्य मोह, प्रलोभने आणि आव्हानांनी भरलेला असतो, परंतु त्याच्या आस्थेने आणि शिकवणीने चालत राहणे म्हणजे जीवनातील खरे यश. हा मार्ग म्हणजे स्वतःच्या आत्म्याला शुद्ध ठेवणे, क्षमाशीलता आणि दयाळूपणाचे आचरण करणे.

आणि ‘जीवन’ या शब्दातून येशूने सांगितले की, जीवन म्हणजे केवळ श्वास घेणे नव्हे, तर प्रेम, सेवा आणि दयाळूपणाने जगणे आहे. त्याच्या दृष्टिकोनातून खरे जीवन म्हणजे आपल्या कृतीतून, विचारांतून आणि मनोभावांतून ईश्वराचे अस्तित्व प्रदर्शित करणे. ज्या पद्धतीने प्रभू येशू जीवन जगले, त्याच पद्धतीने प्रेमाने, सत्याने आणि निःस्वार्थ भावनेने जगणे हेच खऱ्या अर्थाने जीवन आहे, असे त्याचे म्हणणे होते.

येशूच्या या वाक्याचा सर्वसामान्य लोकांसाठी अर्थ असा होता की त्यांनी नेहमीच सत्याची कदर करावी, योग्य मार्गावर चालावे आणि जीवनातील प्रत्येक कृतीत देवत्वाचे दर्शन घडवावे. यातून लोकांना अशा जीवनपद्धतीची शिकवण मिळाली की ज्याद्वारे प्रामाणिकता, निःस्वार्थी सेवा आणि प्रत्येक कृतीतून ईश्वराशी जवळीक साधता येईल.

येशूचा संदेश लोकांसाठी एक साधा पण प्रभावी विचार होता: सत्याच्या मार्गावर, श्रद्धेने, प्रेमाने आणि सेवाभावी जीवन जगणे म्हणजेच ईश्वरमय असणे होय!

# विवेक वादाचा प्रसार

■ फ्रान्सिस आल्मेडा सर, निर्मळ

१. विवेकवादाची साधी व्याख्या : 'विवेकवाद' म्हणजे अशी विचारसरणी जी कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवताना तर्क आणि प्रमाण यांचा आधार घेते. म्हणजेच, आपल्या जीवनातील निर्णय, आचरण आणि विचार हे अंधश्रद्धा किंवा भावनिक आवेगांवर न करता, योग्य विचार आणि शास्त्रीय पद्धतींवर आधारित असतात.

२. स्पष्टीकरण : तर्कशुद्ध विचार : विवेकवादात कोणत्याही गोष्टीचा स्वीकार करण्यापूर्वी ती गोष्ट योग्य आहे का, ती सत्यावर आधारित आहे का हे तपासले जाते. उदाहरणार्थ, एखादी बातमी समजल्यावर ती खरी आहे का, हे तपासण्यासाठी विवेकवाद आपल्याला प्रश्न विचारायला शिकवतो.

प्रमाणांचा आधार : विवेकवादात विश्वास ठेवण्यासाठी कोणतीही गोष्ट फक्त ऐकून किंवा परंपरेने स्वीकारत नाहीत. ती गोष्ट सत्य आहे हे सिद्ध करण्यासाठी कोणते तरी प्रमाण असावे लागते. उदा. शास्त्रज्ञांनी पृथ्वी गोल आहे हे सिद्ध केले आहे कारण त्यांनी त्या गोष्टीचे पुरावे दाखवले आहेत.

अंधश्रद्धेचा विरोध : विवेकवादाचा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अंधश्रद्धांचा विरोध. अंधश्रद्धा म्हणजे कोणतीही गोष्ट प्रमाणांशिवाय, तर्कशुद्धतेशिवाय स्वीकारणे. विवेकवादी विचारसरणी आपल्याला कोणत्याही गोष्टीचा विश्वास प्रमाणांवर आधारित ठेवायला शिकवते.

स्वतंत्र विचार : विवेकवाद आपल्याला स्वतंत्र विचार करण्यास प्रवृत्त करतो. आपण कोणतीही गोष्ट का मानतो, कशावर विश्वास ठेवतो, याचा स्वतः विचार करणे आवश्यक आहे. दुसऱ्यांच्या मते आपल्यावर लादली जाऊ नयेत.

३. उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण : जर कोणीतरी सांगितले की, 'हे झाड पवित्र आहे, त्याला हात लावल्यावर तुमच्या सगळ्या समस्या सुटतील' तर विवेकवादी विचार विचारतो की 'हे कसे शक्य आहे? याचे शास्त्रीय स्पष्टीकरण काय आहे?' आपल्याला त्यावर विश्वास ठेवण्याआधी पुरावे आणि तर्क पाहणे आवश्यक आहे. दुसरे उदाहरण म्हणजे, जर कोणी म्हणाले की ग्रहणाच्या वेळी बाहेर जाऊ नये कारण त्यामुळे नुकसान होईल, तर विवेकवाद विचारतो, 'हे नुकसान कसे होते? यासाठी कोणते वैज्ञानिक पुरावे आहेत?'

४. विवेकवादाचे फायदे :

स्वतंत्र निर्णयक्षमता : विवेकवाद आपल्याला आपल्या निर्णयांवर विश्वास ठेवायला शिकवतो. आपण आपल्या विचारांनी आणि तर्कशुद्धतेने निर्णय घेतो.

समाजातील अंधश्रद्धांवर विजय : विवेकवाद आपल्याला समाजातील चुकीच्या समजुती आणि अंधश्रद्धा दूर करण्यास मदत करतो, ज्यामुळे समाज अधिक प्रगत होतो.

शास्त्रीय दृष्टिकोन : जगातील प्रश्नांना तर्कशुद्ध पद्धतीने आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून सोडवता येते. त्यामुळे समाज अधिक प्रगतिशील बनतो.

५. शेवटचा संदेश : 'विवेकवाद म्हणजे नुसता विचार नाही, तर तो आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात वापरला जाऊ शकतो. अंधश्रद्धा, चुकीच्या परंपरा आणि गैरसमजांना बाजूला ठेवून, प्रमाण आणि तर्कशुद्धतेचा आधार घेऊन आपले जीवन अधिक समृद्ध आणि सुरक्षित बनवूया.' या प्रकारे विवेकवादाची व्याख्या आणि स्पष्टीकरण सोप्या आणि प्रभावी पद्धतीने सर्वसामान्य वाचकांसाठी मांडता येईल.

विवेकवादाचा (Rationalism) इतिहास आणि उद्गम भारतीय आणि पाश्चिमात्य विचारधारांमध्ये वेगवेगळ्या मार्गांनी विकसित झाला आहे. दोन्ही परंपरांमध्ये विवेकवाद हा तर्कशुद्ध विचार, शास्त्रीय दृष्टिकोन आणि प्रमाणांवर आधारित विचारसरणी यांचा पुरस्कार करतो. चला या दोन प्रवाहांचा अभ्यास करूया :

१. भारतीय इतिहासातील विवेकवाद : भारतीय परंपरेत, विवेकवादाची सुरुवात वैदिक कालापासून आणि नंतरच्या बौद्ध, जैन आणि चार्वाक विचारधारेपासून झाली.

i) चार्वाक दर्शन (सु. ६०० ई.पू.) : चार्वाक हे भारतातील सर्वात जुने आणि स्पष्ट विवेकवादी तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानाच्या मते फक्त इंद्रियांनी अनुभवलेली गोष्ट खरी आहे. चार्वाकांनी परमेश्वर, आत्मा आणि पुनर्जन्म यांसारख्या गोष्टींना नाकारले. त्यांनी असा दावा केला की जे काही तर्काने आणि अनुभवाने सिद्ध होऊ शकते, त्यावरच विश्वास ठेवावा.

उदाहरण: चार्वाकांनी धार्मिक कर्मकांडांचा आणि अंधश्रद्धांचा विरोध केला. त्यांच्या मते धर्माच्या नावाखाली केल्या जाणाऱ्या अनावश्यक कर्मकांडांवर पैसा खर्च करण्यापेक्षा जीवनाचा तर्कशुद्ध विचार करावा.

ii) बुद्ध आणि जैन धर्म (सु. ५०० ई. पू.) : गौतम बुद्ध आणि महावीर यांच्या विचारसरणीही तर्कशुद्धतेवर आधारित होत्या. त्यांनी अंधश्रद्धांना विरोध केला आणि सत्यशोधासाठी तर्क आणि अनुभव यांचा आधार घेण्यावर भर दिला.

बौद्ध विचारसरणी : बुद्धांनी ज्ञान प्राप्तीसाठी अनुभव आणि तपासणी यावर जोर दिला. त्यांच्या 'अष्टांगिक मार्गात' स्वतःच्या अनुभवावर आणि शुद्ध विचारांवर आधारित जीवन जगण्याची शिकवण आहे.

iii) उपनिषदं आणि तर्कशास्त्र : उपनिषदंमध्ये तात्त्विक चर्चांच्या माध्यमातून सत्याचा शोध लावण्याचे मार्ग सांगितले आहेत. या ग्रंथांमध्ये तात्त्विक चर्चेच्या माध्यमातून आत्मज्ञान आणि सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो, जो एक तर्कशुद्ध दृष्टिकोन आहे.

२. पाश्चिमात्य इतिहासातील विवेकवाद : पाश्चिमात्य परंपरेत विवेकवादाचा विकास ग्रीक तत्त्वज्ञानापासून आधुनिक काळापर्यंत झालेला आहे.

i) ग्रीक तत्त्वज्ञ (सु. ४०० ई.पू.) : सॉक्रेटीस, प्लेटो आणि अरिस्टॉटल हे ग्रीक तत्त्वज्ञ विवेकवादाच्या सुरुवातीचे पुरस्कर्ते होते. त्यांनी विचार, चर्चा, आणि तपासणी यावर आधारित सत्याचा शोध लावला.

सॉक्रेटीस : सतत प्रश्न विचारून सत्य शोधण्याची पद्धत (सोक्रॅटिक मेथड) त्यांनी निर्माण केली. ही पद्धत विवेकवादाचीच सुरुवात होती.

अरिस्टॉटल : त्यांनी तर्कशास्त्र विकसित केले, ज्याने तर्कशुद्ध विचारांची पायाभरणी केली.

ii) युरोपियन पुनर्जागरण (१४व्या-१७व्या शतकात) : पुनर्जागरण काळात तर्क आणि शास्त्रीय दृष्टिकोनाचा उदय झाला. गॅलिलिओ, कोपर्निकस आणि न्युटन यांच्या विज्ञानाने धार्मिक अंधश्रद्धा आणि रूढीवादी विचारांना आव्हान दिले. गॅलिलिओ आणि कोपर्निकस यांनी पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा तर्कशुद्ध सिद्धांत मांडला, ज्यामुळे ख्रिश्चन धर्माच्या पृथ्वी-केंद्रित विश्वाच्या कल्पनेला धक्का बसला.

iii) आधुनिक काळातील विवेकवाद (१७व्या-१८व्या शतकात) : रिने डेसकार्टस (René Descartes) : फ्रेंच तत्त्वज्ञ डेसकार्टस यांना आधुनिक विवेकवादाचा जनक मानले जाते. त्यांनी 'Cogito, ergo sum' (मी विचार करतो, म्हणून मी आहे) या सिद्धांताने स्वतःच्या अस्तित्वाचा विचार तर्काच्या आधारे सिद्ध केला.

इमॅन्युएल कांट : त्यांनी विवेकवादाच्या विचारसरणीत पुढची पायरी टाकली आणि तर्क आणि अनुभव यांचा समन्वय केला.

iv) विज्ञान आणि तर्कशुद्धता (१९व्या-२०व्या शतकात) : विज्ञानाच्या उत्कर्षामुळे पाश्चिमात्य जगात विवेकवाद अधिक बळकट झाला. चार्ल्स डार्विनच्या उत्क्रांती सिद्धांताने जगाच्या निर्मितीबद्दलच्या धार्मिक विचारांना आव्हान दिले. विज्ञानाने अंधश्रद्धेवर विश्वास ठेवण्याऐवजी तर्क आणि शास्त्राच्या आधारे विचार करण्यास प्रेरित केले.

३. सारांश : भारतीय विवेकवाद चार्वाक, बौद्ध, आणि जैन विचारसरणीतून उगम पावला, जिथे अंधश्रद्धांचा विरोध आणि तर्कशुद्धतेला महत्त्व देण्यात आले. पाश्चिमात्य विवेकवाद ग्रीक तत्त्वज्ञानात सुरू झाला, पुनर्जागरण काळात विज्ञानाच्या वाढीसोबत विकसित झाला, आणि आधुनिक तत्त्वज्ञांनी याला पुढे नेले. दोन्ही परंपरांमध्ये विवेकवाद हा अंधश्रद्धा आणि रूढीवादी विचारांच्या विरोधात उभा राहिला, ज्यामुळे मानवी विचारांची प्रगती आणि विकास झाला.

विवेकवादाचे महत्त्व शिक्षण, विज्ञान व समाजातील स्थानावर आधारित आहे कारण तो तर्कशुद्ध विचार, प्रमाण आणि अनुभव यांच्या आधारावर मानवी जीवनातील सर्व पैलूंचे मार्गदर्शन करतो. विवेकवाद व्यक्तीला स्वतंत्र विचार आणि निर्णय घेण्यासाठी सक्षम बनवतो. त्याचे शिक्षण, विज्ञान आणि समाजातील महत्त्व खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल :

१. शिक्षणातील विवेकवादाचे महत्त्व :

तर्कशुद्धता वाढवते : विवेकवादामुळे विद्यार्थ्यांना फक्त पाठांतरावर भर न देता, तर्कशुद्ध विचार कसे करावेत हे शिकवले जाते. त्यामुळे ते स्वतंत्रपणे विचार करू शकतात आणि आपले निर्णय घेण्यासाठी कारणे शोधू शकतात.

अंधश्रद्धांचा नाश : शिक्षणाच्या माध्यमातून विवेकवादी विचारसरणी विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाते, ज्यामुळे ते अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुतींना प्रश्न विचारायला शिकतात. उदा. त्यांना विज्ञानाच्या सिद्धांतांवर विश्वास ठेवून धार्मिक आणि सांस्कृतिक अंधश्रद्धांपासून दूर राहता येते.

ज्ञानाचे परिपूर्ण आकलन : विवेकवादाच्या मदतीने शिक्षण पद्धतीत तथ्य, विश्लेषण आणि पुराव्यांवर आधारित शिकवण दिली जाते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही विषयाचे सखोल ज्ञान मिळवता येते. शंकांचे निरसन करण्यासाठी त्यांना स्वतंत्र विचारप्रक्रिया विकसित करण्याची सवय लागते.

सृजनशीलता आणि शोध प्रवृत्ती : विवेकवादी शिक्षणामुळे सृजनशीलता वाढते. विद्यार्थी केवळ तयार माहिती स्वीकारण्याऐवजी नवे शोध लावण्याचा प्रयत्न करतात.

२. विज्ञानातील विवेकवादाचे महत्त्व :

शास्त्रीय पद्धतीचा आधार : विज्ञानाचा संपूर्ण पाया विवेकवादी विचारांवर आधारित आहे. वैज्ञानिक संशोधनाची सुरुवात संशय, निरीक्षण आणि प्रयोग करण्यापासून होते. विवेकवादामुळे वैज्ञानिक कसोटी लावली जाते, जी सत्य आणि अज्ञानात फरक करण्यास मदत करते.

अनुभव आणि पुरावे : विज्ञानात कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवण्यासाठी अनुभव आणि पुरावे आवश्यक असतात. वैज्ञानिक सिद्धांतांच्या पुष्टीसाठी प्रयोग केले जातात, ज्यामुळे विवेकवादाला विज्ञानात प्रमुख स्थान आहे.

प्रगती आणि संशोधन : वैज्ञानिक शोध, तंत्रज्ञानाचे विकास व औद्योगिक क्रांती यामागे विवेकवादाचे योगदान मोठे आहे. जेव्हा केवळ परंपरा किंवा अंधश्रद्धांवर आधारित निर्णय घेतले जात नाहीत, तेव्हा प्रगती होते. उदा. औषध विज्ञानात विवेकवादामुळे शारीरिक रोगांवर संशोधन करून नवे उपचार शोधले गेले आहेत.

चुकीची माहिती रोखण्याचा मार्ग : विज्ञानात विवेकवादामुळे गैरसमज आणि चुकीच्या माहितीचे खंडन होते. उदाहरणार्थ, कोविड-19 महामारीत वैज्ञानिक विवेकवादामुळे लस विकसित करण्यात आली आणि चुकीच्या समजुतींना प्रतिकार करता आला.

३. समाजातील विवेकवादाचे स्थान :

समाज सुधारणा : विवेकवादामुळे समाजातील अंधश्रद्धा, जातीयता, आणि धार्मिक भेदभाव कमी होतात. तर्कशुद्धतेच्या आधारे लोक समाजाच्या प्रगतीसाठी विचार करू शकतात. उदा. सती प्रथेसारख्या प्रथा तर्कशुद्ध विचारांनीच नष्ट झाल्या.

लोकशाहीतील विवेकवादाचे महत्त्व : लोकशाहीत विवेकवाद लोकांना स्वतंत्र विचार, तर्कशुद्ध चर्चा व विवेकबुद्धीने निर्णय घेण्यास मदत करतो. हा विचारसरणी लोकशाही प्रक्रियेला पारदर्शक आणि न्याय्य ठेवते. मतदारांना योग्य उमेदवार निवडताना विचार करण्याची प्रेरणा देते.

अहिंसा आणि सहिष्णुता : विवेकवादामुळे समाजात शांतता, सहिष्णुता आणि एकोपा वाढतो. विवेकवादी व्यक्ती अज्ञानावर आधारित हिंसक वागणूक नाकारतात आणि एकमेकांशी तर्कशुद्ध चर्चेच्या आधारावर व्यवहार करतात.

मानवाधिकार आणि सामाजिक न्याय : विवेकवादामुळे समाजात मानवाधिकार, स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्याय यांना प्रोत्साहन दिले जाते. तर्काच्या आधारे सर्वांना समान संधी आणि न्याय मिळावा असा आग्रह धरला जातो.

४. विवेकवादाचा सामान्य जीवनात वापर :

स्वतंत्र निर्णयक्षमतेचा विकास : विवेकवादी विचारसरणीने व्यक्तींना कोणत्याही गोष्टीवर प्रमाणांवर आधारित निर्णय घेण्याची क्षमता मिळते. त्यामुळे त्यांनी अंधविश्वास आणि दबावाखाली विचार न करता स्वतः विचार करायला शिकावे.

समस्यांचे समाधान : विवेकवादी व्यक्ती कोणत्याही समस्येचे तर्कशुद्ध विचार करून उपाय शोधतात. उदा. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय समस्यांवर विवेकवादाच्या मदतीने उपाय शोधता येतात.

निष्कर्ष : विवेकवाद हा शिक्षण, विज्ञान व समाजासाठी एक मूलभूत विचारधारा आहे, ज्यामुळे व्यक्ती आणि समाजाचा विकास होतो. शिक्षणात विवेकवाद विद्यार्थ्यांना तर्कशुद्ध विचार करायला शिकवतो, विज्ञानात तो संशोधन आणि प्रगतीला चालना देतो, समाजात विवेकवाद अंधश्रद्धा, अन्याय आणि भेदभाव दूर करण्यास मदत करतो.

अंधश्रद्धा आणि अज्ञानावर हल्ला : अंधश्रद्धा म्हणजे अशा समजुती, विश्वास, किंवा कृती, ज्या कोणत्याही तर्कशुद्धतेवर किंवा शास्त्रीय प्रमाणांवर आधारित नसतात परंतु परंपरा, भावनिक आवेग किंवा सामाजिक दबावामुळे त्या स्वीकारल्या जातात. या अंधश्रद्धांचा समाजावर आणि व्यक्तींच्या जीवनावर गंभीर परिणाम होतो. अशा समजुतीमुळे अज्ञान पसरते, लोकांच्या विकासात अडथळा निर्माण होतो आणि समाजात असमानता वाढते.

१. अंधश्रद्धांचे स्वरूप : अंधश्रद्धा विविध प्रकारच्या असतात व त्या कोणत्याही क्षेत्राशी संबंधित असू शकतात – धार्मिक, सामाजिक, वैयक्तिक किंवा सांस्कृतिक. उदा. कुंडलीतील ग्रहांच्या स्थितीवरून निर्णय घेणे, काही गोष्टी शुभ किंवा अशुभ मानणे किंवा अमुक कर्मकांड केल्याने आपत्ती टळेल असे मानणे हे अंधश्रद्धेचे काही सामान्य प्रकार आहेत.

उदाहरण : 'काळा मांजर रस्ता ओलांडला तर अपशकून होतो' ही समाजात प्रचलित अंधश्रद्धा आहे, ज्याचा कोणताही शास्त्रीय आधार नाही. मात्र अशा समजुतीमुळे लोक भीतीच्या आधारावर आपले वर्तन नियंत्रित करतात.

२. अंधश्रद्धांचे परिणाम :

i) मानसिक आणि शारीरिक नुकसान : अंधश्रद्धांच्या आधारावर लोकं गंभीर निर्णय घेतात ज्यामुळे त्यांचे मानसिक आणि शारीरिक नुकसान होऊ शकते. उदा. काही गावांमध्ये आजार बरे करण्यासाठी तंत्र-मंत्र वापरण्याची प्रथा आहे, ज्यामुळे योग्य वैद्यकीय उपचार मिळत नाहीत आणि रुग्णाचे आरोग्य बिघडते.

ii) सामाजिक अन्याय : अंधश्रद्धांमुळे समाजातील काही घटकांवर अन्याय होतो. उदा. स्त्रियांच्या बाबतीत अनेक समाजांमध्ये अंधश्रद्धा प्रचलित आहेत. 'विधवा स्त्री अपशकुनी आहे' किंवा 'सती जाणे पुण्याचे कार्य आहे' यांसारख्या विचारांमुळे स्त्रियांवर अन्याय झाला आहे.

iii) आर्थिक शोषण : अंधश्रद्धांच्या नावाखाली आर्थिक शोषणही मोठ्या प्रमाणात होते. धार्मिक कर्मकांड, तांत्रिक पूजा, किंवा जादूटोणा यांसाठी लोक मोठ्या प्रमाणात पैसे खर्च करतात. असे कर्मकांड केल्यामुळे समस्यांचे समाधान होईल असा समाजातील लोकांचा गैरसमज असतो, परंतु त्यामुळे आर्थिक शोषण आणि गरिबी वाढते.

iv) समाजातील वैज्ञानिक दृष्टिकोनाला अडथळा : अंधश्रद्धांमुळे समाजात वैज्ञानिक विचारसरणीला खीळ बसते. लोक अंधश्रद्धांवर विश्वास ठेवून विज्ञानाला दुर्लक्ष करतात, ज्यामुळे समाजाची प्रगती खुंटते. उदा. काही लोकांना आजारी पडल्यावर डॉक्टरकडे जाण्याऐवजी बाबांच्या किंवा तांत्रिकांच्या सल्ल्यावर विश्वास ठेवतात.

३. अंधश्रद्धांच्या विरोधात हल्ला – विवेकवादी दृष्टिकोन : अंधश्रद्धांच्या विरोधात विवेकवाद एक प्रभावी उपाय आहे. विवेकवादामुळे लोकांना तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता मिळते. कोणत्याही गोष्टीचा स्वीकार किंवा विरोध करण्यापूर्वी ती गोष्ट प्रमाणांवर आधारित आहे का, हे तपासण्याची सवय लागते.

i) वैज्ञानिक शिक्षणाचा प्रसार : अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर वैज्ञानिक शिक्षणाची सक्ती करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना तर्कशुद्ध विचार शिकवण्यामुळे पुढील पिढीला अंधश्रद्धांवर विश्वास ठेवण्याऐवजी तथ्यांवर आधारित विचार करण्याची प्रेरणा मिळेल.

ii) जनजागृती मोहिमा : अंधश्रद्धा आणि अज्ञानाविरुद्ध लढण्यासाठी जनजागृती मोहिमा आवश्यक आहेत. समाजातील प्रतिष्ठित नेत्यांनी, विचारवंतांनी आणि शिक्षकांनी लोकांमध्ये तर्कशुद्धतेचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर माध्यमांच्या सहाय्याने अंधश्रद्धांवर प्रहार केला जाऊ शकतो.

iii) अंधश्रद्धा निर्मूलन कायदे : काही देशांमध्ये अंधश्रद्धांवर नियंत्रण आणण्यासाठी कायदे लागू केले गेले आहेत. अशा कायद्यांमुळे तांत्रिक, जादूटोणाचे कृत्य करणाऱ्या लोकांवर कारवाई होते, ज्यामुळे लोकांवर होणारे शोषण कमी होते.

iv) सामाजिक बदलाची सुरुवात : अंधश्रद्धांवर हल्ला म्हणजे फक्त कायद्यांचा वापर नव्हे तर लोकांच्या मनोवृत्तीत बदल घडवणे हेही आवश्यक आहे. विवेकवादाच्या प्रसारामुळे

समाजात विचारांची नवी दिशा येते. व्यक्ती स्वतःचे निर्णय तर्काच्या आधारे घेण्यास सक्षम होतात.

४. निष्कर्ष : अंधश्रद्धा आणि अज्ञान हे समाजाच्या प्रगतीतील प्रमुख अडथळे आहेत. तर्कशुद्ध विचार आणि वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे या अडथळ्यांवर मात करता येते. विवेकवादाच्या मदतीने अंधश्रद्धांना विरोध केला पाहिजे, त्याचे कारण केवळ तर्कशुद्ध विचारच आपल्याला खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि प्रगत समाज निर्माण करण्याची संधी देतो.

तर्क आणि विज्ञानाचे स्थान: तर्कशुद्धता आणि विज्ञानाच्या आधारावर निर्णय कसे घ्यावेत याचे स्पष्टीकरण

तर्कशुद्धता (Rationality) आणि विज्ञान (Science) हे मानवी प्रगतीचे आधारस्तंभ आहेत. ते आपल्याला कोणत्याही विषयावर सखोल विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची, आणि योग्य निर्णय घेण्याची क्षमता देतात. अंधश्रद्धा आणि अज्ञानाच्या विरोधात लढण्यासाठी तर्क आणि विज्ञान हा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे. निर्णय घेण्यासाठी तर्कशुद्धता आणि विज्ञानाच्या आधारावर प्रक्रिया कशी करावी, हे समजून घेण्यासाठी खालील मुद्द्यांचे स्पष्टीकरण दिले आहे.

१. तर्कशुद्ध विचारसरणीचे महत्त्व : तर्कशुद्धता म्हणजे गोष्टींविषयी तर्कशुद्ध विचार करणे, त्यांचा अभ्यास करणे आणि कारण-परिणाम यांचा शोध घेणे. कोणत्याही निर्णयाला आधार देण्यासाठी तर्क वापरला जातो. हा विचार पुढील पद्धतीने विकसित होतो :

तथ्यांवर आधारित विचार : निर्णय घेण्यासाठी फक्त भावनांवर किंवा अंधश्रद्धांवर विश्वास ठेवण्याऐवजी वस्तुनिष्ठ आणि सत्य आधारावर विचार करणे महत्त्वाचे आहे. तर्कशुद्धता व्यक्तीला त्याच्या विचारांची चिकित्सा करण्यास प्रोत्साहित करते.

कारण-परिणामाचे आकलन : कोणत्याही समस्येचे कारण शोधणे आणि त्याचे परिणाम काय असतील, हे विचारात घेणे तर्कशुद्धतेचा मुख्य भाग आहे. तर्कशुद्ध विचारांमुळे व्यक्तीला आपल्या कृतीचे दूरगामी परिणाम समजून घेता येतात.

प्रश्न विचारण्याची सवय : तर्कशुद्धता म्हणजे नेहमी उत्तरांपेक्षा प्रश्न विचारण्याची सवय लावणे. प्रश्न विचारूनच सत्याचा शोध घेता येतो. यामुळे कोणत्याही गोष्टीवर आंधळेपणाने विश्वास न ठेवता त्याबाबत अधिक माहिती मिळवता येते.

२. विज्ञानाचा आधार : विज्ञान हे तर्कशुद्धतेचे व्यवस्थित आणि प्रयोगाधारित रूप आहे. विज्ञानाचे मुख्य तत्त्व आहे की कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवण्यापूर्वी तिची चाचणी केली पाहिजे. शास्त्राच्या मदतीने निर्णय घेण्याची प्रक्रिया पुढीलप्रमाणे असते:

निरीक्षण आणि प्रयोग : वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आधार निरीक्षण आणि प्रयोग हे आहेत. कोणत्याही समस्येवर निर्णय घेण्यासाठी प्रथम त्या समस्येचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. त्यानंतर प्रयोग करून त्या गोष्टीच्या सत्यतेची पुष्टी करता येते.

पुरावे आणि तथ्ये : वैज्ञानिक पद्धतीत कोणत्याही निर्णयाला आधार देण्यासाठी पुरावे शोधले जातात. विज्ञानाची प्रमुख खूण म्हणजे त्या निर्णयाच्या पाठीशी असलेले तथ्य. कोणतीही गोष्ट पुराव्यांशिवाय खरी मानली जात नाही.

चुकीच्या सिद्धांतांचे खंडन : विज्ञानाच्या माध्यमातून चुकीचे सिद्धांत आणि अंधश्रद्धा यांना बाजूला करता येते. कोणत्याही चुकीच्या माहितीला किंवा अज्ञानाला पुराव्यांवर आधारित विचारांमुळे खोटे ठरवता येते.

अनुकूलता आणि सुधारणा : वैज्ञानिक पद्धतीत निर्णय घेणे हा एक सतत चालणारा प्रक्रिया आहे. कोणत्याही गोष्टीला शाश्वत मानले जात नाही. नवीन पुरावे मिळाल्यास, त्याआधारे निर्णयाचे पुनर्मूल्यांकन केले जाते. ही पद्धत व्यक्तीला आपले निर्णय तर्कशुद्धतेच्या आधारे सुधारणाची संधी देते.

३. तर्क आणि विज्ञानाच्या आधारावर निर्णय घेण्याची पद्धत :

i) समस्येचे निरीक्षण करा : कोणत्याही समस्येवर निर्णय घेण्यापूर्वी त्या समस्येचे निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे. निरीक्षणाद्वारे समस्येची मूळ कारणे शोधता येतात. उदाहरणार्थ, जर शाळेत विद्यार्थ्यांच्या कामगिरीत अचानक घट झाली असेल, तर त्या मागे असलेले कारण शोधण्याकरिता त्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास पद्धती, वर्गातील वातावरण, आणि त्यांच्या मानसिक स्थितीचे निरीक्षण करणे आवश्यक आहे.

ii) तथ्यांची आणि पुराव्यांची तपासणी करा : कोणत्याही समस्येचे निराकरण करण्यासाठी पुरावे गोळा करणे आवश्यक आहे. हे पुरावे ऐकीव गोष्टींवर आधारित नको, तर वस्तुनिष्ठ असावेत. वैज्ञानिक विचारांमुळे व्यक्तीला सत्यता पडताळून पाहण्याची सवय लागते. उदाहरणार्थ, विद्यार्थ्यांच्या कामगिरीत घट का झाली हे जाणून घेण्यासाठी शिक्षकांना त्यांच्या मार्कांच्या नोंदी, उपस्थिती, आणि अभ्यासक्रमाच्या पालनाचा अभ्यास करावा लागेल.

iii) तर्कशुद्ध विचार करा आणि शक्यता मांडून पहा : विविध शक्यता विचारात घेऊन त्यांचा तर्कशुद्ध विचार करा. एखादा निर्णय घेताना, त्याच्या विविध परिणामांचे आकलन करणे गरजेचे आहे. अशा पद्धतीने निर्णय घेतल्याने चुकीच्या किंवा अडचणीच्या निर्णयांपासून वाचता येते.

iv) निर्णयाची प्रयोगाने पुष्टी करा : तुमच्या निर्णयाला योग्य तर्कसंगती आहे की नाही, हे पाहण्यासाठी तो निर्णय छोटे प्रयोग करून तपासा. उदा. विद्यार्थ्यांच्या कामगिरीत सुधारणा होण्यासाठी काही अभ्यास पद्धती बदलून पाहा. यामुळे तुमचा निर्णय योग्य आहे की नाही, याची चाचणी घेता येईल.

v) नियमित पुनरावलोकन करा : कोणताही निर्णय घेतल्यानंतर त्याचे पुनरावलोकन करणे महत्त्वाचे आहे. परिस्थिती बदलत असल्यास किंवा नवीन पुरावे मिळाल्यास निर्णय पुन्हा एकदा तर्कशुद्धतेच्या आधारावर तपासणे आवश्यक आहे. विज्ञानातील प्रगती आणि

सुधारणा हा सतत चालणारा प्रवास आहे, ज्यामुळे निर्णय अधिकाधिक योग्य आणि परिणामकारक ठरतात.

४. तर्क आणि विज्ञानाचा समाजावर परिणाम :

शास्त्राच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे : विज्ञानाचा वापर केल्याने तंत्रज्ञान, औद्योगिक क्रांती, आरोग्य क्षेत्रातील प्रगती अशा विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे.

समाजातील सुधारणा: अंधश्रद्धा, धार्मिक अडथळे, आणि सामाजिक अन्याय यांच्यावर तर्कशुद्धतेने लढा देऊन समाजातील अनेक समस्यांवर उपाय करता येतात. विवेकवादामुळे लोकांनी सतीप्रथेला विरोध केला, स्त्रियांचे हक्क मिळवले, आणि जातीय विषमता कमी केली.

व्यक्तिगत जीवनात सुधारणा : तर्कशुद्धतेचा अवलंब केल्याने व्यक्ती अधिक शहाणपणाने वागते. निर्णयांच्या परिणामांचे पूर्ण आकलन होऊन चुकीचे निर्णय घेण्याची शक्यता कमी होते.

निष्कर्ष : तर्कशुद्धता आणि विज्ञान हे निर्णय घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे साधन आहेत. तर्कशुद्ध विचारांमुळे व्यक्ती आणि समाजाला समस्यांचे सखोल आकलन होऊन योग्य उपाययोजना करता येतात. विज्ञानाच्या आधारावर घेतलेले निर्णय हे केवळ सत्याच्या जवळ असतातच, पण ते समाजाच्या आणि व्यक्तीच्या प्रगतीला गतीही देतात.

सर्वसामान्य लोकांच्या शंकांचे निरसन :

विवेकवाद हा विचारांचा आधार आहे, ज्यात तर्क, विज्ञान, आणि पुराव्यावर आधारित विचारप्रणालीचा अवलंब केला जातो. मात्र, सामान्य लोकांमध्ये याबद्दल काही शंका आणि गैरसमज असू शकतात. अशा शंकांचे तर्कशुद्ध आणि सोप्या भाषेत निरसन करणे आवश्यक आहे, जेणेकरून विवेकवाद अधिक समजण्यास सुलभ होईल.

शंका 1 : विवेकवाद म्हणजे देव किंवा धर्माचा विरोध आहे का?

उत्तर : विवेकवाद म्हणजे देव किंवा धर्माचा थेट विरोध नाही. याचा अर्थ असा आहे की कोणत्याही गोष्टीवर आंधळेपणाने विश्वास ठेवण्याऐवजी तर्क, पुरावे आणि विचारांवर आधारित मतं बनवावी. धार्मिक श्रद्धा वैयक्तिक असू शकतात, परंतु विवेकवादाने विचार करताना त्या श्रद्धांचे प्रमाण तपासले जाते. कोणत्याही गोष्टीचा आधार तर्कसंगत असावा हा विवेकवादाचा उद्देश आहे.

शंका 2 : विज्ञान किंवा तर्कावर विश्वास ठेवून भावना दुर्लक्षित होतात का?

उत्तर : नाही, विज्ञान किंवा तर्कावर विश्वास ठेवण्याचा अर्थ असा नाही की भावनांना दुर्लक्षित केले जाते. विवेकवाद भावनांना नाकारत नाही परंतु त्यांचा अंधश्रद्धांच्या नावावर गैरवापर होऊ नये याची काळजी घेतो. तर्कशुद्ध विचारसरणीमुळे भावना अधिक स्थिर आणि संतुलित होतात, कारण व्यक्ती तर्काच्या आधारे परिस्थितीचे आकलन करू शकते आणि योग्य निर्णय घेऊ शकते.

शंका ३ : तर्क आणि विज्ञान सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकतात का?

उत्तर : तर्क आणि विज्ञान हे अनेक प्रश्नांची उत्तरे देऊ शकतात पण काही गोष्टींवर सध्या पूर्ण उत्तर नाही. मात्र विज्ञान हे नेहमी शोधाच्या प्रक्रियेत असते आणि जेव्हा नवीन पुरावे मिळतात, तेव्हा ते निर्णयांमध्ये सुधारणा करते. त्यामुळे विज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची लवचिकता आणि नविन गोष्टी शिकण्याची तयारी. कुठेही आंधळेपणाने विश्वास ठेवण्याऐवजी विवेकवाद आपल्याला सतत प्रश्न विचारण्यास आणि उत्तर शोधण्यास प्रेरित करतो.

शंका ४ : परंपरागत आणि सांस्कृतिक श्रद्धा विवेकवादाशी विसंगत आहेत का?

उत्तर : विवेकवाद परंपरा आणि संस्कृतीला संपूर्णपणे विरोध करत नाही. परंतु परंपरागत किंवा सांस्कृतिक श्रद्धा तर्कसंगत असतील आणि समाजाच्या प्रगतीस मदत करतील, तर त्यांचा स्वीकार केला जातो. काही परंपरा आणि श्रद्धा कालबाह्य असू शकतात, त्यांचा पुनर्विचार आवश्यक आहे. विवेकवाद आपल्याला या परंपरांचा तर्कसंगत दृष्टिकोनातून पुनरावलोकन करायला शिकवतो.

शंका ५ : विवेकवादामुळे समाजात असंतोष निर्माण होतो का?

उत्तर : नाही, उलट विवेकवाद समाजातील असमानता आणि अंधश्रद्धांवर प्रहार करतो, ज्यामुळे समाज अधिक प्रगत आणि न्याय्य होतो. तर्क आणि विज्ञानाचा वापर करून समाजात सुसंवाद आणि प्रगती साधता येते. समाजातील चुकीच्या प्रथांवर प्रश्न विचारल्यामुळे तात्पुरता विरोध होऊ शकतो, परंतु दीर्घकालीन दृष्टिकोनातून हा विरोध समाजाच्या प्रगतीसाठी लाभदायक ठरतो.

शंका ६ : विवेकवाद सर्वांसाठी कसा उपयुक्त ठरू शकतो?

उत्तर : विवेकवाद सर्वांसाठी उपयुक्त आहे कारण तो कोणत्याही परिस्थितीत तर्कशुद्ध विचार, निर्णय घेण्याची क्षमता, आणि पुराव्यांच्या आधारे विचार करण्याची सवय लावतो. हे विचारसरणी वैयक्तिक जीवनात अधिक शांतता, स्थिरता आणि प्रगतीसाठी मदत करते. तसेच, समाजात विज्ञान आणि तर्काचा वापर करून प्रगत विचारांचा प्रसार होतो, ज्यामुळे समाजातील अडचणी दूर करता येतात.

शंका ७ : विवेकवादाने धार्मिक भावना दुखावल्या जातात का?

उत्तर : विवेकवादाचा उद्देश कोणाच्याही धार्मिक भावना दुखावणे नाही. मात्र, विवेकवाद आपल्याला प्रत्येक गोष्ट विचारांच्या चाळणीतून पाहण्यास शिकवतो. त्यामुळे कोणतीही श्रद्धा किंवा विश्वास हा तर्क आणि पुराव्यांच्या आधारे तपासला जातो. विवेकवाद धार्मिक विचारांवर टीका करत नाही, परंतु तो प्रश्न विचारण्यास प्रोत्साहित करतो आणि व्यक्तीला स्वतंत्र विचार करण्याची प्रेरणा देतो.

निष्कर्ष : विवेकवाद हा केवळ तर्क आणि विज्ञानाच्या आधारे जगण्याचा मार्ग आहे. तो अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुतींना विरोध करतो, परंतु वैयक्तिक श्रद्धांचा आणि भावनांचा आदर ठेवतो. सामान्य लोकांच्या शंकांचे निरसन तर्कशुद्धतेच्या आधारावर केल्यास, विवेकवादाची महत्ता अधिक स्पष्ट होते आणि त्याचा स्वीकार अधिक लोक करू शकतात.

अंधश्रद्धा आणि अज्ञानावर टीका – वास्तववादी उदाहरणांसह स्पष्टीकरण

विवेकवादाचा प्रचार करताना अंधश्रद्धा आणि अज्ञानावर टीका करणे आवश्यक आहे, कारण ते समाजाच्या प्रगतीसाठी अडथळा ठरतात. अंधश्रद्धांच्या विरोधात खरे उदाहरणे देऊन तर्कशुद्धतेचा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा उपयोग स्पष्ट केला जाऊ शकतो.

१. वैद्यकीय अंधश्रद्धा: बाबासांभांचा उपचार

काही ग्रामीण भागात आणि शहरी भागांतील काही लोकांमध्ये आजही बाबासांभा, मांत्रिक किंवा तंत्रविद्या यांच्यावर विश्वास ठेवून गंभीर आजारांवर उपचार घेतले जातात. याचे एक उदाहरण म्हणजे, काही लोक आजाराचे कारण भुते-प्रेत किंवा ग्रह-नक्षत्र यांच्याशी जोडून आंधळेपणाने मांत्रिकांकडे जातात. त्यातून त्यांना कोणताही वैज्ञानिक आधार नसलेले उपाय दिले जातात. यामुळे वेळ वाया जातो आणि आजार गंभीर होतो.

वैज्ञानिक दृष्टिकोन : वैज्ञानिक दृष्टिकोनानुसार, आजाराचे कारण शोधण्यासाठी योग्य निदान, रक्त तपासणी, आणि वैद्यकीय उपचारांची गरज असते. उदाहरणार्थ, क्षयरोग, हृदयरोग, किंवा कर्करोग यासारख्या आजारांचे निदान फक्त वैज्ञानिक पद्धतीनेच होऊ शकते. औषधोपचार, शस्त्रक्रिया आणि वैद्यकीय सल्ला याच्याच आधारावर आजारावर उपाय मिळू शकतो.

२. अंधश्रद्धेमुळे जीवितहानी: अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्य

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रद्धेमुळे होणाऱ्या सामाजिक आणि व्यक्तिगत नुकसानीचे उदाहरण दिले. एका गावात एका तरुण मुलीचा आजार बळावल्याने तिच्या कुटुंबीयांनी 'भूत उतरवण्यासाठी' तिच्यावर जोर-जबरदस्ती करून धार्मिक विधी केले, ज्यात तिचा जीव गेला. हे प्रकरण दाभोलकरांनी उचलून धरले, ज्यातून अंधश्रद्धा विरोधी कायदा झाला.

वैज्ञानिक दृष्टिकोन: अशा घटनांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या अभावामुळे माणसांचा जीव जातो. औषधोपचार, मानसिक आरोग्य उपचार आणि डॉक्टरांचा सल्ला याच्या माध्यमातून योग्य उपचार करता येऊ शकतो. विज्ञानाने व्यक्तीला मानसिक आरोग्याबाबतही जागरूक करण्याचे काम केले आहे.

३. गावाकडील शेतकरी आणि गाभूळबाय

गावांमध्ये आजही काही शेतकरी पीक चांगले येण्यासाठी गाभूळबाई (साप) सापडल्यास तिला न मारता पिठ लावून पूजा करतात. सर्पांचे संरक्षण करणे चांगले असले तरी, हा प्रकार अंधश्रद्धेवर आधारित आहे, ज्याचा प्रत्यक्ष शेतमालावर कोणताही परिणाम होत नाही.

वैज्ञानिक दृष्टिकोन: सर्प व सर्पदंश या विषयावर झालेल्या वैज्ञानिक संशोधनानुसार, सापांवर अंधश्रद्धा ठेवण्याऐवजी सापाचे बिळ पाहून योग्य सावधगिरी बाळगावी आणि शेतातील खतांची योग्य मापन प्रणाली वापरावी. सर्पदंश होण्याच्या घटना टाळण्यासाठी जागरूकता निर्माण करण्याचे विज्ञानाचे काम महत्त्वाचे आहे.

४. गर्भलिंग निदानावर नियंत्रण : भारतीय प्रसंग

भारतामध्ये अनेक वर्षे गर्भलिंगनिदानावर आधारित मुलींची गर्भपात प्रक्रिया केली जायची. लोकांचा अंधश्रद्धा आधारित विश्वास होता की मुलगा जन्माला आला पाहिजे, कारण तोच कुटुंबाची जबाबदारी पार पाडेल. यामुळे लिंग असमतोल निर्माण झाला आणि मुलींच्या जन्मदरात घट झाली.

वैज्ञानिक दृष्टिकोन : भारत सरकारने विज्ञानाच्या आधारे गर्भलिंग निदान आणि गर्भपाताच्या प्रक्रियेवर कडक कायदे केले. त्याचबरोबर, समाजात स्त्री आणि पुरुष समानता याबद्दल वैज्ञानिक माहिती देऊन स्त्रियांचे महत्त्व पटवून दिले गेले. विज्ञानाच्या मदतीने गर्भवती महिलांची योग्य काळजी कशी घ्यावी, हे समजवून सांगितले जाते, ज्यामुळे सुरक्षित प्रसूती होण्यास मदत होते.

५. जगभरातील संशोधनाचे उदाहरण: पोलिओ निर्मूलन

पोलिओ हा एकेकाळी जगभरातील महत्त्वाचा आजार होता, ज्याचा परिणाम मुख्यतः लहान मुलांवर व्हायचा. मात्र, पोलिओबाबत अज्ञान आणि अंधश्रद्धेमुळे काही लोक लसीकरणावर विश्वास ठेवत नव्हते. भारतासारख्या देशांमध्ये लोक लसीकरण टाळून धार्मिक वा सामाजिक कारणे देत असत.

वैज्ञानिक दृष्टिकोन : वैज्ञानिक संशोधनाच्या आधारे पोलिओविरोधात लसीकरण मोहीम राबवण्यात आली. जागतिक आरोग्य संघटनेने पोलिओ निर्मूलनासाठी लसीकरणाचे महत्त्व पटवून दिले, ज्यामुळे आज भारत आणि अनेक देश पोलिओमुक्त झाले आहेत. विज्ञानाच्या या यशामुळे लसीकरणावर समाजाचा विश्वास वाढला.

वैज्ञानिक दृष्टिकोनाचे फायदे :

१. समस्या सोडवण्यासाठी योग्य पद्धती : विज्ञान समस्या सोडवण्यासाठी तर्कशुद्ध आणि पुरावेआधारित पद्धती वापरते. यामुळे कोणत्याही समस्येचे मूळ कारण शोधून तिच्यावर योग्य उपाय करता येतो.

२. जीवनाची गुणवत्ता सुधारते : विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आधारे आज आपण चांगले वैद्यकीय उपचार, स्वच्छता आणि सुरक्षा साधनांचा वापर करतो. यामुळे जीवनाची गुणवत्ता वाढते.

३. अनिश्चिततेवर मात : वैज्ञानिक दृष्टिकोन व्यक्तीला अनिश्चिततेवर मात करण्यासाठी योग्य तर्कशुद्ध निर्णय घेण्यास मदत करतो. अंधश्रद्धांच्या आहारी न जाता पुराव्यांच्या आधारे सुरक्षित निर्णय घेता येतात.

४. सामाजिक प्रगती : विज्ञानाच्या मदतीने सामाजिक समस्या जसे की लिंगभेद, जातीय विषमता आणि धार्मिक अंधश्रद्धा यावर योग्य उपाय शोधून प्रगती साधता येते.

निष्कर्ष :

अंधश्रद्धा आणि अज्ञानाला बाजूला ठेवून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अवलंब केल्यास समाजात प्रगती होते. वास्तव उदाहरणे दाखवून तर्कशुद्धता आणि विज्ञानावर आधारित निर्णय घेणे हे किती आवश्यक आहे हे स्पष्ट होते. जगभरातील संशोधन आणि प्रगतीने

विज्ञानाच्या फायदे सिद्ध केले आहेत, त्यामुळे अंधश्रद्धांवर विश्वास ठेवण्याऐवजी विज्ञानाचा अवलंब अधिक फलदायी ठरतो.

सांस्कृतिक आणि धार्मिक संदर्भांचा सन्मान करताना विवेकवादाचा प्रसार करताना हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे की प्रत्येक व्यक्तीच्या परंपरा आणि विश्वासांना आदर देणे आवश्यक आहे. अशा प्रकारे तुमचे विचार अधिक प्रभावी आणि स्वीकार्य ठरू शकतात.

१. सुसंगत व तर्कसंगत टीका : तुम्ही ज्या गोष्टीवर टीका करत आहात, ती तर्कसंगत असावी आणि वैयक्तिक विश्वासांना आदर देणारी असावी.

२. आदरपूर्वक संवाद : धार्मिक किंवा सांस्कृतिक मुद्द्यांवर चर्चा करताना, संवादात आदर राखणे महत्वाचे आहे. त्यामुळे दुसऱ्या पक्षाने तुमच्या विचारांना अधिक स्वीकारले जाऊ शकते.

३. परंपरेचा अभ्यास : सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांचे थोडक्यात अभ्यास करून, त्या संदर्भात ज्ञान प्राप्त करा.

४. संवेदनशीलतेची काळजी : विचारपूर्वक आणि संवेदनशीलतेने विचार मांडून, अशा प्रकारे चर्चा करा की त्यामुळे कोणाला आघात न होईल.

या मार्गदर्शनाने तुम्ही विवेकवादाच्या प्रसारात सांस्कृतिक आणि धार्मिक विविधतेचा आदर करत एक प्रभावी व समर्पक संवाद साधू शकता. समकालीन समस्यांवर विवेकवादाचा उपयोग करून कसा समाधान शोधता येईल हे दर्शवण्यासाठी काही उदाहरणे :

१. पर्यावरणीय प्रश्न:

तर्कसंगत दृष्टिकोन: विवेकवाद पर्यावरणीय समस्यांवर वैज्ञानिक आधाराने विचार करतो. उदा. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या थांबवण्यासाठी विवेकवादी दृष्टिकोन कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर जोर देतो यासाठी वैज्ञानिक डेटा आणि तर्कशुद्ध विश्लेषणांचा वापर करतो.

समाधान : स्वच्छ ऊर्जा स्रोतांचा वापर, ऊर्जा वाचवणारे तंत्रज्ञान आणि पुनर्वापर व पुनर्चक्रण यावर आधारित उपाय.

२. राजकीय अराजकता :

तर्कसंगत दृष्टिकोन : विवेकवाद सर्वसमावेशक आणि तर्कसंगत निर्णय घेण्यावर भर देतो. राजकीय अराजकतेच्या समस्येवर विवेकवादी दृष्टिकोन लोकशाही प्रक्रिया, पारदर्शकता आणि न्यायसंगत धोरणांच्या माध्यमातून उपाय शोधतो.

समाधान : चांगले governance, जबाबदार नेतृत्व आणि सक्रिय नागरी सहभाग यावर आधारित उपाय. यासाठी वैज्ञानिक आणि तथ्य आधारित माहितीचा वापर करणे आणि लोकांच्या गरजा व अपेक्षा लक्षात घेणे आवश्यक आहे.

३. आर्थिक असमानता :

तर्कसंगत दृष्टिकोन : विवेकवाद सामाजिक आणि आर्थिक नितींच्या तर्कशुद्ध विश्लेषणावर विश्वास ठेवतो. आर्थिक असमानतेच्या समस्येवर विवेकवादी दृष्टिकोन समानता आणि सामाजिक न्यायाच्या सिद्धांतांचा वापर करतो.

समाधान : सर्वसमावेशक आर्थिक धोरणे, अशिक्षित व गरीब लोकांसाठी शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम आणि सामाजिक सुरक्षा नेटवर्क यांचा विकास.

४. सामाजिक तणाव :

तर्कसंगत दृष्टिकोन : विवेकवाद सामाजिक समरसता साधण्यासाठी डेटा आणि विश्लेषणावर आधारित उपाय सादर करतो. विभाजन व सामाजिक तणाव कमी करण्यासाठी विवेकवादी दृष्टिकोन सामाजिक संवाद आणि सहकार्य यावर जोर देतो.

समाधान : संवाद व चर्चेचे प्लॅटफॉर्म तयार करणे, विविध समुदायांमध्ये विश्वास निर्माण करणे आणि विविधतेचा स्वीकार करणे.

या उदाहरणांमधून दिसते की विवेकवाद तर्कसंगत व वैज्ञानिक पद्धतींचा वापर करून समकालीन समस्यांवर उपयुक्त आणि प्रभावी उपाय सुचवतो.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या बदलत्या स्वरूपात विवेकवादाचे महत्त्व आणि डिजिटल युगात तर्कशुद्धता कशी टिकवावी हे समजून घेण्यासाठी खालील मुद्दे विचारात घेतले जाऊ शकतात:

विवेकवादाचे महत्त्व तंत्रज्ञानात :

१. तर्कसंगत निर्णय :

विवेकवाद : तंत्रज्ञानाच्या वापरात विवेकवाद तर्कसंगत निर्णय घेण्यावर जोर देतो. उदा. डेटा विश्लेषण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापरून प्रगतीशील निर्णय घेण्यासाठी विवेकवादी दृष्टिकोन डेटा आणि तर्कशुद्ध विश्लेषणावर आधारित असावा लागतो.

उपयोग : तंत्रज्ञानाच्या उपकरणांच्या निवडीसाठी वैज्ञानिक आधारावर निर्णय घेणे आणि प्रतिकूल प्रभावांवर विचार करणे.

२. गोपनीयता आणि सुरक्षा :

विवेकवाद : विवेकवाद गोपनीयता आणि माहिती सुरक्षा याबद्दल जागरूक असतो. डिजिटल युगात तंत्रज्ञानाच्या वापराने गोपनीयतेची व सुरक्षा समस्यांवर विचार करणे महत्वाचे आहे.

उपयोग : डेटा गोपनीयतेच्या नियमांचे पालन करणे आणि सुरक्षितता उपायांची अंमलबजावणी करणे.

३. सामाजिक परिणाम :

विवेकवाद : तंत्रज्ञानाच्या प्रभावाचे सामाजिक परिणाम तर्कसंगतपणे समजून घेणे महत्वाचे आहे. उदा. सोशल मीडिया आणि डिजिटल मीडिया यामुळे होणारे सामाजिक बदल.

उपयोग : तंत्रज्ञानाच्या सकारात्मक व नकारात्मक प्रभावांचे विश्लेषण करून उपाययोजना सुचवणे.

डिजिटल युगात तर्कशुद्धता टिकवण्याचे उपाय:

१. फॅक्ट-चेकिंग :

विवेकवाद : डिजिटल युगात फॅक्ट-चेकिंग आणि माहितीची सत्यता तपासणे आवश्यक आहे. विवेकवादी दृष्टिकोन माहितीच्या स्रोतांचा आणि सत्यतेचा अभ्यास करतो.

उपाय : माहितीच्या सत्यतेची तपासणी करण्यासाठी विश्वासार्ह स्रोतांचा वापर करणे.

२. गुणवत्तेचा आढावा :

विवेकवाद : तंत्रज्ञानाच्या उपयोगात गुणवत्ता आणि यथार्थतेचा आढावा घेणे आवश्यक आहे. विवेकवादी दृष्टिकोन सुसंगत व चुकता-कमीतली माहिती वापरतो.

उपाय : संशोधन व आढावा प्रक्रियेचा वापर करून माहितीची गुणवत्ता सुनिश्चित करणे.

३. सामाजिक प्रभाव आणि जिम्मेदारी :

विवेकवाद : तंत्रज्ञानाचा वापर करताना सामाजिक प्रभाव आणि जबाबदारी यावर विचार करणे आवश्यक आहे. विवेकवाद विविध सामाजिक दृष्टिकोनांचे विचार करून तंत्रज्ञानाचा वापर करतो.

उपाय : तंत्रज्ञानाच्या सामाजिक प्रभावाचे मूल्यांकन करणे आणि नैतिक आचारधर्मांचे पालन करणे.

४. शिक्षण आणि साक्षरता :

विवेकवाद : तंत्रज्ञानाच्या बदलत्या स्वरूपात शिक्षण आणि साक्षरता महत्त्वाची आहे. विवेकवादी दृष्टिकोन शिक्षणावर विश्वास ठेवतो.

उपाय : तंत्रज्ञानाचे मूलभूत ज्ञान व उपयोग शिकवणे आणि डिजिटल साक्षरतेवर जोर देणे.

या पद्धतींचा वापर करून, विवेकवाद डिजिटल युगात तर्कशुद्धता आणि विज्ञानाच्या मूलभूत तत्त्वांचे संरक्षण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो.

विवेकवादाच्या स्वीकाराने आणि त्याच्या परिणामांनी प्रेरित करणाऱ्या काही विचारवंत आणि वैज्ञानिकांची उदाहरणे :

१. कार्ल सागन :

विचार : ‘वैज्ञानिक पद्धत म्हणजे प्रश्न विचारणे, ज्ञानाचा अभ्यास करणे आणि निष्कर्षांवर आलोचनेच्या आधारावर पोहोचणे.’

प्रेरणा : कार्ल सागनने वैज्ञानिक संशोधनातील विवेकवादाच्या महत्त्वावर जोर दिला. त्याच्या ‘कॉस्मॉस’ या कामामध्ये त्याने तर्कसंगत विचार आणि वैज्ञानिक पद्धतीच्या आधारे विश्वाच्या गोष्टी स्पष्ट केल्या. त्याने विज्ञानाच्या लोकप्रियतेसाठी मोठी कामगिरी केली आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारल्यामुळे त्याचे काम जागतिक पातळीवर मान्यता प्राप्त झाले.

२. रिचर्ड डॉकिन्स :

विचार : ‘विज्ञान विश्वासाची गोष्ट नाही, तर प्रश्नांची आणि उत्तरे मिळवण्याच्या प्रक्रियेची गोष्ट आहे.’

प्रेरणा : डॉकिन्सने ‘The Selfish Gene’ या पुस्तकामध्ये विकासवादाच्या सिद्धांताची सुसंगतता स्पष्ट केली. त्याने विवेकवादाच्या आधारावर धर्म आणि तत्त्वज्ञानावर तर्कसंगत

दृष्टिकोन ठेवला आणि विज्ञानाच्या दृष्टिकोनातून जीवनाच्या प्रश्नांवर विचार केला. त्याचे कार्य विचारवंतांमध्ये आणि सामान्य लोकांमध्ये विवेकवादाचा स्वीकार वाढवण्यासाठी प्रेरणादायक ठरले.

३. स्टीफन हॉकिंग :

विचार : 'अहंकाराच्या आणि अज्ञानाच्या अंधारात गहाळ झाल्याने ज्ञानाचा मार्ग बंद होत नाही.'

प्रेरणा : हॉकिंगने त्याच्या कार्यात आणि पांडित्यपूर्ण विचारांमध्ये विवेकवादाचा महत्त्व स्पष्ट केले. त्याच्या 'A Brief History of Time' या पुस्तकात त्याने ब्रह्मांडाच्या गूढतांना तर्कसंगत आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून समजावून सांगितले. हॉकिंगच्या कार्याने विज्ञानाच्या तर्कशुद्धतेला प्रोत्साहन दिले आणि सार्वजनिक समजामध्ये विवेकवादाच्या स्वीकारात योगदान दिले.

४. नेल्सन मंडेला :

विचार : 'शिक्षण सर्वात शक्तिशाली हत्यार आहे ज्याचा वापर तुम्ही जग बदलण्यासाठी करू शकता.'

प्रेरणा : मंडेलाने शिक्षण आणि तर्कशुद्धतेच्या महत्त्वावर बल देऊन सामाजिक बदलांमध्ये विवेकवादाचा उपयोग केला. त्याच्या नेतृत्वामुळे दक्षिण आफ्रिकेत अपार्थेड समाप्त झाला आणि सामाजिक न्याय साधला. त्याचे कार्य तर्कशुद्धतेचा आणि विवेकवादाचा उपयोग करून सामाजिक समानतेच्या दिशेने एक प्रेरणा म्हणून पाहिले जाते.

५. अल्बर्ट आइनस्टाइन :

विचार : 'शिक्षण म्हणजे ज्ञानाचे फक्त संग्रह नाही, तर विचाराची प्रक्रिया आहे.'

प्रेरणा : आइनस्टाइनने विवेकवादाचा स्वीकार करून त्याच्या शोधकार्यांत वैज्ञानिक पद्धतींचा उपयोग केला. त्याच्या सापेक्षतेच्या सिद्धांताने भौतिकशास्त्रात क्रांती केली आणि वैज्ञानिक तर्कशुद्धतेचा आधारे नवीन ज्ञानाची दिशा निश्चित केली.

या विचारवंतांच्या आणि वैज्ञानिकांच्या कार्याने विवेकवादाच्या तत्त्वांचा स्वीकार कसा प्रेरणादायक ठरू शकतो हे स्पष्ट होते. त्यांच्याद्वारे दिलेले योगदान आणि तर्कसंगत दृष्टिकोन हे आधुनिक ज्ञान आणि सामाजिक सुधारणा यांत प्रभावी ठरले आहेत.

वाचनानंतर विचार करण्यासाठी मार्गदर्शन :

तुमच्या वाचनाच्या अनुभवातून पुढे जाण्याचा आणि तुमच्या निर्णयांमध्ये तर्कशुद्धता कशी लागू करावी याचा विचार करण्याचा हा एक सुवर्णकाळ आहे.

१. प्रश्न विचारा :

उदाहरण : एखाद्या विचाराच्या किंवा सिद्धांताच्या सत्यतेवर प्रश्न करा. ते तुमच्या माहितीत योग्य आहे का? त्यात कोणतीच तर्कसंगत असमानता आहे का?

विचार : तुमच्या दैनंदिन जीवनात किंवा कामामध्ये तुम्ही कोणत्या विचारांचा सामना करता? ते विचार किती तर्कसंगत आहेत?

२. शंका घ्या :

उदाहरण : तुमच्या समोर आलेल्या माहितीवर शंका घेणे सामान्य आहे. एका विचाराच्या किंवा माहितीच्या स्रोतावर विश्वास ठेवण्याऐवजी, त्याची तपासणी करा आणि विविध दृष्टिकोनांचा विचार करा.

विचार : तुमच्या कामातील किंवा निर्णयांमधील कोणतीही माहिती संशयास्पद वाटली का? त्यावर विचार करणे कसे तुमच्या निर्णयांना प्रभावित करू शकते?

३. शोधा :

उदाहरण : नवीन माहिती शोधणे आणि त्याचे विश्लेषण करणे, तर्कशुद्धतेला महत्त्व देणे आवश्यक आहे. हे तुम्हाला अधिक सुसंगत व माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करेल.

विचार : तुमच्या विचारसरणीत किंवा निर्णय प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी तुम्ही कोणती नवीन माहिती किंवा संसाधने वापरू शकता?

वाचनानंतर तुमच्या विचारात तर्कसंगतता आणि विवेकवादाचा समावेश करा. हे तुम्हाला अधिक स्पष्टता आणि समजून घेण्यात मदत करेल, आणि तुमच्या निर्णयांमध्ये अधिक सुसंगतता आणि पारदर्शकता आणेल. प्रश्न विचारा, शंका घ्या, आणि शोधा हेच विचारशीलतेच्या दिशेने तुमच्या प्रवासाचे मार्गदर्शक तत्त्व असू शकते.

तुमच्या पुस्तकात विवेकवाद आणि तर्कशुद्धतेच्या विश्लेषणाला शास्त्रीय आधार देण्यासाठी तुम्ही खालील संदर्भांचा वापर करू शकता:

१. ‘Thinking Fast and Slow’ - डॅनियल कॅनमन (Daniel Kahneman)

संदर्भ : कॅनमनने मानवी निर्णय प्रक्रियेत तर्कशुद्धतेचा आणि पूर्वग्रहांचा अभ्यास केला आहे. या पुस्तकात, "फास्ट" आणि "स्लो" विचार प्रक्रियेतील फरकांचा आणि त्यांचा निर्णयावर प्रभावाचा तपशीलवार अभ्यास आहे.

शास्त्रीय आधार : मनोविज्ञान आणि व्यवहारात्मक अर्थशास्त्रातील संशोधन.

२. ‘The Structure of Scientific Revolutions’ - थॉमस एस. कुन्ह (Thomas S. Kuhn)

संदर्भ : कुन्हने वैज्ञानिक प्रगतीच्या पद्धतीची आणि पॅराडाइम शिफ्टची व्याख्या केली आहे. या पुस्तकात, वैज्ञानिक ज्ञानाच्या उत्क्रांतीवर विवेकवादी दृष्टिकोनाचे महत्व स्पष्ट केले आहे.

शास्त्रीय आधार : विज्ञानाच्या इतिहासातील बदलांचे विश्लेषण.

३. ‘Sapiens: A Brief History of Humankind’ - युवाल नोहा हरारी (Yuval Noah Harari)

संदर्भ : हरारीने मानवी सभ्यतेच्या विकासाचे विवेचन तर्कसंगतपणे केले आहे. या पुस्तकात, विज्ञान आणि तर्कशुद्धतेच्या माध्यमातून मानवी समाजाच्या बदलांचा अभ्यास केला आहे.

शास्त्रीय आधार : मानवशास्त्र, इतिहास, आणि समाजशास्त्रातील तर्कसंगत विश्लेषण.

४. ‘The Demon-Haunted World: Science as a Candle in the Dark’ - कार्ल सागन (Carl Sagan)

संदर्भ : सागनने विज्ञानाच्या महत्वावर आणि तर्कसंगततेच्या विकासावर लेखन केले आहे. या पुस्तकात, तर्कसंगततेच्या अभावामुळे होणाऱ्या समस्यांचा आणि विज्ञानाच्या मार्गदर्शनाचा अभ्यास आहे.

शास्त्रीय आधार : विज्ञानाचा प्रचार आणि तर्कशुद्ध विचारधारा.

५. ‘Rationality: From AI to Zombies’ - एलिजा युडकोव्स्की (Eliezer Yudkowsky)

संदर्भ : युडकोव्स्कीने विवेकवादी विचारशक्तीच्या विविध पैलूंचा अभ्यास केला आहे. हे पुस्तक विवेकवादाच्या आणि तर्कशुद्धतेच्या विकासाच्या समस्यांवर चर्चा करते.

शास्त्रीय आधार : तर्कशुद्ध विचार आणि कृत्रिम बुद्धिमत्ता.

६. ‘A Brief History of Time’ - स्टीफन हॉकिंग (Stephen Hawking)

संदर्भ : हॉकिंगने भौतिकशास्त्र आणि ब्रह्मांडाच्या मूलभूत तत्त्वांची तर्कसंगत व्याख्या केली आहे. या पुस्तकात वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे ब्रह्मांडाचा अभ्यास केलेला आहे.

शास्त्रीय आधार : भौतिकशास्त्र आणि ब्रह्मांडशास्त्र.

या संदर्भांद्वारे तुम्ही विवेकवादाच्या तत्त्वांचा आणि तर्कशुद्धतेच्या महत्वाचा आधार आपल्या पुस्तकात देऊ शकता. शास्त्रीय आधारामुळे तुमच्या विवेचनाला अधिक विश्वसनीयता आणि बळकटी मिळेल.

# वसईतील ख्रिस्तसभा  हा समूह, कळप की समुदाय?

■ ॲड. अतुल आल्मेडा, निर्मळ

*झाडं पक्षी जनावरे*
*प्रार्थना करीत नाहीत*
*तरीही सुखी असतात*
*देवाकडे भीक मागतो*
*त्यालाच आपण प्रार्थना म्हणतो.*
*- कवी सायमन मार्टिन.*

ख्रिस्त आपल्या शिकवणुकीतून आणि आचरणाने विवेकी, प्रेमळ समाज निर्मितीसाठी कार्य करत होता. त्याची इच्छा होती, पृथ्वीवरील सर्व माणसांनी एकमेकांशी प्रेमाने आणि सलोख्याने एक कुटुंब म्हणून जगावे आणि नांदावे. यासाठी त्यांनी आपल्या दृष्टांतात शिकवणीद्वारे प्रेम करण्याचे उदाहरण, हे चांगल्या समारीतनच्या दाखल्याद्वारे, सज्जन आणि धार्मिक नाही तर अनोळखी माणूस सुध्दा प्रेमाने उपयोगी पडू शकतो. त्याचप्रमाणे विवेकी विचारानं  वागण्याचे,  उदाहारण, व्याभिचारी स्त्री संबधीत दाखल्याद्वारे, स्त्री एकटी कशी व्याभिचार करू शकणार! तिथे पुरुष असणारं, त्याने व्यभिचार केला की नाही? मग दोष फक्त तिलाच  का? म्हणजेच स्वतंत्र विचाराने निर्णय घेण्याचे आणि वर्तणूक करण्याचे आदर्श शिकविले.

असे सर्व शिकवित असतांना, तत्कालीन असलेल्या धनगर समाजाचे उदाहरण, म्हणजे देव आणि त्याची प्रजा यासाठी, मेढपाळ व त्यांची मेंढरे हे प्रतिक वापरले आहे. ख्रिस्तसभा त्या वृतीनुसार आजही कार्य / व्यवहार करत आहे. थोडक्यात धार्मिक असो किंवा भौतिक असो निर्णय धर्मगुरू आणि बिशपांनी (मेंढपाळ) द्यायचे आणि  लोकांनी (मेढरांनी) पाळायचे / माना डोलावयाच्या.

ख्रिस्ताच्या शिकवणुकीचे जे आकलन मला झाले आहे, ते या कार्यपद्धतीच्या विरुद्ध आहे. का? विचार करू या!

ख्रिस्तसभेच्या माध्यमातून असे शिकवले जात आहे की ख्रिस्ती लोक / श्रद्धावंत हे एकत्र असतात, कारण ते एक समूह आहेत. वास्तवात मात्र हे पुर्ण असत्य आहे. कसे ते कळण्यासाठी, कळप, समूह आणि समुदाय या शब्दाचे अर्थ समजणे / आकलन होणे आवश्यक आहे.

१. कळप : इंग्रजीत herd कळप प्राण्यांचे असतात. उदा. मेंढरांचा कळप, गुरांचा कळप तर पक्षाचा थवा, कळपात स्वतंत्र विचार नसतो. नेता घेईल तो निर्णय श्रद्धांवंत म्हणून आज्ञाधारकपणे पाळावयाची, चूकीचा असला तरी.

२. समूह : इंग्रजीत mass / community, विचार पुर्वक, सुख:दु:खाने बांधला गेलेला मानवी समाज. येथे प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे विचार मांडण्याची मुभा असते. विवेकी विचाराने चर्चा करून निर्णय घेतला जातो.

३. समुदाय : इंग्रजीत collection of people. सुट्या व्यक्तीची एकाच किंवा समान हेतूने जमलेल्या लोकांचा जमाव.

जर ख्रिस्तसभा सांगते, ते मान्य केले, तर ख्रिस्ती श्रद्धावंताचा समाज म्हणजेच प्रेषितांच्या काळात कार्यरत असलेला समाज, समूह असायला हवा. पण आज वसई धर्मप्रांतातील ख्रिस्ती समाज किंवा वसईतील कुठल्याही धर्मग्रामातील समाज हा ख्रिस्ती समूह आहे, असे आपण म्हणू शकतो का? माझ्या मते उत्तर प्रत्येक ख्रिस्ती म्हणवणाऱ्या व्यक्तीने शोधले पाहिजे, दिले पाहिजे. उत्तर शोधण्यासाठी उपलब्ध पर्याय असे असू शकतात. धर्मप्रांताचे निर्णय घेताना श्रद्धावंताचे विचार ऐकून घेतले जातात का? आणि ऐकून घेतले जात असतीलच, तर त्यांना प्राधान्य दिले जाते का? अशाप्रसंगी खुली चर्चा, संवाद होतो का?? हे विचार ऐकून घेण्याची प्रक्रिया समूहांतील सर्व वर्गाचे प्रतिनिधित्व असते का? ख्रिस्तसभा लोकशाहीच्या गोष्टी भरपूर बोलते, पण वर्तन तसे नसते.

देव प्रेम आहे. देव प्रेमळ आहे. त्याला आपली गरज नाही असे माझे ठाम मत आहे. हे माझे मत बदलण्यासाठी कोणी पुरावा देईल का? (देव आणि देवळाचा, सुताराम संबंध नाही, देवळात राहायला देव आपला पगारी नोकर थोडाच आहे.- कवी सायमन मार्टिन) परंतु श्रद्धावतांना तो एकमेकांशी विवेकपूर्ण विचारानं आणि प्रेमाने वागण्याची शिकवण प्रत्येक धर्मात देत आहे. कारण मनुष्याने एकमेकांशी न भांडता एक कुटुंब म्हणून जगावे अशी त्याची इच्छा आहे. पण ती शिकवण माणूस पाळत नाही. अंगिकारत नाही.

आपण देवाची पूजाअर्चा करतो. म्हणजे पुजाअर्चनाद्वारे आपण धर्म पाळतो. आपण सर्व भक्त आहोत, शिष्य किंवा अनुयायी नाही. खरं म्हणजे आपण धर्म जगायचं असतो. धर्म जगायला आपले पुजारी / धर्मगुरू सांगत नाहीत. कारण त्यांनाच कृतीशील धर्म जगणे अवघड जाते. त्यामुळेच दोघांनाही धर्म न जगता धर्म पाळल्याचे समाधान लाभते. प्रत्येक माणसाने आपापल्यापरी धर्म जगायचं ठरविले तर जगांत आणि मानवांत शांती नांदू शकते. धर्म जगणे म्हणजे मानसाने माणसावर प्रेम करणे व आकस न धरणे हा माझा विश्वास आहे. मला असे राहून राहून जाणवते, की ख्रिस्ताने त्यासाठी जून्या करारांतील दहाही आज्ञा बाजूला सारून, अन्यायी व समतेची समाजव्यवस्था बदलून समतेचा समाज समाज निर्माण करण्याचा आदेश दिला आहे. (मोझेसचा धर्म नाहीसा नाही, तर पुर्ण करावयास आलो आहे).

एकच नवी आज्ञा सांगितली आहे. "मी एक नवीन आज्ञा तुम्हाला देतो; एकमेकांवर प्रेम करा. मी तुमच्यावर प्रेम केलं तसंच तुम्हीदेखील एकमेकांवर प्रेम करा. तुमच एकमेकांवर प्रेम असलेलं, तरच तुम्ही माझे शिष्य आहात हे सर्वांना पटेल!" (पहा योहान १३: ३४ व ३५) "स्वत:सारखं शेजाऱ्यावरही प्रेम कर" असे चांगला सॅमेरीटन या दाखल्यातून ख्रिस्त शिकवत आहे. आपले राष्ट्रपिता आणि आधुनिक जगाचे आध्यात्मिकपिता महात्मा गांधी यांची विचारधारा योग्य वाटते. कुठलेही ख्रिस्ती कर्मकांड न करता ख्रिस्ताच्या शिकवणुकीप्रमाणे जीवन जगलेला माणूस. आपल्या 'My Religion' या पुस्तकात म्हणतात, 'संग्रह करणे, भविष्याची तरतूद करणे, संग्रह करण्याच्या वृतीमुळे अनेक असमानता निर्माण झाल्या आहेत, ज्यामुळे दु:खं भोगावी लागतात.'

अपरिग्रहाच्या मूल्याचे व्यवस्थित पालन करावयाचे असल्यास मानवाला पक्षाप्रमाणे राहावं लागेल. ख्रिस्तानेच हा विचार दिला आहे. संग्रह करावा. पण किती? संग्रहाला मर्यादा असायला हवी. समुहात राहण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक श्रद्धावंताने विचार केला पाहिजे, हा विचार करताना, मी ख्रिस्ताचा भक्त की अनुयायी याचाही विवेकी विचार व्हावा. असे म्हणतात 'पृथ्वी सगळ्याच्या गरजा भागविण्यासाठी देईल, पण प्रत्येक माणसाची हाव पुर्ण करण्याएवढे नाही. ख्रिस्ती श्रद्धांवतांवर एक वेगळी जबाबदारी आहे. याची जाणीवच त्याला नाही. हपापलेल्या एखाद्या मनुष्यासारखा कुठलाही विचार न करता कल्पनेत येईल तितके कमवून आपले घर भरण्यासाठी आपल्या बुद्धिचे, शक्तीचे व युक्तीचे प्रदर्शन तो करत आहे. हेच एक कारण आहे, समाजात समतेऐवजी विषमता वाढत आहे. यासाठी गांधींच्या 'स्वयं-साधेपणाचा' नियमाचा अवंलब करणे महत्त्वाचे आहे. हा नियम म्हणजे

स्वत:च्या इच्छा नियंत्रित करून, आवश्यक गरजा भागवून साधे आयुष्य जगणे. हेच ख्रिस्त शिकवत आहे. ख्रिस्ताची धर्मशिकवण स्थितीवादी नसून परिवर्तनवादी आहे. हे नेहमी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. आज धर्मबाजी भरपूर चालू आहे, पण समाजातून नैतिकता लोप पावत चालली आहे.असे मला समजते. तुम्हाला काय वाटते? विवेकी विचार करून ठरवा.

मेंढपाळ आणि कळप, या धर्म पाळण्याच्या धारणेतून दोघांनी बाहेर पडल्याशिवाय ख्रिस्ताला अभिप्रेत असलेला ख्रिस्ती समूह हे दिवास्वप्नच आहे. नाहीतर चारशेहून जास्त वर्षे जपत असलेले श्रद्धावंत ज्या कर्मकांडाच्या हेतूने उद्धेशाने रविवारी देवळात येतात, त्याच्याअगदी विसंगत हेतूने त्यांच्यापैकीच बहुतेक सोमवार ते शुक्रवार वसईच्या Temple of justice, न्यायालयात / कोर्टात एकमेकांना भेटले नसते. हे बदलणे कठीण आहे. मात्र अशक्य मुळीच नाही. स्वतंत्र, समता, बंधुता आणि न्याय समाज निर्माण करण्यासाठी फक्त प्रवचने आणि उपासना पुरेशी नाही, हे चारशे वर्षाच्या अनुभवांतून आपण शिकलो पाहिजे. आपले संविधानसुद्धा समूह विचाराची प्रेरणा देणारे आहे. विवेकी कृती करण्याची आज आवश्यकता आहे. ती वेळ येऊन ठेपली आहे. जग बदलण्याची सुरवात स्वत:पासून करू या. ख्रिस्तासारखे विवेकी आणि चिकित्सक होऊ या. शांतीचे आणि समाधानी जीवन जगू या.

# एव्हरी प्रॉब्लेम हॅज ए सोल्यूशन

■ बावतीस पेडीकर, नंदाखाल

आपण इतिहासात वाचतो की सिकंदर राजा जग पादाक्रांत करत होता आणि एके दिवशी तो जास्त आजारी झाला तेव्हा त्यांचे शेवटचे मनोगत, माझी शवपेटी डॉक्टरांनी वाहावी व माझे दोन्ही हात शवपेटी बाहेर पुढे ठेवावेत, तात्पर्य मी जगाचा राजा पण डॉक्टर माझे प्राण वाचवू शकले नाहीत आणि मी देवाकडे परत जाताना रिकाम्या हाताने जात आहे, काहीही बरोबर घेऊन जात नाही, जे येथील आहे ते येथेच राहणार आहे.

हिटलरने लाखो ज्यू लोकांचे हाल हाल करून त्यांना जीवे मारले, शेवटी त्याला आत्महत्या करावी लागली. आपण हे वाचत असताना रशियाचे पुतीन काय, चीनचे झी पंग पॅग काय किंवा आपल्या भारताचे नरेंद्र मोदी काय, सर्वांना जगाचे मालक व्हायचे आहे, किती काळ ? माहित नाही.

वाल्याचा वाल्मिकी झाला! सौलचा पौल झाला, गेल्या महिन्यात लाखो कोटीचे मालक असलेले अब्जाधीश रतन टाटाचे निधन झाले, त्यांनी लग्न न करता आयुष्यभर गरीब, गरजवंत उपेक्षितांची सेवा केली, त्यांच्यासाठी जे जे करता येईल ते त्यांनी केले, त्यांचेही शेवटचे मनोगत फारच महत्त्वाचे आहे, पैसा हे सर्वस्व नाही, गमावलेल्या भौतिक वस्तू परत मिळू शकतात पण जीवन नाही, जीवनाला समजून घेण्यासाठी 'रुग्णालय, तुरुंग आणि स्मशानभूमी' ही तीन ठिकाणे फार महत्त्वाची आहेत असे ते म्हणाले आहेत.

त्यांच्यासाठी मुंबईच्या कार्डिनल ऑझवल्ड ग्रेशस यांनी चर्चमध्ये मिस्सा अर्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

एका प्राप्त झालेल्या माहितीनुसार आपल्या भारत देशात ११५० वृद्धाश्रम आहेत, त्यामध्ये ९७ हजारापेक्षा जास्त वृद्ध राहत आहेत. भारताची लोकसंख्या १४० कोटीच्या वर आहे, सरासरी ११ ते १२ टक्के हे ज्येष्ठ नागरिक. महाराष्ट्राची लोकसंख्या सुमारे १२ कोटी आहे.

वैद्यकीय शास्त्रात प्रचंड प्रगती झाली आहे, त्यामुळे वयोमानात वाढ झालेली आहे, आपल्या स्वातंत्र्याचे वेळी सरासरी आयुष्यमान ३८ होते ते आज ७२ पेक्षा जास्त आहे, याला कारण बदलती जीवनशैली आणि आर्थिक, सामाजिक, स्थर उंचावला आहे आणि हे सर्व असताना अनेक लोकांना वृद्धाश्रमात जावे लागते यामागे जशी मानसिकता आहे तशीच परिस्थिती सुद्धा कारणीभूत आहे.

सर्वच लोक आपल्या एक किंवा दोन मुलांसाठी जीवाचे रान करतात, त्यांचे लाड करतात पण त्याचबरोबर त्यांना उच्चशिक्षित करतात. प्रत्येकाला वाटते की माझा मुलगा / मुलगी डॉक्टर इंजिनियर प्राध्यापक सीए वगैरे व्हावी आणि त्यासाठी ते पात्र व्हावेत म्हणून प्रत्येक आई-वडील, आजी-आजोबा त्यांच्यासाठी आपले सर्वस्व देत असतात.

मग अशा सर्व मुलांना आपल्या वसई मुंबई व इतर शहरात मनासारखी, हवी असलेली परिस्थिती सर्वांसाठी उपलब्ध नाही, त्यामध्ये रोजच्या जीवनात करावी लागणारी कसरत, धावपळ, स्कूटर मोटरसायकलचा प्रवास, रिक्षा, बसचा प्रवास, खड्डे रस्ते, रेल्वेचा प्रवास, गाडीमधील गर्दी, विजेचा खेळखंडोबा, पिण्यासाठी नळाचा शुद्ध पाण्याचा अभाव, आरोग्य समस्या, त्यासाठी डॉक्टर हॉस्पिटल इत्यादीचा अभाव, छानपैकी जीवन जगण्यासाठी परिस्थिती येथे नाही मग असे पात्र उमेदवार मुलगा किंवा मुलगी परदेशात जातात एकदा तिथे गेल्यावर तेथील परिस्थिती त्यांना आकर्षित करते मग त्यांचा विवाह होतो, होणाऱ्या मुलांचे भवितव्य, इत्यादी विचार करून ती तिथेच स्थायिक होतात.

काही वर्षे, त्यातील काही महिने, ते आपल्या आईवडील, आजीआजोबा, सासू-सासरे यांना तिथे नेतात. त्यांनाही तेथील वातावरण एकंदरीत जीवनशैली आवडते पण ते तिथे कायम राहण्याची त्यांची अजिबात तयारी नसते. मग या वयस्कर ज्येष्ठ नागरिकांचे पुढे काय ? हा मोठा प्रश्न निर्माण होतो.

येथे राहण्यासाठी सर्व सोयी सुविधा असलेले घर, बंगला सर्व आहे पण माणसे दोनच, कधी कधी एकच मग त्यांची देखभाल कुणी, कशी करायची ? जोपर्यंत चालत फिरत आहेत, काही छोटी छोटी घरातील कामे करता येतात तोपर्यंत ठीक, काही आजार मधुमेह, ब्लड प्रेशर, गुडघेदुखी, लघवीचा त्रास, डायलेसिस, पोटाची विकार आणखीन इतर प्रकारचे रोग आणि त्यात कर्करोगाने शिरकाव केला तर बघायलाच नको, अशा वेळी त्या परदेशात राहणाऱ्या मुलाने वा मुलीने नेमके काय करायला हवें?

ते स्वतः इथे येऊन किती दिवस महिने सेवा करू शकतील ? मग त्यांचा जॉब, त्यांचे कुटुंब, त्यांची मुले त्यांचे संगोपन, शिक्षण आणि त्यांचे भवितव्य इत्यादी बाबत त्यांनी काय भूमिका घ्यावी ?

येथील ज्येष्ठांनी त्यांच्या मुलामुलीसाठी वाटेल ते कष्ट घेतले मग त्या मुलामुलींनी त्यांच्या मुलासाठी काही करायला हवे की नको ? तसा हा प्रश्न गुंतागुंतीचा आहे. दोन्ही बाजूने विचारपूर्वक योग्य निर्णय घ्यायला हवा, प्रत्यक्ष आपल्या मुलाने मुलींनी किंवा सुनेने आपली सेवा करायला हवी ही अपेक्षा ज्येष्ठांनी आता बाळगण्याची दिवस निघून गेले आहेत.

काळ बदलत आहे तशी ज्येष्ठांनी आपली मानसिकता बदलायला हवी. तसेच मुला-मुलींनी त्यांना वाऱ्यावर न सोडता त्यांच्याबरोबर रोजचा रोजचा संपर्क ठेवणे, काय हवं

नको त्याची तजवीज करणे आणि अतिशय महत्त्वाच्या इमर्जन्सीवेळी प्रत्यक्ष येऊन सेवा करणे योग्य होईल.

माझ्या एका मित्राने त्याचे वडील शेतकरी, नोकरी न करणारे, त्यांना पेन्शन मिळत नाही किंवा त्यांच्याकडे काही पुंजी सुद्धा नाही मात्र त्यांची मुले अमेरिकेत राहतात. त्यांनी आपल्यासाठी मस्त बंगला बांधला आहे. त्यांच्यासाठी तसेच आई-वडिलांसाठी सर्व भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करून ठेवलेले आहेत. घरात सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत, एक वयस्कर ३०/३५ वर्षाची बाई पूर्ण वेळ, २४ तास त्यांच्याबरोबर राहणारी, सर्व काही खाणं-पिणं कपडे धुणे इत्यादी कामे करून येथेच राहते, तिला पंधरा हजार रुपये महिना मोबदला दिला जातो आणि ती त्यांच्या आई-वडिलांची काळजी घेते आणि हा सर्व व्यवहार व्हाट्सअपवर, व्हिडिओवर रोज पाहिला जातो, सांगितलं जातो.

दुसरा एक मित्र आहे, त्याची दोन्ही मुले कॅनडामध्ये नोकरी करीत आहेत. त्या आई-वडिलांना विजासुद्धा मिळाला आहे. त्याला तीन वर्षे होऊन गेली पण त्याला तिथे जाता येत नाही, मुलाकडे दोन-तीन महिने राहण्यासाठी का असेना गेलो तर ८० च्या घरात असलेल्या आई-वडिलांचे काय करायचे ? एखाद्या वृद्धाश्रमात ठेवावीत तर लोक, नातेवाईक काय म्हणतील ? मुलाकडे जाणे, ते कसे राहतात, काय खातात पितात त्यांचे जीवन कसे चालले आहे हे फक्त फोनवर प्रत्यक्ष जाऊन त्यांना भेटावे त्यांच्याबरोबर थोडे दिवस राहावे. आपणही तेथील अनुभव घ्यावा असे त्यांना मनोमन वाटते ती सुद्धा त्यांची मुलं आहेत त्यांनाही आकर्षण आहे मग त्यांनी अशा परि-स्थितीत काय करायला हवे ? आईवडील तीन महिन्यासाठी वृद्धाश्रमात जायला तयार नाहीत, काम करणारी बाई, प्रामाणिक सेवा करणारी, मिळणे हे सुद्धा आजकाल मुष्कील झाले आहे.

मी काही परदेशी वास्तव्य करणाऱ्या आपल्या येथील मुलामुलींशी संवाद साधला तर त्यांचीही इच्छा आहे की आई-वडील, आजी आजोबा आपल्या स्वतःच्या घरात ऐशआरामी जीवन जगावे, त्यांना वृद्धाश्रमात जायला नको आणि त्यांना तेथे पाठविण्याची इच्छा सुध्दा नाही. पण...

तसेच काही आई-वडील, आजीआजोबाशी बोललो तर ते सुद्धा सांगतात की आम्ही आता किती दिवस जगणार, आमच्यासाठी मुलांनी, नातवंडांनी त्यांच्या भवि-तव्याचा त्याग करू नये. आम्ही तिथे मुलाकडे, नातवंडाकडे जाऊन आलो आहोत, तेथील परिस्थिती आणि येथील पुष्कळ फरक आहे. मुलांना आणि सूनांना तिथे व्यक्ती स्वातंत्र्य, मनासारखे राहता येते. येथे सासू-सासऱ्यांच्या घरात त्यांच्या वर्चस्वाखाली राहायला त्यांची तयारी नसते, तसेच ही ज्येष्ठ मंडळी मुलांच्या आणि सुनेच्या अधिपत्याखाली राहायला तयार नसतात ही खरी मेख आहे.

अनेक लोक, आजीआजोबा यांना वृद्धाश्रमात पाठवतात म्हणून मुलांनी पर-देशात जाऊ नये, की चर्चमधील लोकसंख्या कमी होत आहे म्हणून बोंब मारत असतात का.

आजी आजोबा यांची काळजी असेल तर यावर चर्च असो, संस्था असो किंवा काही सामाजिक कार्यकर्ते असो त्यांनी पुढाकार घ्यावा, एकाच ठिकाणी मोठी पाच-सहा मजली यू आकाराची इमारत उभारावी आणि तेथे शंभर, सव्वाशे, दीडशे वृद्ध लोकांची एकत्र राहण्याची सोय करावी.

प्रत्येकी दोन बेडची सेल्फकंटेन रूम त्यात सर्व सोयी सुविधा (पलंग, बेड, उशा, बेडशीट, चादर, टेबल, खुर्च्या, कपाटे, बाथरूम टॉयलेट इत्यादी) यामध्ये पती-पत्नी, दोन भाऊ, दोन बहिणी, दोन नातलग, दोन मैत्रिणी, दोन मित्र अशी दोघे दोघे एकत्र एकाच रूममध्ये राहू शकतात.

या इमारतीत कॉमन किचन, डायनिंग हॉल कॉमन, स्टेज, चॅपल, प्रेअर हॉल, दवाखाना, दोन नर्स, वॉचमन केअर टेकर, अशा अनेक सुविधा असतील. शिवाय दोन रूम्स धर्मगुरूसाठी फादर आणि दोन रूम्स धर्मभगिनी सिस्टर साठी सुद्धा असतील.

जुन्या काळात म्हणजेच आताचे ज्येष्ठ आई वडील, आजीआजोबा हे एका जुन्या कौलारू घरात जिथे जन्मले तेथील मोठा ओटा, एका बाजूला हिंदोळा, दुसऱ्या बाजूला माची काही मोठे बाक, आणि त्या ओटीवर लहान मोठे एकत्र नांदले, तसे वातावरण निर्माण करून पूर्ण दिवसाचा कार्यक्रम त्यात करता येईल.

आजूबाजूच्या परिसरातील शाळा कॉलेजमधील मुलांना सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी बोलवायची त्यांची प्रॅक्टिस होईल आणि ज्येष्ठांची करमणूक. शिवाय अशा ठिकाणी आरोग्य शिबिरे, प्रबोधन शिबिरे आयोजित करता येतील, अनेक धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम सुद्धा राबवता येतील.

इथे राहण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी एका बेडसाठी पाच लाख रुपये म्हणजेच एका रूमसाठी दहा दहा लाख रुपये भरून संस्थेचे सभासद होता येईल, संस्था रजिस्टर करायची, 80Gचा फायदा तसेच महापालिका, सरकारी अनुदान शिवाय बँका पतपेढ्या येथून मदत मिळू शकेल.

त्यांच्या महिन्याचा (खाण्या पिण्याचा राहण्याचा) मेंटेनन्स खर्च दर महिन्याला त्यांना द्यावा लागेल. ज्या ठिकाणी आपले घरगुती वातावरण आपले गावातले वातावरण निर्माण केले की अनेक प्रश्न एकमेकांना मदत करणे, सोबत करणे, एकत्रित प्रार्थना करणे असे रोज कार्यक्रम केले जावेत. येथे सुरक्षा रक्षक, वॉचमन कम ड्रायव्हर, २४ तास सेवा केअरटेकर असतील साफसफाई साठी कामगार असतील,
नर्स असतील.

किचनमध्ये सकाळी चहा, नंतर नाश्ता दुपारचे जेवण म्हणजे लंच, संध्याकाळी चहा नाश्ता व रात्रीचे जेवण म्हणजे डिनर. दररोजचा मेनू वेगवेगळा असेल, मोठे मोठे हॉस्पिटल मध्ये जशा सुविधा आहेत तशा इथे करता येतील. आपल्याच परिसरात, आपलीच माणसे असल्याने कोणी कधीही येऊन भेटू शकतात, घरी जाऊन येऊ शकतात अशी मुभा असेल.

ज्यांची इच्छा आहे व ज्यांना परवडेल त्यांना सभासद करून घेता येईल, हे सर्व ऐच्छिक ना नफा तोटा या तत्त्वावर या संस्थेचा कारभार चालेल निदान ४० ते ५० व्यक्ती साठी असा प्रयोग करायला हरकत नाही. आज साठीचे आहेत त्या जवळपास सर्वाकडे सर्व काही आहे. ते सर्वजण शाळेत होते त्यावेळी असलेल्या परिस्थितीपेक्षा आता श्रीमंत झालेले आहेत.

पूर्वी शेती बागायतीमधून तुटपुंजी उत्पन्न मिळत होते, जुनी कौलरू घरे, किमान गरजा कशातरी भागवल्या जात होत्या. आज शिक्षणामुळे चांगल्या नोकऱ्या कामधंदा उद्योग व्यापार यामधून चांगले आणि भरपूर उत्पन्न मिळते, त्यामुळे राहण्यासाठी बंगले, गाड्या टू व्हीलर फोर व्हीलर इतर आधुनिक सुविधा, डांबरी रस्ते, वीजपुरवठा प्रवासाच्या सोयीसुविधा अशा अनेक बाबतीत प्रगती झालेली आहे.

त्या काळात घरातील कुटुंबातील बारसे, फर्स्ट कम्यूनीयन, वाढदिवस, लग्न इत्यादी कार्यक्रम कसेबसे करत असत आज ती दणक्यात करून दाखविण्याची स्पर्धा सुरू आहे. याला कारण आर्थिक सुबत्ता, सामाजिक स्तर उंचावला आहे त्यामुळे अपेक्षा सुद्धा वाढलेल्या आहेत.

अमेरिकेत शिक्षणासाठी जाणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना कॅम्पस जॉब असिस्टंट, इंटरनशिप, पुढे थेट वर्क व्हिसावर पूर्णवेळ नोकरी मिळून ती एक दोन वर्षात, शिक्षणासाठी घेतलेल्या कर्जाची व्याजासह परतफेड करतात, आणि ते ही मजेत राहून. अमेरिकेतील शिक्षण संशोधनावर तसेच औद्योगिक, तांत्रिक आणि व्याव-सायिक उपयोजनावर आधारित असते तसेच नियमाधारित लोकशाही व्यवस्था, राहणीमानाचा उत्तम दर्जा, शुद्ध हवा पाणी, स्पर्धात्मक भेदभाव रहित वातावरण व गुणाची कदर ही अमेरिकेची अंगभूत गुणवैशिष्ट्ये आहेत त्यामुळे तिथे गेलेली विद्यार्थी तिथे स्थायिक होण्याच्या प्रयत्नात असतात.

शेवटी काय ! डॉ नीतू मांडके, हार्ट स्पेशालिस्ट, हार्ट अटॅक होऊन गेले. डॉ शंतनु अभ्यंकर, आपले मरण पाहिले म्या डोळां, यामध्ये शेवटचे मनोगत वाचण्यासारखे आहे. स्वतः डॉक्टर असूनही काही उपयोग होत नाही. म्हणून जेवढे समाधान मानू तेव्हढे कमीच. ....

# सकारात्मकता एक कल्पवृक्ष!

■ ॲड. जॉन रॉड्रिग्ज, रांबाई

अनेक वेळा आपल्या वाचनात खालील वाक्ये येतात. उदा. A man is a Rational Animal. A man is social animal and A man is a human being.

अर्थात मनुष्य हा सुज्ञ (विवेकी) प्राणी आहे तसेच तो एक सामाजिक प्राणी आहे. परंतु तो अनेक सजीव प्राण्यांसारखा, एक सजीव माणूस आहे. जवळजवळ सर्व प्राण्यांना माणसाप्रमाणे हवा, अन्न-पाणी अशा मूलभूत गरजेप्रमाणे, शारीरिक व लैंगिक भुक तसेच राग, भीती, वात्सल्य वगैरे प्रकारच्या भावनासुद्धा असतात.

परंतु माणसाला निसर्गाने / देवाने एक निराळेपण दिलं आहे. ते म्हणजे त्याला मिळालेली सद्सदविवेकबुद्धी वापरण्याची देणगी. म्हणून त्याला A Rational Animal म्हटलं जातं. आपल्याला मिळालेल्या बुद्धीचा तो साकल्याने विचार करू शकतो. कारण त्याच्यात निसर्गाने जन्मत:च क्षमता ठासून भरून ठेवली आहे.

पृथ्वीतलावरील जेवढया दृष्य स्वरुपात ज्या वस्तू दिसत आहेत, मग त्या वनस्पती असो किंवा कोणतेही सजीव जीवजिवाणू किडे-मुंग्या, सर्व श्वापदं, प्राणी, पशू-पक्षी, जलचर प्राणी व सर्वात श्रेष्ठ असा मनुष्य प्राणी, ह्या सगळ्यांना आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी जीवनात सदैव संघर्ष करावा लागतोच. कुणालाही 'असेल माझा हरी तर देईल माझ्या खाटल्या वरी’ असे सहज मिळत नाही. संघर्ष हा अटळ आहे. वनस्पतींना वादळ-वाऱ्याचा, उन-पावसाचा, दुषित हवामानाचा सामना करावा लागतोच. तसेच निसर्गात सर्वश्रेष्ठ प्राण्यामधला समजला जाणाऱ्या माणसापासून सुद्धा सर्वात मोठा धोका हा आहेच. ती निसर्गातील आपत्तीना आपापल्या परीने तोंड देत असतातच. परंतु, स्वार्थी व हावरट माणसापासून त्यांना धोका असतो. कारण हा माणूस त्यांच्या मुळावरच आपली कुऱ्हाड चालवतो व त्यांचे अस्तित्वच नष्ट करतो. (पर्यावरण हा संवेदनशील विषय आहे, त्याविषयी आपण कधीतरी विचार करु, तूर्तास नको) तसेच पशू-पक्षी व इतर जलचर ह्यांनाही अशाच नैसर्गिक आपत्तीना तोंड द्यावं लागतं. असो... आपण आपल्या मूळ विषयाकडे वळूया...

जगात सर्व सुखी असा कोण आहे ? अशी एक म्हण आहे. अर्थात कोणच नाही. देवाने एका दुःखी माणसाला तू सुखी माणसाचा सदरा घाल म्हणजे तू सुखी होशील असे सांगितले. तो दुखी माणूस, सुखी माणसाचा सदरा घातलेल्या माणसाच्या शोधात बाहेर पडला. परंतु सर्व ठिकाणी शोध घेता-घेता त्याला सगळी माणसं दुःखीच सापडली. सरतेशेवटी संध्याकाळी एक माणूस समुद्र किनारी बसलेला दिसला. तो आनंदाने किनाऱ्यावर बसून स्वच्छंद मनाने आपल्या हाताने किनाऱ्यावर आदळणाऱ्या लाटांमध्ये एक-एक करुन मस्तपणे दगड फेकत होता. ह्या दुःखी माणसाला आनंद झाला व त्याला वाटले की हा खरंच सुखी आहे. आपल्याला देवाने सांगितलेल्या सुखी माणसाचा सदरा मिळेल हया आशेने त्या दुःखी माणसाने, समुद्रकिनारी बसलेल्या माणसाकडे धाव घेतली. परंतु जेव्हा तो त्या माणसाकडे पोहोचला, तेव्हा तो दुःखी माणूस अधिक दुःखी झाला. कारण त्याच्या अंगावर सदराच नव्हता. तात्पर्य : जगात कुणीच सुखी नाही. प्रत्येकाच्या जीवनात कसल्या न कसल्या रुपात दुःखे ही  असतातच.

प्रत्येक माणसाचे दुःख हे एक सारखे नसते. प्रत्येकाची दुःखे, समस्या, अडचणी, अरिष्टे, संकटे वगैरे वगेरे ही निरनिराळी अससात. ही यादी न संपणारी आहे. परंतु अशा संकटानी खचून न जाता त्यातुन मार्ग काढणे हे सुज्ञपणाचे ठरते. नैराशाचे शेवटचे टोक म्हणजे आत्महत्या.

निसर्गाने जन्मत:च माणसाला विचार करण्याची शक्ती दिलेली आहे. सकारात्मक व नकारात्मक विचार ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्याचा सदुपयोग कसा करायचा हे प्रत्येक माणसाच्या हाती आहे. थॉमस एडिसन ह्या शास्त्रज्ञानी सकारात्मक विचार आत्मसात केले नसते, तर आज आपण विजेचे दिवे किंवा विजेवर चालणारी अगणित यंत्रे पाहू शकलो नसतो, किंवा राईट बंधूनी आकाशात उडण्याचे स्वप्न बघितले नसते तर आज मानव सूर्यावर झेप घेताना दिसला नसता. अशा प्रगल्भ बुद्धिवान माणसांनी सकारात्मक विचारसरणीचा पाठपुरावा केला म्हणून ते यशस्वी झाले. त्यांना त्यांच्या प्रयत्नात असंख्य अडचणी / समस्या आल्या. परंतु त्या समस्यामुळे खचून न जाता त्या लोकांनी त्यावर मात करुन यश संपादन केलं, स्टॅन्ली अर्नोल्ड म्हणतात की Every problem contains the seeds of its own solutions. प्रत्येक समस्येच्या उदरी त्याचे उपायाचे बीज दडलेलं असते.

परंतु समस्या, संकटे व अडचणी जीवनात निर्माण झाल्या तर माणसांनी नैराश्यात न जाता सकारात्मक विचार करून त्यावर मात करणे गरजेचे आहे.

डॉ. अल्बर्ट एलिस म्हणतात की, आपले विचारच आपल्याला घडवत असतात. ते सकारात्मक आहेत की नकारात्मक यावर आपली त्यापुढील कृती आणि पर्यायाने आपलं आयुष्य ठरत असतं. हे विचार नेमके काय असतात, त्यांना तटस्थपणे पाहता येतं का किंवा कसं पाहिलं पाहिजे हे सांगून अनेकांच्या आयुष्याला सकारात्मक वळण देणारे ठरतात.

माझ्या वाचनात मला जास्त आवडलेला एक परिच्छेद आलेला, तो मी पुढे नमूद करतो.

आयुष्याचा मार्ग हा अनेक वळणे घेतच पुढे जात असतो. ज्यापर्यंत पोहोचायचे असते, ती 'मंझील' अनेकदा एकच नसते. अनेक व बदलत्या ध्येयांच्या क्षितिजाकडे आपण लक्ष केन्द्रित करत असेल तरच आपलीही वळणावरची कसरत तोल न जाऊ देता चालत राहायला हरकत नसते. प्रत्येकाचेच आयुष्य असे वळणवाटांनी भरलेले व भारलेले असते. त्यांच्याकडे मागे वळून पाहिल्यास सुखदु:खाची चढाओढ तर जाणवतेच परंतु त्यापल्याड आपली पावले धावत राहिल्याचे मोलही उमजते. एखाद्या वळणावर काही निसटलेले जाणवते तर तर काही वेळा एखादी झेप पहाड चढून जाणारी ठरली आहे, असे मिश्र संकेत मिळतात. या साऱ्यांचा आढावा घ्यायचा तो इतरांसाठीच नव्हे तर स्वत:साठीही, पुढचा मार्ग आखण्यासाठीही.

Be positive and prepare for worst. Success is in your favour !

# गोष्ट आर्थिक साक्षरतेची

■ ब्रिनल सेल्वीन क्रास्टो, नंदाखाल (परसाव)

अद्वैत हा इयत्ता चौथीमध्ये शिकणारा मुलगा. खेळणे, खाणे, मोबाईल, टीव्ही हे त्याला फारच आवडे. कधी हातात पैसे येतील व आवडीचा खाऊ खाईन असं व्हायचं त्याला. कधी अचानक घरी कोणी नातेवाईक आले की ह्याची फार मज्जा, जाताना ५०-१०० ठरलेलेच ना. पट्ठ्या कधीकधी प्रार्थनाही करे की, आज एक तरी नातेवाईक येऊ दे रे देवा.

कधीकधी आईकडे हट्ट करूनही पैसे मिळवी आणि एकदा का पैसे आले की जवळच्या दुकानात जाऊन ते कधी फस्त करायचे ह्याची घाई त्याला लागे. दुकानदारही ह्याला चांगलाच ओळखून होता. ह्याला हिशोबात काय कळतं? हेही छान ठाऊक होतं. त्यामुळेच लहान समजून दुकानदार ह्याला चांगलंच लुटायचा. भाव तर हा कधी विचारायचा नाही त्यामुळेच त्याचंही छान फावलं होतं.

असंच एकदा आईने ह्याला २० रुपये दिले व एक हिंगाची डबी आणायला सांगितली. हा गेला व २० रुपये देऊन डबी घेतली व घरी आला. डबी आईला दिल्यावर वरचे पैसे विचारले असता हा मात्र कोड्यात पडला. कारण वस्तूचा भाव विचारून खरेदी करणं त्याला ठाऊकच नव्हतं. आता पर्यंत जी नोट असेल ती देऊन हा वस्तू घेई. आईने मात्र खूप राग भरला, ती तातडीने त्याला घेऊन थेट दुकानात पोहोचली. दुकानदारास रागे भरून हिंगाच्या डबीचा भाव विचारला.

दुकानदार म्हणाला, “१५ रुपये बाई.”

“मग तुम्ही अद्वैतला ५ रुपये परत का नाही दिले ?”

“अहो बाई, मी त्याला ५ रुपये देणार तोवर तो निघून गेला.”

आपली बाजू दुकानदाराने मांडली व ५ रुपयांचा कॉइन आईच्या हाती ठेवला. आईला फार राग आला होता परंतु काही ना बोलता ती घरच्या दिशेने चालू लागली. अद्वैतला असं कुणीही कधीही फसवेल ह्याची तिला जाणीव झाली होती परंतु फार काही चर्चा न करता ती घरी पोहोचली. जेवणं आटपली. बाबा घरी आले, आईने घडलेला प्रसंग सांगितला व अद्वैतला बडबडू लागली. बाबा म्हणाले, “त्याला

रागावण्यापेक्षा व्यवहार कसा करायचा हे शिकविणे योग्य आहे. व्यवहार कसा करायचा, पैसे कसे वाचवायचे, बचत हे त्याला शिकविले पाहिजे असं म्हणून बाबांनी विषय संपवला.

आज १ तारीख, सकाळी उठल्यावर बाबांना युक्ती सुचली. त्यांनी ५० रुपये घेतले व अद्वैतच्या हाती टेकवले व म्हणाले, “हा तुझा पॉकेटमनी. आजपासून तू ह्यातूनच खर्च करायचा व कुठे कसे खर्च केले हे सांगायचं.” ठरलं तर मग....

अद्वैतही मागच्या प्रकरणापासून जरा सावध झाला होता. त्यामुळं जरा शहाणपणही आलं होतं. आता दिलेल्या पैशातून भाव विचारून तो खरेदी करू लागला. शिवाय नातेवाईक व इतरांनी खाऊसाठी बक्षीस दिलेले पैसे तो साठवू लागला. पैशाची नोंद करू लागला व हळूहळू त्याला व्यवहार समजू लागला. आता मित्रांवर पैसे उधळायचे नाहीत हे देखील त्याला उमगले. वेळ प्रसंगी आपल्या पिगी बँकमधील पैसे गरजेवेळी वापरू लागला.

आता मात्र आईला त्याचा फार अभिमान वाटू लागला. बाबांनाही त्याच्यावर विश्वास वाटू लागला. आता तर त्याला बँकेत चेक टाकणे, पैसे जमा करणे, पासबुक प्रिंट करणे वगैरे जमायला लागलं. आई त्याच्या बरोबर दुकानात गेली नसती तर अद्वैत कधी आर्थिकदृष्ट्या साक्षर झाला असता का ?

आज काळ बदलला आहे, मुलं ऑनलाईन गेम, कॉम्पुटर , इलेक्ट्रॉनिक गॅजेट वापरण्यात दंग झाली आहेत. जीवनकौशल्य (Lifeskiils) विकसित होणे फार गरजेचे आहे. मुलगा इंजिनीअर झाला आहे परंतु १ किलो टोमॅटो आणायला बाजारात पाठवलं तर त्याला मात्र विचार पडतो. मुलगी फार्मसी मधून पदवीधर आहे परंतु आपले शेजारी कोण हे नक्की माहित नाही. पुढे आयुष्यात किती तरी आव्हानं असणार त्यावेळी आपल्या मुलांकडून आपण काय अपेक्षा धरणार.

प्रत्येक पालकांची ही नैतिक जबाबदारी आहे कि आपली पाल्य आर्थिक दृष्ट्या साक्षर आहेत कि नाही हे तपासून पाहणं. आज समाजातील किती तरी होतकरू तरुण पैशाच्या गैरवापरामुळे जाळ्यात ओढवले गेले आहेत. आपला कॅश inflow, outflow हे बालपणीच कळायला हवं. पैशाची योग्य किंमत, कदर हि जाणीव व्हायलाच हवी. प्रगत समाजाचे हे ही एक लक्षण आहे.

# निमित्त लिहिण्यासाठी की न लिहिण्यासाठी...

■ जॉर्ज फ्रान्सिस पावलीन डाबरे,
गिरीज, वसई. ९८५०९७०५४९

गेली १३ वर्षे सातत्याने "ख्रिस्तायन" ह्या नाताळ विशेषांकाचे प्रकाशन दरवर्षी होत असते. यंदा ह्या विशेषांकाचे चौदावे वर्ष आहे. वास्तविकता: मी या विशेषांकाचा वाचक असलो तरी नियमित वाचक नाही. त्यामुळे या विशेषांकाची पार्श्वभूमी, इतिहास, ध्येय, उद्दिष्टे इत्यादी बाबत मी तसा अनभिज्ञ आहे. तरीसुद्धा "ख्रिस्तायन" ह्या नाताळ विशेषांकाचे आणि ह्याचे प्रकाशन करण्यासाठी मेहनत घेणाऱ्या सर्वांचे विशेषतः विद्यमान संपादक ख्रिस्तोफर रिबेलो ह्यांचे मला खूप कौतुक वाटते. या कौतुकाची विविध कारणे आहेत. अर्थात कौतुक-कारणमीमांसा करणे हा माझ्या लेखाचा विषय नसला तरीही ज्या सातत्याने हा विशेषांक ही मंडळी प्रकाशित करीत आहे ते सातत्य मला प्रकर्षाने प्रेरणादायी वाटते.

वास्तविकता: मी कुणी मोठा वाचक किंवा लेखक नाही. मात्र मला माझ्या वडिलांनी शालेय जीवनापासून वाचन-लेखन करण्याची सवय लावली आहे. तेव्हा शाळेत असताना निबंध लेखनापासून केलेल्या सुरूवातीची परिणीती महाविद्यालयीन वार्षिक अंकात प्रासंगिक लेखन करण्यात झाली. अर्थात पुढे माझा हा प्रासंगिक लेखन प्रवास विविध मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे इत्यादी माध्यमातून चालू राहिला. माझ्या परिचयातील ज्या ज्या मंडळींनी मी केलेल्या लेखन साहित्याचे वाचन केले आहे ते मला लेखक समजतात. पण मला खरेच नम्रपणे कबूल केले पाहिजे की मी जरी थोडंफार लेखन करीत असलो तरी काही लोक मला समजतात त्याप्रमाणे मी लेखक नाही. असो.

अशाच एका समजूतीतून "ख्रिस्तायन" ह्या नाताळ विशेषांकाचे संपादक ख्रिस्तोफर रिबेलो गेली तीन-चार वर्षे मी एक लेख त्यांच्या या विशेषांकासाठी लिहावा म्हणून माझा पाठपुरावा करीत होते. प्रत्येक वर्षी "न लिहिण्यासाठी" मी त्यांना काही ना काही "निमित्ते" देत होतो आणि लिहिण्याचे टाळत होतो. परंतु या वर्षी मी काहीतरी लेखन करायचे ठरवले कारण..........

एखाद्या नियतकालिकाचे किंवा वर्तमानपत्राचे संपादन करण्यासाठी त्या संपादकाकडे विविध गुण-कौशल्ये असावी लागतात. त्यांच्यापैकी एक म्हणजे लेखकांकडून लेखन करवून घेणे. आपल्या "ख्रिस्तायनचे" संपादक ख्रिस्तोफर रिबेलो ह्यांच्याकडे लेखकांकडून लिहून घेण्याची हातोटी आहे. म्हणूनच ते सातत्याने माझ्यासारख्या आळशी लेखकाचा पाठपुरावा करीत राहिले आणि मला लेखणी हातात घेण्याशिवाय पर्याय उरला नाही. अशा प्रकारे संपादक लेखकांना घडवत असतात. असो.

समर्थ रामदासांनी म्हटल्याप्रमाणे

।। दिसामाजी काहीतरी लिहावे, प्रसंगी अखंडीत वाचीत जावे।।

हा कित्ता बालपणापासूनच माझ्या तीर्थरूपांनी मला गिरवायला शिकवले होते. तेथूनच माझ्या वाचन-लेखन प्रवासाला सुरुवात झाली होती. साहित्य निर्मिती हा माझा पूर्णपणे आवडीचा विषय असल्यामुळे मी या बाबतीत कमालीचा स्वच्छंदी आहे. तेव्हा मला कुणी लिहायला सांगितलं की मी न लिहिण्यासाठी विविध निमित्ते देतो. खरे तर लिहिण्यासाठी देखील खूप निमित्ते आहेत.

न लिहिण्यासाठी मी का बरे निमित्ते देत असेन ? खरं तर सकस साहित्य निर्मिती करायची म्हटले तर प्रसव वेदना सहन कराव्या लागतात. वेळ द्यावा लागतो. बैठक मारावी लागते. डोक्याला ताण देऊन विचार करावा लागतो. विषय निवडायला लागतो. सुसुत्रपणे मांडणी करावी लागते..... आणखीन असे खूप काही करावे लागते. आणि मी थोडासा आळशी असल्याने हे सर्व करणे मला त्रासदायक वाटते. म्हणूनच मी काही ना काही निमित्ते देऊन लेखन करण्याचे टाळतो.

जर मी माझा थोडासा आळस झटकला आणि थोडासा वेळ दिला, बैठक मारली तर लिहिण्यासाठी देखील माझ्याकडे खूप निमित्ते आहेत. समर्थ रामदासांनी दररोज काहीतरी लिहिण्यासाठी आणि प्रसंगी अखंडीत वाचण्यासाठी जो उपदेश केला आहे तो केवळ प्रथितयश साहित्यिकांसाठी नसून अखिल मानवजातीला उद्देशून केला आहे. साहित्य निर्मितीचा प्रवास जरी काहीसा वेदनादायी असला तरी तो त्रासदायक नसावा तर आनंददायी असावा. एकादी गर्भवती स्त्री प्रसव वेदना सहन करून बाळाला जन्म देते तेव्हा तिच्या चेहऱ्यावर कमालीचा निर्मिती आनंद असतो. त्याचप्रमाणे प्रत्येक साहित्यिक आपल्या साहित्य निर्मितीचा आनंद अनुभवू शकतो.

मी लिहितो कारण लिहिण्यासाठी माझ्याकडे खूप विषय आहेत. एक माणूस म्हणून माझ्याकडे असलेले विचार, भावना मला व्यक्त करायच्या आहेत म्हणूनदेखील मी लिहितो. मला माझ्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पूरेपूर आस्वाद घ्यायचा आहे म्हणून लिहिण्यासाठी माझ्याकडे असलेली सर्व निमित्ते मला बाहेर काढायची आहेत..... आणि माझा हा वाचन-लेखन प्रवास असाच अखंडपणे चालू ठेवायचा आहे......

# आंघोळ

■ एमेल आल्मेडा, 9270416123

स्नान, आंघोळ हा अनेकांसाठी आवडीचा आणि काहींसाठी कंटाळवाणा विषय असतो. मी कोणत्या गटात येतो हे जाहिररीत्या सांगणे तसे लाजिरवाणे असले तरी मी दिवसातून सकाळ संध्याकाळ दोन वेळा आंघोळ करतो हे मात्र खरे. गार पाण्याने आंघोळ करुन मस्तपैकी ताजेतवाने व्हावे किंवा कढत पाण्याने आंघोळ करुन सगळा शीण घालवावा ही ज्याची त्याची आवड.

थंड पाण्याने आंघोळ करणाऱ्या लोकांविषयी मला फार अप्रूप आणि अभिमान आहे. सांज सकाळ तीन त्रिकाळ वर्षातील सर्व ऋतूत ही मंडळी थंड पाण्याने स्नान करतात. मलाही थंड पाण्याने आंघोळ करणे आवडले असते परंतु प्रयत्न करूनही ते जमत नाही किंबहुना हिंमत होत नाही.

मला गरम कढत पाण्याने आंघोळ करणे खूप आवडते. बादलीभर गरम पाणी शरीरावरून घातले की मन आणि शरीर कसे तरतरुन येते. वर्षभर नेहमी गरम पाणी उपलब्ध व्हावे म्हणून मी घरात सौर बंब, गॅस गिझर आणि इलेक्ट्रिक हिटर सर्व व्यवस्था केली आहे तरीही वर्षात विशेषतः पावसाळ्यात चार दोन प्रसंग असे येतात त्यावेळी हे सगळे पर्याय कुचकामी ठरतात अशावेळी गॅस शेगडीवर पाणी तापवून आंघोळ करावी लागते.

मागे एकदा मी एका प्रबोधनात्मक शिबिरास गेलो होतो. वक्ते एक नावाजलेले ख्रिस्ती धर्मोपदेशक होते. आपल्या भाषणात ते सकाळच्या थंड पाण्याच्या आंघोळीचे महत्व विशद करत होते. थंड पाण्याने आंघोळ केल्याने माणसात सचेतना येते. आपण सगळे जिवंत आहोत म्हणून आपण सगळ्यांनी थंड पाण्याने आंघोळ करावी असे ते सांगत होते. मयत झाल्यानंतर शेवटची आंघोळ ही गरम पाण्याने केली जाते. तुम्ही जिवंत आहेत की मुडदा हे तुम्हीच ठरवा. त्यांच्या ह्या वाक्यामुळे माझा हिरमोड झाला होता. परंतू नेपोलियन बोनापार्ट ह्यांच्या आत्मचरित्रात मी वाचले होते की नेपोलियनला गरम पाण्याने आंघोळ करणे फार आवडत असे. आमच्या दोघातील हे साधर्म्य लक्षात घेऊन मीही नेपोलियनप्रमाणे शूर आहे असा मी माझ्या स्वतःच्या मनाचा समाज केला आणि मुडदा चेतना थिअरीच्या न्यूनगंडातून बाहेर पडलो.

तसे आम्ही शेतकरी. लहानपणी जेव्हा गॅसचे आगमन व्हायचे होते त्या काळातल्या ह्या आठवणी. शाळेत जाऊन आल्यानंतर संध्याकाळी शेतातून घरी येणाऱ्या मोठ्या माणसांसाठी पाणी तापवून ठेवण्याची जबाबदारी आम्हा मुलांवर असे. लाकूडफाटा, काड्याकुड्या ह्याची व्यवस्था प्रत्येकाच्या घरी करुन ठेवलेली असे. त्याकाळी प्रत्येकाच्या घरी दूधदूभते असे. त्यामुळे गाईम्हशीच्या शेणांपासून गोवऱ्यादेखील थापल्या जायच्या. परसदारी दगडांची किंवा विटांची चूल असे. त्यावर पाणी गरम करण्यासाठी मोठा हंडा किवा तपेली असे. चूल धडकली आणि आग धगधगली की मग त्या आगीत चिंचोके, काजूच्या आठ्या, आंब्याचे बाठे, कोंबडीचे अंडे भाजून खाण्यातील मज्जा अधूनमधून आम्ही मुले घेत असू.

आता बंद बाथरूममध्ये शॅम्पू आणि शॉवरजेल लावून कितीही आंघोळी केल्या तरी त्याकाळच्या त्या उघडीवरच्या बिनसाबणाच्या आंघोळीला तोड नाही.

लहानपणापासूनच अधुनमधून आंघोळीचा मला कंटाळा यायचा. आताही ती सवय मध्येच डोकं वर काढते. आपल्यातील बेशिस्त बालक जिवंत असल्याचा निर्वाळा देत मग मी एखाद दिवस आंघोळ टाळतो. ह्या दुर्गुणाचा मला फायदाच होतो इलेक्शन ड्युटीवर गेल्यावर तिथेच वस्तीला राहावे लागले. प्रत्येक ठिकाणी गरम पाण्याची व्यवस्था होतेच असे नाही अशावेळी आंघोळीची गोळी घेण्याची सवय मदतीला धावून येते.

आमच्या ख्रिस्ती धर्मात 'कन्फेशन' हा एक पाप निवेदनाचा प्रकार आहे. आपल्या जीवनातील सर्व चुका, अपराध, प्रमाद, पाप, मोह ह्यांचे क्षालन व्हावे म्हणून जाऊन धर्मगुरुकडे त्याची कबुली द्यायची, प्रायचित्त घ्यायचे आणि परत नवे व्हायचे. मन शुद्धिकरणाचा हा प्रकार निश्चित लाभदायक आहे पण आता आम्ही त्याचा योग्यरित्या वापर करत नाही ही वेगळी गोष्ट आहे.

प्रत्येकजण स्वतःचे तत्वज्ञान जगत असतो. मी माझी स्वतःची जीवनपद्धती विकसित केली आहे. रोज बायको, मुलं, मित्र, सहकारी ह्यांच्यापैकी कोणाला आपल्या मनातील द्वंद्व सांगावे. आपले कन्फेशन करुन घ्यावे.

आता एका नवीन प्रकारच्या आंघोळीची मला सवय लागली आहे, मनाची आंघोळ! वाचनाने मनाचे शुद्धीकरण होते असे मी माझे स्वतःचे मत करून घेतले आहे. वाचन, लेखन, संगीत, वादन, खेळ, हौस, मज्जा हे सगळे मानसिक आंघोळीचेच प्रकार आहेत.

जीवनात कितीही गोंधळ असला तरी एक आंघोळ दिवाळीच्या अभ्यंग स्नानासारखे तुम्हाला नवीन करतील हे निश्चित.

आणि हो पार्टी करुन आलात, हॅंग ओव्हर असेल तर थंडगार पाण्याचा शॉवर घ्यावा, लगेच उतरते सगळी मस्ती. असे लोक म्हणतात, आपल्याला तर सवय नाही.

# योहानाचे धैर्य

■ फा. असिस रॉड्रिग्ज (जेज्वीट), माणिकपूर चर्च

योहान बॅप्टिस्टने येशूसाठी मार्ग तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. योहान हा एक धाडसी माणूस होता, ज्याने त्याच्या काळातील आध्यात्मिक आणि राजकीय नेत्यांना आव्हान दिले होते.

धैर्य ही एक दुर्मिळ भावना आहे. जगात सगळेच धैर्यवान नसतात. या ग्रहावरील बहुतेक लोकांच्या जीवनावर भीतीचे वर्चस्व आहे, केवळ काही लोकांच्या जीवनावर धैर्याचे वर्चस्व आहे. धैर्यामध्ये जोखमीचा एक अतिशय मजबूत घटक असतो. जीवाला धोका स्वीकारणे हा धैर्याचा अविभाज्य भाग आहे. अनेकदा जोपर्यंत जीवाला धोका नसतो तोपर्यंत माणूस धैर्यवान असतो. जेव्हा अस्तित्व धोक्यात येते तेव्हा धैर्य नाहीसे होते. इतिहासात फार कमी लोकांनी मृत्यूला सामोरे जाताना धैर्य दाखवले आहे.

बायबलमध्ये, आपण अनेक संदेष्टे पाहतो ज्यांनी अतुलनीय धैर्य दाखवले, त्यापैकी एक म्हणजे जॉन द बॅप्टिस्ट. धैर्य म्हणजे केवळ भीतीचा अभाव नसून भीतीचा सामना करण्याचा एक मार्ग आहे. भीतीदायक परिस्थितीत आत्मविश्वास असणे हे धाडसी व्यक्तीचे वैशिष्ट्य आहे.

जॉन द बॅप्टिस्टने त्याच्या काळातील धार्मिक शासकांचा धैर्याने सामना केला. जॉन द बॅप्टिस्टसाठी, त्याचे ध्येय स्पष्ट होते. त्याने स्वतःला मसिहाचा आवाज असल्याचे घोषित केले. देवाचा आवाज होण्याचा अर्थ असा आहे की त्याला सत्य घोषित करावे लागेल, जे करण्यासाठी, एखाद्याला स्वतःचा जीव देखील धोक्यात घालावा लागतो. सत्य मृत्यूची मागणी करते. त्याच्याठायी तुरुंगाची किंवा मृत्यूची भीती नव्हती.

जॉन द बॅप्टिस्टने हेरोदचा सामना केला, ज्याची जीवनशैली, त्याच्या स्वतःच्या जीवनशैलीशी विरोधाभासी होती. एक राजासाठी जगला तर दुसरा राजाप्रमाणे जगला. एक तपस्वी होता, दुसरा सुखवादी होता. एक परमेश्वराच्या भीतीने जगत होता आणि दुसऱ्याच्या भीतीने सर्व जगत होते. एकाने देवाच्या राज्याचा प्रचार केला आणि

दुसऱ्याने स्वतःचे राज्य उभारले. योहानाला हेरोदची भीती वाटत नव्हती, पण हेरोद योहानाला घाबरत होता.

हेरोद भीतीने राज्य करत होता आणि भीतीने जगत होता. नागरिकांच्या मनातील भीती हेच त्याचे बलस्थान होते. हत्या, निष्पाप मुलांना किंवा तरुणांना फाशीवर चढवणे ही त्याच्या राज्यात एक सामान्य घटना होती. हेरोदला सामोरे जाणे म्हणजे मृत्यूशी सामना करणे होय. जॉन द बॅप्टिस्टने त्याच्या जीवाला धोका माहीत असूनही जाणीवपूर्वक घेतलेला हा निर्णय होता. त्याचे धाडस त्याच्या ध्येयाशी निगडीत होते. जॉन द बॅप्टिस्टचा हेरोदशी सामना नाथान आणि दाविद यांच्यातील एका चकमकीची आठवण करून देतो. (२ शमुवेल १२:७)

जॉन द बॅप्टिस्टच्या हृदयात भीतीचा अजिबात भाव नव्हता. त्याची हिम्मत कुठून आली? त्याच्या धैर्याचे मूळ काय होते? जर आपण संदेष्टांच्या जीवनावर नजर टाकली तर आपण स्पष्टपणे पाहू शकतो की त्यांचे धैर्य, ते ज्या परमेश्वराचे प्रतिनिधित्व करत होते, किंवा ज्याच्या नावाने ते बोलत होते त्या परमेश्वरापासून होते. त्यामुळे शौर्याचा उगम लष्करी शक्तीपेक्षा दैवी शक्ती होता. जॉन बॅप्टिस्टच्या धैर्याचा स्रोत देव होता.

जॉन द बॅप्टिस्टच्या धैर्याचे रहस्य हातात धरलेल्या शस्त्राऐवजी त्याने धरलेल्या देवाच्या हातात आहे. बचावासाठी तयार असलेल्या, शस्त्राने सज्ज असलेल्या, पीटरचे धैर्य, हे त्याचे नव्हते, तर त्याचे धैर्य हे शस्त्रविरहित येशूचे धैर्य होते. भ्याड व्यक्ती शस्त्र वापरतो; बलवान त्यांचे धैर्य, शस्त्र म्हणून वापरतात.

आपण पाहिले आहे शेतकऱ्यांना आपल्या काळातील बलाढ्य हेरोदाच्या विरोधात धैर्याने आंदोलन करताना. आपण पाहिले फा. स्टॅन आणि इतर सामाजिक कार्यकर्त्यांना बुलडोझर व्यवस्थेविरुद्ध धैर्याने लढा देताना. या साहसी व्यक्तिमत्त्वांना आपला आदर्श बनवू या.

सत्य बोलणे, सत्य ऐकणे, सत्य घोषित करणे आणि सत्याच्या बाजूने उभे राहणे यासाठी आपण जॉन द बॅप्टिस्टसारखे धाडसी आणि निर्भय आहोत का?

# वय आणि वलय

■ डॉ. नेन्सी विन्सेंट डिमेलो, गास, वसई.

"काय ग, किती बारीक झाली आहेस ? खूप मेनटेन ठेवले आहेस स्वतःला... तू आणि तुझी मुलगी बहिणी बहिणी दिसतात." ही स्तुती ऐकून तिचा आनंद गगनात मावेनासा झाला. गेल्या अनेक महिन्यांचा तिचा डायट प्लान आज यशस्वी झाला होता.

दोन मुलांच्या जन्मानंतर घर, संसार, नोकरी, मुलांचा अभ्यास इ. गोष्टी सांभाळता सांभाळता तिने स्वतःकडे कधी लक्ष दिले नाही. एव्हाना तिला तितका वेळही नव्हता. त्यामुळे तिची शारीरिक जडणघडण, राहणीमान हळूहळू बदलत गेले. स्वतःकडे बघण्यास तिला जराही उसंत मिळत नव्हती. हातात घेतलेले काम चालू असताना डोकं पुढच्या कामाचे प्लॅनिग करत असे. व्यायाम, मेकअप, हेअर स्टाइल, फॅशनेबल कपडे घालणे हे सगळं ती विसरली होती. आदर्श ग्रुहिणी, आदर्श पत्नी, आदर्श सुन, आदर्श आई बनण्यासाठी तिने दिवस रात्री एक केल्या. ह्या सर्वात तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्व कधी विरघळून गेले हे तिलाही कळले नव्हते.

पण कालांतराने "जरा स्वतःकडे लक्ष दे. काय पोतेरे करून ठेवले आहेस स्वतःचे. नवरा काही बोलत नाही का तुझा अवतार पाहून ?" असे ताशेरे तिला मिळू लागले. अन् अचानक ती सर्वांना 'गबाळी, मागासलेली' भासू लागली. तिचे साधेपण तिला खुपायला लागले. तिला इतर बायका सुंदर वाटायला लागल्या. ती स्वतःची प्रत्येक स्त्रीशी तुलना करू लागली. ती या सगळ्या गोंधळात आपली कर्तव्ये यथोचित पार पाडत असे पण आतून ती स्वतःच वाळवी बनुन स्वतःला पोखरत चालली होती.

आजच्या या मॉर्डन जगात स्मार्ट दिसण्याचा एक ताण प्रत्येक स्त्रीवर आहे. बाजारात अनेक चकचकीत उत्पादने आलेली आहेत, जाहिरातींचा भडिमार सतत डोळ्यांवर होत असतो. स्मार्ट राहणे ही काळाची गरज झालीय. डाएट, जिम वगैरे करून स्वतःला जपणाऱ्या स्त्रीला लोक नटवी म्हणतात तर सकाळपासून रात्रीपर्यंत घरासाठी राबणाऱ्या गृहस्वामिनीला काकूबाई म्हणतात.

सरत जाणारे वय व्यक्तीभोवती एक प्रतिभासंपन्न वलय निर्माण करते. हे वलय तेज, परिपक्वता, प्रसन्नता निर्माण करते परिणामी इतरांना त्यापासून प्रेरणा मिळते. ह्यासाठी कृत्रिम बाबींची काही गरज नसते. पडद्यावरील कलाकारांचे तरुण दिसणे आपल्याला विचारात पाडते. आपण आपल्याच वयाच्या त्या कलाकारांशी स्वतःची तुलना करून त्यांच्याशी स्पर्धा सुरू करतो. दैनंदिन गरजा भागवण्यासाठी घड्याळाच्या काट्यावर चालणारी जीवनचर्या आपण जगत आहोत. त्यातून शरीरातील कमी होणारे कॅलशियम, हार्मोनल चेंजेस अन् स्वतःचे आणि प्रियजणांचे बदलते मूडस आणि उशिराने स्वतःबद्दल झालेली जाणीव ह्यांमुळे आपण स्मार्ट फिट दिसण्यासाठी शॉर्टकट अवलंबितो.

वयावर आपण कसे मात करतो ? कसे दिसतो ? कसे राहतो ? ह्यावरून आपल्या अस्तित्वाची सार्थकता ठरते का ? मला फिट राहायचं आहे असे मनात आले की एक-दोन महिने व्यायाम, आहार इ. बाबींवर मेहनत घेऊन नंतर आयुष्यभर मजा करावी अशी ही प्रक्रिया नाही. ती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आजच्या काळात फिट दिसण्यापेक्षा फिट असणं महत्त्वाचं आहे. वेगवेगळे आजार, दुखणे, व्याधी यापासून शरीराला मुक्त ठेवणे, स्वतःबरोबर इतरांचे जीवन आनंदी करणे ह्या बाबीना प्राधान्यक्रम देणे गरजेचे आहे.

परंतु एखाद्या मर्यादेपलीकडे जाऊन स्लिम ट्रिम होण्यासाठी विविध औषधाचा शरीरावर भडीमार करणे, व्यायामाचा अतिरेक करणे, सतत उपवास करणे चुकीचे आहे. क्षणभंगुर आयुष्य साधे सोप असावे अशी सर्वांची अपेक्षा असते. मोजमापाच्या साच्यात तंतोतंत बसण्यास आयुष्याची सार्थकता नाही हे व्यक्तीला लवकर कळत नाही. अयोग्य व अपुरा आहार, सतत दिर्घकालीन उपवास, विविध महागडी औषध ह्या मार्गाने त्वरित आकर्षक शरीररचना प्राप्त करून घेताना अनेक आजार, दुखणी उशाशी येवून बसतात.

याउलट काही जण यात उगाच स्वतःच्या वयाला मारून चांगलं दिसलच पाहिजे वगैरे भानगडीत पडत नाहीत. वयानुसार बदल घडणारच, प्रत्येकजण थोडीच विग लावतो, प्रत्येक जण थोडीच येता जाता मेकअप करतो, प्रत्येक जण थोडीच केसांना कलप लावतो, प्रत्येकाला थोडीच प्रसिद्धीची हाव असते. छोटी बालिका असो की वयस्कर आजी, दोघीही दातांशिवाय हसताना सुंदर दिसतात. गुलझार म्हणतात "जैसे जैसे उम्र बढ़ती हैं, दिन प्रतिदिन इंसान रईस बनता जाता है. चांदी बालों में, सोना दांतो में, मोती आंखों में, शक्कर खून में और महंगे पत्थर किडनी में पाए जाते हैं...!!

# अनिवासी वसईकर कुपारी

■ सॅबी परेरा (sabypereira@gmail.com)

मानवी इतिहासात जगण्यासाठी, रोजगारासाठी आणि नवे काही शोधण्यासाठी तसेच युद्धे, लढाया, दंगली आणि वांशिक अत्याचार इत्यादी कारणांमुळे स्थलांतरे होत आलेली आहेत. माणसाच्या या स्थलांतराने जगाची दशा आणि दिशा सतत बदलत राहिली आहे आणि यापुढेही बदलत राहणार आहे. वसईच्या पश्चिम पट्ट्यात (म्हणजे विरार, नालासोपारा, वसई आणि नायगाव या रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेला) राहणाऱ्या सामवेदी (कुपारी) आणि वाडवळ ख्रिश्चन समाजातील लोकांनी मागील पन्नास साथ वर्षात जे परदेशात स्थलांतर केले ते मात्र प्रामुख्याने रोजगारासाठीच. मूळचा "ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असो द्यावे समाधान" असा अल्पसंतुष्ट स्वभाव आणि त्यावर पोर्तुगीजांच्या सुशेगाद स्वभावाच्या राजवटीचा पडलेला प्रभाव यामुळे सत्तरच्या दशकाआधी वसईतून फार कुणी मोठ्या संख्येने परदेशी जाऊन स्थायिक झाल्याची उदाहरणे नाहीत. सत्तर-ऐशीच्या दशकात वसईतील तरुण नोकरीसाठी आखाती देशात जाऊ लागले आणि १९९०च्या दशकात जागतिकीकरण आणि उदारीकरणाचे पर्व सुरू झाल्यानंतर आखातासोबत, युरोप, अमेरिकेत स्थलांतर करण्याला अधिक वेग आला. उच्च शिक्षण आणि रोजगार ही दोनच या स्थलांतरांमागची प्रमुख कारणे होत.

स्थलांतरे ही स्वेच्छेने होतात असे आपल्याला भासत असले तरी बऱ्याचदा ती लादलेली असतात. आपण ज्या समाजात, देशात राहतो तेथील आणि इतर प्रगत देशांतील आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थिती ह्याची तुलना करून, आपल्या देशात राहण्यापेक्षा इतर देशात गेल्यास आपली आर्थिक प्रगती अधिक जोमात होईल, आपल्याला अधिक संपन्न सामाजिक जीवन अनुभवता येईल, उत्तम प्रतीच्या शैक्षणिक, वैद्यकीय आणि पायाभूत सुविधा मिळतील, चांगलं वैयक्तिक जीवनमान जगता येईल, अधिक कार्यक्षम आणि आश्वासक राज्यकर्ते लाभतील अशी जेव्हा लोकांना आशा वाटते तेव्हाच ते

स्थलांतराला उद्युक्त होतात. जेव्हा एखादी व्यक्ती एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतराचा निर्णय घेते तेव्हा आपल्या देशातील अभावांपासून दूर जाऊन जेथे आपल्या कर्तृत्वाला अधिक वाव मिळेल अशा देशात जाण्याचा त्या व्यक्तीचा कल असतो.

वसई-विरार मधील पश्चिम पट्ट्यात भुईगाव ते अर्नाळा या भागात कुपारी नावाने ओळखल्या जाणाऱ्या ख्रिश्चन समाजाची साधारण तीसेक हजार लोकांची वस्ती आहे. या समाजातील अनेक मूलनिवासी वसईकर आज कामानिमित्ताने परदेशात आपल्या कुटुंबासहित तात्पुरते किंवा कायमस्वरूपी स्थायिक झालेले आहेत. वसईतील कुपारी समाजातील लोकांनी परदेशी केलेल्या स्थलांतराचे तीन प्रमुख टप्पे सांगता येतील.

**१) निव्वळ पोटासाठी:**

साठ-सत्तरच्या दशकात वसईतील कुपारी समाज हा आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे शेती-बागायती आणि दूधदुभते यांवर अवलंबून होता. अल्पभूधारक असल्याने शेती-बागायतीचे उत्पन्न मर्यादित, घरची गरिबीची परिस्थिती, उच्च शिक्षणाची सहज उपलब्धता आणि ऐपत नसल्याने शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या पहिल्या-दुसऱ्या पिढीतील काहींनी शिक्षकी पेशा स्वीकारला तर काही आयटीआय करून कुशल किंवा अर्धकुशल कामगार बनले. या कामगार वर्गापैकी थोडक्या नशीबवान लोकांना चांगल्या कंपन्यात नोकरी मिळाली तर इतरांच्या नशिबात भायंदर, मालाड, गोरेगाव यासारख्या ठिकाणी छोट्यामोठ्या कारखान्यातील अल्प वेतनातील पिळवणूक आली. रोजगाराची शाश्वती नाही, सामजिक सुरक्षा नाही, शेतीच्या आणि नोकरीच्या उत्पन्नात कुटुंबाचा खर्च भागत नाही, चांगलं घर नाही, विरार, नालासोपारा आणि वसई स्टेशनवरून पाच-सात किलोमीटरवर असलेल्या आपल्या गावात येण्यासाठी धड रस्ते नाहीत, वाहन नाही, विजेची सोय नाही. ग्रामपंचायत आणि सरकारकडे या सर्वांवर उपाययोजना नाहीत अशा निराशाजनक परिस्थितीत, ‘इतकं राबायचंच आहे तर त्याबदल्यात चांगला पैसा का मिळवू नये?’ या विचाराने या कामगारांनी तेव्हा नुकताच खुला झालेला आखाती देशाचा पर्याय निवडला. केवळ, आपल्याला आपल्या कष्टाचा सन्मानजनक मोबदला मिळावा आणि कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळावं या एकमेव

उद्देशाने या पिढीतील तरुणांनी आखाता-तील विविध उद्योगात आणि विशेषतः इमारत बांधणी उद्योगात नोकऱ्या मिळविल्या. आखातात नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देऊन मुंबईतील एजेंट लोकांनी कित्येकांची आर्थिक फसवणूकही केली. आपल्या कुटुंबापासून पाच-पाच, दहा-दहा वर्षे दूर राहून, उन्हातान्हात राबून त्यांनी वसईत आपल्या राहण्यासाठी पक्के घर, मुलाबाळांचे शिक्षण आणि कौटुंबिक गरजा पुरविल्या. अगदी सुरुवातीपासूनच, एक दिवस आपल्याला आपल्या मायदेशी, आपल्या मूळ गावी परतायचे आहे हे पक्के डोक्यात भिनलेले असल्याने, कुटुंब स्थिरस्थावर झाल्यावर आखातात गेलेले हे अनिवासी वसईकर, वसईत परत येऊन आपापल्या मगदुराप्रमाणे आणि ऐपतीप्रमाणे छोटे-मोठे व्यवसाय, नोकरी किंवा शेती करू लागले.

कुपारी समाजातील अत्यंत गरिबीत जीवन कंठणाऱ्या कुटुंबांना या आखाती नोकरीचे इंजिन जोडल्यानंतर या समाजाचा चेहरामोहरा बदलू लागला. आखातात काम करणाऱ्या अल्पशिक्षित तरुणांनाही लग्नासाठी सुशिक्षित, नोकरी करणाऱ्या मुली सांगून येऊ लागल्या. गावातील पोराबाळांच्या अंगावर इंपोर्टेड कपडे दिसू लागले, जुन्या पडक्या घरांच्या जागी बंगले उभे राहू लागले, स्टेशन परिसरात स्थानिक भूमिपुत्रांची दुकाने / व्यवसाय उभे राहिले, लग्न समारंभ धुमधडाक्यात होऊ लागले. आखाताच्या परिसस्पर्शामुळे कुपारी समाजाने एक प्रकारे कात टाकली.

### २) पुरेसे धन कमवून मायदेशी परत येण्यासाठी

नव्वदच्या दशकात, चर्च संचालित शाळांच्या कृपेने वसईतील तरुण वर्ग जवळजवळ शंभर टक्के साक्षर होऊन त्यातील कित्येक उच्चशिक्षण घेते झाले. जागतिकीकरणाच्या रेट्यात, इंजिनियरिंगच्या विविध शाखांत विशेषतः कम्प्युटर आणि सॉफ्टवेअर इंजिनियरिंग शिकलेल्या वसईतील या बुद्धिसंपदा आणि श्रम-संपदेला युरोप-अमेरिकेतील आघाडीच्या कंपन्या आकर्षित करू लागल्या. नुकतीच शिक्षण संपवून बाहेर पडलेली ही पिढी मागील पिढीपेक्षा अधिक प्रॅक्टिकल असली तरी त्यांची आपल्या गावाशी, समाजाशी, भाषेशी, संस्कृतीशी नाळ घट्ट जोडलेली होती. त्यामुळे साधारणतः वयाच्या तिशीपर्यंत परदेशी राहून आपल्या शिक्षण-कौशल्याद्वारे चांगला पैसा कमवायचा आणि वयाच्या तिशीच्या आसपास मायदेशी परत येऊन संसार थाटून, इथेच नोकरी-धंद्यात सेटल व्हायचे

असा त्यांचा कल होता आणि त्यातील बरेचसे लोक आठदहा वर्षे परदेशात काढून, आपल्या मातीच्या ओढीने वसईत परतले.

ह्याच सुमारास हॉटेल मॅनेजमेंट किंवा काही तांत्रिक कोर्स केलेले तरुण बोटींवर नोकरीसाठी जाऊ लागले. कामानिमित्त परदेशी भूमीवर राहण्यापेक्षा सुमुद्रात बोटीवर राहणे हे अधिक कष्टाचे आणि मनाच्या खंबीरपणाची परीक्षा घेणारे असले तरी त्या व्यवसायासाठी भारतात मिळत असलेल्या मोबदल्याच्या मानाने बोटीवर मिळत असलेला पैसा कित्येक पट जास्त असल्याने वसईच्या तरुणाईला या बोटी-वरील जीवनाने आकर्षून घेतले. ठराविक महिन्यांनी सुट्टीसाठी घरी यायला मिळत असल्याने या दर्यावर्दींचा आपल्या मातीशी संपर्क टिकून राहतो. ही बाबदेखील समाजप्रिय असलेल्या वसईकर तरुणांच्या पथ्थ्यावर पडली. असं म्हणतात की, आज वसईचा क्रू मेंबर नसलेली बोट समुद्रात सापडणे मुश्किल आहे. इतके हे बोटीवरील जीवन वसईच्या तरुणांना मानवले आहे.

**३) परदेशी स्थायिक होण्यासाठी:**

आताची पिढी म्हणजे ज्याला आपण मिलेनियल जनरेशन म्हणतो त्या पिढीला युरोप, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड यांसारख्या देशातील उत्तम प्रतीच्या उच्च शिक्षणाच्या, वैद्यकीय आणि पायाभूत सुविधा, शिक्षणासोबत कमविता येण्याचा पर्याय, नोकरी-धंद्याच्या संधी आणि त्यातील लवचिकतेमुळे मिळणारं उत्तम वैयक्तिक जीवनमान (Work Life Balance) या बाबींचं आकर्षण आहे. शक्य झाल्यास त्याच देशाचे नागरिक होऊन तिथेच आयुष्य व्यतीत करण्याचा त्यांचा इरादा आहे.

जागतिकीकरण आणि उदारीकरणानंतर जगभरात ज्या प्रगतीच्या संधी उपलब्ध झाल्या त्याचा फायदा उठवित परदेशी जाऊन आपला उत्कर्ष करून घेणे ही नैसर्गिक मानवी प्रेरणा असल्याने वसईतील अनेकांनी सातासमुद्रापार जाऊन आपले नशीब अजमावून पाहिले. आजच्या घडीला वसईच्या ख्रिश्चन समाजातील दर तिसऱ्या कुटुंबातील एक सदस्य शिक्षण किंवा रोजगारासाठी परदेशी स्थायिक झालेला आढळून येईल. असे असले तरी या अनिवासी वसईकर ख्रिश्चनांनी आपल्या मायभूमीशी आणि आपल्या संस्कृतीशी असलेले आपले नाते जपण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे, करीत आहेत.

परदेशी स्थायिक झालेले वसईकर ख्रिश्चन दरवर्षी नेमाने ख्रिसमसच्या सुट्टी-साठी वसईला येतात. त्यांच्या नात्यागोत्यातील लग्नकार्ये, साखरपुडे, नवीन घरांचे आशीर्वादविधी इत्यादी शुभकार्ये याच काळात योजिले जातात. याच काळात आयोजित केल्या जात असलेल्या कुपारी महोत्सवात मांडलेले पारंपरिक खाद्य-पदार्थ, कपडे, जुन्या काळातील जनजीवनाशी संबंधित देखावे, अस्तंगत होत असलेल्या घरगुती आणि शेतीविषयक वस्तूंचे प्रदर्शन इत्यादीद्वारे परदेशस्थ वसईकरांच्या पुढील पिढीला आपल्या नातेवाईकांची, गावकऱ्यांची, समाजाची, रितीभातींची आणि एकंदर संस्कृतीची ओळख होते. वसईहून पुन्हा आपल्या देशात जाताना ह्या कुटुंबाच्या बॅगा वसईतील कुटुंबाने दिलेल्या पारंपरिक मसाल्यांनी, सुक्या मासळीने, पारंपरिक पक्वान्नांनी, घरगुती लोणचे, सुकेळी, चिकन भुजिंग, गावठी वाल पापडीचे गोळे (दाणे) सारख्या वसईच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांनी भरलेल्या असतात. बॅगेत भरून नेलेले हे वसईचे खाद्यपदार्थ आपल्या गावच्या आठवणींच्या स्मरणरंजनासह वर्षभर पुरवून पुरवून खाल्ले जातात आणि परदेशातच जन्म झालेल्या नवीन पिढीपर्यंत वसईची कुपारी खाद्यसंस्कृती झिरपत राहते.

भाषा ही संस्कृतीची वाहक असल्याने संस्कृती टिकवायची असेल रोजच्या व्यवहारात ती भाषा वापरत राहणे आवश्यक आहे. व्यवहारात उपयोगी पडणाऱ्या विविध भाषा मुलांना घराबाहेर आणि शाळा-कॉलेजात शिकता येतील. पण आपली बोलीभाषा त्यांना केवळ आपणच शिकवू शकतो याची सार्थ जाणीव बहुसंख्य परदेशस्थ वसईकरांना आहे. वसईच्या कुपारी समाजाची कादोडी (सामवेदी) बोली-भाषा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावी म्हणून घरात आपापसात बोलताना आणि आपल्या मुलांशी बोलताना हे परदेशस्थ कुटुंब सामवेदी बोलीभाषा म्हणजेच कादोडीचा वापर करतात. वसईत होणाऱ्या कादोडी भाषेतील सांस्कृतिक कार्यक्रमांचे, लोकगीतांचे ऑडिओ-व्हिडीओ परदेशस्थ वसईकरांकडून सहकुटुंब पाहिले जातात. सोशल मीडियावर लिहिल्या जाणाऱ्या कादोडी भाषेतील पोस्ट्स आणि प्रसंगोपात प्रकाशित होणाऱ्या बोलीभाषेतील ऑनलाईन नियतकालिकांचे सहकुटुंब सार्वजनिक वाचन केले जाते.

वसईकर कुपारी समाज हा हाडाचा शेतकरी असल्याने परदेशी स्थायिक झालेले कित्येक जण आपल्या परसदारी छोट्या-मोठ्या फळभाज्या, फुलभाज्या पिकवून आपल्यातल्या शेतकरीपणाला खतपाणी घालत असतात. विविध

सणसमारंभा निमित्त परदेशात होणाऱ्या स्नेह-संमेलनात कादोडी बोलीभाषेत कार्यक्रम सादर करून, कुपारी वेशभूषा करून, जेवणासाठी वसईचे पारंपरिक पदार्थ बनवून अनेक NRV (Non-Resident Vasaikars) आपल्यातील वसईकर डीएनए जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. सोशल मीडियाच्या आगमनामुळे विविध ग्रुपवर सक्रिय राहून हे NRV आपल्या मातृभूमीच्या संपर्कात राहतात. विविध विषयावर जाहीरपणे व्यक्त होत राहतात. इथल्या लोकांच्या सुखात व्हर्च्युअली सामील होतात. वसईत आणि भारतात येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी आर्थिक मदतीचा हात पुढे करतात.

"वसुधैव कुटुंबकम" या सनातन धार्मिक मुल्याप्रमाणे संपूर्ण जगालाच आपलं कुटुंब मानून परदेशी गेलेल्या बांधवांबद्दल अभिमान बाळगायचा की भारता-तील संसाधने वापरून मोठे झालेले लोक परदेशी गेल्यामुळे (Brain Drain) आपल्या मायभूमीच्या होणाऱ्या नुकसानाबद्दल खेद करावा हे ज्याच्या त्याच्या विचार करण्याच्या पद्धतीवर अवलंबून असले तरी यातील कुणीही आपल्या मातृभूमीला विसरलेले नाहीत ही बाब आश्वासक आहे. आपल्या गावाची, आपल्या देशाच्या मातीची ओढ आणि ओल त्यांनी आपल्या काळजात जपली आहे. आपली माणसं जगाच्या पाठीवर कुठेही गेली तरी सोबत आपली संस्कृती घेऊन जातात. तिथल्या समाज जीवनात समरस झाल्यावरही आपल्या संस्कृतीचं वेगळेपण जपतात. संस्कृतीच्या विविध घटकांतील जे जे शाश्वत ते ते काळाच्या कसोटीवर टिकेल आणि जे तकलादू ते काळाच्या ओघात नष्ट होईल हा निसर्गाचा न्याय आहे. त्यामुळे एखादी व्यक्ती आपला गाव, आपली माती, आपला देश सोडून परदेशी जाते तेव्हा आपल्या संस्कृतीचा क्षय होत नसून तिची एक नवी शाखा उघडत असते असा सकारात्मक विचार करणेच समयोचित ठरेल.

# ‘रॉ’ची दहशत....!

■ **जॉन कोलासो, वसई**

कॅनडा आणि भारत यांच्यातील राजकीय संबंध सध्या विकोपाला गेले आहेत. कॅनडामधून भारताविरोधात करावाया करणाऱ्या ‘खलिस्तानवाद्यांना’ पाठिंबा मिळतो, त्यांना तेथे उदारहस्ते राजकीय आश्रय मिळतो. हे सर्व उघडपणे चालू आहे. त्यामुळे उभय देशांतील राजकीय शीतयुद्ध अनेक वर्षांपासून चालू होते. परंतु, आता ते विकोपास गेले आहेत, त्याचे कारण कॅनडामधील हरदीप सिंग निज्जर या खलिस्तानवाद्याची झालेली हत्या आणि ही हत्या भारतीय गुप्तचर संघटना ‘रॉ’मार्फत केल्याचा खुद्द कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांचा जाहीर आरोप!

याप्रकरणी अमेरिका हा आपला मित्र देश असूनही तो कॅनडाचे समर्थन करीत आहे. कारण अमेरिकेतही गुरुपतवंतसिंग पन्नू या खलिस्तानवाद्याच्या खुनाचा प्रयत्न झाला होता व त्यामागे भारताची ‘रॉ’ हीच गुप्तचर संघटना असल्याचा आरोप अमेरिकन सरकारही करीत आहे. या दोन घटनांसंबंधी वृत्तपत्रांत रोजच सविस्तर बातम्या प्रसिद्ध होत आहेत, परिणामी ‘रॉ’ संघटना चर्चेत आहे. त्यामुळे साहजिकच या गुप्तचर संघटनेचे काम कसे चालते याबद्दल अनेकांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली असणार.

कारण ‘युद्धस्य कथे’प्रमाणे हेरगिरीच्या रहस्यमय कथाही वाचकांना आता आवडतात. परंतु आपल्या देशातील हेरकथा गोपनीयतेच्या नियमामुळे स्पष्ट उघड करता येत नाहीत... तरीही अलीकडे इंग्रजीमध्ये अनेक पुस्तके उपलब्ध होऊ लागली आहेत. मात्र मराठीत अशा पुस्तकांची उणीव प्रकर्षाने भासते. ही उणीव भरून काढण्याचा स्तुत्य प्रयत्न पत्रकार श्री. रवी आमले यांनी ‘रॉ... भारतीय गुप्तचर संस्थेची गूढगाथा’ या पुस्तकाच्या रूपाने केला आहे.

अमेरिकेची सीआयए, रशियाची केजीबी, इस्त्रायलची मोसाद या जगात सर्वश्रेष्ठ गुप्तचर संघटना समजल्या जातात आणि त्यांच्या तोडीस तोड भारताची ‘रॉ’ ही संघटना आहे, हे आता अमेरिका आणि कॅनडासारख्या देशांनाही समजून चुकले आहे.

या सर्व संघटना आपापल्या देशाच्या हितासाठी परदेशांत हेरगिरी करण्याचे काम चोखपणे करीत असतात. पूर्वी भारत आणि सोव्हिएत युनियन यांच्यात मैत्री होती. त्यामुळे अमेरिकेच्या सीआयएची भारतातील हेरगिरी सर्वत्र दिसून येत असे. त्यावेळी पंतप्रधानपदी असलेल्या श्रीमती इंदिरा गांधी तर देशातील अनेक दुर्घटनांना सीआयएला जबाबदार धरत असत... त्या वारंवार 'परकीय हाता'चा उल्लेख ते संसदेत व संसदेच्या बाहेर करीत असत. परिणामी स्वतंत्र पक्षाचे खासदार पिलू मोदी यांनी तर संसदेत प्रवेश करताना आपल्या शर्टावर 'सीआयएचा हस्तक' म्हणून बिल्ला लावून पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या आरोपांची थट्टा करण्याचा प्रयत्न केला होता.

मित्र देश असला तरीही सोव्हिएत रशिया केजीबीमार्फत भारतात हेरगिरी करीत असे, परंतु, या यंत्रणेवर त्यावर उघड आरोप त्यावेळी करण्यात येत नसे.

हेरगिरी ही मैत्री व शांततेच्या काळातही करायची असते. या काळात मिळविलेल्या मित्र व शत्रू राष्ट्रांची माहिती युद्धजन्य परिस्थितीत उपयोगी पडत असते. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राचे गुप्तहेर हे आपल्या मित्र किंवा शत्रू राष्ट्रांत हेरगिरी करण्याचे काम नित्यनियमाने करीत असतात.

स्वातंत्र्य मिळाल्यावर भारतात आयबी म्हणचे इंटलिजेंट ब्युरो या नावाने गुप्तहेर संघटना स्थापन करण्यात आली. ही संघटना देशातअंतर्गत छोट्यामोठ्या घडामोडींची माहिती सरकारला पुरविते. या संघटनेस कोणासही अटक करण्याचे अधिकार नाहीत. केवळ माहिती काढणे आणि ती सरकारला पुरविणे. आपल्या हाती आलेल्या माहितीचा वापर किंवा त्या आधारे कारवाई कशी व कधी करायची यासंबंधी निर्णय सरकार घेत असते.

तथापि, स्वातंत्र्यानंतर १९६२ साली भारतास चीनच्या अतिक्रमणास तोंड द्यावे लागले. चिनी आक्रमणाच्या तयारीबाबत भारतास कोणतीच पूर्वकल्पना नव्हती. पंतप्रधान पंडित नेहरू चीनसोबत 'भाई भाई'च्या भ्रमात वावरत असताना चीन भारताचा अरुणाचल प्रदेश गिळंकृत करण्याची जय्यत तयारी करीत होता. या युद्धात आपण सपाटून मार खाल्ल्यावर लक्षात आले की, परदेशांतील माहिती काढण्यासाठी आपल्यालाही एक स्वतंत्र गुप्तहेर संघटना बांधणे आवश्यक आहे. अशी संघटना उभारण्यास वेळ लागतो. दरम्यान पाकिस्तानने भारतावर १९६५ साली युद्ध लादले. या युद्धात सोव्हिएत रशियाने मध्यस्थी करून ताश्कंद करार घडवून आणला. परंतु या

करारानंतर ताश्कंदमध्येच पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचे अकस्मात निधन झाले. श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. त्यांनी गुप्तहेर संघटना उभारण्याच्या कामी तातडीने लक्ष घातले. आयबीमधील वरिष्ठ अधिकारी श्री. रामेश्वरनाथ काव यांच्याकडे ही जबाबदारी सोपविली. त्यांनी ती चोख पार पाडली.

ही गुप्त संघटना परराष्ट्रांच्या लक्षात येऊ नये म्हणून तिचे नाव 'रॉ' म्हणजेच 'रिसर्च अँड ॲनालिसिस विंग' असे ठेवण्यात आले. २१ सप्टेंबर १९६८ रोजी स्थापना करण्यात आलेली ही संघटना म्हणजे नावाप्रमाणे आता केवळ 'रॉ' राहिलेली नाही तर पाकिस्तानसह अनेक राष्ट्रांच्या छातीत धडकी भरणारी संघटना बनली आहे. तिने आतापर्यंत शेजारी देशांतच नव्हे तर इतरत्रही अनेक साहसी आणि धाडसी मोहिमा यशस्वीपणे राबविल्या. फक्त एवढेच की ही संघटना या मोहिमेतील यशाचे उघडपणे 'क्रेडिट' घेत नाही.

'रॉ'ने आतापर्यंत केलेल्या कामगिरीचे कौतुक इतर राष्ट्रांकडूनच ऐकावे लागते. पाकिस्तानचा आणखी एक तुकडा करून स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती करण्यात 'रॉ'ने पेरलेल्या गुप्तहेरांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली होती. इतकेच नव्हे तर भारतात आलेल्या बांगलादेशी निर्वासितांना शस्त्र चालविण्याचे प्रशिक्षण देण्यातही ही संघटना होती. तर सिक्किमला भारतात विलीन करून भारताची सीमारेषा विस्तारित करण्यातही हीच संघटना आघाडीवर होती. सिक्किम भारतात विलीन झाल्याने चीनचा, इशान्य भाग तोडून भारताचे तुकडे करण्याचा इरादा धुळीस मिळाविण्यासही या संघटनेने केलेली कामगिरीस उपयुक्त ठरली.

'खलिस्तान' संघर्षाच्या वेळी आणि सुवर्ण मंदिरातील अतिरेक्यांना हुसकावून लावण्याच्या कामी पंजाब पोलिस आणि भारतीय सेना यांना योग्य ती माहिती मिळवून देण्याची कामगिरीही 'रॉ'मुळेच शक्य झाली होती. याशिवाय 'खलिस्तान'ला मदत करणाऱ्या पाकिस्तान सरकारवर 'सिंध प्रांत' फोडून काढण्यासाठी मोहीम आखण्याच्या कामीही 'रॉ'चाच पुढाकार होता. पाकचे अशाप्रकारे नाक दाबण्याचे काम 'रॉ'च करू शकते.

म्हणूनच पाकिस्तानचे अधिकारी 'रॉ'बद्दल म्हणतात, कौटिल्याचे तंत्र भारतीय गुप्तचर वापरतात. तर पॅलेस्टाइन मुक्ती संघटनेचे त्यावेळचे प्रमुख यासर अराफत भारतीय नेत्यांना सांगत असत की, पाकिस्तान भारतीय लष्कराला घाबरत नाही तर

‘रॉ’ला वचकून आहे. तर श्रीलंकेतील अध्यक्षपदाच्या निवडणुकीत आपल्या पराभवास ‘रॉ’ कारणीभूत असल्याचा आरोप श्रीलंका फ्रीडम पार्टीचे प्रमुख श्री. महिंद्र राजपक्षे यांनी केला होता. ते राष्ट्राध्यक्ष असतानाच पुन्हा निवडणूक लढवित असताना त्यांचा पराभव झाला होता. ते पराभूत होतील, असे कोणाच्या स्वप्नातही आले नव्हते. कारण त्यांच्या नेतृत्वाखाली श्रीलंकेने लिबरेशन टायगर्स ऑफ तामीळ इलम (एलटीटीई)चा खात्मा केला होता.

पाकिस्तानच्या आयएसआय या गुप्तचर संघटनेने नेपाळमध्ये जाळे पसरविले होते. एकमेव हिंदू राष्ट्र म्हणून समजणाऱ्या नेपाळने पाकिस्तानी दहशतवाद्यांना आसरा दिला होता. चीनशी राजकीय आणि व्यापारीदृष्ट्या नवे संबंध स्थापन करून भारताची कोंडी करण्याचा प्रयत्न चालू केला होता, अशावेळी  नेपाळमध्ये बसलेल्या प्रमुख दहशतवाद्यांची माहिती काढून त्यांची तयार केलेली फाइल नेपाळ पोलिस आणि सरकारकडे सोपवून त्यांना त्यांच्यामार्फत अटक करण्याची कामगिरीही ‘रॉ’ पार पाडत आहे.

‘रॉ’च्या अशा अनेक कथा आपणास ‘रॉ... भारतीय गुप्तचरसंस्थेची गूढगाथा’ पुस्तकात वाचायला मिळतात. तसेच ‘खलिस्तान’ चळवळ, सुवर्ण मंदिरातील कारवाई, पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व श्री. राजीव गांधी यांची हत्या या प्रमुख घटनांच्या काळात या गुप्तचर संघटनेस अपयश का आले, यासंबंधी कारणमीमांसाही मिळते.

त्याच्यात आता कॅनडा आणि अमेरिका ‘रॉ’वर उघडपणे करीत असलेल्या आरोपांची भर पडली आहे.

# कोडोलीचा नाताळ

■ पौलस वाघमारे, अहमदनगर

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यात कोडोली नावाचे एक मिशन स्टेशन आहे. बाजारपेठेचे गाव असल्याने येथील पंचक्रोशीत हे प्रसिद्ध आणि सुपरिचित आहे. येथील नाताळाला उपस्थित राहण्याचा योग मला आला आणि तो भव्यदिव्य नाताळ पाहून अचंबा वाटला.

नाताळच्या आदल्या दिवसापासूनच खेळणीवाले, आकाशपाळणे, रहाटगाडगी, मिठाईची दुकाने गावातील चर्चकडे जाताना दिसत होते. हे सर्व पाहुन गावातील मुले आणि माणसे यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. गेल्या काही दिवसापासून महामारीचे सावट सर्वत्र पसरल्यामुळे आणि शासकीय बंदीमुळे बाजार भरलेला नव्हता. यावेळी जरा मोकळीक मिळाल्याने सर्वांनी कोडोलीकडे कुच केले होते.

नाताळच्या दिवशी म्हणजे २५ तारखेला चर्च उपासनेला स्थनिक पोलीस स्टेशनचे पोलीस आणि मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते. ते अतिभव्य ऐतिहासिक चर्च स्त्रीपुरूषांनी तुडुंब भरले होते. या दिवशी कधी न येणारी मंडळी देखील आवर्जुन हजर असते हा आजवरचा अनुभव. हा अनुभव चर्च प्रशासनाला ठाऊक होता. त्यानुसार चर्चला मंडळी गर्दी करणार हे ठाऊक असल्यामुळे सर्वजण सावध होते. पुरेसे मास्क चर्चने उपलब्ध करून दिले होते. ज्यांनी स्वत:चे मास्क आणले नाहीत त्यांना आवाहन करून चर्चची वडील मंडळी मास्क वाटत होते.

नाताळचे वैशिष्ठय म्हणजे त्या दिवशी जमा होणारे दान गावातील ख्रिस्तेतर लोकांची शेते चर्चपासून जवळच आहेत शेतावर जाताना चर्चला ओलांडून पुढे जावे लागते. त्यामुळे शेतीचे भरपुर उत्पन्न मिळावे. देवाने कृपादृष्टी ठेवावी या श्रद्धेने ख्रिस्तेतर लोक आपल्या शेतीतील उत्पन्न चर्चमध्ये दान म्हणून आणतात. मोठया भक्तीभावाने चर्चमध्ये आणून अर्पण करतात. यामध्ये विविध प्रकारची धान्ये, कोंबडया, अंडी, बकऱ्या, भुईमुगाच्या शेंगा, नारळ, निरनिराळी फळे अशा वस्तू चर्चमध्ये आणून ठेवतात. चर्च प्रशासन नंतर त्या त्या वस्तूंचा लिलाव करून

लिलावाचे पैसे चर्च भांडारात जमा करतात. चर्च सुटल्यानंतर चर्च प्रशासनाकडून आनंदाप्रित्यर्थ मुरमुरेबताशे यांचे वाटप केले जाते. ख्रिस्त जन्माच्या आनंदाबरोबरच देवाचा प्रसाद म्हणून ते घरी नेले जाते ही विशेष उल्लेखनिय बाब आहे.

कोडोली गाव हे बाजारपेठेचे गाव असले तरीही येथे कोणत्याही देवाची जत्रा यात्रा भरत नाही. पंचक्रोशीतही या गावाला केवळ बाजारालाच लोक येतात. जत्रा किंवा यात्रेला कोणी येत नाही. परंतु कोडोली हे मिशन स्टेशन असल्याने येथील चर्च हे ऐतिहासिक आहे. गावातील लोकांची खिस्तावर श्रद्धा आहे. चर्चला खिस्ती लोकांबरोबरच अन्य लोकही चर्चला येतात. भरपूर गर्दी होते. गावातील गर्दीबरोबरच आसपासच्या गावातील आपापल्या नातेवाईकांनाही यानिमित्ताने बोलावणे पाठविले जाते. चर्चमध्ये दानार्पण दिले जाते हे सर्वज्ञात आहे. त्यामुळे पैसा स्वरूपात दिलेल्या दानासोबतच लोक आपापल्या शेतातील पीकाचा काही भाग चर्चमध्ये आणतात. यात गहू, ज्वारी, भुईमुगाच्या शेंगा, इत्यादी सह बागेतला पहिला नारळ, आंबा, इतर फळे, तसेच बकरे, कोंबडी, अंडी इत्यादी प्राणी पक्षीही चर्चमध्ये दान म्हणून आणली जातात. वेदीसमोर ठेऊन मनोभावे प्रार्थना केली जाते. ही प्रथा गेल्या अनेक वर्षापासून येथे सुरू आहे. ती आजतागायत सुरू आहे.

# पिंपळोबा

■ डॉ. फेलिक्स डिसोजा, भुईगाव

माझ्या आत असलेला एक झोका, चिमण्याचा चिवचिवाट, सुगरणीचा खोपा, निवांत शीतल छाया, माझ्या एकटेपणातला सोबती, एकांतातला हवाहवासा आवाज म्हणजे उंच डेरेदार पिंपळ. माझ्या आजोबालाही कधी सांगता आलं नाही या वृक्षाचं नेमकं वय किती. आजोबाचे आजोबा म्हणायचे हा पिंपळ माझ्यापेक्षा मोठा. तो कधीपासून येथे आहे हे कोणालाच माहिती नाही, गावातील सर्वात प्राचीन जाणता जीव. हा हिरवागार पर्णसंभार म्हणजे माझ्या लहानपणीचं जंगल. आजूबाजूला दाट झाडी, अंगावर चढलेल्या वेली, मागे असलेले बावखाल, बावखालात असलेली गोलाकार विहीर, बावखालाच्या कडेकडेला उभी असलेली नारळ, आंब्याची झाडे. ही हिरवीगार जागा म्हणजे झाडांची जागा, झाडांनी आपापली जागा शोधून आपलं स्वत:चं उभं केलेलं गाव, झाडांचं गाव. हिरवं गाव. लोक त्याला पिंपळाचं जंगल म्हणत.

आम्ही मुलं खेळता खेळता चेंडू या पिंपळामागे असलेल्या जंगलात गेला की आणण्यासाठी त्या झाडीत जाण्याची कोणाची हिंमत होत नसे, मग मोठी मुले भीत भीत जाऊन चेंडू शोधून आणत असत. इतकं दाट होतं पिंपळाचं जंगल. पिंपळाच्या झाडाखाली उभे राहून झाडाकडे पाहिले तर तोही आपल्याला वाकून पाहत आहे, आपल्याशी बोलत आहे असे नेहमीच मला वाटत असे. गावातील सर्व मुले या झाडाखालीच खेळायचे. खेळ रंगात आला की पिंपळाच्या पानांचा सळसळ आवाज सतत ऐकू यायचा. शाळेत जात असताना आम्हा मुलांना पाहून पिंपळ टाळ्या वाजवत आहे असे मला वाटायचे. मुलांना पाहून त्या झाडाला आनंद होत असावा आणि तो आपले दोन्ही हात उंचावून टाळ्या वाजवत आहे असं वाटत रहायचं, नंतर पुढे कितीतरी दिवस मी त्या झाडाखाली एकटा बसून त्या झाडाचं गाणं ऐकलं आहे, उंच आणि आपला पर्णसंभार डौलाने मिरवत उभा असलेला पिंपळ सगळं बघत आहे, त्याला सगळं ऐकू येते, त्याला सगळं दिसते, समजते असे मला वाटायचे, मुलांना पाहून सळसळणारा आनंदाने बेभान होत टाळ्या वाजवणारा पिंपळ जसा दिसत असे तसा गावात कुणी मेल्यावर झाडा- समोरून प्रेतयात्रा जात असताना किंवा नवरी मुलगी लग्नानंतर सासरी जात असताना दु:खी होऊन स्तब्ध उभा असलेला शांत पिंपळही

मी पाहिला आहे, त्याच्या डोळ्यात डोळे घालून मी कित्येकदा त्याला विचारलं आहे, "तुला सर्व समजते, सर्व कळते, या गावाच्या सुखदु:खात तू सहभागी असतोस, मला माहिती आहे कुणीच न सांगता तू स्वत:हून या गावाला सांभाळण्याची जबाबदारी घेतली आहेस, तुझ्या पानाच्या सळसळीतून होणारी ही पिवळ्या पानांची उधळण म्हणजे गावासाठी आशीर्वाद आहेत."

त्या झाडाखाली बसून मी खुपदा बोललो आहे, मनातलं सारं, मला वाटायचं तो ऐकतोय, ऐकतोय सारं. आणि प्रतिक्रिया म्हणून मला ऐकू यायची पानांची सळसळ आणि कधीतरी जाड, लांब देठ असेलेलं भलं मोठं पान येऊन बसायचं माझ्यासोबत. अशी अनेक पानं मी जमवली होती, पुस्तकाच्या पानात. त्या पुस्तकात ठेवलेल्या पानांचा हिरवा रंग उडून जायचा, आणि एक जाळीदार पान उरायचं. अशी कितीतरी जाळीदार पानं मी जपून ठेवली होती, जी झाडाने मला भेट दिली होती. या झाडामुळेच मी कधी एकटा नसायचो. माझ्या सोबत झाड होतं, झाडांनी दिलेलं पान होतं, सूर असलेली पानांची सळसळ होती, सावली होती, सूर्य मावळताना काहीतरी निसटत असल्याच्या भावनेने कातर होत जाणाऱ्या संध्याकाळच्या नाजूक क्षणी बसून राहण्यासाठी झाडांचा बुंधा होता. या बुंध्यावर बसूनच मी कुहू कुहू करणाऱ्या कोकिळेला कुहू कुहू करून चिडवले आहे, माझा कुहू कुहू ऐकून ती चिडून अधिक जोराने, त्वेषाने कुहू कुहू करायला लागायची. या झाडाच्या फांदीवर बसून झाडाखाली असलेल्या विहिरीच्या आत डोका-वताना मला गोलाकार आरसा दिसला आहे, त्या आरशात आपलं प्रतिबिंब उतरवून स्वत:ला न्याहाळणाऱ्या लता वेली मी पहिल्या, या झाडावरील घरट्यात राहणारी साळुंकी, ती आई झाल्यावर मला खूप प्रेमळ वाटू लागली होती, अचानक पाणीदार झालेल्या तिच्या डोळ्यात चमकणारी काळजी मला दिसली होती.

अंड्यातून नुकत्याच बाहेर आलेली पिसं नसलेली उघडीनागडी सतत तोंड उघडं ठेवून खाऊ मागणारी पिल्लं आणि त्यांच्या चोचीत काहीतरी खाऊ टाकण्यासाठी धडपडणारी साळुंकी, मला या झाडानेच दाखवली. अशा असंख्य जीवांचं घर म्हणजे हा पिंपळ होता. या पिंपळाने निसर्ग दिला, हिरवेपणा दिला. माझ्या कवितेत या निसर्गाचे अनेक आवाज मिसळले. या आवाजाने माझ्या कवितेला सौदर्य दिले, आशय दिला, अर्थ दिला. असा हा निसर्ग अनेकांच्या कवितेत कधी सौदर्य घेऊन अवतरला आहे, तर कधी जीवनाशय. निसर्ग आणि माणूस, त्यांचे जिव्हाळ्याचे नाते संत तुकोबा 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या शब्दात सांगतात. "मिनमिन आला वारा / कोन कोनाशी बोलली / पानं झाडाची हलली" बहिणाबाईच्या कवितेची भाषा निसर्गाची भाषा आहे. ऊन वारा, पाऊस, शेती, पाखरं त्यांच्या कवितेत बोलू लागतात, प्रेमशंकर शुक्ल यांच्या कवितेत 'समुद्र पानी का / सबसे बडा बर्तन

है / सुरज जिस से पानी पीता है !” किंवा “झरना पानी के बचपन का आवाज है” असा तरल, मौलिक अनुभव देणारा निसर्ग आहे. तर चंद्रकांत  देवताले यांना तोच ‘समुद्र आकाशाच्या पिंजऱ्यात डरकाळी फोडणारा वाघ म्हणून दिसतो. तर आणखी एका कवीच्या कवितेत हा समुद्र पांढरी आयाळ असलेला डरकाळी फोडणारा सिंह बनून येतो.

ना. धो. महानोर “या नभाने या भुईला दान द्यावे आणि या मातीतून चैतन्य गावे / कोणती पुण्ये अशी येती फळाला / जोंधळ्याला चांदणे लगडून जावे अशी प्रार्थना निसर्गासाठी करतात. अनेक कवींच्या अनेक कवितेत निसर्गाचे वेगवेगळे आवाज ऐकू येतात. जे कवीने निसर्गाच्या सानिध्यात राहून हृदयाचे कान करून ऐकलेले असतात. अशा अनेक कवींच्या कवितेतील निसर्ग निसर्गात दडलेले अनेक अर्थ सांगत राहतो. निसर्ग माणसाला भरभरून देतो. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा भागवतोच पण अनेक अनुभवातून, घटितांतून सौदर्यानुभव देत असतो. जीवनाशय पुरवीत असतो.

माझ्या वाट्याला निसर्ग आला तो ह्या पिंपळाच्या रुपात. गावचा इतिहासाला साक्षी असलेला हा अतिप्राचीन पिंपळ. गावाच्या संदर्भात जेव्हा जेव्हा एखादी महत्त्वपूर्ण घटना सांगायची असेल तर या पिंपळाच्या झाडाला वगळून ती सांगताच येणार नाही. गावात भरलेली पहिली जत्रा या पिंपळा-खाली भरली होती, मृणाल गोरे यांची पहिली सभा, हरित वसईच्या लढयाची गावात झालेली सभा, गावात आलेल्या चोराला गावातील लोकांनी पकडून या पिंपळाच्या झाडालाच बांधले होते, अशा अनेक गोष्टीला हा पिंपळ साक्षी  होता. मुलांचे खेळ या झाडाखालीच व्हायचे, मोठ्याच्या गप्पा या झाडांच्या बुंध्यावरच रंगायच्या, अनेकांच्या भेटण्याची आवडती जागा म्हणजे पिंपळाचे झाड, गावातील अनेक महत्त्वाच्या सभा, सण-उत्सवासाठी पिंपळाचे झाड, शेतात काम करून थकल्या भागल्या मजुरांची विसाव्याची जागा म्हणजे पिंपळाचे झाड, हा अतिप्राचीन पिंपळ माणसाच्या हसण्याचा, खिदळण्याचा, प्रेमाचा, द्वेषाचा, मैत्रीचा, हुंदक्याचा, भीतीचा, काळजीचा आवाज अतिप्राचीन काळापासून ऐकत आहे. गावाच्या पाठीवर असलेला हा हिरवागार ठिपका म्हणजे गावाची ओळख होती, त्याच्या पानांची उत्साही सळसळ गावात चैतन्य होऊन वाहत होती.

गावात सर्वात मोठा कोण तर हे पिंपळाचे झाड. असंच एकदा मित्रांच्या गप्पात मी सहज म्हणालो, पिंपळोबा... सगळ्या  गावाचा  आजोबा पिंपळोबा. आणि तेव्हापासून आम्ही सर्वच मित्र या आमच्या सगासोयरा असलेल्या पिंपळाला ‘पिंपळोबा’ म्हणू लागलो. ‘पिंपळोबा’ ज्याच्या सावलीचा स्पर्श झाला नाही असा गावात एकही माणूस नव्हता. ‘पिंपळोबा’च्या पर्णसंभारात नुकताच उगवलेल्या कोवळ्या लुसलुशीत तांबूस  पानावर

संध्याकाळी मावळत्या सूर्याची पिवळसर नारिंगी किरणे पडली की ध्यानस्थ बसलेल्या 'पिंपळोबा'च्या मुकुटावर साक्षात्कारी तेजोमय वलय दिसू लागते. हा 'पिंपळोबा' वयाने इतका मोठा आणि उंच होता की त्याच्या छायेत माणसाला स्वत:च्या खुजेपणाची जाणीव व्हावी. सगळा अहंकार गळून जावा, या डेरेदार वृक्षाखाली स्वत:ला छोटं छोटं पाहत स्वत:पर्यंत पोहोचता यावं, 'पिंपळोबा' एक ध्यानस्थ आदिम साक्षात्कारी वृक्ष. सर्वांच्या कल्याणाची प्रार्थना करणारा.

पण याच पिंपळोबाच्या झाडाखाली दोन भावांमध्ये जमिनीच्या वाटणीवरून भांडण झाले, याच पिंपळोबाच्या झाडाखाली दोन भावांमध्ये पंचानी जमिनीची वाटणी करून न्याय केला. लहान भावाच्या वाटणीला पिंपळोबाची जागा आली, तर थोरल्या भावाला गावाबाहेर हायवेलगतची. पिंपळोबाचा न्याय झाला नाही. कितीतरी वर्ष मातीत मुळ रोवून उभा असलेला पिंपळोबा त्या दिवशी भूमिहीन झाला. लहान भावाने एका बिल्डरला ही जागा विकून टाकली आणि तो आपल्या कुटुंबाला घेऊन परदेशात गेला. पिंपळोबाच्या पायाखालची माती त्याची राहिली नाही. पिंपळोबाच्या नावे कोणताच सातबारा नव्हता. लहान भावाच्या जमिनीत उभा असलेला पिंपळोबा त्या बिल्डरला अडगळीचा वाटू लागला. अतिप्राचीन पिंपळोबाची माती हिरावून घेतली गेली. पिंपळोबा जमीनदोस्त झाला. माती मोकळी झाली. ते आले करवत, कुऱ्हाडी घेऊन. सगळा गाव हे पाहत होता. पाहून न पाहिल्यासारखे करीत होता. अनेकांना दु:ख झाले, त्या दिवशी अनेकांच्या घरी चूल पेटली नाही, अगदी नाहीच असे नाही गावातून पिंपळोबाच्या बाजूने आवाज झाला. बिल्डरला विरोध करण्यात आला. पण सत्ता, संपत्ती, आणि बळाचा वापर करून पिंपळोबाचा जीव घेतला गेला. मी हे सारे पाहत होतो. मोठमोठ्याने रडावसं वाटत होतं. नरेश सक्सेनाच्या कवितेतील झाडासाठी असलेलं रुदन कितीतरी दिवस मला ऐकू येत राहिलं -

घेऊन गेले त्याला

जसं घेऊन जातात एखादं बेवारस प्रेत

फरफरफटत

घेऊन गेले त्याला

घेऊन गेले अंगणातील ऊनसावली

सकाळ संध्याकाळ चिमण्यांचा चिवचिवाट

घेऊन गेले ऋतू

आतापर्यंतची साथसोबत सुख दु:ख

सगळं आयुष्य घेऊन गेले ( अनुवाद : चंद्रकांत पाटील )

पिंपळोबाबरोबर विहीर, बावखाल, झाडे, वेली नाहीशा झाल्या. एक गाव उठवलं गेलं, झाडांचं गाव. पिंपळाचं जंगल कायमचं नाहीसं झालं. जमीन मोकळी झाली. उघडी नागडी. सूर्य मध्यावर आला की त्या जागेकडे साध्या डोळ्याने पाहू शकत नाही, इतकी उघडी. अतिप्राचीन पिंपळोबाचे आणि हिरव्यागार जंगलाचे कोणतेच अवशेष मागे उरले नाहीत.ते घेऊन गेले त्याला आणि असंख्य आवाज नाहीशे झाले. पिंपळोबाची सळसळ, पिवळ्या पानांची उधळण, पक्ष्यांची मधुर किलबिल, विहिरीत पडणाऱ्या नारळाचा डुबुक आवाज, जंगलातून वाहताना वाऱ्याने घातलेली शीळ, पिंपळोबाच्या बुंध्यावरच्या गप्पांचा आवाज, मुलांच्या खिदळण्याचा आवाज. माझ्या कवितेला अर्थ देणारे हे आवाज नाहीशे झाले. पिंपळोबा गेला आणि जणू गावचा मूड बदलला. त्या चेपून चेपून गुळगुळीत केलेल्या जमिनीत काही दिवस उत्सवाचे मांडव उभे राहिले, कर्णकर्कश डीजेचा आवाजाने कोलाहल वाढत गेला. पिंपळोबाच्या हिरव्यागार जंगलाची कत्तल करून अनेक जीवांची वस्ती उठवली. त्या जागेवर माणसांना राहण्यासाठी उंच मनोऱ्यात खुराडी बांधली गेली. माणसांचे आवाज क्षीण झाले. गोंगाट वाढला. ऐकण्याची क्षमता कमी कमी होऊ लागली. कसलीच ओढ शिल्लक राहिली नाही. निसर्गाच्या हाका ऐकू येणे बंद झाल्या किंवा निसर्गाची भाषा येणारी माणसेच शिल्लक राहिली नाहीत. मला आता या गावात स्तब्धता ऐकू येत आहे, स्तब्धता. पिंपळोबा गेला तेव्हा त्याबरोबर गावाचं चैतन्य निघून गेलं आणि त्या जागी ही स्तब्धता आली. गावातील वातावरणातील स्तब्धता.

ही उन्हानं वेढलेली दुपार

एकमेकांत अंतर ठेवून उभी आहेत

घरासारखी दिसणारी निर्जीव खोकी

त्यात आहेत आजच्या वर्तमानात नसलेली

खूप मागे राहिलेली

एक-दोन माणसं शिल्लक उदासीनं भरलेली

खरं तर या मातीची गाणी त्यांनीच गायली होती
आणि हे माहीत असूनसुद्धा
संवादाचे आणि सहवासाचे गरम श्वास
अडकून आहेत त्यांच्या घशात चिकट कफासारखे

त्यांना गाता येत नाही
आणि जे सकाळी भरभर कुठे कुठे
निघून गेले आहेत
ते ओढाताणीच्या आणि स्पर्धेच्या पिंजऱ्यात
अडकले आहेत
त्यांच्या डोळ्यांत भविष्य खातंय हेलकावे

त्यांना गावाकडून उरल्या नाहीत कुठल्याच अपेक्षा
मातीच्या वासाच्या इच्छा
उगवणारा दिवस बाळगू देत नाही
त्यांच्या लयी विस्कटल्या आहेत भाषेच्या युद्धात
त्यांना गाता येत नाही
खरं तर
स्वतःचे आवाज गमावून मुकी झालेली
पराभूत भाषा आहे ही
गावातल्या वातावरणातील स्तब्धता...

# ख्रिस्ताचे सामाजिक राजकारण

■ फादर मायकल जी., वसई

***ख्रिस्ताचे राजकारण हे महात्मा फुलें-आंबेडकरांसारखे होते. त्यांना जसे ब्रिटिशांपासून देशाला स्वातंत्र्य मिळविण्याची घाई नव्हती, तशी ख्रिस्ताला रोमन साम्राज्यापासून इस्रायलच्या स्वातंत्र्याची घाई नव्हती. पण-.***

बऱ्याचवेळा असे ऐकीवात येते की ख्रिस्ताने राजकारणात भाग घेतला नाही. त्याने रोमन साम्राज्याच्या गुलामगिरीतून इस्रायलची मुक्तता करण्यासाठी चळवळ केली नाही. तो केवळ धार्मिक गुरु होता. तसे नाही. ख्रिस्ताचे राजकारण हे महात्मा फुलेंसारखे होते. महात्मा ज्योतिराव फुले यांना ब्रिटिशांपासून भारत देशाला स्वातंत्र्य मिळविण्याची घाई नव्हती. उलट ब्रिटिशांच्या आमदानीत ब्राह्मणांपासून दलितांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मदत झाली. समाजात समता, बंधुत्व आणि न्याय आणण्यासाठी ब्रिटिश राज्याची मदत झाली.

तशाच प्रकारची परिस्थिती येशूच्या काळामध्ये होती. येशूला रोमन साम्राज्यापासून इस्रायलचे स्वातंत्र्य मिळविण्याची घाई नव्हती आणि म्हणून तो त्या राजकीय स्वातंत्र्यासाठी झटला नाही. त्यासाठी बराब्बस हा नेता झटत होता. त्यासाठी कायदेत होता. जेव्हा पिलातासमोर येशूला ज्यू धर्माधिकाऱ्यांनी उभे केले आणि त्याला देहांताची शिक्षा मागितली, तेव्हा पिलात म्हणाला, “मला ह्याच्या ठायी काही दोष दिसत नाही. तुम्हीच तुमच्या नियमशास्त्राप्रमाणे त्याचा न्याय करा.” परंतु ज्यू लोकांनी येशूला तो कैसराच्या विरुद्ध आहे, तो स्वतःला राजा करतो, असा आरोप करून रोमन साम्राज्याच्या हस्ते त्याला मारून घेतला! पिलाताने येशूला सोडवण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यापैकी एक प्रयत्न म्हणजे तो लोकांना म्हणतो, “तुमच्या सणानिमित्त मी कोणाला सोडू बराब्बासला की येशूला?” तेव्हा ते ओरडून म्हणाले, “बराब्बसला सोडा आणि येशूला क्रुसावर खिळा!” (यो. १८.४०) अगदी महात्मा फुलेंसारखी येशूची गत झाली. ब्राह्मणांनी महात्मा फुलेंना शिक्षा दिली; त्यांच्या पत्नीवर चिखल फेकला पण जे देशाच्या स्वातंत्र्यासाठी झगडत होते त्यांना सोडून दिले.

बाबासाहेब आंबेडकरदेखील महात्मा गांधींबरोबर स्वातंत्र्य लढ्यामध्ये सक्रिय झाले नाहीत. त्यांना दलितांना ब्राह्मणांपासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अधिक प्रयत्न करावयाचे

होते आणि त्याप्रमाणे त्यांनी ‘चवदार तळे’, मनूस्मृती जाळणे सारख्या चळवळी केल्या. लोकांना बौद्ध धर्माची दीक्षा देऊन हिंदू धर्मातील जातीयता व कर्मकांडापासून मुक्तता दिली. आणि जेव्हा स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताला असे एक संविधान दिले की जे आज सर्व प्रजेला बंधुत्व आणि समता देते.

येशूने सामाजिक राजकारण केले. समाजात समता व बंधुत्व प्रस्थापित करण्यासाठी आणि उच्चवर्णीयांपासून दलितांची सुटका करण्यासाठी तो झटत होता. म्हणूनच त्याला ‘ब्राह्मणांनी’ उच्चवर्णीयांनी खूसावर खिळले. ख्रिस्त शास्त्री-परुषांबरोबर झगडला आणि त्यांच्या विळखयातून गोरगरीब श्रध्दावंतांची सुटका करण्याचा त्याने प्रयत्न केला (लूक ४.१८-१९). धर्माधिकाऱ्यांवर ते मेंढपाळ असून मेंढरांची लूट करत आहेत, विधवांची घरे खात आहेत, असे त्यांनी आरोप केले आहेत. (लूक १२.३८-४०). वेश्या, पापी, अशा बहिष्कृत जनांना तो जवळ करतो. त्यांच्यात तो बसला, खाल्लं, पिलं आणि म्हणूनच त्याच्यावर धर्मबुडव्या असा आरोप ठेऊन शेवटी शास्त्री-परुषांनी आणि याचकांनी त्याला ठार केले.

**ख्रिस्ती समाजवाद.**

प्रेषितांपासून आजतागायत मिशनऱ्यांनी जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन केवळ धर्मप्रसार केला नाही तर तेथील जनतेला उच्चवर्णीय व स्थानिक राज्यकर्त्यांपासून प्रेम, बंधुता आणि स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रवृत्त केले. जगाचा इतिहास पाहिला तर सामाजिक अन्यायाविरूध्द संघर्ष चालवण्यात ख्रिस्ती देशांचा (यूरोपियन) पुढाकार दिसतो. ख्रिस्ती माणूस सत्यासाठी, न्यायासाठी जगाच्या कानाकोपऱ्यात मिशनरी म्हणून गेला नि झगडला आहे. खुद्द आधुनिक भारतात स्त्रीमुक्ती, सतीसारख्या अन्यायी व अनिष्ट चलीरीतीविरूध्द -मनूस्मृतीविरूध्द- चळवळी ख्रिस्ती विचाराने (लॉर्ड विलियम बेंटिंग) सुरू झाल्या. ख्रिस्ती युरोपमध्येच फ्रेंचक्रांती घडून आली आणि तीची झळ खुद्द ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यांनादेखील लागली. दक्षिण आफ्रिकेतील काळे-गोरे ह्यांना समता शिकवणारे नेल्सन मंडेला हे ख्रिस्तीच होते. आधुनिक भारताचे उदाहरण घ्यायचं तर मुंबईतील गोदीकामगार नेते डिमेलो आणि त्यानंतर रेल्वेट्रॅकवर झोपलेले जॉर्ज फर्नांडीस हेदेखील आग पाखड करणारे, खरोखर क्रांतिकारक नेते ख्रिस्तीच होते. गोव्यात गोवामुक्तीसाठी ख्रिस्ती आंदोलक होते.

आपणही तोच कित्ता गिरविला पाहिजे. अगदी पुरोहितांनीदेखील केवळ पुजारी बनून चर्चमध्ये बंदिस्त न राहाता समाजात स्वातंत्र्यासाठी झटले पाहिजे.

**वसईच्या चळवळी**

आज तरी भारतीय ख्रिस्ती समाज शांतिप्रिय, 'सुशेगात' वाटतो. अल्पसंख्यांक असल्यामुळे तो भितो का? गरीबी, बेकारी, जात-धर्माच्या टेढी इत्यादी नागरी जीवनाचे प्रश्न सुटले नाहीत तरी आंदोलन, मोर्चे, राजकीय किंवा सामाजिक सभासंमेलने यामध्ये तो निष्क्रिय राहतो. मला आठवतं १९९२ साली मी नंदाखाली असताना पॉल डिमेलो यांचा खून झाला होता. पोलीस खुन्याचा तपास लावत नव्हते. म्हणून आम्ही खुद्द चर्चमधून एके रविवारी एक मोर्चा विरार पोलीसस्टेशनवर आयोजित केला. जवळजवळ दहा हजार लोक त्या मोर्चामध्ये सामील झाले होते, परंतु रस्त्यावर एकही पोलिसाची गस्त दिसत नव्हती. मोर्चा पोहोचल्यानंतर मी इन्स्पेक्टरना प्रश्न केला, "बंदोबस्तासाठी एकही पोलीस तुम्ही पाठवला नाही?" त्यावर त्यांचे उत्तर होते, "आम्हाला माहित आहे की तुमच्या मोर्चामध्ये काही अनिष्ट घडणार नाही; कारण तुम्ही शांतिप्रिय लोक आहात!" खरंच, आमचे मोर्चेकरी जणू एखाद्या 'आदरेसांव'ला साजेसे चालत होते. आपल्याला बऱ्याचदा विसर पडतो की येशू म्हणाला आहे, "मी शांती नाही तर आग टाकण्यासाठी, वाद निर्माण करण्यासाठी, आपसात सत्य-असत्यामधला संघर्ष निर्माण करण्यासाठी आलो आहे." "तुझ्या एका गालावर मारली तर दुसरा गाल पुढे कर" हे शब्द ख्रिस्ताचेच आहेत; पण पिलातासमोर जेव्हा एक शिपाई त्याला चपराक मारतो तेव्हा त्याला 'विनाकारण मला का मारतोस?' असा जाब विचारणारा ख्रिस्तच आहे!

तरीदेखील १९व्या शतकातच वसईत ख्रिस्ती समाजात समाजवादी पक्ष फोफावला त्याचे नवल वाटायला नको. सायकलमहर्षी श्री. जॅक डिमेलो, साथी झेवियर मच्याडो, रस्तेसम्राट डॉमनिक घोन्सालवीस आदि समाजवादी नेते निर्माण झाले. तसे मनवेल तुस्कानो जरी मुळात 'संडे ख्रिश्चन' असले, ख्रिस्तासारखे 'चेपलेला बोरूदेखील न मोडणारे' अशा खाक्याचे असून एक जहाल आंदोलक बनले! आपला जीवदेखील धोक्यात घालेपर्यंत कणखर बनले! त्यांच्या जीवनावरून मला लग्नाच्या बोहल्यावरून पळून गेलेल्या रामदास स्वामींची आठवण येते. संतवृत्तीचे रामदास, पण मनात दुष्टांचा नायनाट करण्याची जबरदस्त इच्छा असल्यामुळेच ते 'देऊ कासेची लंगोटी अन नाठाळाच्या माथी काठी!' अभिर्वावात त्यांनी शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी प्रेरणा दिली. मार्कुस डाबरे आदी नेत्यांनी स्वतःच्या स्वभावाविरुद्ध आणि सुशोगात ख्रिस्ती समाजरीतींविरुद्ध जाऊन १९८०-९०च्या घरात वसईच्या हरीतपट्ट्याच्या रक्षणासाठी सरकार आणि माफियांविरूध्द कडक भूमिका घेतली आणि शारीरिक व मानसिक त्रास सहन केला आहे (पहा: हरित वसईचा लढा)!

**निर्भयजन मंच**

१९८९ साली मी नंदाखाली प्रमुख धर्मगुरु म्हणून आलो व काही चळवळी मंडळी माझ्या भोवती जमली. आम्ही उत्तर वसईत 'निर्भय जनमंच'ची स्थापना झाली. त्या

काळात वसईतील भाई ठाकूर माफियाच्या भीतीने नंदाखाल नाक्यावर संध्याकाळी सातनंतर कोणी फिरकत नसे. जनतेला निर्भय बनविण्याची गरज होती. सुदैवाने पोलिस इन्स्पेक्टर उल्हास जोशी ह्यांची वसईत नेमणूक झाली. जोशी ह्यांच्या उपस्थितीत आब्राहाम नाक्यावर जंगी सभा झाली आणि वातावरण सैल झाले! निर्भयजनमंचची नंदाखाली किती आवश्यकता होती, हे लक्षात येईल. तेव्हापासून त्या भागात जोरदार जाहीर सभा होऊ लागल्या. मला आठवतं, नंदाखालचर्च कंपाऊंडमध्ये एकदा निर्भयने निखिल वागळे यांची सभा लावली होती. त्या काळात ते शिवसेनेच्या विरोधात बोलत असत. म्हणून त्या सभेमध्ये सभा उधळण्याच्या उद्देशाने शिवसैनिक गुपचूप येऊन बसले होते. पोलिसांनी त्यांना वेळीच पकडले आणि अनर्थ टळला होता! त्या सभेचे अध्यक्षस्थान माझ्याकडे होते. त्यानंतर एकदा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये निर्भयची अशी एक गरमागरम सभा झाली होती. ती शरद पवारांच्या विरोधात होती आणि त्या वेळचे म्युनिसिपल कमिशनर गो. रा. खैरनार हे वक्ते होते. त्याही सभेचे अध्यक्षस्थान माझ्याकडे होते. कोणत्याही क्षणी पोलिस खैरनारना ताब्यात घेतील, अशी आणीबाणीची स्थिती आयोजक ह्या नात्याने श्री. मनवेल तुस्कानो झेलत होते. तसेच त्यांनी परांजपे बिल्डराच्या विरुद्ध सुप्रीम कोर्टात लढा लढवून विजय मिळवला होता. अर्थात त्यासाठी आंदोलकांनी जीवाच्या धमक्या पचवल्या आहेत.

तरीपण निर्भयजनमंच निर्मितीचे प्रकरण माझ्यावर शेकलेच. नंतरच्या माझ्या निर्भय चळवळीतील सहभाग धर्माधिकाऱ्यांच्या आणि खुद्द काही माझ्याच सहकाऱ्यांच्या डोळ्यात सलण्यासारखा झाला. त्यांनी माझी बदली करण्यासाठी बिशपकडे तक्रारी केल्या. त्यात तत्कालीन आमदारकीचे उमेदवार विवेक पंडित (भाऊ)देखील सामील होते. विरोधक यशस्वी झाले आणि माझी नंदाखालहून बदली झाली. बदली कार्डीनल पिमेंटा वसईबाहेर अंधरीला करणार होते. पण मी पिमेंटांना पटवून दिले की ‘मी वसईत नको म्हणून मला मुंबईत टाकून कुजवण्यापेक्षा बंगळूरला पाठवा. नॅशनल सेंटरला मझी गरज आहे.’ त्यांनी विनंती मान्य केली आणि अशा प्रकारे मी माझी दहा वर्षांची 'हद्दपारी' बंगळूरला वळवली आणि त्या हद्दपारीचे सोने केले! माझा सर्जनशील उपासनेच्या कार्यशाळांचा (Seminars on Creative Catechetics and Liturgy) झेंडा मी सगळ्या जगात फडकवला! मात्र त्या ‘हद्दपारीच्या’ काळात समाजवादी निर्भय परिवाराने मला भक्कम साथ दिली! माझे प्रश्न धार्मिक होते. तेव्हाचे ‘निर्भयजनमंच’ अध्यक्ष श्री. मनवेल ह्यांनी कसलीही भाडभीड न बाळगता मुकाबला केला! त्यांचे ते उद्गार मला अजून आठवतात, “मला जरी चर्चने पुरण्यासाठी जागा दिली नाही तरी हरकत नाही; पण मी माझा समाजधर्म सोडणार नाही!"

**माझे सामाजिक राजकारण**

माझ्या राजकिय प्रचाराला सुरुवात १९९६पासून झाली. माझे राजकारण सामाजिक उद्दिष्टांसाठीच होते. मी कधीच कोणत्या एका पक्षाचा बांधील राहिलो नाही. जो पक्ष ती सामाजिक उद्दीष्टे पूर्ण करील त्या पक्षाला माझा पाठिंबा असे. माझी भूमिका मांडणारा एक लेख जनपरिवार साप्ताहिकात ८/४/९६ रोजी प्रसिद्ध झाला. त्यात मी स्वधर्मीयांच्या आक्षेपांना उत्तरे देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचे शीर्षक होते: "ख्रिस्त धर्मगुरू की समाज सुधारक?" त्या लेखांमध्ये मी म्हटलं आहे: येशू ख्रिस्त हा पुरोहित वंशाचा नव्हता. तो एक साधासुधा सुतार (वैश्य) होता आणि जे काही त्याने समाजात कार्य केले ते एक समाजसुधारक व धर्मसुधारक म्हणून केले आहे. आणि म्हणूनच त्याने प्रसंगी धर्मगुरूंना ढोंगी म्हटलं आहे नि धर्मपंडितांना अंतरंगात घाणीचे ढीग लपवणाऱ्या संगमरवरी कबरांची उपमा दिली आहे (मत्तय २३.२७). केवळ देवदेव म्हणणारे मुक्ती पावणार नाहीत तर जे शुद्ध चारित्र्य बाळगतील तेच देवाचे आवडते बनतील, असा इशाराही दिला आहे. एकदा तर त्याने मंदिरात बाजार भरवणाऱ्यांना झोडपून बाहेर काढले (यो.२.१३-१६) धार्मिक व्रत वैकल्ये उपासतापास करणाऱ्यांची त्यांनी टर उडवली आहे.

लेखाचा शेवट मी पुढील प्रमाणे केला आहे: येशूने सुरू केली ती चळवळ, संस्था नव्हे. संस्था उभारली ती त्याच्या प्रेषितांनी, विशेषतः संत पॉलने. या ख्रिस्ती धर्माच्या संस्थेत (चर्च) जर आज ख्रिस्ताची चळवळ दिसली नाही तर त्यात ख्रिस्त नसेल, चळवळ्या व्यक्तींना स्थान नसेल, उलट त्यांना तडीपार केले जात असेल, धर्मबहिष्कृत केले जात असेल तर ख्रिस्ताला पुन्हा अवतार घ्यावा लागेल, असेही मी म्हटलं होतं.

**विधानसभा निवडणूक २०२४**

२० नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणूक झाली. वसईत प्रामुख्याने महायुती (शिंदे-शिवसेना व भाजपा) आणि महाविकास आघाडी (कॉंग्रेस, राष्ट्रवादी व उध्द्व-शिवसेना) मध्ये चुरस होती. मी महाविकास आघाडीच्या वतीने प्रचारात भाग घेतला होता. माझी राजकीय भूमिका अशी आहे: महायुतीचा मोदी सरकारला पाठिंबा आहे आणि मोदी सरकार आपल्या भारताची राज्यघटना मोडीत काढत आहे. ती राज्यघटना वाचवण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत महाविकास आघाडी निवडून आली पाहिजे, असा माझा प्रचार चालू होता. काही कॅथलिकांचा मला विरोध आहे, ते म्हणतात: धर्मगुरूने राजकारणात भाग घेऊ नये. एकाने तर म्हटल आहे की ह्या फादरला जर एवढी राजकारणाची आवड असेल तर त्याने झगा उतरवून आमदार व्हावे!”

माझी काही हरकत नाही कारण तशाने मी ख्रिस्ताच्या जीवनाला किंवा कोणत्याही मूल्याला किंवा तत्वाला बाधा आणत नाही. पण तसं न करता मी चर्चमधून बाहेर निघून समाजमंदिरात उतरून भ्रष्टाचाऱ्यांना झोडपून बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत आहे. ख्रिस्ताचे मंदिरशुध्दीकरणाचेच ते काम आहे. जर मी बाहेरून राजकारण शुद्ध करण्याचा

प्रयत्न केला तर ते आमदार होण्यापेक्षा अधिक चांगले असेल, म्हणून मी प्रचारात भाग घेतो.

माझे राजकारण सत्तेसाठी नाही; राजकारणशुध्दीसाठीच आहे. गेल्या १ नोव्हेंबर रोजी वसईच्या कॉँग्रेस भवनात महाआघाडीची सभा अकरा वाजताची जाहीर झाली होती. मी अकराला दोन मिनिटे असताना तेथे पोहोचलो आणि सरळ हॉलमध्ये जाण्यासाठी जिना चढू लागलो. तेवढ्यात एक कार्यकर्ता मला म्हणाला, "फादर, ऑफिसमध्ये चला, आपले उमेदवार विजय पाटील आले आहेत." मी म्हणालो, "मी सभेसाठी आलो आहे." आणि मी वर चढू लागलो. हॉलमध्ये शिरताना आणखीन एक कार्यकर्ता मला म्हणाला, "पुढे बसा." मी म्हटलं, "मी भाषण करण्यासाठी आलो नाही!" आणि मी तिसऱ्या रांगेत जाऊन बसलो. सभा सुरू होण्याच्या थोड्याशा अगोदर आणखीन एक कार्यकर्ता मला म्हणाला, "तुम्ही स्टेजवर बसा." आणि मी म्हणालो, "मी पक्षाच्या वशिल्याने माझी खाजगी कामे करून घेण्यासाठी आलो नाही; मी आलो आहे एक नागरिक म्हणून संविधान वाचवण्यासाठी. महाविकास आघाडी त्या कामासाठी उभी आहे तिला पाठिंबा देण्यासाठी मी इथे आलो आहे!"

शेवटी त्यांनी मला भाषण दिलेच. आणि मी ते घेतलेही -जमलेल्या कार्यकर्त्यांना कानपिचक्या देण्यासाठी! मी म्हणालो, "मित्रहो! मोदीसरकारकडून रोज आपल्या संविधानावर हल्ले होत आहेत. ताजा हल्ला म्हणजे ईव्हीएम मशीन. जनतेचा त्यावर विश्वास नसून संविधानाविरूध्द्ध त्याचा वापर केला जात आहे. राहुल गांधी तर म्हणतात, इव्हीएमशिवाय मोदी निवडणूक जिंकूच शकत नाहीत. ते संविधान आपल्याला वाचवायचे आहे. आज इंडिया गटबंधन ते उद्दीष्ट साद्य करण्यासाठी पुढे आले आहे, आपल्या महाराष्ट्रात महाआघाडी त्यासाठी तयार झाली आहे. त्यांना पाठिंबा देण्यासाठी मी येथे आलो आहे. वास्तविक संविधानाची फार दयनीय अवस्था झाली आहे. इलेक्टोरल बॉंड हे संविधानाच्या विरुद्ध आहेत, असे सुप्रीम कोर्टाने जाहीर करूनसुद्धा त्या संविधानाविरोधी कृतीबद्दल पंतप्रधान आणि गृहमंत्री यांना अटक झालेली नाही! महाराष्ट्रात सुप्रीम कोर्टानेच जाहीर केले होते की राज्यपालांनी मोठी चूक करून महायुतीचे सरकार स्थापित केले आहे. तरीदेखील ते बरखास्त न करता तारखेवर तारीख देऊन मराठी सरन्याध्धीश चंद्रचूड ह्यांनी त्यांना अडीच वर्षे महाराष्ट्राच्या जनतेवर अनधिकृत राज्य करू दिले आहे! संविधान बिनधास्त तोडले जात आहे आणि त्याबद्दल सुप्रीम कोर्टालाही काही वाटत नाही! मोदीसरकारने सगळ्या संविधानिक संस्था आपल्या ताब्यात घेऊन देशात तानाशाही अनित आहे. ते आपल्याला लोकशाही वाचवायची आहे.

# टिल्लू महादेव

■ प्रा. जगदीश संसारे,
सेंट जोसेफ महाविद्यालय, विरार

'टिल्लू महादेव' हे नाव वाचल्यावर तुमच्या मनात ताबडतोब मी आता तुम्हाला काहीतरी धार्मिक गोष्टी सांगणार असे धर्मविचार आले असतील, बरोबर ना? म्हणजे 'खड्या हनुमान' सारख्या एखाद्या जागृत देवस्थानाविषयी मी काहीतरी सांगणार (अर्थात लिहिणार) असे तुम्हाला नक्की वाटले असेल ना ? 'टिल्लू महादेव' हे कुठल्यातरी शंकराच्या देवस्थानाचे कोण्या पुण्यवानाने नामकरण केले असेल असे तुम्हाला नक्की वाटले असेल! बरोबर यातले पण यातले काही नाही टिल्लू महादेव म्हणजे नेमके काय असेल याविषयी कितीही ताण दिला तरी, तुमच्या डोक्यात प्रकाश पडणार नाही.

टिल्लू महादेव हे नाव उकळलेल्या चहाचे आहे! आहे की नाही गंमत? त्याचं असं झालं, गिरगावमधील खाडिलकर रोडवर असणाऱ्या वैश्य समाजाच्या हॉलमध्ये मी अभिनय प्रशिक्षण देण्यासाठी अगदी वेळेवर म्हणजे संध्याकाळी चार वाजता दाखल झालो. बघतो तर काय सगळे मोठे मोठे आर्टिस्ट अजून पोचलेच नव्हते! म्हणून आयोजकांची परवानगी घेऊन चहाची तल्लफ भागवायला बाहेर पडलो.

चहावाले आणि बारवाले नाक्यानाक्यावर असतातच कारण व्यसनी माणसांची या देशात काही कमी नाही. अर्थात आयोजक असलेल्या आमच्या वहिनीसाहेब चहा देणारच होत्या. पण आयत्या मिळणाऱ्या चहापेक्षा टपरीवर सुरका मारत चहा पिण्यात बेवड्यांना बिन सोड्याची पिताना येते तितकीच मजा आम्हा चवय्याना येते. खाडिलकर रोडवर मस्त टपरी दिसली बिन लग्नाची मेव्हणी दिसल्यावर खुश होणारा चेहरा माझा झाला होता. कळकट, मळकट तिचं रूप पाहून मन मोहरले.

चहा फलक वाचू लागलो 'तुफान', 'टिल्लू महादेव' अशी चहा नामे वाचून चहा पिण्याची तलफ अजून वाढली. माझं मूळ गाव साखरपा! पण जन्मभूमी व कर्मभूमी दुसऱ्या टोकाची (रत्नागिरी जिल्ह्याच्या) म्हणजेच मंडणगड! तेथील पाटरोडवरील घाग चहावाले आहेत, त्यांच्या चहांची नावे आठवली. 'मंडणगड', 'म्हापळ' आणि 'रत्नागिरी'! मी दुकानात गेलो की आमचे महेंद्र लोखंडे दादा आवर्जून ओरडून सांगायचे "घाग, एक रत्नागिरी पाठव." कोणी ऐकलं तर एसटीचे तिकीट मागतोय असंच वाटेल.पण 'रत्नागिरी' चहाचे नाव होते. म्हणजे अजुनही आहे! घागांचे गाव म्हाप्रळ म्हणून साधी चहा म्हणजे म्हाप्रळ! स्पेशल चहाचे नाव 'मंडणगड' कारण मंडणगड हे तालुक्याचे ठिकाण. तर व्हेरी व्हेरी स्पेशल म्हणजे फक्त दूध आणि वेलची मारके अर्थात चहा! तिचं नाव रत्नागिरी! कारण जिल्ह्याचे ठिकाण रत्नागिरी! घागांच्या प्रतिभाशक्तीला त्रिवार अभिवादन!

सांगण्याचा मुद्दा हाच टिल्लू महादेव हे चहाचे एक नवीन नाव मला गिरगावात कळले. चहा म्हणजे पृथ्वीवरचे अमृत! अर्थात प्यायलो नाही तर जगण्याचा अर्थच काय ? चहा म्हणजे ऊर्जा! चहा म्हणजेच असणारे चैतन्य! आणि चहा म्हणजे आम्हाला लागलेलं मरेपर्यंत न सुटणार व्यसन! त्या कळकट, मळकट, पण दणकट चहावाल्याला विचारले टिल्लू महादेव काय आहे? त्यावर तो हसत हसत म्हणाला "नवीन आहात की काय?" माफ करा मंडळी. मुंबईच्या भाषेत म्हणाला "नये हो क्या टिल्लू महादेव मतलब इतने से कप मे मिलने वाली चाय!" बघून मला हसायला आलं! पण खरं सांगू चीनूशी कटिंग पिताना एक वेगळाच फिल येत होता. टिल्लू महादेव नावाचं चांगभलं! तुम्ही एकदा पहा पिऊन टिल्लू महादेव! परत परत घ्यावीशी वाटेल!  चला दुसरा टपरीवाला वाट पहातोय!

# पालखी

■ अतुल काटदरे, मुंबई

आयुष्यात काही क्षण अविस्मरणीय बनतात; ते पुन्हा पुन्हा येत नाहीत. पण काही फिरून पुन्हा येतात आणि दर खेपेला नुतन अनुभूती देऊन जातात. भटकंतीची हीच तर गंमत आहे. गतवर्षीप्रमाणेच या वेळेसही हा अविस्मरणीय अनुभव पुन्हा मिळाला तो वज्रेश्वरी देवीच्या पालखी उत्सवात. यंदा पालखीचा मान होता अर्नाळा गावाचा. वसईच्या किल्ल्यातल्या वज्रेश्वरी मंदिरातून निघालेली पालखी अर्नाळ्याच्या राम मंदिरात येणार होती.

मगं काय, ठरल्याप्रमाणे आम्हा भटक्या मित्रांचं टोळकं संध्याकाळी विरार स्टेशनात भेटलं. चहाच्या तलफी मंडळींच्या आग्रहाखातर नवभारत मध्ये चहा आणि मिसळ-पाव हाणला आणि विरार स्टेशनहून अर्नाळ्याला निघालो. बोळिंज सोडलं तसं हवेतला गारवा चांगलाच जाणवायला लागला. पुढे दूरवर पसरलेल्या नारळीच्या बागा दिसू लागल्या. नारळी आणि केळीची वनं म्हणजे या प्रांताला मिळालेलं निसर्गाचं देणं! या उंच ताड-माड वनराईला छेदणारा अथांग असा समुद्र किनारा, काळसर चिकट वाळू, त्यावर सुरूची बाग, नजर जाईल तिथवर पसरलेल्या दर्यासारंगांच्या होड्या अन् नजरेत भरणारा; मदमस्त लाटांचे तडाखे लीलया परतवणारा अर्नाळ्याचा किल्ला!! अर्नाळ्याचं हे मोहक रूप मी अनेकदा अनुभवलंय. त्यामुळे येणारा अनुभव हा नक्कीच काहीतरी खास असणार ह्याबद्दल मी साशंक नव्हतो.

एव्हाना रस्त्याच्या दुतर्फा सुंदर बंगल्यांच्या रांगा लागल्या होत्या. काही जुनी, कौलारू बैठी घरं तर काही नवी, सुबक दुमजली. घराबाहेर येशूख्रिस्ताच्या जन्माचे सुरेख देखावे दिव्यांच्या प्रकाषात उजळत होते. चौकाचौकात ख्रिस्ताच्या, मदर मेरीच्या पुतळ्यांपढे रोषणाई केली होती. नाताळच्या पूर्वसंध्येपासून ते नववर्षाच्या सुरूवतीपर्यंत हा परीसर केवळ पाहून घ्यावा. गुलाबी थंडीत, झोंबणारा वारा अंगावर घेत या गावातल्या आळ्या, जुने वाडे, बंगले, चर्चेस, च्यापेल्स, चौकाचौकात बसवलेले क्रुस अन् ख्रिस्ती देवतांचे पुतळे पाहात फिरणं एक वेगळीच् मुशाफिरी आहे. या दिवसांत ख्रिस्तजन्माचे देखावे बोलके होतात अन् रोषणाईचे तारे सुद्धा खरे भासतात.

आगाशीला पोहोचेस्तोवर चांगलाच अंधार पडला होता तेव्हा आगाशीच्या स्पेशल पोहा भुजिंगचा मोह आवरून जुन्या कोळीवाड्यातल्या राम मंदिरात जिथे पालखी थांबली

होती त्या दिशेने निघालो. रस्त्यांवर पडलेले रांगोळ्यांचे सडे आणि घरादारांवर गुढीसमान उभारलेले भगवे झेंडे दिशा दाखवत होते. जसं जसं राम मंदिर जवळ येऊ लागलं तसं कोळी बाजाचे सूर कानावर पडू लागले अन् इतक्या आतुरतेने ज्या क्षणाची वाट पहात होतो तो क्षण आला. पालखीत विराजमान झालेल्या वज्रेश्वरी देवीचं दर्शन! देवीचा चेहरा, तीची आयुधं, अलंकार सर्व काही नजरेत साठवत मनोभावे डोकं टेकलं. आणि तीचा भंडारा माथी मिरवत मिरवणुकीत सामील झालो.

पालखी उत्सवाचा मानकरी ठरलेल्या या गावाचा थाट काही औरच होता.

"दिंड्या पताका वैष्णव नाचती।
पंढरीचा महिमा वर्णावा किती।"

हे वर्णन या छोट्याश्या गावाने सार्थ केलं! घरांबाहेर, रस्त्यांवर सुंदर रांगोळ्या काढल्या होत्या, ठिकठिकाणी रोषणाई केली होती; जणू दिवाळसणच् आला होता. पताका, तोरणांनी पडव्या-दारं सजली होती. चौकाचौकात पिण्याच्या पाण्याची, अल्पोपहाराची आणि प्रसादाची सोय केली होती. लेझीमच्या तालात, झेंडे नाचवत, मशालींच्या प्रकाशात, शिवछत्रपतींच्या आणि नरवीर चिमाजी आप्पांच्या जयघोषात पालखी गावभर फिरवण्यात आली. आणि कोळीवाडा म्हटलं की बाजा आलाच्.. मग् काय! दर्यावरी आमची डोले होरी.. पासून वेसावची पारू नेसली गो, नेसली गो नवा सारा पर्यंत 'लाइव्ह परफॉरमन्स' आणि एकच् कल्ला!!

राम मंदिरापासून ते विठ्ठल मंदिरापर्यंतच्या मिरवणूकीतला अनुभव अलौकिक होता! घराघरांतून पारंपारीक पोषाख करून, टोप्या चढवून, फेटे बांधून पुरूष मंडळी दर्शनाला येत होती, पालखीचे भोई बनत होती. त्यापेक्षाही स्त्री वर्गाचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. नऊवारी साड्या, अंगावर पारंपारिक दागदागिने, हातात देवीच्या पूजेची थाळी, त्यात खणा-नारळाची ओटी अन् मनात अपरंपार भक्तिभाव! हाताशी असलेल्या पोराला पालखी खालून काढत दूर समिंदरात 'म्हावरं' पकडायला गेलेल्या आपल्या साथीदाराच्या खुशालीचं साकडं घालायला त्या रात्री उशिरापर्यंत गर्दी करून होत्या.

रात्रीच्या मुक्कामाला पालखी विठ्ठल मंदिरात उतरणं म्हणजे 'वारी' या संकल्पनेची पूर्ती. माझ्या आडवाटेवरच्या भटकंतीत मी पाहिलेल्या काही खूप सुंदर मंदिरांपैकी एक असं हे विठ्ठल मंदिर पहाताक्षणी भावणारं. सुंदर मूर्तींनी सजलेलं; केवळ गाभाऱ्याच्या आतंच् नव्हे तर गाभाऱ्याबाहेरही. गाभाऱ्यात कर कटे वरी ठेवून विठ्ठल रखुमाई विटेवर उभे, गाभाऱ्याच्या उंबरठ्यावर सुरेख पितळी कासव. त्याबाहेर उजव्या हाताला देवी शारदा तर डाव्या हाताला गणपती गजानन. प्रदक्षिणा केल्यास गाभाऱ्याच्या तीन बाजूंना तीन संत विभूती - ज्ञानोबा, तुकोबा आणि चोखामेळा. आणि सगळ्यात भारी म्हणजे विठ्ठलाच्या आरतीत म्हटल्याप्रमाणे मुख्य प्रवेशद्वारावर 'गरूड हनूमंत पुढे उभे राहती!'

पहाटे पालखी केळव्याला रवाना होईस्तोवर या सुंदर देवस्थानात रात्रीचा मुक्काम.. यापेक्षा आनंद म्हणतात तो वेगळा काय असतो? थकलेला जीव लागलीच निद्राधीन झाला.

सकाळी पालखी केळव्याच्या शितलादेवी मंदिराकडे जायला निघाली आणि आमचा अर्नाळ्याचा मुक्काम हलला. या दरम्यान दोन गोष्टी सांगाव्याश्या वाटतात;

एक म्हणजे, मला आपलं सहज वाटलं... प्रचंड मेहनती, रांगड्या पण दर्यासारख्याच दर्यादिल, मनमोकळ्या स्वभावाच्या कोळ्यांचं देवांपेक्षा देवीवरच् प्रेम अधिक. मग ती कार्ल्याची एकवीरा आई असो किंवा विरारची जिवदानी. वसईची वज्रेश्वरी, केळव्याची शितलादेवी, माहीमची महिकावती, किंवा अगदी दातिवऱ्याच्या समुद्रात वसलेली आशापुरा देवी. सगळा कारभार देवीच्या हातात. म्हणूनच मला मुंबई सुद्धा मातृसत्ताक वाटते. कारण मुंबईचे मूळचे रहिवासी कोळीच. त्यामुळे सिद्धीविनायक, बाभूळनाथ किंवा वाळकेश्र्वर हे एखाद दोन अपवाद सोडल्यास मुंबादेवी, प्रभादेवी, काळबादेवी, धारावी, महालक्ष्मी, जोगेश्वरी आणि अनेक गावदेवी.. एवढंच कशाला, असं म्हणतात की वांद्र्याची माऊंट मेरी किंवा भाईंदरची वेलंकन्नी यांचा उगमही समुद्रातलाच! सर्व मातृसत्ताच!!

आणि दुसरं म्हणजे या प्रांतातील 'शिवाजी' या नावाचं गारूड! यंदाच्या अर्नाळ्यापासून ते मागल्या खेपेस पालखीचा मान असलेल्या दातिवऱ्यापर्यंत कित्येक घरांच्या प्रवेशदारावर आजही छत्रपतींची समर्थांसोबत असलेली तस्बीर लावलेली दिसते. पण इथे महाराज लोकनेत्यांसारखे किंवा महात्म्यांसारखे केवळ भिंतींवर नाही तर लोकांच्या मनात देखील आढळतात. विशाल सागरात स्वतःला झोकून देण्याचं धाडस आणि आपल्या मनमोकळ्या स्वभावाने समोरच्याला झटक्यात मित्र बनवण्याचं कर्तब, हे राजस गुण महाराजांचीच देणगी असावी! म्हणूनच 'राजे' या एका शब्दात ईथे उत्सव साजरा होतो!!

अर्नाळ्यातला पालखी उत्सव कायम स्मरणात राहील, अन् त्याहीपेक्षा गावकऱ्यांचा प्रचंड उत्साह आणि प्रेमळ आदरातिथ्य!

चतुर्थीत गणपती पोहचवताना जसं दुःख होतं तसं पालखीला निरोप देताना वाईट वाटतं; 'पुढल्या वर्षी लवकर या' असं वचन घेत जसं वर्षभर त्याची वाट बघतो तसं काहीसं पालखीबाबतही होतं. वज्रेश्वरी देवीची पालखी केवळ उत्सवाचा आनंद देत नाही तर देते दुर्गसंवर्धनाचा वसा. गडकोट ही जर राज्यलक्ष्मी असेल तर दुर्गसंवर्धन हीच तीची पूजा. येत्या वर्षी अनेक दुर्गभ्रमण अन् संवर्धन मोहिमा घडाव्यात अन् त्यात आपल्याला खारीचा वाटा उचलता यावा हिच् देवीच्या चरणी प्रार्थना!

# सुखी माणूस

▪ क्लेमेंट डिमेलो, आय सी कॉलनी, बोरीवली
भ्रमणध्वनी- 9082318532

माझ्या नेहमीच्या जाण्या येण्याच्या रस्त्यालगत एक झोपडी होती. त्या झोपडीचे छप्पर गवताने शाकारले होते व त्यावर हिरव्या रंगाचे प्लास्टिकचे कापड टाकले होते. त्या झोपडीचा मालक झोपडीसमोर एका मोडक्या आराम खुर्चीवर रेलून बसला होता. त्याच्या अंगात पांढऱ्या रंगाचे बनियान होते, बनियानवर हिरव्या, पिवळ्या रंगाचे कलरचे ठिपके पडलेले दिसत होते. झोपडीसमोर एक प्लास्टीकचा डबा ठेवला होता व त्या डब्यात एक ब्रश होता, जो रंगाने माखला होता. हा एवढा बायोडाटा पुरेसा होता, हे सांगण्यासाठी की, तो झोपडीसमोर बसलेला माणूस एक रंगारी असावा. त्या झोपडीतून रेडीओचा आवाज येत होता. हिंदी चित्रपटातील गाणी वाजत होती. मी क्षणभर तिथे थांबलो. त्या माणसाकडे पाहून विचार करू लागलो की, हाच तो सुखी माणूस असावा, ज्याला पाहून संत तुकडोजी महाराजांना ती सुप्रसिद्ध कविता सूचली होती, "राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली ती सर्व प्राप्त झाली, हया झोपडीत माझ्या... भूमीवरी पडावे, ताऱ्यांकडे पहावे...."

मला माझ्या ऑफिसातला ताप आठवला... मनात विचार आला की, आपण सहा आकडी पगार घेतो. पण बॉसचा धाक किती? कामाचा प्रेशर किती? आपण हे सगळे सहन करतो. मर मर मरतो! कशासाठी? तर चांगले जीवन जगण्यासाठी. आपणच आपल्या वाढवून ठेवलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी. आपल्यापेक्षा हा माणूस जास्त सुखी आहे. क्षणभर वाटलं.. आपणही हया झोपडीवाल्यासारखे असतो तर बरे झाले असते. पण काय करणार? चांगल्या सोसायटीत राहतो तर स्पर्धेला सामोरे जावेच लागणार. काहीतरी विचारावे हया उद्देशाने मी त्या झोपडीच्या मालकाकडे गेलो.

"तुम्ही रंगारी आहात का?" मी.

डोळे मिटून रेडिओवर वाजणाऱ्या गाण्याचा आनंद घेणाऱ्या त्या माणसाने डोळे उघडले व माझ्याकडे पाहत म्हंटले, "हो."

मग मी पुढचा प्रश्न विचारला, "ही झोपडी तुमचीच का?"

तेव्हा तो माणूस हसून म्हणाला, "झोपडी माझी पण जागा मालकाची. मी त्याच्याकडे काम करतो म्हणून त्याने राहायची सोय करून दिली आहे."

मी पुढे दोन तीन प्रश्न विचारले आणि तिथून निघालो. पण विचारामागून विचार मनात येत होते ... हयाचे एक बरे आहे. मालकाने राहायची सोयसुद्धा करून दिली आहे. इथे आपले सारे आयुष्य राहण्यासाठी घेतलेल्या घराचे हप्ते फेडण्यातच निघून जाते.

पुढे काही महिन्यासाठी कामानिमित्त मी बाहेर गेलो होतो. परत आल्यानंतर जेव्हा मी माझ्या नेहमीच्या रस्त्याने जात होतो, तेव्हा अर्थातच माझे लक्ष त्या सुखी माणसाच्या झोपडीकडे गेले. अन मला आश्चर्याचा धक्का बसला. तिथे ती झोपडी नव्हती! अन त्या झोपडीचा मालक तो सुखी माणूसही नव्हता. त्याच्या झोपडीच्या जागी आता एक टुमदार बंगला उभा होता. अन तो बंगला त्या सुखी माणसाच्या मालकाचा असणार ह्याची मला खात्री होती. पण मग तो झोपडीत राहणारा गेला कुठे? मी त्या बंगल्यात राहणाऱ्या त्या बंगल्याच्या मालकाला त्याविषयी विचारले, तेव्हा त्या बंगल्याचा मालक माझ्याकडे जरा आश्चर्यानेच पाहू लागला. मी त्या माणसाची चौकशी का करतो? ह्याचेच त्याला आश्चर्य वाटले असावे. पण मग विचारलेल्या प्रश्नाला काहीतरी उत्तर दिलेच पाहिजे हया न्यायाने त्याने मला सांगितले "मला काय माहित? तो कुठे गेला ते."

मी थोडीशी हिम्मत एकवटून म्हणालो, " पण तो तुमच्याकडे काम करत होता ना?"

"काम करत होता; पण आता नाही करत. साला राहायला जागा मागत होता. दिला हाकलून .. जो पर्यंत शक्य होते तो पर्यंत दिली राहायला जागा..." व त्याने आणखी एक शिवी हासडली!

काही दिवसांनी मी मुलांची शाळा सुरु होणार म्हणून त्यांना पुस्तके आणण्यासाठी विरार स्टेशनला जात असताना, रस्त्याकडेला कोपऱ्यात असलेल्या जिल्हा परिषदेच्या मोडकळीस आलेल्या शाळेच्या अंगणात मला तो सुखी माणूस सापडला. मी वाट वाकडी करून त्याच्याकडे गेलो. थोडीशी चौकशी केली असता त्याने मला सांगितले की, " मालक देत असलेल्या पगारात भाड्याच्या घरात राहणे शक्य होत नाही. मालकाला सांगितले तर त्याने, "परवडत नसेल तर येऊ नको असे सांगितले.... मग मीच सोडली नोकरी." आता हया सुखी माणसाने दुसऱ्या मालकाकडे नोकरी धरली होती; पण राहायला घर नव्हते. मला त्याची दया आली.

मी खिशात हात घालून शंभर रुपयाची नोट बाहेर काढली व ती नोट त्याच्या हातात दिली. त्याने फार उपकार झाले अशा अर्थाने माझ्याकडे पाहिले व हात जोडले.

तोच आभाळात ढगांचा गडगडाट सुरू झाला. पाऊस येणार म्हणून मी तिथून काढता पाय घेतला. घरी पोहचलो अन मुसळधार पावसाला सुरूवात झाली. मी बाल्कनीत बसून कोसळणाऱ्या पावसाकडे पाहत होतो. इतक्यात बायकोने गरम गरम भजी अन वाफाळता चहा माझ्यासमोर आणून ठेवला. बाहेर प्रचंड पाऊस कोसळत होता पण मला त्याचा अजिबात त्रास होत नव्हता. उलट त्या तो पाऊस पाहून मन मोरासारखे थुईथुई नाचत होते. मला आता अचानक तो झोपडीत राहणारा व आता परागंदा झालेला तो सुखी माणूस आठवला.. आता तो काय करत असेल? पावसापासून स्वतःला वाचवण्यासाठी तो कुठे गेला असेल? आता त्याने त्याचा संसार कुठे थाटला असेल? असे एक ना अनेक प्रश्न माझ्या मनातून वारूळ फुटून त्यातून बाहेर पडणाऱ्या मुंग्यासारखे बाहेर पडू लागले. काही दिवसांपूर्वी कामाच्या प्रचंड व्यापाने कटाळलेलो मी आता स्वतःला प्रश्न विचारत होतो, "खरा सुखी माणूस कोण?"

# जीवन अनुभव

■ श्रीमती सुजाता पीटर तुस्कानो,
निवृत्त आरोग्यसाहाय्यिका, महाराष्ट्र शासन

## गुलाबाचे काटे

तेव्हा मी इयत्ता ८ वीच्या वर्गात होते. दुपारची शाळा होती माझी. ११ वाजता तयारीला लागले की मग ११:४५ ला शाळेत पोहचायचे. तशी शाळा आमची के. जी. हायस्कूल, घरापासून १२ मिनीटांवर होती व तयारी तशी काही फारशी नसायची. माझी दादय म्हणजेच आईने सकाळी १० वाजता केस विंचरून चांगल्या उंचावर डोक्यावरील दोन घट्ट वेण्या दोन दिवस तशाच राहायच्या. कपडे एकच जोडी, जी धुतली ती चढवली जायची, अशी तऱ्हा असायची... चपला प्लास्टीकच्या व मजबूत टिकाऊ होत्या, चांगली शिवून शिवून २-३ वर्षे जायची त्यावर... व त्याच सगळीकडे घरात, दारात, बाहेर व नाहीतर अनवाणी मस्त फिरायचे.

वाडीमधील मजूरी त्यावेळेस करणे सोपेच जाई  व दोन पैसे हातालाही लागत. पहाटे आई लवकरच ५ वाजता उठवायची, कशीबशी चूळ भरून लगेच धूम पळायचो. कारण मजूरीचे ५० पैसे मिळायचे. आदल्या दिवशीच 'मोगरा' कळी खुडण्याची अनेक आमंत्रणे यायची. आगाशी परिसरांत चांगल्या बागायतदारांकडे पूर्वी मोगरा फुलशेती असायची. मोगरा कळी पहाटेच तोडावी लागे व त्यासाठी मजूरीला त्यांना कमी पैशात मुले मिळाली तर बरे पडत असे. मुलं म्हणून फक्त आठ आणे मजूरी मिळे, परंतू तेव्हा गरीबीत आठ आणे पण आम्हाला घरातले एक ठिगळ लावायला कामी येत असत.

दूरच्या नात्यातल्या लोकांना आधीच माहीत असायचे. लहान २/३ भावंडे आहेत तर त्यापैकी कुणीतरी कामाला येईलच. तशी तर मी जरा धीट, चपळ व काळी ठूस्स होती व काम चपळाइने करायचे व माझा नंबर अधिक लागे. चाळपेठ ते कातरवडी... व चाळपेठ ते नवापूर / अर्नाळा असा काळोखात ५-३० ला प्रवास असे. मग थंडी असो की पाऊस. रस्ता, चिखल, दगडमाती, साप, सरडा ह्या अंधारातील भितीला व तक्रारीला वावच नव्हता तेव्हा. पावसात डोक्यावर एखादा प्लास्टीकचा तुकडा मिळे व थंडीत बोचऱ्या थंडीचे काही कौतुकच नव्हते. मोगरा फुलझाडांवर २/३ दिवसांवर औषध फवारणी असे. खूप वेळेस ॲलर्जीने अंगावर पुरळ येई व अस्वस्थ होई कळी तोडतांना पण तेव्हा कुरकुर

करून सांगणार कुणाला... कमरेला डागाळलेली कापडी पिशवी बांधली कि मग ती भरे पर्यत.. दोन्ही हातांच्या हालचाली व त्या गरीब कळ्या इतकच दिसे... कधी तर फुलझाडांवरील अधूनमधून सुरवंट व हिरव्या किडींना स्पर्श होई व अंगावर शिसारी येई.

असे ९ वाजेपर्यत हे काम संपले कि मग एक क्वचितच कोरा चहा मिळे. बाजूलाच असलेल्या केळीच्या पानांतल्या द्रोणात गरम वाफाळलेला चहा त्याच मोगऱ्याच्या बांधावर पितांना एकाच दमात संपे, कारण जरा कुठे हलला, तर तो जमीनीत जाण्याची भिती असे. त्या चहामुळे दुपारच्या दोनच्या जेवणापर्यत बरीच ऊर्जा मिळे. पुन्हा चालतच ९-३० पर्यत घराकडे पोहोचत असू. घरी पोहचल्या पोहचल्या आई वेणीफणी करी व ओटीवर जमीनीवर बसल्याबसल्या सांगे, “अगं.. ती शालीवहीनी आली होती मालविडे आळीतली, तिला लग्नघाईचा सिजन आहे व खुप वेण्या बनवायची ऑर्डर आहे व ती गुलाब काढण्यासाठी तुला बोलवायला आली होती. मला आईचा खरं तर खूप राग येत होता त्या वेळी.

“आत्ताच तर आले ना गं मी. आत्ता मी नाही जाणार परत आणि मला शाळेला पण जायचे आहे.”

“अगं, वाजले का अकरा, बघ अजून १ तास आहे, तोपर्यंत तू पटकन येशील पण जावून... जा.. जा.. बाय माझी शहाणी आणि बघ, ती तुला गुपचुप काही खाऊपण देईल.”

एकीकडे परत ५० पैसे व काहीतरी शिळापाका खाऊ मिळणार हे मला मनोमन सुखावत होतं. किशोरवयातील वाढती भूक, बऱ्याचदा कुणी काही लाडू, रवा, चॉकलेट किंवा चार चणे जरी हातावर ठेवले तरी बरे वाटे. पण मला ते ‘गुलाब काढणी’चे काम नको नको वाटे. गुलाबासाठी खुप दुरवर पोहचल्यानंतर आधी मला त्या काट्यांचा खुप राग येई. मोठमोठी माझ्या उंचीपेक्षा वर वाढलेली जुनाट झाडे, एकमेकांच्या फांद्या एकदुसऱ्या झाडांत अडकून गुंताच झालेला असे. गळाभेट घेत जणू नात्यांतील मैत्रीतील गोडवाच गात. पण माझा संताप हा की मला गुलाब तोडण्यासाठी उंच उडी मारावी लागे. आत्ता कात्री व हत्यारे आहेत गुलाब खुडण्यासाठी. पूर्वी एखादी गंजकी विळी किंवा हातानेच चांगले वितभर अंतर ठेवून फांदीतून अलगद गुलाब तोडावा लागे. गुलाबाचे फुल कधी उन्हात तर कधी आडोशाला असे लपत असे कि मला त्यास शोधण्यात पुन्हा पुन्हा त्याच ठिकाणी तेच काटे व त्याच झोंबी पुन्हा पुन्हा रक्तबंबाळ करीत. एक जरी गुलाब फांदीवर लटकलेला राहीला तर वहीनी मालकिण मला लगेचच दम भरी. “नीट काढ गुलाब नाहीतर तुला पैसे नाय मिळणार.”

बऱ्याचदा बोचरी थंडी अंगाला झोंबे व झाडांना विहीरीचे पाणी दिल्याने जमिनीतील चिखलांत पाय रुतून पायात चिखलाचे जाड रबरी बुट बसविल्यागत पाय जड होत व पाण्यात सतत भिजल्या कुजल्यामुळे एक प्रकारे बुरसटत असत. बालपणातील ती कोवळी त्वचा अकाली आलेल्या परिस्थितीच्या वातावरणाने निब्बर झाली होती. त्या

कुजलेल्या पायांची आग आग होते, ती शमविण्याचे रामबाण उपाय तेल चोळत असू. किंवा रात्री चुलीच्या आगीने तापलेल्या विटेला शेकत असू, मग आराम पडे. औषध व मलम हे तर कधी पाहीलंही नव्हतं तेव्हा.

गुलाब १/२ दिवसाआड काढत असू. गुलाबाचे प्रकार गावठी साधा फिक्कट गुलाबी गुलाब, त्यात एक लाल भडक गुलाबी गुलाब व एक अत्तरी गुलाब असत. परंतू त्या गुलाबाकडे कधी निरखुनही पाहिलं नव्हतं तेव्हा. हा गुलाब काढतांना दोन्ही हातांना अनेकदा चरे पडायचे व हात रक्तबंबाळ व्हायचे. तेव्हा ना सनकोट होता ना ॲप्रन. परंतू गुलाब हाती आल्याचा आनंद त्या चऱ्यांपेक्षा मोठा असायचा. त्याचे दुःख जेव्हा घरी सायंकाळी आंघोळी व्हायच्या तेव्हा गरम पाणी टाकताक्षणी जाणवायचे व अंगाला अधिक काटे टोचायचे. खुप रडत कुढत अंघोळ उरकायची. पुढे अनेक काळ शाळेत व काही वर्षे पुढे कॅालेजात जावू लागले तरी ही मजूरी व हे चक्र सुरूच होतं. सगळ्या माझ्या वर्गमैत्रीणींचे कपडे सुंदर असायचे व त्याचबरोबर किशोरवयातील ती उमललेली कांती तुकतुकित व नित्तळ असायची. हे सर्व पाहून मी माझ्या हातापायांकडे पाहायची व ते माझे घाण, ओल्या सुक्या रेघोट्या व चरे पडलेले हात पाहून माझी मलाच किव यायची. हात व पाय तर लपविलेलेच बरे असे होते. परंतु परिस्थितीच्या चूलीवरील शिजणाऱ्या अन्नाला यातनाच्या वाऱ्यानेच धगधविले जाणार होते.

दुःखानंतर सुख प्राप्तीही असतेच हयाची अनुभूती व त्या सुवर्णक्षणांची प्रसुती इतकी सुंदर झाली की मला हीच गुलाबांची फुले ५० वर्षाच्या प्रतिक्षेनंतर शृंगार, सौदर्यतेज, गुलकंद, शांतता, मैत्री, कौतुक, प्रेम, सुशोभिकरणासाठी विराजमान असलेल्या गुलाबाचे महत्व क्षणोक्षणी स्मरण देवून गेली. ज्या गुलाबांसाठी मला अनेक काट्यांनी रक्तबंबाळ केले होते, त्याच सर्व काट्यांनी माझ्यावरील उपकारांची परतफेड रंगीबेरंगी गुलाबपुष्पांनी शंभर पटीने एकत्र येत मैत्री करून माझ्या दारी आज सुंदर तोरणे उभारली व आज मी त्या सर्व काट्यांना विनम्रतेने पुन्हा पुन्हा न्याहाळते आहे. स्वर ओठांवर आळवते आहे.

काट्यांनाही कळली माझ्या त्या वेदनेची भाषा. फिटतां फिटत नाही ऋण हे पुष्पगंधा, अनेकां हाती स्विकारता. गरीबीत का वसतो ईश्वरा, तुझे रूप साजीरे दिसते आज मला, अजूनी काय हवी मनीषा, अजूनी काय हवी मनीषा...

## शेणांतील सुगंध

काही दिवसांपूर्वी एका पाड्यावर बीसीजी लसीकरण समूपदेशनासाठी गेले होते. तो पाडा होता, थळ्याचा पाडा. मी लाभार्थ्यांना बोलविण्यास एका झोपडीत वाकले. “कुणी आहे का घरात ?” आत अंधार होता. काही दिसतच नव्हतं. तेवढ्यात एक तिशीतील महिला बाहेर आली.” हो, मी आहे ताई. काय झालं ताई ? तुमी कोण ? जरा

तिथेच थांबा हं बाहेर." ती हळूवार आदरयुक्त भावनेने म्हणाली, "आत येऊ नका, बरं. पाय व कपडे घाण होतील तुमचे." "का ग ?" "आज आमच्या आतल्या घरात ना, आम्ही शेणाने नुकतेच सारवलयं. शेणाचा घाण वास येतोय व ओलं आहे सर्व मीच बाहेर येते." पटकन हातच काम तसच ठेवून ती माऊली बाहेर आली.

"मी सिस्टर आहे, ह्या गावात नवीन आले आहे" मी तिला लसीबाबत समजावले व मग तिला एक प्रेमळ हास्य देत परत मागे फिरले. मनात विचार सुरू होते, गरीबी व परिस्थितीचे व्यवस्थापन करतांना आपल्या गरीबीला कुणी हसू नये म्हणून तिचा किती हा आटापीटा होता आणि घर शेणानेच तर सारवलं होतं. त्यात कसली लाज आणि घाण. पण तिला वाटत असावं, शुभ्र व स्वच्छ कपड्यातल्या बाईंना ह्या घाणीचे व शेणाचे काय महत्व कळणार बरं... तिने गरीबीची व श्रीमंतीची एक व्याख्या मनात तयार केली असावी. मी दुसऱ्या घराकडे चालत होते.

मला काही क्षणात ते माझे बालपण आठवले.... रात्रीचा अंधार संपून पहाट होण्याच्या तयारीची वेळ माझ्या आईला रोज घड्याळाआधीच संकेत देत असे. "चल सुजा ऊठ, शेणाला जा बघू." आईची एक आरोळी म्हणजे फार मोठ्ठा धाक असे. परिस्थिती बरोबर मिळतजुळतं केल्यामुळे कुरबुर न करता उठून कामाला लागणे हेच सत्य होतं. अमुल, गोकुळ, वारणा अशा मोठ्या दुधकंपन्या जेव्हा उदयास व नावारूपास आल्या नव्हत्या, तो काळ म्हणजे १९५० ते सर्वसाधारण १९८५, जेव्हा साऱ्या मुंबईच्या दुधाची तहान वसई तालुका भागवित असे. गावागावांतील प्रत्येक घरात सर्वसाधारणपणे एक दोन म्हैस असायची व गावांतील २ ते ३ मोठ्या घरांत ३५/४० म्हशींचा तबेला असायचा व गरीबीमध्ये जळावू इंधनाची सोय म्हणजे शेणापासून बनविलेल्या गोवऱ्या.

आम्हाला ७ जणांच्या स्वयंपाकासाठी रोजच्या दैनंदिन जळणाची गरज शेणाच्या गोवऱ्या भागवित असत व त्यासाठीच हा संघर्ष असे. अवघ्या १०/११ वर्षात जगण्याचा संघर्ष परिस्थितीने व नियतीने आपोआप शिकविला होता. आईबरोबर मिळेल तशी मजूरी कामे, शाळेची हजेरी, दोन वेळचे पोटभर अन्न, अंगात एक जुना फ्रॅाक व केसांच्या वरती टांगवलेल्या आईच्या घट्ट विणेतल्या दोन वेण्या, इतकंच राहाणीमान "सुखाची व्याख्या" सांगत असे. घरात सगळ्यांसाठी सकाळी ७/८ वाजता चहा बनेल तेव्हाच तो मिळे. उठल्या उठल्या बाकी काही प्रोटोकॅाल नव्हतेच मुळी. लहान बहीणीला अंग हलवीत, "चल उठ ना गं लवकर, आपल्याला शेणाला जायचंय, आत्ता उगवेल लवकर. चल." तीही मग घाबरून उजेड पडेल कि काय म्हणून माझ्या मागे डोळे चोळत निघे. मी सुध्दा डोळे चोळतच, अंथरूण झटकत घराबाहेर कारवीच्या कुडाला लावलेले टोपले घेत असे.

टोपले आईने चांगले शेणाचे सारवण केलेले सुंदर असे होते व त्याच्या जवळच एक छोटे न सारवलेले निखुरले म्हणजे छोटे जाळीदार टोपले असे होते. मोठं टोपलं म्हणजे एक संतापच होता तेव्हा. रिकामे असतांना त्याचा काही भार नव्हता. पण जेव्हा ते शेण

ओतपोत भरून सांडू लागे तेव्हा मात्र जबाबदारीच्या व मोठेपणाच्या कर्तव्याच्या जाणीवेचे ओझे त्याला व मलाही जाणवल्याशिवाय राहात नसे. काळोखातच वाट शोधत दोघी निघायचो. गावात लांब लांब घरे होती. आमच्यासाठी नेहमीच मोठे तबेले व जमीनदार माणसे महत्वाची वाटत. कारण जमीन, शेती, बागायती व त्यांस शेतीबरोबर जोडधंदा म्हणून म्हशी, दूधदूभते असा मोठा व्यवसाय असल्याने आम्हाला एक आधार मिळे. आम्हाला जाळणासाठी इंधन म्हणून त्यांच्या गोठ्यातील शेण स्वस्त व मस्त पडे. मग एक दिवसाआड आमचे नियोजन ठरे. आज कुणाच्या गोठ्यातले शेण चोरून आणायचं बरं ?

होय.. खरंय .. चोरूनच.. तसं तर सहजी कुणी न्या म्हणून स्वत: सांगत नसे. अगदीच शेण उचलणारा गडी माणूस नसेल तरच आम्हाला निरोप येई शेण हवं तर या न्यायला म्हणून व तेव्हा आम्ही छाती फुगवीत टोपल्या उडवत दिवसाढवळ्या शेणाला जात. पण असं फारच क्वचित घडे. कारण शेण हे उकिरड्यावर एक खड्डा् शेणकळीत टाकून तेच पुन्हा बागायतीला टाकले जाई व ते काही निरूपयोगी नव्हतेच तेव्हादेखील. पण खरचं आजही मला त्या आमच्या गावकरी जमीनदार दिलदार व्यक्तींचे ऋण व माझ्या कुटुंबावर केलेली दया विसरता येणार नाही. कारण रोज आपली म्हैस रात्रीत शेणाचे किती शेण-शेणपे देते हे गुराखी व शेतकरी हमखास जाणतो. असे असतांना १०/१२ म्हशीच्या शेणातील एक टोपली शेण जरी आम्ही पहाटे पहाटे चोरले तरीही त्यांना समजत असे व चोरही नक्किच ठाऊक असे. अनेकदा आपण म्हणतो तसं सेवा दाखवून केली जाते. परंतू खुपवेळेस ती कुणासही न बोलता कशी केली जाते हे मला आज उमगते आहे, त्यांनी कधीच गावगोंगाटा किंवा कुठे वाच्यता देखील कधी केली नाही हेच मोठ ह्दय होतं त्यांच्या दान सेवेचे.

आम्ही शेण पळवतो हे त्यांना निश्चितच ठाऊक असावे. मालक तर पहाटे लवकरच उठत. कारण पहाटेच्या गुरांच्या दूधकाढणीची वेळ ३/४ वाजताचीच बहुदा असे, गोठ्यात अंधुक दिवा पेटलेला असे व कधीकधी तर गुरांचा चारा-खुराक सुध्दा बादल्यांमध्ये पडलेला असे. गावात व आजूबाजूच्या गावात आमचे नाना, पास्कूकाका ह्यांच्या गोठ्यात व अगदीच नाही शेण मिळाले तर "मिनेजआळी" म्हणजे थोड्या दूरवरही जायचो. कुत्रे तर आमच्या पाचवीला पुजलेलेच असायचे. लहानपणी शेणाच्या ह्या खेपांमध्ये मला दोनदा श्वानांच्या लचक्यांना सामोरे जावे लागले होते व तब्बल पोटात १४ / १४ इंजेक्शन सुध्दा दिली गेली होती. परंतू त्या विजयखुणाच म्हणाव्या लागतील आज. काळोखात खुप घाबरत, दबक्या पावलांनी आम्ही गोठा गाठायचो. गोठ्यात शिरल्यावर कधी कधी तर खुप आनंद व्हायचा. इतका की पंचपक्वान्न मिळाल्यागत. कारण म्हशींच्या मलमुत्राच्या असण्याने आमच्या वाट्याला थोडेथोडके शेण यायचे व आमची चूल धगधगायची. खुप ढीगभर शेणातले थोडे शेण पळवतांना अंतरी काही चोरल्याचे दुःख व्हायचे नाही कारण मालकाला पुरून उरेल इतकेच आम्ही पळवायचो. मग काय.. लूटच..

आजूबाजूला पावडे व घमेले असायचे पण आवाज व गोंगाट नको म्हणून हातांनीच चांगले भरभर भरून घ्यायचो. सकाळी पहाटे नखांमध्ये शिरलेले शेण रात्रीपर्यंत सुगंध देत राहायचं. "शेणाचा सुगंध आजही अंतर्मनात तसाच अत्तराप्रमाणे साठवून ठेवलाय व त्याच बरोबर त्या गोठ्यातील मालकाच्या औदार्याचे ते ऋण" छोटे निखुरले शेण भरून मोठ्या टोपल्यात भरायला सोपे जाई. पण गंमत अशी होई की गोठ्यात शिरल्याने जनावरांना आमच्या आगमनाने मालक आल्याची जाणीव होत असे व ती खाण्याच्या आशेने अचानक उभी राहात व खडबड आवाज होई. बऱ्याचदा दावणीला बाधलेल्या गळ्यातील जाड साखळ्यांचा आवाज गोंधळ उडवी आमचा. कधी तर त्यातील एकदोन म्हैस लगेचच शेण व मुत्र टाकी. तेव्हा मात्र आमची तारांबळ उडे. मग अशा वेळेस आम्ही लगेचच छोटी टोपली म्हशीच्या गुदद्वाराजवळ लटकवत शेण जमीनीवर पडू न देता टोपलीत जमवल्याचा आनंद मिळवत असू. कित्ती मज्जा होती ती. पण बऱ्याचदा ते जनावरांना पसंद येत नसावे. अनेकदा त्या म्हशीच्या लांब झुपकेदार शेपट्या माझ्या गालावर नक्षीदार डिजाईन व चुरचुरीत लाल छापा उठवित अद्दलदेखील घडवित. मुत्रमिश्रीत शेण बऱ्याचदा नको नको वाटे, कारण ते गोळा करतांना हातांतून निसटे व डोक्यावर घेतल्यावर टोपलींच्या चिरांमधून देखील ते केसांतून अंगाखांद्यावर निथळे. अखेर पहिली मोठी टोपली भरभर भरून झाली कि मग छोटी निखुरली भरून घेत. मोठी टोपली भरली कि ती माझ्या डोक्यावर चढवणे माझ्या लहान बहीणीला सोपे जाई. दोघींनाही सगळी ताकद लावून मगच ते करावं लागे.

टोपली डोक्यावर ठेवण्याच्या ह्या झटापटीत अनेकदा प्रयत्न अयशस्वी देखील झालायं व संपुर्ण टोपले कधी खाली पडलयं तर कधी टोपले माझ्या अंगावरून खाली ओघळलयं. असे किस्से घडल्यावर देखील एकमेकांना रागावता येत नसे कारण पुढे काही पर्यायही नसे. छोट्या बहीणीला डोक्यावर ठेवतांना पुन्हा अडचण नको म्हणून तर ते छोटं निखुरलं टोपलं होतं तिच्यासाठी. आमची आई नेहमी म्हणायची, "गाढव मेलं ओझ्याने आन शिंगरू मेलं हेलपाट्याने. ह्या संघर्षातील गमतीजमतीमध्ये परिस्थिती, मेहनत, कष्ट व संघर्ष दडला होता. ह्याच शेणाच्या सुगंधाने सारवलेल्या लिंपनाची माझ्या शुभ्रसाडीला घाण व डाग लागू नये असचं वाटत असावं त्या माऊलीला आज. तिला तरी कुठे ठाऊक आहे की ह्या घाण शेणांतून निर्माण झालेल्या 'सोनखतांनी व गोवऱ्यांनी' माझ्या आयुष्याचे सोनं केलयं. ह्या जीवनाच्या विषम, कठीण परिस्थितींना तोंड देण्यासाठी, अत्यंत कुशलतेने संकटांना तोंड देतांना ती अपराधीपणाची भावना किंवा लज्जा ह्या दोन्ही गोष्टी कितीतरी दूर दूर होत्या. आजही चुकून रस्त्यात पडलेल्या त्या आखीव रेखीव शेणाच्या गोळ्याकडे, शेणप्याकडे मी तेवढ्याचं कुतूहलाने व प्रेमाने पाहते की अजून कुणी हयांस सारवणास कसे नेले नाही बरं..

'शेणातील सुगंधात' संघर्षात अनेक मोती दडलेले आहेत व त्यांच्या अनेक गाथांना शोधायचं राहून गेलयं...

# पारंब्या

■ आयवन क्रास्टो, उमराळे, वसई

या इकडे उभ्या चार मजली इमारतीच्या चौथ्या मजल्यावर माझे बस्तान आहे. खिडक्यांना लोखंडी जाळ्या, त्या जाळ्यांवर पाणी निथळणाऱ्या कुंड्या, कुंड्यात काही खुरटलेली, काही बहरलेली, काही जिवंत, काही मृत होऊ घातलेली झुडपे. आम्ही त्या झुडपांना फुले यायची वाट बघतोय. मोठी झाडे या कुंड्यात जीव द्यायला येत नाहीत. त्या खिडक्यांमधून एका बाजूला छोटेसे आभाळ, एवढंच मिळालंय आम्हाला. त्याच बाजूला भला मोठा वड, अगणित पारंब्या घेऊन, निरनिराळ्या पक्ष्यांच्या किलबिलाटामुळे सततचा जागा. त्या खालून वाहणारा रस्ता. तोही कायम जागाच. पण उत्तररात्री घटकाभर पेंगत असतो एखाद्या 'जागते रहो' गुरखासारखा.

त्या तिकडे, इस्पितळाची इमारत. वडाआड दिसत नसली तरी सतत ऐकू येणारी. या पूर्ण गलक्यात, वेगवेगळ्या कहाण्या घेऊन  येणारी. प्रत्येकाला कधीना कधी कहाणी व्हायचे आहे . वड या सगळ्या कहाण्यांचा साक्षीदार आहे. येणाऱ्या कहाण्या दु:ख घेऊन येतात. काही सुखी होऊन निघून जातात. काही वडाच्या पारंब्यांवर शाश्वत होऊन टांगल्या राहतात.

कहाणी आली की इस्पितळ लगबग करतं. हीच ती जागा जिकडे जीवन देणाऱ्या ब्रह्माची वस्ती आहे अन यमाचा रेडा इकडे कधीच फिरकत नाही; या अशा दिखाव्याने कहाणीचे स्वागत होते. स्वागत सांत्वनाने केले जाते. कधी होतही नाही. किती वेळा आणि किती जणांचे करणार? काही मरणासाठी येतात, काही जिवंत राहण्यासाठी, काही तर उगाचच ! मग सांत्वन नेमकं कोणाचे करायचे ? सतत हसू.. हसूनंतर रडू..., पुन्हा हसू आणणे जमले असते तर नट नटी का झालो नसतो !

कहाणी आली की बिलिंगचे काउंटर मात्र उजळून निघते. काउंटरच्या पलीकडे ऊर्जा असते अन अलीकडे निराशा अन काळजी.

स्ट्रेचरचा खडखडात होतो. अजून एक जीव वाहून न्यायचा आहे. ते बराच वेळा ऑपरेशन थेटरकडे निघते किंवा एखाद्या खोलीत जाऊन थांबते. भार उतरला की परत निघते. अजून एक कॉल आलेला असतो. थोडा आराम हवा असतो या

वर्दळीच्या कार्यात. पण तो मिळणे दुरापस्त आहे. जशी स्ट्रेचर मख्ख काम करतात तशीच कार्ये वार्डबॉय, मावश्या, डॉक्टर, नर्सेस या जिवंत माणसांकडूनही उरकली जातात. कहाणी आत आली, स्ट्रेचरने स्वागत केले, बिलींग काउंटरने ओवाळणी घातली की ही जिवंत माणसे त्या कहाणीला, पैसा, काळजी, हुरहूर, वेदना, अपमान, निराशा या योनीतुन परत जगात पाठवतात आणि हे जमलेच नाही तर वडाच्या पारंब्या आहेतच.

गेटवरला वॉचमन मात्र स्थितप्रज्ञ असतो. कोणाला या जीवन मरणाच्या फॅक्टरीत प्रवेश द्यायचा. कोणास द्यावयाचा नाही. याचे सूतोवाच तोच करणार. कहाणीच्या नातलगांना बाहेरचा रस्ता कसा दाखवावा यासाठी बहुदा काही ट्रेनिंग होतच असणार. कधी कधी हातावर मलाई चढते याच्या आणि मग याची प्रज्ञा लोप पावते अन वॉचमनचा वॉचिंग डॉग होतो.

इस्पितळ अनेक मजली, अनेक खोल्यांचे, अनेक खिडक्यांनी वेढलेले. इतकी हवा खेळत असते तरी इथे जीव गुदमरावा हे खरे गमक.

तळघरात इस्पितळ चालवणारे बसतात अन पाताळलोकांसारखे गूढ वागतात. हे तळघर म्हणे, ऊर्ध्व मजल्यावरच्या कहाण्यांच्या जीवन मरणाचे निर्णय घेत असते. या पूर्ण फॅक्टरीचे पाताळ यंत्र या तळघरात आहे. इथेच पैशाचा धूर निघतो; पण जमिनीखालून निघून तो आसमंतात कोणास नजर होण्याअगोदर नळांतून या चालवणाऱ्यांच्या घरापर्यंत सोडला जातो.

वर लगबग चालूच आहे, बिलिंग काउंटर चलन मोजणाऱ्या यंत्राच्या आवाजाने गजबजलेले आहे. स्ट्रेचर कहाण्या इकडे तिकडे नेत आहे. वॉचमन हजर आहे, नातलग द्विधा आहेत. खोल्या भरल्या जाताहेत. ऑपेरेशन थेटरबाहेर रांग आहे. कहाणी सुखी असेल तर सफल संपूर्ण, दुःखी असेल तर बाहेर वडाच्या पारंब्या वाट पाहत आहेतच.

माझ्या खिडक्या ऐकत आहेत. कुंड्यांतून पाणी वाहते आहे. मला मिळालेले आभाळ निरभ्र आहे.

# करशील जे....

■बर्नड लोपीस, आगाशी

रात्री दिड दोनचा सुमार. तो निर्जन रस्त्यावरून अनवाणी चालत होता, कपडे मळलेले, केस विस्कटलेले, कुठून निघालो कुठे जाणार आहोत याचं भान नसलेला तो जीव उपाशीपोटी फिरत होता.

अवघ्या विसाव्या वर्षाच्या वयात त्याची ही अशी अवस्था झाली होती. बारावी झाल्यानंतर केवळ आपण आयपीएसची परीक्षा द्यावी व चांगली नोकरी करून आपल्या कुटुंबाला चांगले दिवस दाखवावे ते स्वप्न पाहत तो रात्रीचा दिवस करत होता. चार भावंडात तो मधला, दोन लहान असलेली भावंडे शाळेत शिकत होती. बाप नोकरी करत होता पण पोरांपेक्षा त्याचं लक्ष छानछोकीवर जास्त होते. पगाराची चौथा हिस्सा रक्कम सुद्धा घरात येत नव्हती. आईसोबत भावंडे एकमेकांना आधार देऊन तुटपुंज्या पैशात जगत होती परंतु छंदिफंदी बापाला मात्र त्याची तमा नव्हती.

आपल्या कुटुंबाचा गाडा आपल्यालाच चालवायला लागणार आहे याची जाणीव मुलांना झाली होती. आपल्याला पुढे कसंही करुन आयपीएस अधिकारी बनायचंय हे ध्येय घेऊन तो झपाटून अभ्यास करत होता. पण दैवगती वेगळीच होती.

रोज भल्या पहाटे उठून घरकामात गुंतणारी आई अचानक एक दिवस ऊठलीच नाही. तीचे प्राणपाखरू झोपेतच उडून गेले होते....

रात्री खूप उशिरा दारू पिऊन आलेला बाप अजून जागाही झाला नव्हता... शिवमच्या भोवती संबंध घर गरागरा फिरू लागले....

माणूस इतका निष्ठूर कसा असू शकतो या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या पौगंडावस्थेतील मनाला मिळत नव्हते...

आईच्या चितेत उडी घेऊन डोक्यात भिरभिरणारा भुंगा कायमचा जाळून टाकावा अशी अवस्था झाली होती. आईच्या चितेच्या प्रकाशात त्याचं विश्व मात्र अंधारून गेले.

रस्त्यावरच्या दिव्यांचा उजेडातही एरव्ही रहदारीने भरलेला तो रस्ता सुनसान होता. चालता चालता त्याची नजर एका ठिकाणी खिळली. ती एक लहानसे ऊघडे मंदिर होते... आत एका क्रूसावर येशूची मुर्ती होती, खाली स्वच्छ शुभ्र टाईल्स लावलेल्या दिसत होत्या. तो नकळत तेथे वळला. तीन बाजुला तीनचार फूट उंच

स्टीलच्या ग्रील असलेल्या त्या मंदिराचा लहानसा जाळीचा दरवाजा लोटून तो आत गेला. क्रुसावरील तो पुनरुत्थानाचे प्रतिक असलेला अतिशय दयार्द नजरेचा येशू, दोन्ही बाहू पसरून जणू आपल्याला कवेत घेण्यासाठी उभा असल्याचा त्याला भास झाला....

त्याने त्याला मिठी मारली व तत्क्षणी ती इमाज चक्क जणू जिवंत होऊन क्रूसावरून त्याच्या मिठीत आली. तो क्षणभर गांगरून गेला.. अनवधानाने त्याने हात सोडले व फायबरची फक्त एक खिळ्यावर भिंतीवरच्या घड्याळासारखी अडकवून ठेवलेली ती इमाज खालच्या फरशीवर पडून तुटली... तो ते पहातच उभा राहिला..

अपरात्री झालेल्या आवाजाने शेजारच्या दुकानात झोपलेले कामगारही जागे झाले. बाहेर येऊन पाहतात तो येशूच्या इमाजीचे हात तुटलेले व जवळच एक मुलगा तेथे शांतपणे उभा होता. घटना चक्रावून टाकणारी होती. प्रसंग गंभीर वळण घेऊ शकत होता. त्यांनी फोन करून आपल्या मालकाला हकीकत कळवली.

गावाच्या सार्वजनिक प्रार्थनेचे ते ठिकाण असल्याने त्याने दोन-चार तरूणांना उठवले, वस्तुस्थिती सांगितली व त्यांना सोबतीला घेऊन घटनास्थळी आला...

आपल्या धार्मिक भावना दुखावण्याचा हेतू घेऊन आलेल्याला चा़ंगला चोप दिला पाहिजे अशा मनोभूमिकेतून आलेले ते चारपाच तरूण समोरचे दृश्य पाहून चक्रावले...

तो तरुण मुलगा येशूचे तुटलेले हात हातात घेउन शांत बसून होता. गावातील तरुणांनी सारी चौकशी केली. आश्चर्याची गोष्ट तो असंबद्ध उत्तरे देखील अतिशय शांतपणे देत होता.

आपल्या हातून काही चूक झाली असावी. या परक्या ठिकाणी आपल्याला मारहाण होईल वगैरे भीतीचा लवलेशही त्याच्या चेहऱ्यावर नव्हता. तो या जगात वावरतच नसावा हे लक्षात येत होते.

मात्र कुठून आला हे सांगताना तो दोन तीन मोबाईल नंबर सहज बोलून गेला... स्वतःच्या आधारकार्डाचा नंबर सांगणारा हा मुलगा मनोरूग्ण झालेला असल्याचे त्यांच्या लक्षात आले. मिळालेल्या मोबाईल नंबरवर फोन लावताच पलिकडून एक पोरसवदा आवाज आला...

उत्तरप्रदेशातील एका खेडेगावात राहणारा अभ्यासात अतिशय हुशार असलेला हा मुलगा शिवम पाठक होता. भ्रमिष्ट होऊन दोन महिन्यांपूर्वीच घरातून निघून गेला होता. त्याला शोधण्यासाठी त्याचा एक भाऊ मुंबईच्या कानाकोपऱ्यात वणवण भटकत होता. या महासागरात त्याला शोधणं जवळजवळ अशक्यच होते. मामला वाटला त्याहूनही अधिक गंभीर होता.

सोपस्कार व खबरदारी म्हणून पोलिसांना त्वरित कळविण्यात आले... तोवर मुंबईला पहिल्या गाडीने जाणारी फुल वाली मंडळी, फर्स्ट शिफ्टचे कामगार यांना ही गोष्ट जाता वरवर समजली व बघता बघता ती षटकर्णी झाली...

येथे गावातील त्या समंजस तरुणांनी मात्र येशूचे तुटलेले इमाज उचलून आपल्या कारमध्ये ठेवले व या मानसिक धक्का बसलेल्या मुलाचा सकाळपर्यंत सांभाळ व्हावा म्हणून त्या मुलाला पोलिसांकडे ठेवले. रात्रीच कल्पना देऊन सकाळी मुंबईहून बोलावण्यात आलेल्या भावाकडे रितसर चौकशी करून सुपूर्द केले व विषय संपवला.

पण शेवटी गावच ते. सकाळपर्यंत ही बातमी पंचक्रोशीत पसरली होती. वस्तुस्थिती माहिती नसल्यामुळे उलटसुलट प्रतिक्रियाही येऊ लागल्या. गाववेशीवर मंडळी जमू लागली. ख्रिस्ती व अख्रिस्ती लोकांनाही झालेल्या प्रकाराबद्दल औत्सुक्य होते. त्यातही हौसे,गवसे नव्हे होतेच. निवडणुकाही नुकताच पार पडल्या होत्या. आगीत तेल टाकून पळणारे मुद्दामच संशय व्यक्त करू लागले होते.

रिकामा क्रूस पाहून मुर्ख लोक भावनिक होऊ नयेत यासाठी खबरदारी घेणे आवश्यक होते. मामला सार्वजनिक होता... परंतु शेवटी येशूची शिकवण कामी आली. गावाच्या वेशीवर एकमताने सर्व जमावाला जाहीर सांगण्यात आले...

ही घटना एक अपघात आहे तरीही तो एक चमत्कारच समजू या ! कारण उत्तर प्रदेशातील एक तरुण व हुशार मुलगा जो मनोरूग्ण बनला होता. आपल्या घरापासून हरवला होता. कुटुंबाला तो परत मिळणं केवळ अशक्य होते. येशूचे फायबर इमाजही जर असे अलगद टांगलेले नसते व जर त्याच्या हातून पडून तुटले नसते तर. त्या कुटुंबाला देखील घरापासून पंधराशे किलोमीटरवर लांब हे हरवलेले कोकरू कदाचित सापडले नसते.

खुद्द ख्रिस्ताचेच शब्द आहेत. "हे माझे शरीर आहे व ते तुमच्यासाठी अर्पण केले जाईल"

ही तर फक्त प्रतिमा होती ती कधीही सांधता येते. परंतु तिच्या तुटण्याच्या योगायोगाने आज एक कुटुंब सांधले गेले आहे.

ही भेट असंभव ज्या परमेश्वराने घडवून आणली, त्या प्रभूचा गौरव असो!

# कविता /

# चारोळ्या /

# कलाकुसर

# विस्तार

तुझा विस्तार करीत गेलो तर कुठं कुठं पोहोचलो मी
थर मध्ये कच्छ मध्ये हिमालयात नागालॅण्ड आसामवगैरे
सगळं राष्ट्रगीतच पालथं घातलं तर तिथं कुठला प्रदेश दिसेना-
आव्याका बाहेर गेलास तू -

मखर करता येईल थर्मोकोली तुझ्या स्तुती शब्दांच –
बसावं लागेल तुला आत -
बाहेर टाळ कुटाळ वाजतील धर्म अधर्माचे -

त्या आवाजांनी तुला घाम फुटू दे
तुझ्या पायाखाली तुझ्या घामाचा समुद्र उसळू दे
विसर्जन होईल आपोआप तुझं
नि थर्मोकोली मखर तरंगत राहील काही काळ -
स्तुतीसुमने पूर्ण सडेस्तोवर

■ **रवीन्द्र दामोदर लाखे**

# अनादी आकर्षण

हवा असतोस तू मला अवतीभवती
तुझ्या नजरेच्या सुयाही
टोचून घ्याव्याश्या वाटतात कधीमधी
सोडून द्याव्याशा वाटतात तुझ्या दिशेला
ओठांच्या स्वैर पाकोळ्या
आणि तुझ्याकडून आलेला प्राणगंध
भरून घ्यावासा वाटतो रंध्रारंध्रात

नाही टाळता येत मला
हे अनादी आकर्षण
आणि खोडताही येत नाहीत
जगण्याचे सनातन संदर्भ
या सगळ्यासहित जगायचंय मला
अगदी स्वत:लाही कसलंही स्पष्टीकरण न देता
तुडवायच्या आहेत मला सगळ्या वाटा
तुझ्याकडे जाणाऱ्या
घसरड्या आणि निसरड्याही

होऊन होऊन काय होईल
घसरून पडेन
मोडतील हातपाय
तसंही तुझ्याच पावलांनी
सरणापर्यंत चालत जायचंय मला

■ **संगीता अरबुने**

# बटण

■ महेश लीलापंडित

एक आता थोड्यावेळापूर्वी बॅचलरी
आनंदा पर्यंत
मी दिलदार यारों का यार
लग्न झालं माझ्या
खिशांना डोळे
वाळीत पडलेलं जातीबाहेर
काढलेलं आत्ता थोड्यावेळापूर्वी बॅचलरी
आनंदा पर्यंतचं
वैतागवाडी बटन खिशाचं
स्वच्छ सवर्ण आपलसं वाटू लागलं
आणि वापर
कांदिवली ऐवजी बोरीवली

दोन उतरलो दोघे मुद्दाम
एक स्टेशन पुढे
लोकलमधनं
बोरीवली ते कांदिवली
मीटर प्रमाणे रिक्षा
अनईकॉनॉमिकल रोमॅंटिसीझमात
खिशाच्या बटनाविषयी कॉन्शीअस

तीन काढावं म्हटलं सर्दी

ताप, डोके दुःखी

दात कंबर अंगदुःखी

अंगावरच

रडते बायको

"मी आजारी पडल्यावर थोडं काही झाल्यावर मग कशाला नेता दवाखान्यात मला लगेच ?"

चार "ए चल अरे फक्त चहा आनि वडापाव चारव"

चल हॉटेलमध्ये लंच दे

नो नो नो नो

यार नाही आवडत मला

खायला बाहेरचं

काय वडापाव

चल घरी पोहे खा

चहा पी

तू ये रात्री जेवायला

पाच "अहो काय भाजी आणायची ?"

भाजी नको डाळच कर रोज रोज ?

सहा मगं बाहेर जाऊया चल मुव्ही, सिंहगड

अ) नको आपण इथेच गप्पा करू

ब) नंतर कधीतरी

क) कैलासच्या रूमवर

ड) योगिताकडे

(बटण)

सात अहो कुठंतरी बाहेर जाऊया का तुळशीबाग ?.... मुव्ही

अ) नको घरात किती रोमॅण्टिक वातावरण आहे

ब) मला बरं नाही वाटतय

क) मला लेक्चरची तयारी करायचीय कठीण टॉपीक्स आहेत

(बटण)

पाहतो वाट एक महीना

दोन महीनेभर

कधी येतोय पिक्चर मॉर्निंगला

पंधरा रुपयात बाल्कनी

रेग्युलरला लागतात रुपये साठ

ओके ओके ओके

ठिके ई-स्क्वेअरला जावू

आत्ता या वयात नाहीतर केव्हा ?

सॉरी बटना

नऊ तरी इन्टेलेक्चुअल लिटररी सामाजिक कलेच्या गप्पांसाठी काढून ठेवतो विशेष टाईम

तेव्हा बटनाची माझी चांगलीच

जमते

एरवी डोक्यात उठत

राहतात बटनी वादळ

कवितेत विसावतो

परत

एक हलकासा विचार

कविता छापायचा करतो

रूपांतर कवितांचे असंख्य बटनात

दिसतात सगळीकडे

बटनच बटनच बटनच बटनच

डॉक्टर बटन

बगलेत बटन कधी तोंडात बटन

घालून

मोजतो किती बटन ताप झालाय

लिहितो कागदावर कोणते बटन

दिवसातून किती वेळा

जेवणा अगोदरचे बटन

जेवणानंतरचे बटन

चमच्यातून बटन

मेडिकलवाला बटन

मेडिकलमध्ये बटनच बटन

बटनी बसमध्ये बटनी कंडक्टर

सर्व शिटांवर बटनी चेहरे

बटनी थिएटर बटनी हिरो

बटनी मित्र

बटनी कॉलेज, कलीग्ज, स्टुडंटस

बटनी नात कॉलेजशी सगळ्यांशी होत

चाललेलं

बटनी सुपर शॉप बटनी किराणा

बटनी भाजीपाला

सोळा बुटयात एक बटन केळी

बटनी एस.टी.डी., बटनी सायबर

बटनी विचार बटनी आचार

चहा नाष्टा जेवण

सारं काही बटन बटन

मला मी बटन वाटू लागतो

माझ्या डोक्यात बटन

आरशात मला दिसतं मोठ बटन

माझं बटन दुखू लागतं

जोरजोरात

बटनी विचारांनी

रात्रीची बायको

कविता

काढतात मला बटनातून

त्या भोवऱ्यातून

एका बटन मुक्त विश्वात होतो

मी त्रास मुक्त

सकाळी मी

सापडतो मला

पुन्हा बटनी विश्वात

फरफटवून फरफटवून

आणला गेलेलो

त्या साडे दहा रु. अर्धा लीटर

चितळे म्हशीच्या दुधाने

पुन्हा सुरू होते

बटनी चाकोरी

मी एका बटनाने

झपाटलेला

पछाडलेला

बटन कॉन्शीअस माणूस

# कंटाळा

कंटाळा
वाढवून घेतला
दाढीसोबत

मग त्याचाही
कंटाळा आल्यावर
गुळगुळीत
दाढीच करून घेतली
आणि पुन्हा
दाढीचा कंटाळा
येईस्तोवर मग
गुळगुळत्या कंटाळ्यावर
घसरगुंडी खेळलो
मनसोक्त कंटाळेस्तोवर

# तुझ्याही अनौरस पदराला बिलगून ----

दु:ख,
दु:खातून
सावरत असल्याचं

दु:ख,
दु:ख
संपत असल्याचं

सुरुवात,
दु:खाचीच
न आठवण्याची

ही वात,
पेटती ठेवणं
दु:खाचं

दु:ख,
दुखतंय ते
अद्यापिही न आकळण्याचं

दु:ख,
दुखत्याचं
स्वत:ला न कळण्याचं

दु:ख,
अलबेल सगळं
मानून चालण्याचं

दु:ख,
दु:ख

गुडघ्यांत अडकलेलं

दु:खं
गुडघ्याची दोनोळी हाडकं
पाहून
गुडघ्यात मेंदू नसलेलं.

आता
सरण आनंदी जगीन
वादा.

## बघ दिवे तरंगताहेत

जनावर स्वत:ला नखं मारू
लागतं तेव्हा?
प्राणायमी मरणाचे दिवे
डोळ्यांत तरंगतात तेव्हा...
वाटेल सारं काही बरं होत,
फक्त आपल्याशिवाय
या जंगलात.

पाठुंगळीवर हल्की ओझी
असतील कर्माची,
म्हणून कुंडीतल्या
लाजाळूच्या पानासह
जे जगतंय त्यावर प्रेम केलं
असशील तरी तू...

निसर्ग देतो स्वात्तता कारण
तोच आहे स्वयंभू, म्हणून
तुझ्या प्रेमाचाही करू नको
माज.

निसर्गाला प्रवाह कळतो
स्थितीशीलते शिवायचा
त्याला ना भान प्रेमाच् ना
माजाचं,
त्याला फक्त बिमोड
करायचा असतो

मक्तेदारीचा सर्वांवर हावी
होण्याचा.
तू सजव साज
हा माज
तुझ्या माजाचा
मरताना तुझ्यातल्या
जनावरानं मारलेल्या
नखांचा.

बघ दिवे तरंगताहेत
पाण्यावर
निसर्गसंपन्न मरणाचे
या जंगलात.

- अजित अभंग, 7775955890

# दिवेलागण

तुझ्या साऱ्या तगमगीचा
वारस आहे मी
तुझी जमापूंजी तीच होती.
तुझी एकट्याची आणि
आपल्या दोघांचीही
भागीदारीतली तगमग
सुरक्षित आहे माझ्या
मेंदूच्या बँकेत,
जगाला कळणार नाही
अशा कोपऱ्यात अन्
कोऱ्या चेहऱ्याच्या कुलूपात.
त्यावर दरोडा पडणार नाही
निश्चितच
आणि तगमगीत चक्रवाढ व्याजानं
वाढच होते,
घटीचं भय तिला नाही.
मी अर्थातच जिवापाड जपेन
या ठेवीला
माझ्यानंतर कुणीही नॉमिनी
नसेल
काळा सर्प होऊन
बसेन त्यावर

जगबुडीपर्यंत.
मोक्षाच्या वर्तमान व्याख्येत
ही तगमग कुठे बसते का
याची कल्पना नाही पण
तगमग जपण्यासाठी तरी
आपल्या वाटांवर
दिवेलागण व्हावी
हीच इच्छा.

**- अक्षय शिंपी**

# ‘तूतिचे ते झाड’

अंगनातल्या तूतिच्या झुडपाकडे पाहून
सांगितले सहज त्याला एक मनचे गूज
किती रे सुंदर सुखी डौलदार तू
रंगिबेरंगी फुलपाखरे रोज येतात कुशीत
पाहूनचाराला, बाळंतपणाला अन् आश्रयाला.
तरी मौन त्याचे भंगले नाही.
इतक्यात आली एक धुव्वाधार वर्षासर
खळकन पडले गळून एक पिकले पान
तेव्हा कळाले मर्म जीवनाचे
सुखचित्राचे भ्रम सारे त्या पानासवे गळाले.

**■ सबिना सांतान थॉमस फोस, गास**
**भ्रमणध्वनी क्र. : 84469 01602**

# इतकं शांत तर

इतकं शांत तर तुला कधीच वाटलं नसेल

इतकं शांत की
तुझ्या उजव्या खांद्यावर बसून
एखादी चिमुकली चिमणी
तुझ्या सर्वज्ञ कानात कुजबूजू शकते

मी पाहू शकतो तुझ्या चेहऱ्यावर आनंद
की तू आहेस
आणि तुझ्या अवतीभोवती चिमण्या

चिमण्या करत नाहीत भांडवल
तुझ्या हातात ठोकलेल्या खिळ्यांचं
तुझ्या रक्तामांसाशी त्यांना
करायचा नसतो कोणताच देवघेवीचा करार
तु देवाचा पुत्रयस
की माणसाचा की कुमारिकेचा की विवाहीतेचा
या गोष्टींचा चिखल चिवडत नसतात चिमण्या
चिमण्या मूकाटपणे मेटिंगरत होतात
तुझ्या डोक्यावरील ध्यानस्थ मुकूटावर
तुझ्याशी असलंच तर चिमण्यांचं
इतकंच जैविक नातं असतं

चिमण्या चिवचिवतात
त्याची प्रार्थना होते

तुझ्या लाकडी पापण्या ओलावतात

तुझे लाकडी ओठ कुजबुजतात
प्रभो, दया कर
आणि हा प्याला माझ्यापासून कधीच हिरावून घेऊ नकोस.

# चिमणी नाही आहे

जी चिमणी आहे
ती चिमणीच आहे असं नाही

एकदा मी पाहिली होती चिमणी
ख्रिस्ताच्या लाकडी खांद्यावर बसलेली

पुन्हा कधीच दिसली नाही
म्हणजे दिसली पण तशी नाही
जशी एकदा दिसली होती

खांदा लाकडीच होता
पण बदलला होता
चिमणी बदलली होती
बसणं बदललं होतं
आणि माझं पाहणं

मी जसं एकदा पाहिलं होतं
चिमणीला ख्रिस्ताच्या लाकडी खांद्यावर
बसलेलं
आणि कुजबुजताना ख्रिस्ताच्या सर्वज्ञ
कानात
तसं पुन्हा कधीच पाहू शकलो नाही

ख्रिस्त विव्हळला होता
हे पित्या शक्य असेल तर
हा प्याला माझ्याकडून कधीच हिरावून
घेवू नकोस

पण पिता घातकी
नेहमीसारखाच
चर्चच्या घंटा घणघणल्या
आणि भाविक पावले वळू लागली
चर्चकडे

चिमणी नाही आहे

आणि असलीच जर चिमणी
तर काय फरक पडतो
किंवा नसल्यानेही

ख्रिस्ताने आपले लाकडी कान
झाकून घेतले आहेत.

■ इग्नेशियस डायस

# मुलीनं मांडलेल्या सवसारात

मुलीनं मांडलेल्या सवसारात
असते वाळक्या पानाची चटणी
लुसलुशीत गवताच्या पालेभाज्या
मातीची पत्ती अन पाण्याचे दूध
ती म्हणत असते माझ्या हातचा चहा पिऊन पहा एकदा

ती खाऊ घालते तिच्या बाळाला
काऊ चिऊचा घास
आईबाळाच्या या अतुल्य वात्सल्याच्या
प्रेमकहाणीचा खेळ चलतो तेव्हा
जगातल्या समस्त काऊ चिऊच्या डोळ्यात
तरळते हृदयंगम पाणी
ती अंघोळ घालते तिच्या बाळाला
करून मांडीचा झुलवा
तिचे बाळ भलताच गोड छोकराये

किती गोड असते तिची इवली दुनिया

तिच्या खेळात नसतो समावेश
लाखमोलाच्या सोन्याचांदीच्या वस्तूंचा

खेळाच्या या नात्यात असते ती
प्रेमदात्री
ती सतत देत राहते प्रेमाचे पावसाळे हर क्षणाला

तिच्या या सवसारात नसतो कोणत्याच
सुखादुःखाला थारा

तिच्या या सवसारात नसतो
कोणासोबतही हेवादावा
ती तिच्या सवसारात असते तटस्थ
एखाद्या ध्यानमग्न साधूसारखी
ती तिच्यातच असते मग्न

मुलीनं मांडलेल्या सवसाराच्या स्वप्नांना आभाळपंख
मुलीनं मांडलेला हा सवसार
खरंच असता प्रत्येक मुलीचा तर
जगातल्या प्रत्येक मुलीनं मारल्या असत्या
प्रकाशवेगानं गगनभराऱ्या

खेळून झाल्यावर तिनं सारा पसारा गुंडाळून ठेवून दिला थैलीत
तेव्हा मनात विचार आला
सवसार मोडून टाकणं इतकं सहजसोप्पं कुठाय
एकदा वर चढलो की कापल्या जाते दोर
नसतो परतीचा रस्ता
की नसते अनडू चे ऑप्शन

अन् मुली तुला हे कसं सांगू
सवसार म्हणजे एकदा मोडून परत थाटायचा खेळण्याचा खेळ नाहीये

- **अमोल विनायकराव देशमुख, महेंद्र नगर,परभणी**
**संपर्क - 7620949985**

# अभागी भारतमाता

जातीच्या व धर्माच्या अग्निकुंडात
भरडला जातो सामान्य जन,
सामान्य स्त्री जमात.

ज्या भारतमातेला
आई, आजी, मावशी, मामी, काकी,
बहीण, मुलगी म्हणून पुजले जाते
तिथे नारीची होते विटंबना.

धर्मांध व जात्यंध घालतात
तिच्या पदराला हात
तिला विवस्त्र करतात, तिच्यावर
अत्याचार करतात,
तिच्या अब्रू चे धिंडवडे काढतात.

कार्ल मार्क्स म्हणतो
धर्म ही अफूची गोळी आहे,
हे खरे आहे का?

प्रत्येक धर्माची निव
प्रेम दया शांती ह्या तत्ववावर
विसावली असताना
हे कसं शक्य होत!

मग हे धर्माचे नराधम
ज्या योनीतुन जन्म घेतात
ज्या स्तनातून दूध प्राशन केले
त्या नारीला कसे विसरतात
त्यांना फक्त स्त्रीतली मादीच दिसते
का?

आपण हे उघड्या डोळ्यांनी कसे
पाहू शकतो?
आपल्या संवेदना संपल्या का?
आपण नामर्द झालो का?

बाप्पा, आम्हाला माफ कर

-- **जॅक गोम्स, आई,चुळणे,वसई.**
**संपर्क - 9028195888**

# जन्म येशूचा

नक्षत्रस्थितीने  दाखविला होता मार्ग
मेंढपाळ आले शोधत घ्याया दर्शन

जन्म ख्रिस्ताचा झाला बेथलेहेम गावी
यशोहवा म्हणजे तारणहार नावी

जोसेफ मरिया चा पुत्र नाझरेथ
मार्ग, सत्य व जीवन मीच सार्थ

जेरूसलेम मध्ये परुशी नि याजक
केला वादविवाद अंधश्रद्धा विरोध

जादू होती त्याच्या स्पर्शात दिसले नित्य
चमत्कार म्हणावे केले अतर्क्य कृत्य

केले मृतांना जिवंत ,रोगी झाले बरे
दृष्टी मिळाली आंधळ्यांना

पाहिले ज्यांनी चालले त्याच्या मागून
वचनांवर पूर्ण विश्वास ठेवून

हत्या करू नका, हिंसा करू नका
व्यभिचार करू नका, शपथ घेऊ नका

दोष लावू नका कुणालाही माया धरा
गरीबांची सेवा करा, प्रेम सर्वांवर करा

सर्वांसाठी गेला ख्रिस्त वधस्तंभावर सुळी
मरणातून उठला पुन्हा स्वर्गात गेला मुळी

■ बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर
पुनावळे, पुणे-४११०३३
मो. 9890567468

# जुदास

माझ्या चतकोर भाकरीसाठी,
मी अनेक भागीदार बनवले;
तूही त्यांत होतास.
माझ्या पुण्याईचे बळ,
मी निवडलेल्यांस दिले;
तूही त्यांत होतास.
माझ्या संवेदना मी वाटत होतो,
तूही त्यांत होतास.
माझ्या आत्म्याला देवाने दिलेली देणगी,
मी सढळ हाताने अर्पण केली;
तूही त्यांत होतास.
तुला मी अधिपती नेमले,
स्वर्गाची वाट दाखवली,
चमत्काराचे प्राक्तन दिले,
या बदल्यात.....
तू मला विकून मोकळा झालास
जुदासा, तू आजही जिवंत आहेस!

■ **आयवन क्रास्टो, उमराळे, वसई**

# तॅ कुपारी हा तुमॅ

हाकोटे नाष्ट्याला कनेरी पेत्या हायद्या
तॅ कुपारी हा तुमॅ
वाला गॉळ्याई बाझी आन बुंबलाई काडी बगॉन
तुमश्यॅ हातपाय गळात्यात हायद्यात
तॅ कुपारी हा तुमॅ
शाळा, कॉलेज आन ऑफिसात बॉठ्ठयान कादोडी बॉलात्या हायद्या
तॅ कुपारी हा तुमॅ
लग्ना मिस जाल्योर वडापाव खाऑन स्प्राईट पेत्या हायद्या
तॅ कुपारी हा तुमॅ
सुवार्ता मांगशा पानापासून वाशित्या हायद्या
तॅ कुपारी हा तुमॅ
तुमश्या पै पावन्यात कमीत कमी ५ जने बायार हायद्यात
तॅ कुपारी हा तुमॅ
तुमश्या नॉनव्हेज आवडिऑ क्रम पयला मावरा, मंग डुकरा,
मंग बकऱ्या आन मंग चिकन हायदॅ
तॅ कुपारी हा तुमॅ
कडॅ पान उबी रॅऑन बाजॅ आयकात्या हायद्या
तॅ कुपारी हा तुमॅ
ऑफिस हुटल्योर घारा जाशी उतळी पडातॅ हायदॅ
तॅ कुपारी हा तुमॅ
नाताळश्या हनाला दुनियेआ कुहन्यापान टोकोरनॅ वसयला येत्या हायद्या
तॅ कुपारी हा तुमॅ
दर वहरा मद्रासला जाऑन उमा हळवो हाडत्या हायद्या
तॅ कुपारी हा तुमॅ
आन हा...कुपारी फॅमिली चॅनलला सबस्क्राईब कॅलॅ हायदॅ
तॅ नक्कीस कुपारी हा तुमॅ

■ **सुनिल डिमेलो, वटार**

# तिची आई

त्याची आई,तिची आई सेम
पण त्यांच्या आईचा होतो गेम
ती कुठे असेल याचा नाही नेम
नातवंडं वाढवताना तिचा क्लेम
तिची आई आता खूप थकते
म्हातारी होण्याआधी वाकते
लेक तिच्यासाठी करूणा भाकते
सासु मात्र उसासे टाकते
बिछाना धरताच टेन्शन येते
कशाला तडमडता,बोलणी खाते
तिच्या आईसाठी घालमेल होते
विचारात पडते,ती रडते
आजारी होताच,ती धडपडते
जिवापाड जपते,बडबडते
घरच्या सेवेत गडबडते
घरची जग सोडते, तेव्हा जागते
देवाकडे मगं माफी मागते
लेकाला कळते ही कशी वागते
तिच्या आईतच तो विसरतो
कर्तव्य चुकतो,मायला मूकतो
गेल्यावर मात्र नुसता भुंकतो
माय मरते,ती आईसाठी झुरते

# खुप कळलं

नोकरी नंतर पगार झाला
हप्ता कापून हाती आला
कधी संपेल काळ वाढला

खुप कळलं,हा शत्रु धाडला

पूर्ण  पगार नाही घेतला
कधी घराच  होई कर्ज
फिरणे तर होते वर्ज्य
मुलं मोठी करताना थकलो

आवडी निवडीला आळा
शिक्षणासाठी घाम गाळा
कमविता झाला रे बाळा
लग्नात  हातभार  निती पाळा
सुनेची सेवा थोडी करा
आजी होण्याची आस धरा
थकलो तरी नातवंडासाठी  मरा
बाप म्हणजे  डोक्याला ताप
आई किती देते रे मनस्ताप
सुन म्हणे नको हा व्याप
मी कशी पोसू तुझे मायबाप
पोरासाठी  नवं घर घेतलं
कर्ज  माझ्या जिवावर बेतलं
अजुन माया ,लोभ दिसतो
रिटायर  झालो अजून फसतो
कुंपणच शेत खाते,मी हसतो
कारण मी बाप,असतो

- **शकुंतला नारायण पाटील, नवाळे**

# कलाकुसर :-

## लिओनार्ड रिबेलो :-

# सकाळ.....

अजून काही पूर्णपणे उजाडलेलं नव्हतं. दरवाजा उघडताच उगाच ते थंडीमधे गुलाबी गुलाबी झाल्यासारखं वाटून बाहेरची गार हवा अलगदपणे घरात शिरते. मी दरवाजा ओढून बागेत पाऊल टाकतो. समोरच, इवल्याश्या गच्च जांभळ्या फुलांनी नटलेल्या एक छोट्याश्या झुडपात बारीक हालचाल जाणवते. फुलांच्या नाजूक कांड्यावर बसून सूर्यपक्ष्यांचं एक जोडपं मध खाण्यात मग्न असते. मंद पावलांनी जवळ जाण्याचा प्रयत्न करतो, तोच आईने लावलेल्या पपईच्या झाडावरच्या फुलावर ताव मारत बसलेली एक कोकिळा आवाज करत पळ काढते. कोकिळेच्या मागोमाग खाली किडे शोधत असलेला भारद्वाज अथवा कुंभारकावळा पहिल्या उड्या मारत व नंतर लांबच लांब भरारी घेत उड्डाण टाकतो. मी जागीच थबकतो.

आजूबाजूच्या निरव शांततेत कानोसा घेत मी श्वास रोखुन तिथेच उभा राहतो. समोर एक इवलंसं फुलपाखरू अगदी शांत व हळुवारपणे एका नाजूक वेलीवर अलगदपणे बसलेलं असते. त्याच्याकडे पाहताना मला उगाच त्याचा हेवा वाटतो. शेवग्याचा झाडावर रात्री वस्तीला असलेलं रान-भाईचं (जंगली सातबहिणी) एक अखंड कुटुंब खाली येऊन चराण्याचा बेत करत असतं. डाव्या बाजूला थोड्या वर पेरूच्या झाडात माझी जराही तमा न बाळगता पेरूचा फडशा पाडत वेडा राघू माझ्याकडे एक नजर फेकतो व दुसरं एक पेरू पंजात पकडून धूम ठोकतो...

सकाळ हळूहळू पुढे सरकते....

***"You can follow my photography page at following links :***

***Follow me on Instagram : [https://www.instagram.com/leonardodafotogravinci](https://www.instagram.com/leonardodafotogravinci) "***


©LeonardoDaFotoğravinci


©LeonardoDaFotoğravinci


©LeonardoDaFotoğravinci


©LeonardoDaFotoğravinci




©LeonardoDaFotoğravinci


©LeonardoDaFotoğravinci



©LeonardoDaFotoğravinci


©LeonardoDaFotoğravinci




©LeonardoDaFotoğravinci


©LeonardoDaFotoğravinci





©LeonardoDaFotoğravinci




## रॉयल बॅप्तिस्ट रॉड्रिग्ज :-















## ऑस्टिन डाबरे :-







## सेलिना कोरिया :-

